म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १३०९

१०८५

संपादक— मु. गो. देशपांडे

# माझे विद्यार्थी जीवन

इतिहासाचार्य
राजवाड्यांचे शिक्षणविषयक
आत्मकथन

REFBK-0014481

महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
महाद्वार रस्ता, कोल्हापूर.

संप
.मु. गो. दे



# 'माझे विद्यार्थीजीवन'

## इतिहासाचार्य राजवाड्यांचे शिक्षणविषयक आत्मकथन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# माझे विद्यार्थी जीवन

अथवा

( इतिहासाचार्य राजवाडे यांचे कनिष्ठ,
मध्यम व उच्च शाळांतील स्वानुभव )

REFBK-0014481

संपादक :

मु. गो. देशपांडे

प्र का श क :
गोविंद वामन कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
महाद्वार रस्ता, कोल्हापूर

© मु. गो. देशपांडे
प्रथमावृत्ति
४ डिसेंबर १९६५
किं म त ६ रुपये

मु द्र क :
गोविंद वामन कुलकर्णी,
सेवा मुद्रणालय, १६७ बी,
विद्यापीठ रस्ता, कोल्हापूर

नंदगावकरांच्या
घरांतील
सर्व मंडळीस

या निबंधाचे मूळ नांव ‘ कनिष्ठ , मध्यम व उच्च शाळांतील स्वानुभव’ असे होते. ते बदलून **माझे विद्यार्थी-जीवन** हे नवे नाव त्याला देण्यात आले आहे. मूळचे नाव कंसात दिलेलेच आहे. मूळचे शुद्धलेखनही बदलून नव्या स्वीकारलेल्या शुद्धलेखनाप्रमाणे छपाई करण्यात आली आहे.

निबंधाच्या शेवटी त्याच्यावरील अतिशय प्रखर अशा एका टीकेची जोडही दिलेली आहे. प्रास्ताविक विवेचनात याचे कारण विशद केलेले असले तरी येथे डॉ. केतकर यांच्या मताचा उतारा देणेही योग्य होईल. “ कै. राजवाडे यांच्या एकंदर तीस वर्षे चाललेल्या लेखन व्यवसायामध्ये अनेक तऱ्हेचे वाद उपस्थित झाले, आणि राजवाडे यांस अनेक लोकांनी दूषणे लावली. कांही प्रसंगी त्यांवर होणारी टीका यथार्थ होती तर अनेक प्रसंगी ती टीका अज्ञानीपणाची होती. राजवाडे यांच्यावर टीका करणाऱ्यामध्ये कांही वर्ग त्यांच्या उत्कट देशाभिमानाला नियंत्रण घालू इच्छिणारा होता. अशा टीकाकारामध्ये कै. विनायक कोंडदेव ओकांचे नाव घेता येईल. राजवाड्यास चित्पावन ब्राह्मणांचे पुरस्कर्ते समजून

किंबहुना पेशवाईची किंवा भटशाहीची किंवा कोकणस्थशाहीची परंपरा चालविणारे हे गृहस्थ आहेत अशी कल्पना करून टीका होई. या प्रकारची टीका करणाऱ्यामध्ये युरोपियन, सारस्वत, कायस्थ प्रभू आणि देवरूखे यांचा उल्लेख केला पाहिजे. सर व्हॅलेंटाईन चिरोलने तर राजवाड्यास राजद्रोह पसरविण्याची नवीन पद्धती शोधून काढणारे असे सर्टिफिकेट दिले आहे. राजवाडे यांच्या कायस्थ प्रभुविषयक एका लेखावरून ‘कोदंडाचे टणत्कार’ आणि ‘राजवाड्यांची गागाभट्टी’ ही पुस्तके निर्माण झाली. त्यानी ‘शेणवी या शब्दाची व्युत्पत्ति ‘सैन्यपति’ अशी लावून शेणव्यास क्षत्रिय ठरविण्याचा प्रयत्न केला. याबद्दल सारस्वताकडून त्यास बराच प्रसाद मिळाला आहे. सरदेसायास देखील मनांतून असे वाटे की, राजवाड्यांनी पानपतच्या मोहिमेचे खापर गोविंदपंत बुंदेल्यांच्या डोक्यावर फोडले आहे, तर कऱ्हाड्यांनी गोविंदपंतांची बाजू घेतली पाहिजे...राजवाड्यांच्या ग्रंथाचे पुनर्मुद्रण जेव्हा होईल तेव्हा त्यांच्यावर होणाऱ्या टीकांपैकी निवडक टीकांचेहि पुनर्मुद्रण व्हावे. राजवाड्याविरुद्ध होणाऱ्या टीका प्रज्ञायुक्त नसतील, तथापि कोणत्या मानसिक स्थितींत राजवाड्यानी लेख लिहिले ती समाजाची मानसिक परिस्थिति स्पष्ट करावयास त्यांच्यावर होणाऱ्या टीका पुन्हा छापल्या गेल्यास उपयोगी पडतील. त्यांच्यावर होणाऱ्या सर्व टीका केवळ मराठीतून झाल्या नाहीत. हरप्रसादशास्त्री यासारख्या अभ्यासकानी इंग्रजीतहि खंडणे लिहिली आहेत. त्यांचेही संकलन अवश्य व्हावयास पाहिजे.” प्रज्ञायुक्त नसलेल्या टीकासुद्धा पुन्हा छापाव्या असे डॉ. केतकर यांचे मत होते; या पुस्तकात दिलेली मंगेश जिवाजी तेलंग यांची टीका ही एका प्रज्ञावानाची टीका आहे. तेलंगांचे विविध ज्ञानविस्तारातील इतर लेख त्यांच्या बुद्धिवादी

विचारसरणीची व मीमांसक म्हणून त्यानी मिळविलेल्या योग्यतेची ओळख पटविणारे आहेत.

या पुनर्मुद्रणाच्या कामी ज्यांचे सहाय्य झाले त्यांचा निर्देश करणे जरूरीचे आहे. आचार्य वि. प्र. लिमये यांनी अतिशय आत्मीयतेने टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालयातील ‘ राजवाडे संकीर्ण लेख संग्रह ’ हे पुस्तक मला उपलब्ध करून दिले. किर्लोस्कर, स्त्री व मनोहर मासिकांचे संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर व त्यांच्या संपादकीय विभागात काम करणारे श्री. फडके व श्री कुंभोजकर यांनी मनोहर मासिकाचा जानेवारी १९४५ चा अंक त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करून दिला. इतरही काही नाणावलेल्या वाचनालयांच्या चालकांनी महत्त्वाच्या संदर्भासाठी मदत केली आहे.

उतारे घेण्याच्या कामी सहाय्य करणारे माझे विद्यार्थी मित्र व आता सहकारी प्राध्यापक श्री. अशोक केंघे यांचाही उल्लेख जरूर आहे.

श्री. गो. वा. कुलकर्णी यांनी या निबंधाच्या पुनर्मुद्रणाची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल त्यांचेही हार्दिक आभार मानले पाहिजेत.

नाशिक<br>
२८ नोव्हेंबर १९६५

– मु. गो. देशपांडे

## महत्त्वाच्या दुरुस्त्या

| | | |
|---|---|---|
| पृष्ठ २ | ओळ १८ | लौकिक, उत्कर्ष व या ऐवजी<br>**लौकिक उत्कर्ष व** असे वाचावे. |
| पृष्ठ १२५ | ओळ १५<br>[तळटीपेची] | अय्यंगार या ऐवजी<br>**अय्यर** असे वाचावे. |
| पृष्ठ १४८ | ओळ २२ | इतिहासंशोधक या ऐवजी<br>**इतिहास शोधक** असे वाचावे. |
| पृष्ठ १५१ | ओळ ९ | वैर या ऐवजी<br>**स्वैर** असे वाचावे. |
| पृष्ठ १५८ | ओळ २ | विष्णुशास्त्री या ऐवजी<br>' **विष्णुशास्त्री** असे वाचावे. |

४१९६४ १३.१.१ २६-१-६०

# प्रास्ताविक

## राजवाडयांची चरित्रविषयक थोडीशी माहिती :

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचे नांव त्यांच्या अतुलनीय इतिहास संशोधनकार्याने प्रत्येक सुशिक्षित महाराष्ट्रीयाच्या परिचयाचे झाले आहे. वास्तविक चिपळूणकर युगाची अखेर राजवाड्यांच्या कार्याच्या समाप्तीशी सर्व अर्थाने जुळण्यासारखी असल्याने मराठी वाङ्मयांत १९२० पर्यंत या युगाचा कालावधी मोजण्याची प्रवृत्ती कांहीं वाङ्मय विवेचकांत आढळते. तिच्यात दुरुस्ती करून तो कालखंड १९२६ अखेर पर्यंत धरला पाहिजे. मराठी वाङ्मयाच्या अंतः-प्रवृत्तींचा आढावा घेतल्यास असे दिसेल कीं, लोकमान्य टिळक यांच्या निधनाचे वर्ष जरी १९२० असले तरी टिळक कालातील जोरकस-पणा आणि प्रचंड कामे करून दाखविण्याची उमेद १९२६ पर्यंत मराठी वाङ्मयात अखंडितपणे आढळते. केतकरांचा ज्ञानकोश या वेळ-पर्यंत सिद्ध झाला. केळकरांचे महत्त्वाचे लेखन या वेळपर्यंतच होत होते. वा. म. जोशी यांचे महत्त्वाचे लेखन या वेळपर्यंत बरेचसे झाले होते. चिंतामणराव वैद्य यांची कामगिरी याच काळातील. पां. वा. काणे यांचे काम या काळातच उठून दिसले. इतिहास क्षेत्रातील राजवाड्यांच्या समकालीनांची कामगिरी त्यांच्याच कालखंडात

पडते हे सांगण्याची गरजच नाही. १९२६ नंतर मराठी वाङ्मयात नवीन प्रवृत्ती दृग्गोचर झाल्या. रत्नाकर मासिकाचा जन्म या प्रवृत्तींचा सूचक आहे. म्हणून राजवाड्यांच्या आयुर्मर्यादेने एका स्पष्टपणे विभागल्या जाणाऱ्या वाङ्मयीन कालखंडाची जाणीव होते असे म्हटले गेले पाहिजे. राजकारणांत टिळक युगाचा अस्त आणि गांधीयुगाचा उदय ढोबळपणे मांडण्यासाठी १९२० हे वर्ष उपयोगी असले तरी वाङ्मयीन विवेचनात अंतःप्रवृत्तींचा मागोवा घेण्याचा प्रयत्न असतो, त्याला अनुसरून ध्येयवादी कणखर आणि तपस्वी जीवनाचे प्रतीबिंब ज्यांच्या कार्यात व लेखनात पडलेले आहे अशा प्रखर व्यक्तिमत्त्वांची मालिका १९२६ पर्यंत अप्रतिहत चाललेली आपणांस दिसेल.

राजवाड्यांचा जन्म २४ जून १८६३ रोजी झाला. आषाढ शुद्ध अष्टमी शके १७८५ या दिवशी बुधवारी हस्त नक्षत्रावर दुपारी १२ वाजण्याचे सुमारास त्यांचा जन्म झाला असल्याचे त्यांच्या पत्रिकेत नमूद केले आहे. या पत्रिकेचा थोडासा अभ्यास करून प्रसिद्ध राजवाडेभक्त वा. दा. मुंडले यांनी काही मीमांसाहि केली आहे. राजवाड्यांची असामान्य बुद्धिमत्ता, त्या बुद्धीला केव्हा केव्हा येणारी विक्षिप्तपणा किंवा विपर्यास करण्याची लहर, शत्रूचे तेज न पडता उलट राजवाड्यांचीच छाप विरोधकावर पडणे, लौकिक, उत्कर्ष व धनप्राप्ति न होण्याची कारणे, पुष्कळशा अर्धवट राहिलेल्या गोष्टींची पूर्ती न होणे, संसारसुखाविषयी त्यांना वाटणारे औदासिन्य, अध्यात्म-बुद्धीच्या प्रकर्षाबरोबरच नास्तिक मताकडेहि झुकण्याचा संभव, या गोष्टी राजवाड्यांच्या कुंडलीच्या आधाराने मुंडल्यांनी दिग्दर्शित केल्या आहेत. ‘त्यांच्या मकर लग्नामुळे प्रवासाची व हिंडण्याची फार आवड, गूढपणा, भित्रेपणा, अचाट महत्त्वाकांक्षा, सदा संशयी, वर्ण गोरा–निमगोरा, शरीर सडसडीत, लांबट तोंड, चंचल वृत्ती, या

गोष्टींचा उलगडा होतो' असे ज्योतिषशास्त्रदृष्ट्या मुंडल्यांचे म्हणणे आहे.

वरील परिच्छेदात राजवाड्यांच्या शारीरिक बांध्याबद्दल, स्वभाव-वैशिष्ट्याबद्दल, महत्त्वाकांक्षी व करारी वृत्तीबद्दल आणि बुद्धि-सामर्थ्याबद्दल जे एकत्रित विवेचन आहे ते त्यांच्या चरित्राचे सार रूपाने वर्णनच आहे, हे कोणालाही सहज दिसेल. तथापि राज-वाड्यांच्या चरित्रातील काही घटनांची ओझरती ओळख करून घेऊन नंतर या निबंधाच्या पुनर्मुद्रणाच्या दृष्टीने ज्या काही बाबींचा उहापोह व्हावयास पाहिजे त्यांचा विचार करू.

राजवाड्यांच्या पणज्याचे नाव वैजनाथ, आज्याचे नाव बापजी व वडिलांचे नाव काशिनाथ. राजवाड्यांच्या आईचे माहेरचे नाव आवडी. सासरचे नाव यमुना. वडील काशिनाथपंत हे पुण्यास वकिली करीत होते. राजवाड्यांच्या जन्मानंतर साधारण ४ वर्षांनी त्यांचे वडील वारले. (सन १८६७).

राजवाड्यांचे चुलते जगन्नाथ बापजी हे पुणे जिल्ह्यातील वडगांव या गावी मराठी वकील होते. इसवी सन १८९५ च्या मे महिन्यात हे गृहस्थ वारले. वडगांव येथे राजवाडे, त्यांच्या मातोश्री व त्यांचे वडील बंधु काही दिवस राहात असत. आपल्या पदवी परीक्षेचा शेवटचा अभ्यास आपण वडगांव येथे केला असे राजवाड्यांनी नमूद केले आहे.

'राजवाड्यांची सांपत्तिक स्थिति अगदी सामान्य प्रकारची होती. परंतु त्या काळची स्वस्ताई, त्यांचा प्रपंचखर्च व शिक्षणखर्च भाग-विण्यासारखी असल्यामुळे विशेष अडचण पडली नाही.' १८८७ साली वैजनाथ काशिनाथ राजवाडे याना कराचीस प्रोफेसर नेमण्यात आले. ते तेथे १८९६ पर्यंत होते. त्याआधी कांही वर्षे वैजनाथपंत हे डेक्कन कॉलेजमध्यें फेलोही होते. विद्यार्थी दशेत विल्सन कॉलेजमध्ये

असताना वैजनाथपंतांनी विसुभाऊंना विल्सनमध्ये दाखल केले होते. कॉलेज चालकांनी वैजनाथपंतांची विनंती मान्य करून विश्वनाथपंतांची फी देखील माफ केली होती. परंतु विल्सन कॉलेज सोडून विश्वनाथ काशिनाथ एल्फिन्स्टनमध्यें जाऊं लागले. पुढे प्रिन्सिपॉल म्याकिकन यांनी वैजनाथपंतास राजवाड्याबद्दल विचारले असतां त्यांनीं सांगितले कीं, ' मला काहीच माहीत नाही. ' म्याकिकन यांना या गोष्टीचा राग येवून वैजनाथपंताची शिष्यवृत्ती ८ रुपये होती ती ६ रुपये करण्यांत आली. विश्वनाथपंत मात्र एल्फिन्स्टन कॉलेज सोडून देऊन पुण्यांत आले व तेथे सेकंड ग्रेड पब्लिक सर्व्हिस परिक्षेकरिता तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा वर्ग चालवून दरमहा ३०-३५ रुपये मिळवूं लागले. हा वर्ग दीड वर्षें त्यांनीं पुण्यांत चालविला. प्रस्तुत निबंधात ज्या कारकुनी शिक्षणाची तयारी करणाऱ्या शिक्षण पद्धतीवर राजवाड्यानी कोरडे ओढले आहेत त्याच कारकून बनविणाऱ्या विशाल कार्यपद्धतीतील राजवाडे हे एक लहानसे भागीदार सुरवातीला होते. हे ध्यानी घेतले म्हणजे तेलंगांच्या टीकेतील काही मार्मिक शब्दप्रयोगांचा नीट उलगडा होतो. वर्ग चालविल्याचा हा उल्लेख स्वतः राजवाड्यानी या निबंधातच केलेला आहे.

हा वर्ग बंद करून राजवाड्यांनी डेक्कन कॉलेजात नांव दाखल केले, त्याला कारण वैजनाथपंतांची डेक्कन कॉलेजात फेलो म्हणून नेमणूक होय. राजवाड्यांच्या प्रस्तुत निबंधात पुढील सर्व शिक्षण-क्रमाची हकीकतही दिलेलीच आहे. निरनिराळे विषय पदवी परिक्षे-साठी त्यानी निवडलेले दिसतात. त्यापैकी इतिहास हा विषय शेवटी त्यानी मुक्रर केला आणि जरी तो विषय शिकविणारा कोणी प्राध्यापक डेक्कन कॉलेजात त्या वेळी नव्हता, तरी इतिहास विषय घेऊनच ते बी. ए. झाले.

त्याआधी त्यांच्या स्वतःच्याच विनंतीवरून वैजनाथपंतांनी १८८८ साली राजवाड्यांचा विवाह घडवून आणला. विष्णु नारायण गोडबोले या पुण्यांतील सुखवस्तु पुस्तक विक्रेत्यांची कन्या मथुताई हिच्याशी राजवाड्यांचे लग्न झाले. १८९१ सालचे माघ महिन्यांत त्यांना एक मुलगा झाला. परंतु तो २ महिन्यांचा होऊन वारला. पुढे दुसऱ्या बाळंतपणात पत्नी व नुक्तीच जन्मलेली कन्या ही दोन्हीही दगावली. १८९२ साली ही दुर्घटना झाल्यानंतर दुसऱ्या लग्नाचा विचार त्यांनी मनात आणला नाहीं. राजवाड्यांच्या पत्नीच्या निधनाचें वर्ष एके ठिकाणी १८९२ तर दुसऱ्या ठिकाणी १८९३ असे भट यांनी राजवाडे चरित्रात दिलेले आढळते.

त्यांची न्यू इंग्लिश स्कूलमधील नोकरी अशीच थोडीशी काल निर्णयाच्या दृष्टीने विसंगतिमिश्र आहे. एके ठिकाणी १८९१ हें वर्ष त्यांच्या न्यू स्कूलमधील नोकरीच्या सुरवातीचे वर्ष म्हटले आहे, तर दुसऱ्या ठिकाणी त्यांनी १८९२ पासून शिक्षकाची नोकरी न्यूस्कूल-मध्ये धरली असे म्हटले आहे. ज्या अर्थी अडीच वर्षांचा कालावधी या नोकरीचा दिला आहे व ऑगस्ट १८९३ मध्यें त्यांनीं या नोकरीचा राजिनामा दिला असें नमूद करण्यांत आले आहे, त्याअर्थी १८९१ हे वर्षच बरोबर दिसते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा इतिहास या ग्रंथात प्राध्यापक प. म. लिमये यांनी बऱ्याच तत्कालीन शिक्षकांची माहिती दिलेली आहे. परंतु त्यांत वि. का. राजवाडे यांचे नांव नाही. किंबहुना १०-१२ शिक्षकांनी १८९३ च्या ऑगस्टमध्ये सामुदायिकरीत्या राजीनामे देऊन न्यू इंग्लिश स्कूल सोडले. या घटनेचाहि भटांनी राजवाडे चरित्रात जो उल्लेख केलेला आहे तो डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या इतिहास ग्रंथात आढळत नाही.

१८९४ च्या जानेवारी पासून राजवाडयांनी भाषांतर मासिक

चालू केले. या महत्त्वाच्या मासिकाविषयी निश्चित माहिती कोठेही अद्यापि उपलब्ध नाही. ज्या मंडळींनीं राजवाड्यांविषयी लिहिले आहे त्यांतील कांहीनी भाषांतर मासिकाविषयी कांहींच लिहिलेले नाही आणि ज्यांनी लिहिलेले आहे, त्यांनी केवळ अंदाजानेच लिहिले आहे. ग्रंथमालेच्या पांचव्या वर्षाच्या साल अखेर या सदरांत विजापूरकरानी भाषांतर मासिकातून कोणकोणते ग्रंथ छापले गेले त्याची सविस्तर माहिती दिली आहे. परंतु विजापूरकर या लेखकाची स्मृतीच आजच्या महाराष्ट्रास नसल्यानें त्यांच्या ग्रंथमाला व विश्ववृत्त या मासिकातून मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकाला केवढी महत्त्वाची माहिती प्राप्त होण्यासारखी आहे याची नीट जाणीव आजच्या अभ्यासकात आढळत नाही. ग्रंथमालेच्या ५ व्या वर्षीच्या साल अखेर या लेखाचे महत्त्व भाषांतर मासिकाच्या दृष्टीने येथे जाता जातां सांगितलें. खेरीज वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, ना. गो. चापेकर, किबे, वि. ल. भावे, वा. गं. टिळक इत्यादि श्रेष्ठ महाराष्ट्रीय लेखकांचा विचार करीत असतांना देखील विजापूरकरांच्या या दोन मासिकातील या मंडळींचे आधीचे लेखन ध्यानी घेणें जरूर आहे. राजवाड्यांच्या विषयी विचार करणाऱ्याने तर विजापूरकर वगळल्यास राजवाड्यांच्या लेखक व राष्ट्रशिक्षक म्हणून बनत जाणाऱ्या पहिल्या १०-१५ वर्षांच्या अत्यंत महत्त्वाच्या कालखंडाचे अज्ञान दर्शविल्यासारखे होईल.

खुद्द भाषांतर मासिकाचेच कांही अंक ज्यांस पहावयाचे असतील त्यांनीं भारत इतिहास संशोधक मंडळांत या अंकांचे एक बांधीव पुस्तक आहे ते पहावे. त्यात शि. म. परांजपे यांनीं केशव मिश्र विरचित तर्क भाषा या ग्रंथाचे भाषांतर केलेले आहे. (१८९४ सत्यप्रकाश छापखाना). श्री. काशिनाथ खंडेराव गर्दे बी. ए. यांनी

बिशप बटलर यांची नीति व्याख्याने हे भाषांतर केले आहे. (१८९४ श्रीविठ्ठल छापखाना). वसाहतीशी सख्य करण्याच्या सूचनेच्या वेळी दिलेले एडमंड बर्कचे व्याख्यान याचे भाषांतर आहे. भाषांतरकारांचे नांवमात्र नाही. टामस पेनचा सारासार विचार हा ग्रंथ भाषांतरित केला आहे; जॉन स्टुअर्ट मिलचा 'जनपद हितवाद' हा ग्रंथ भाषांतरित केला आहे. झेनोफनकृत हीरो अथवा राजांची दैन्यावस्था हे भाषांतर येथे आढळते; आणि भाषासरणी व भाषांतर मासिकाचा मूळचा उदात्त हेतु या दोन्ही दृष्टीने पाहिल्यास राजवाड्यांच्या प्रातिनिधिक लेखसंग्रहांत त्यांच्या अशा प्रभावी भाषांतरशैलीचा नमुना अवश्य घेतला गेला पाहिजे. मराठी साहित्य दर्शन या अ. वि. गृह प्रकाशन मालेतील राजवाडे दर्शनांत असा एखादा राजवाड्यांच्या भाषांतराचा नमुना पाहावयास मिळेल असे वाटले होते. परंतु दि. वि. काळ्यांसारख्या विचक्षण संपादकांनी सुद्धा तसे केलेले नाही. असो. क्रीटो अथवा कर्तव्यकर्म हे भाषांतर या बांधीव पुस्तकांत आहे. माधवाचा सर्व दर्शनसंग्रह यात आहे. इतरही कांही ग्रंथ या पुस्तकांत आढळतात. साक्रेटिसाच्या अंतकाळाचें वर्णन ज्यांत आहे तो संवाद या बांधीव पुस्तकात पृ. १ पासून पृष्ठे १४ पर्यंत म्हणजे ग्रंथ समाप्तीपर्यंतचा आहे. हे बांधीव पुस्तक कोणी गणेश बापूजी वाव, क्लार्क, दि पूना कॉटन मिल, याचे दिसते. आणि त्यावरून भाषांतराचा जो हेतु राजवाड्यानीं प्रसिद्ध केला होता तो सिद्धीस जात होता हें उघड दिसते. राजवाडे लिहितात 'ज्यांना अन्य भाषेंतील रसास्वाद घेणेची इच्छा असून तशी साधने नाहीत त्याच्याकरिता ही साधने आम्ही तयार करीत आहोत.'

पहिल्या वर्षी भाषांतर मासिकाने लहान मोठे सहा ग्रंथ छापले. नऊ ग्रंथांची भाषांतरे तेव्हा पुढे चालू होती. 'भाषांतराचा उपोद्घात'

व ‘ गतवर्ष ’ हे भाषांतर मासिकाविषयींचे राजवाड्यांचे दोन महत्त्वाचे लेख चित्रशाळेच्या लेखसंग्रहांत आढळतात. हे मासिक सुरू करण्यात राष्ट्राच्या उभारणीचा त्यांचा हेतु होता. भाषांतर मासिकाचे ध्येय राष्ट्रातील प्रतिभा जागृत करणे, राष्ट्रांत अभिमानाचे वारे खेळविणे आणि स्वभाषेची सुसंपन्नता घडवून आणणे हे होते. ‘ कोणत्या तरी मार्गाने देशसेवा घडावी हा आमचा मुख्य उद्देश आहे ’ असे राजवाडे भाषांतराचा उपोद्घात या लेखात म्हणतात. ‘ गतवर्ष ’ या लेखात मातृभाषेची स्वत्व रक्षणाच्या दृष्टीने महती वर्णन करून ‘ बाल शाळा-तून व पाठशाळातून सर्व विद्या आपल्या मातृभाषेच्या द्वारे शिकविणे अत्यावश्यक आहे. एका नव्या विश्वविद्यालयाची स्थापना करून तेथें इष्ट प्रयोजनांस हितावह अशा परीक्षकांची योजना केली पाहिजे व येथील विद्याधरांचा उपयोग देशातील व्यापाऱ्यांना व संस्थापकांना होईल अशी तजवीज करणे इष्ट आहे. तसेच या सर्व गोष्टी जाणून सवरून घडवून आणण्याचा प्रयत्न करण्याचा ज्याअर्थी उद्देश आहे, त्याअर्थी या प्रयोजनांला साफल्य आणण्यास ज्याची अंती मदत होईल तो ग्रंथसंग्रहही मराठीत तयार करणे जरूर आहे.’ असा अंतीम हेतू त्यांनी प्रगट केला होता.

राजवाड्यांच्या चरित्राची त्रोटक रूपरेषा देताना भाषांतर मासिकाविषयी जे थोडक्यात येथे सांगितले आहे, त्यावरून शिक्षण आणि राष्ट्राची बांधणी याविषयीचे विचार राजवाड्यांच्या व इतर समकालीन धुरीणांच्या मनात एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विशेषतः कर्झनशाहीच्या काळात कसे आकारित होत होते तेही ध्यानात येण्यासारखे आहे. डेक्कन कॉलेजमधील शिक्षण आणि संस्कार यांचा स्पष्ट परिणाम राजवाडे आणि विजापूरकर यांच्यावर पडलेला जर कोठे दिसत असेल तर त्यांच्या या भाषांतराच्या

प्रयत्नात होय. राजवाड्यांनी जी पुस्तके निवडलीं त्यातील काही सेल्बी यांच्या संपादनाची विषय झालेली आहेत, तर काही डेक्कन कॉलेजमध्ये अभ्यासक्रमात तेंव्हा नेमली गेली होती अशीही आहेत. या निबंधात बेकनच्या ॲडव्हान्समेंट ऑफ लर्निंगला राजवाड्यांनी जुने-पुराणे पुस्तक ठरविले आहे, परंतु त्याचे भाषांतर मात्र त्यांच्या मासिकातून इव्यासाने आधी दिले गेले होते. हळुहळू राजकीय परिस्थिति बदलू लागली तसतशी राजवाड्यांची प्रतिक्रिया निराळी झाली हे यावरून उघड होते. प्रस्तुतचा निबंध हा कर्झनच्या युनिव्हर्सिटी सुधारणेच्या कायद्यामुळे ज्या तीव्र प्रतिक्रिया हिंदुस्थानभर झाल्या त्या प्रतिक्रियांच्या पैकीच एक लहानशी प्रतिक्रिया आहे. तथापि या निबंधाची पायाभूत अशी विचारसरणी बऱ्याच वर्षांपासून आकारित होत होती असे भाषांतर मासिकाविषयींच्या दोन लेखावरून आणि जी भाषांतरे त्या मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झाली त्यांतील एकदोन पुढे ज्ञानाच्या अद्यावत्पणाच्या दृष्टीने राजवाड्यांना तितकीशी उपयोगी वाटलीं नाहींत तरी इतर काही ग्रंथावरून निसंदिग्ध रीतीने स्पष्ट होते.

भाषांतर मासिक सदतीस महिने चालल्यानंतर प्लेगमुळे असो किंवा श्री विठ्ठल छापखान्याला आग लागून नुकसान झाले म्हणून असो, परंतु ते बंद झाले. अशा अडचणी राजवाड्यांच्या पाचवीला पुजल्या सारख्या दिसतात. परिस्थितीने अत्यंत कठीण कसोटीवर पारखून घेऊन मगच त्यांना इतिहासाचार्य म्हणून मान्यता दिली आहे. इतिहास साधनांचे बावीस खंड त्यानी प्रकाशित केले खरे, परंतु पहिला खंड अग्निप्रकोपाच्या भक्षस्थानी पडला होता, तो पुन्हा छापावा लागला. तो छापला त्यात अशुद्धे फार राहिली म्हणून रद्दीच्या भावाने विकावा लागला. आणि तिसऱ्यांदा त्याचे मुद्रण करावे लागले. इतिहास साधनासारखा ग्रंथ कसोशीने छापला गेल्यावाचून

त्याचे महत्त्वच उरणार नाही. छापलेला ग्रंथ रद्द ठरविण्याची राजवाड्यांप्रमाणेच महात्मा गांधी यांच्यावरही पाळी आली होती. अशा उदाहरणावरून कसोशीने काम करण्याची व दुर्लंघ्य पर्वत ओलांडावे लागले तरीही कर्तृत्व कोमेजू न देण्याची थोर सेवकांची निश्चयी वृत्ती दिसून येते. विजापूरकर आणि राजवाडे यांची या कामांतील थोरवी प्रतिकूल परिस्थितीमुळे अधिकच उठून दिसते.

राजवाड्यांच्या चरित्रात भारत इतिहास संशोधक मंडळाच्या स्थापनेला केंद्रस्थानीचे महत्त्व आहे असे म्हटले तरी चालेल. ज्याला राजवाडे चरित्र तळापासून पहायचे असेल त्याला राजवाड्यांच्या जीवनातील या मंडळाचे स्थान आणि मंडळाशी राजवाड्यांचा अखेरीस तुटलेला संबंध याचा सर्वांगीण विचार करावाच लागेल. या प्रास्ताविकात तशा चर्चेची कांहीच गरज नाहीं. कारण भा. इ. सं. मंडळ १९१० सालीं अस्तित्वात आले. हा निबंध १९०४ सालचा आहे. म्हणून या मंडळाविषयी येथे अधिक विस्ताराने लिहिण्याची काही गरज नाही. मात्र मंडळाच्या सभासदाच्या यादी-कडे नजर टाकली तर आपल्याला असे आढळते की, महाराष्ट्रातील बहुतेक सर्व महत्त्वाची माणसे या कार्याशी तेव्हा संलग्न झालेली होती. हे सभासद वेगवेगळ्या श्रेणीचे असतील, परंतु त्यांतून फारसे कोणी बाहेर राहिलेले दिसत नाहीत. महाराष्ट्रीय संत मंडळींनी मराठी भाषेची सेवा प्रभावीपणे केल्यामुळे महाराष्ट्राचा भूगोल ठरला हे सांगणाऱ्या टिळकांचा राजवाड्यांच्या तद्विषयक मताशी थोडासा मतभेद झाला असला किंवा ॲनी बेझंटच्या हिंदु कॉलेजाविषयी टिळकांचे मत उदार-पणाचे तर राजवाड्यांचे अगदीच अनुदारपणाचे असा जरी उघड फरक दिसत असला, तरी टिळकांना राजवाड्यांच्या कार्याबद्दल आदर वाटत होता, हे मंडळाच्या पहिल्या काहीं वर्षांच्या इतिहासावरून कळून येते. सर्व

लोकानी राजवाड्यांच्या महनीय कार्याची जाणीव योग्य रीतीने ठेवली होती. पण खुद्द इतिहास संशोधनाचे कार्य व प्रकाशनाचे कार्य मंडळाकडून जलदीने होईनासे झाल्यावर राजवाड्यानी तुसडेपणाची, संशयखोरपणाची, त्राग्याची आणि हट्टवादीपणाची भूमिका घेतली, व मंडळाशी असलेला आपला संबंध तोडून टाकला. म. म. पोतदार यानी एका पत्रात जें म्हटले आहे ते येथे उद्धृत करण्यासारखे आहे. ‘राजवाडे माझे गुरु आहेत, वंद्य आहेत, विद्वान आहेत, थोर आहेत, कष्टाळू आहेत, स्वार्थत्यागी आहेत, बुद्धिमंत आहेत, निश्चयी आहेत, एकनिष्ठ आहेत, विभूती आहेत, अद्वितीय आहेत. त्यांच्या राष्ट्रसेवेला तोड नाही; त्यांचा मी कट्टा भक्त आहे; हे मी किती वेळा लिहू? त्यांच्या संगतीत मी कित्येक वर्षे काढली आहेत. इतके आहे तरी त्यांचे दोष तेही गुणच आहेत असे म्हणायला मी तयार नाही. त्यांचा संशयखोरपणा, त्यांचा एककल्लीपणा, त्यांचा हट्ट हे नेहमीच चांगले असे मी म्हणणार नाही. श्रीमंत तात्यासाहेब याना संस्था आपल्या तंत्रात घ्यावयाची आहे. टिळकाना संस्था ताब्यात घ्यावयाची आहे वगैरे राजवाड्यांची विधाने म्हणजे मला तर निराधार वल्गना वाटतात.’

१९१७ सालापासून राजवाड्यानी भारत इतिहास संशोधक मंडळामधून आपले अंग काढून घेतले.

‘मराठ्यांच्या इतिहासाची साधने’ याखेरीज राधामाधव विलास-चंपू, महिकावतीची बखर, ज्ञानेश्वरी, दासोपंताची पदे, मराठी छंद, सुबंत विचार व इतर कित्येक संकीर्ण लेख राजवाड्यानी आपल्या हयातीत लिहिले. महानुभावी वाङ्मयाचा उलगडा त्यानीच करून दाखविला. पुढे पुढे तर भाषाविषयक विवेचनात आणि समाजशास्त्रीय लेखनात त्यांची बुद्धि रमू लागली होती. डॉक्टर केतकर म्हणतात

की, राजवाड्यांच्या इतिहासविषयक कामगिरीपेक्षा त्यांची भाषाविषयक कामगिरी अधिक गौरवास्पद ठरली पाहिजे. 'राजवाड्यांची भाषाशास्त्रविषयक कामगिरी लक्षात घेतली तर तीपुढे अनेक मोठमोठ्या अभ्यासकांचे प्रयत्न फिक्के पडतील. राजवाड्यांच्या अनेक कामगिऱ्यांपैकी सर्वांत अधिक मोठी कामगिरी कोणती हे ठरवून राजवाड्यांचे वर्णन करावयाचे झाले तर त्यास भाषाशास्त्रज्ञ म्हणावे लागेल आणि त्यांची गणना अत्यंत मोठ्या वैयाकरणात करावी लागेल. हेमचंद्र आणि वररुचि यांचे प्रयत्न राजवाड्यांच्या प्रयत्नांच्या दृष्टीने काहीच नाहीत. इतिहासाचार्य किंवा इतिहाससंशोधक हे नाव राजवाड्यास देण्यात आपण त्यांच्या कार्याचे अज्ञान दाखवू. त्यांच्या बौद्धिक कार्याचे गुरुलघुत्व माझ्या मते १) भाषाशास्त्र, २) वैयाकरण, ३) शब्दसंग्राहक व ४) इतिहास संशोधक या अनुक्रमाने आहे.'

पुढे धुळ्याला वर्षांतून बरेच दिवस ते राहू लागले होते. त्यांच्या सहवासात या वेळी विशेषत्वाने येणारे कै. कृ. पां. कुलकर्णी लिहितात की, 'अलीकडे अलीकडे युद्ध शास्त्रासंबंधी लेख लिहिण्याचे त्यांच्या डोक्यात घोळत असे आणि त्याकरिता साधने जमविण्याचे इच्छेने एका अतिशय जुनाट गुहेमध्ये मांग गारुडी लोक सोबतीसाठी बरोबर घेऊन गेल्याच्या मागील नाताळात ( १९२५ मध्ये) त्यानी संशोधन चालविले होते. परंतु दुर्दैव हे की त्या गुहेमध्ये पडलेल्या मुक्कामात विषारी हवा घेतल्यामुळे प्रकृती जी एकदा ढासळली ती पुन्हा काही ताळ्यावर आली नाही व त्यांतच पुढे त्यांचा अंत झाला.'

राजवाड्यांच्या चरित्राचा व्यवस्थित उलगडा होण्यासाठी अनेक गोष्टी तपशीलवार तपासल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, त्यांच्यावरील एका मृत्युलेखात असे म्हटले आहे की, ते काही दिवस मराठा या वृत्तपत्रात सहसंपादक म्हणून काम करीत होते. त्यांच्या मृत्यूविषयीही

थोडेसे गूढ आहे. त्यांचे चरित्रकार भट म्हणतात की, तेव्हा रक्तदाबाचा विकार नवीन असल्यामुळे राजवाड्यांना तो माहीतच नव्हता. परंतु ते रक्तदाबाच्या विकारानेच वारले. राजवाड्यांच्या आठवणी निवेदन करणारे कल्याणचे श्रीयुत फडके हे म्हणतात की, स्वामी श्रद्धानंद यांचा खून झाला आणि त्या घटनेचा राजवाड्यांच्या मनावर एवढा जबरदस्त आघात झाला की, ते सारखे मोठमोठ्याने म्हणत राहिले 'याचा सूड कोणीच कसा घेत नाहीं' आणि या अवस्थेतच त्यांना भ्रम झाला व ते पुढे २-३ दिवसांनी वारले. स्वामी श्रद्धानंद यांचा खून २३ डिसेंबर रोजी झाला, असे चित्राव शास्त्रींच्या कोशात नमूद आहे. राजवाडे ३१ डिसेंबर १९२६ ला वारले. तेव्हां ही शक्यता आहे किंवा नाही हे ठरविताना राजवाड्यांच्या मनाची ठेवण, त्यांच्या निष्ठा, आणि त्यांची रामदासी वृत्ति ध्यानी घेतल्यास या गोष्टीची संभवनीयता वाढते. परंतु साने गुरुजींनी सविस्तर रीतीने त्यांच्या लहानशा राजवाडे चरित्रात राजवाड्यांच्या मृत्यूविषयी लिहिलेले आहे. त्या वृत्तांतात असा भ्रम झाल्याचे व त्यांच्या संवेदनाशील मनावर श्रद्धानंदांच्या खुनाचा परिणाम झाल्याचे कोठेही म्हटलेले नाही. उलट सोमवार दिनांक २७ डिसेंबर १९२६ पर्यंत त्यांची प्रकृती उत्तम होती व मंगळवारी सकाळी साडे अकरा वाजता जेवणास बसेपर्यंत त्यांना स्वतःलासुद्धा आपल्या प्रकृतीची कांहीं कल्पना नव्हती, असे म्हटले आहे.

राजवाड्यांच्या चरित्राविषयी अनेक दृष्टीने उहापोह व्हावयास पाहिजे असे जे आधी म्हटले त्याची दोन उदाहरणे येथे दिली. परंतु एवढी ही त्रोटक रूपरेषा पुरेशी आहे असे मानून आता इतर बाबींकडे वळू.

## शिक्षणविषयक विचारांना महाराष्ट्रात मिळालेली चालना :

स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचा विचार सदैव मनाशी स्फुरावा असे जे शिक्षण ते राष्ट्रीय शिक्षण, ही कल्पना एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विशेषतः कर्झनशाहीच्या दिवसात बळावली. त्या आधी शिक्षणाविषयीची दृष्टि कोणती होती, तिचा विकास कसकसा होत गेला, कोणकोणत्या महाराष्ट्रीय विचारवंतानी व धुरीणांनी शिक्षणविषयक कार्य करून ठेविले आहे किंवा त्याबद्दलचे आपले विचार प्रगट केले आहेत या गोष्टीचा सामग्र्याने विचार अद्यापि कोणी मांडलेला नाही. प्राचीन भारतीय शिक्षणावर संशोधनपर कांही ग्रंथ झाले आहेत; ब्रिटिश अमलांतील सरकारी धर्तीचा शिक्षणक्रम कसाकसा विकसित झाला तेहि सरकारी कागदपत्रांच्या सहाय्याने मांडण्यात आले आहे, परंतु ब्रिटिश अंमल सुरू झालेल्या पहिल्या अवस्थेत, पुढे विद्यापीठांची स्थापना झाल्यानंतर, त्या शिक्षणकार्यांचे मूल्यमापन करण्यासाठी १८८२ साली जे कमिशन आले तेव्हा, १९०६ च्या राष्ट्रीय शिक्षण विषयक चळवळीला उधाण आले होते; तेव्हांच्या अवस्थेत, व पुढे गांधीयुगापर्यंत, अशा निरनिराळ्या कालखंडात ज्या ज्या स्त्रीपुरुषांनी या संबंधी वैचारिक किंवा प्रत्यक्ष कार्यरूपाने कांही प्रयत्न केले आहेत त्या सर्वांचा विस्तृत इतिहास निवेदन करण्याची अतिशय गरज आहे.

याविषयाची स्थूल कल्पना यावी म्हणून अगदी थोडक्यात हीं अंगे कोणकोणती होऊ शकतील त्यांचे माझ्या समजुतीप्रमाणे येथल्या येथेच थोडेसे विवेचन करितो. अनेक प्रकारचे शिक्षणक्रम आज आपल्या मनासमोर येतात. वैद्यक, कृषि, स्थापत्य, यंत्रविज्ञान, चित्रकला, संगीत, व्यायाम, नृत्यसाधना, नाट्य शिक्षण, वृत्तविवेचन

वाणिज्य, कायदा, युद्धशास्त्र, नौकानयन असे अनेक शिक्षणक्रम पुढे आलेले दिसतात. आपल्या शैक्षणिक इतिहासात या विविध शिक्षणक्रमांच्या आवश्यकतेची जाणीव कसकशी तीव्रतेने भासू लागली व ती भासू देण्यात कोणा महाराष्ट्रीय विचारवंतांचा निर्देश करता येण्यासारखा आहे का हे पाहिले गेले पाहिजे. असा शोध घेतल्यास आपणांस ६०-६५ वर्षांपूर्वीचे नांव सयाजीराव गायकवाड यांचे सहजच सुचेल.इतर नांवे आढळण्यासाठी थोडे अधिक लक्षपूर्वक पाहिले तर त्याही पूर्वीची ना. जगन्नाथ शंकरशेट, डॉक्टर भाऊ दाजी, यांची नांवे आठवू लागतील. शिक्षणक्रमातील विविधता व तिचा इतिहास हा विचार जसा वर मांडला त्याचप्रमाणे सामान्य जनतेसाठी शिक्षण उपलब्ध झाले पाहिजे, स्त्रिया, मुली व प्रौढ निरक्षर जनता यांनाही शिक्षणाची संधि प्राप्त करून दिली पाहिजे, यासाठी हिंदुस्थानातील इतर भागाप्रमाणेच महाराष्ट्रात जो झगडा करावा लागला आहे त्याचा व त्यात पुरोगामी भूमिका घेणाऱ्यांच्या नव्या जाणिवेचा इतिहास सविस्तरपणे मांडला गेला पाहिजे. ज्योतिबा फुले, महर्षी शिंदे, सयाजीराव गायकवाड, शाहू छत्रपती, यांच्या प्रमाणेच पंडिता रमाबाई, धोंडो केशव कर्वे, अण्णासाहेब लठ्ठे, ताराबाई मोडक यांच्याही कार्याचा इतिहास विस्ताराने दिला पाहिजे. यानंतर या इतिहासाचे तिसरे अंग म्हणजे वसतिगृहांची स्थापना व वाढ हे होय. ज्ञातिनिष्ठ असे जरी या वसतिगृहांचे स्वरूप असले तरीही आपल्या शिक्षणविषयक इतिहासात त्यांचे स्थान फार मोठे आहे. याच इतिहासाची आणखी कांही अंगे उपांगे म्हणजे शाळातून नेमल्या गेलेल्या अभ्यासक्रमाची छाननी, ते अभ्यासक्रम ठरविण्यांत आपल्या विद्वानांचा व पुढाऱ्यांचा हात कितपत होता, परकीय सत्तेचा हात कितपत होता, याविषयी होऊ शकणारे विवेचन होय. मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, मातृभाषेचा

माध्यम म्हणून उपयोग, परीक्षापद्धती, या बाबींचा समावेश कसा झाला तेही शैक्षणिक इतिहास लेखनात उपांगे म्हणून अभ्यासिले गेले पाहिजे. महत्त्वाच्या अशा व्यक्तींचा परिचयही विस्ताराने व्हावा. जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, ज्योतिबा फुले, केरू नाना छत्रे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, पंडिता रमाबाई, महर्षि कर्वे, प्रिन्सिपाल गोळे, प्रि. आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, विष्णु गोविंद विजापूरकर, विष्णु दिगंबर पलुसकर, चित्रकार धुरंधर, प्रो. माणिकराव, गोपाळ कृष्ण देवधर, ठक्कर बाप्पा, वैद्य नानल शास्त्री, भाऊराव पाटील इत्यादींनी जी थोर सेवा महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रांत केली, ती सर्वसामान्य रीतीने पाहिल्यास बरीचशी अज्ञातच आहे. न्यायमूर्ती रानडे व लोकमान्य टिळक यांची नांवे थोडीफार परिचित आहेत. परंतु युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम आपल्या तरुणांना जाचक होत आहे; मातृभाषेचे महत्त्व फार मोठे आहे, हे रानड्यानी आर्जवून सांगितले. परिक्षेतील सर्व विषयात उत्तीर्ण न होऊं शकलेल्या विद्यार्थ्यांस जेवढ्या विषयात तो उत्तीर्ण व्हावयाचा राहिला असेल तेवढ्याच विषयांची परीक्षा पुन्हा द्यावी लागावी, सबंध परीक्षेला पुन्हा त्याला बसावे लागू नये असे आज मान्य झालेले तत्त्व रानड्यांनी सत्तर वर्षांपूर्वी प्रतिपादिले होते हे किती जणांना माहीत आहे? आपल्या विचारवंतांनी असा जो शिक्षणपद्धतीविषयी, शिक्षणाच्या विविधतेविषयी, शिक्षणाच्या समान संधीविषयीं विचार केला आहे तो प्रामुख्याने इंग्रज सरकारच्या धोरणानुसार असला तरीही स्वराज्यपूर्व कालात ते धोरण ठरवितांना या मंडळींच्या विचारविनिमयाचा उपयोग फार झालेला आहे हे आपण विसरू नये. हंटर कमिशनपुढील वामन शिवराम आपटे यांची साक्ष हे या गोष्टीचे एक उदाहरण. या साक्षीचे धोरण

टिळक, आगकर व तेव्हां नुकतेच वारलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी ठरविलेले होते आणि आपटे या सर्वांचे विचार समर्थपणे बोलून दाखवीत होते, हे टिळकांच्या राजीनाम्यावरून आपणांस दिसून येते. याच कमिशनपुढे सीतारामपंत चिपळूणकर, पंडिता रमाबाई व ज्योतिबा फुले यांनी ज्या साक्षी दिल्या त्या फार महत्त्वाच्या आहेत.

राजवाड्यांचा प्रस्तुतचा निबंध अिंग्रज सरकारच्या धोरणानुसार चालणाऱ्या शिक्षणसंस्थावर जबरदस्त आघात करणारा आहे. या निबंधाची दिशा राष्ट्रीय शिक्षण कसे असले पाहिजे, ते नकारात्मक रीतीने सांगण्याची आहे. म्हणून वर सांगितलेले अितर मंडळींचे शिक्षणविषयक प्रयत्न आणि राजवाड्यांचा हा निबंध व राष्ट्रीय शिक्षण-विषयक विचार प्रसृत करणारे तेव्हांचे अितर लेखन या सर्वच साहि-त्याचा शिक्षणविषयक कल्पनांचा अितिहास लिहिणाऱ्याला अत्यंत मोठा उपयोग होणार आहे.

## प्रस्तुत निबंधातील दोन टीकाविषय बनलेल्या संस्था

राजवाड्यांनी जी तत्कालीन शिक्षणपद्धतीवर, डेक्कन कॉलेजवर, डेक्कन एज्युकेशन सोसायटीवर व तिच्या अनुकरणाने स्थापन झालेल्या इतर शिक्षण संस्थांवर झोड उठविली तिची पार्श्वभूमि काय होती? या प्रश्नाचे उत्तर शोधल्यावर नंतर राजवाड्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीवर जे आक्षेप घेतले आहेत ते कितपत समर्थनीय होते याचा विचार करितां येईल आणि डेक्कन कॉलेजने जो महाराष्ट्र घडविला आहे त्या विषयीचेहि कांही विवेचन करता येईल.

## पार्श्वभूमी

पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यातील १८७५ सालचे दुष्काळ, वासुदेव बळवंत फडके यांनी १८७९ मध्ये केलेले बंड, बडोदा व कोल्हापूर प्रकरणामध्ये घडलेले अन्याय, आणि साम्राज्य विस्ताराच्या तृष्णेमुळे हिंदुस्थानच्या शासनामध्ये येत असलेला दर्प या सर्वांचा संयुक्त परिणाम इंग्रज सरकारबद्दल अप्रीती वाढणे हा स्वाभाविकच होता. सुरवातीला नोकऱ्या मिळत होत्या, तरी पुढे पुढे त्या मिळेनाशा झाल्या. आणि ज्या मिळत त्याही फक्त सबॉर्डिनेट सर्व्हिस-च्याच असत. 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या गोळे यांच्या पुस्तकावरील परीक्षण अनेक लेखांकात लिहिताना गोळे यांच्या केवळ शिक्षकी व अगदीच आकुंचित दृष्टिकोणाची कींव करून लोकमान्य टिळकांनी राष्ट्राचे तेज नाहीसे करणारी परकीय सत्ता केवळ जुजबी स्वरुपाच्या नोकऱ्या विद्याधरांच्या पुढे कशा ठेवीत असते, ते मार्मिकपणे दाखविले आहे. अशा स्वरूपाच्या नोकरीत राहून देशकार्य करणे किंवा गुणवत्ता दाखवून उच्च योग्यतेच्या पदाला पोचणे अवघड होऊं लागले होते. रानड्यांना सुरवातीला उघडपणे काँग्रेसला हजर राहाता येत होते, परंतु १८८९,९० सालापासून ते त्यांना जमेना. सामाजिक परिषदेच्या निमित्ताने काँग्रेसला हजर राहाण्याचा मार्ग त्यांना शोधावा लागला. विष्णु-शास्त्री यांनी सरकारी नोकरीचा १८७९ मध्येच राजीनामा दिला. वामन शिवराम आपटे यांची अिच्छा चांगली सरकारी नोकरी मिळाली तर पत्करण्याची होती, परंतु त्यांना कमी दर्जाचे नोकरीवर कल्याणला राहावे लागणार होते. म्हणजे अिंग्रजी शिक्षणाचा जो बऱ्या पगाराची नोकरी मिळवून देणे हा मुख्य फायदा तो हळू हळू अदृश्य होऊं लागला होता.

काँग्रेसची स्थापना करणारे इंग्रज गृहस्थ राजसत्तेशी प्रजेने एकनिष्ठ राहावे असा उद्देश सुरवातीला बाळगत होते. तरी तेहि पुढेपुढे सरकारी अरेरावीची व जनहिताला पायदळी तुडविणाऱ्या राजवटीची गय करीनासे झाले होते. स्वाभाविकच कांग्रेस अधिकाधिक धीटपणे मागण्या मागू लागली. शिक्षणासारख्या बाबीमध्ये नवराष्ट्र निर्मितीची बीजे आहेत, हे स्वाभिमानी राष्ट्रधुरीणांना दिसून येऊ लागल्या-बरोबर राष्ट्रीयतेची शिकवणूक देण्याचे धोरण शिक्षणाच्या माध्यमा-तून अवलंबिण्यात आले. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या स्वतंत्र शिक्षण संस्थेत सुरेंद्रनाथ बानर्जी यांना नेमण्यात आले. आय. सी. एस. असलेल्या सुरेंद्रनाथांनी बाणेदारपणाने राजीनामा दिला होता व काही तरी खुसपट काढून सरकारने त्यांना खालच्या दर्जावर आणले ही गोष्ट आपणास सहन होण्यासारखी नाही हे दाखवून दिले होते. महाराष्ट्रात न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेप्रमाणेच आर्यन एज्युकेशन सोसायटीची शाळा मुंबईस १८८२ साली अशाच देशसेवेच्या व्रता-नेच निघाली. पुण्यांत ज्या अनेक शाळा निघत होत्या त्यांत वासुदेव बळवंत फडके यांनीहि शाळा काढली होती हे प्रथमच या निबंधा-वरून कळते.

डेक्कन कॉलेजमध्ये जे शिक्षण पदवीधरांना मिळत होते, त्याचाही स्वाभिमानाच्या जोपासनेच्या दृष्टीने फार मोठा परिणाम झाला असला पाहिजे. त्याविषयीची थोडीशी अधिक चर्चा पुढे करावया-चीच आहे. येथे हे ध्यानी घेतले पाहिजे की, विद्या ही पोट भरण्या-साठी ध्यवयाची नाही, तो एक मोठा संस्कार आहे, स्वतःच्या व्यक्तित्वाचा विकास घडविणे हे उच्च शिक्षणाचे प्रमुख ध्यय आहे. राष्ट्रीयत्वाचा विकासही अशा ध्येयप्रवण शिक्षणातूनच होतो; सत्याचा शोध, ज्ञानाची निरलस आसक्ती आणि चारित्र्यसंपन्नता व

मानसिक औदार्य या गुणसंपदेची पैदास महाविद्यालयीन शिक्षण-क्रमामुळे झाली पाहिजे असे विचार सर्व पदवीधरांच्या मनात डेक्कन कॉलेजने ठसविले होते. राजवाडेच या निबंधात म्हणतात की, प्रत्येक पदवीदान समारंभाचे वेळचे भाषण किंवा महाविद्यालयांतील प्राध्यापकांचे सर्वसामान्य प्रतिपादन याच धर्तीचे असे. शिक्षणपद्धतीचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे इंग्रज सरकारची हलकी नोकरी करण्याची पात्रताच फक्त निर्माण व्हावी हा होतो, हे त्यांचे मुख्य सूत्र आहे. स्वतःचे भाषेतील समृद्ध वाङ्मयाकडे पाठ फिरवू नका; स्वतःच्या अंतःप्रेरणाशी प्रतारणा करू नका; चौकसपणाने स्वतंत्र विचारसरणीचा अवलंब करून धारिष्टाने नवीन मते बनवा; ही शिकवण उच्च शिक्षणा-मुळे महाराष्ट्राला नव्याने मिळत होती. राजवाड्यांचे आधीच्या पिढीला ती मिळाली; त्याचप्रमाणे राजवाडे, विजापूरकर, शिवराम महादेव परांजपे, हरी नारायण आपटे, महादेव शिवराम गोळे, विठ्ठल रामजी शिंदे, अशा कित्येकांना ही शिकवणूक मिळाली.

१८९७ सालापासून म्हणजे रँडच्या खुनापासून व टिळकांच्या तुरुंगवासापासून तो १९०४ सालापर्यंत महाराष्ट्राचे वातावरण अतिशय संतप्त झालेले होते. या जुलमी राजवटीशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य निर्माण होण्यासाठी सरकारी नियंत्रणे झुगारून देणारी व स्वत्वाचा निर्भय प्रचार करणारी शिक्षण संस्था असली पाहिजे. अशा शिक्षण-संस्थांचे जाळे जिकडे तिकडे पसरले पाहिजे, हे विचार कांहीजणांना अतिशय तीव्रतेने पटू लागले होते. या काहीजणांपैकी राजवाडे होते. व त्यांच्या हातून जरी अशी शिक्षण संस्था निर्माण झाली नाही, तरी ज्यांच्या हातून अशा तेजस्वी शिक्षणसंस्थेचा जन्म होऊ शकला ते विजापूरकर या विचारांनीच भारलेले होते. फर्ग्युसन कॉलेज या नांवाला देखील विजापूरकरांनी आक्षेप घेतलेला आहे. सर्व सरकारी

नियमांचे पालन करून सरकारच्या धोरणाप्रमाणे आपला शिक्षणक्रम ठरवून त्या शिक्षणक्रमातील परीक्षा पास झालेले शेकडो विद्यार्थी देशाला पुरविणाऱ्या प्रचलित संस्था देशकार्य करीत आहेत की देशद्रोह करीत आहेत असा प्रश्न या वेळी महाराष्ट्रासमोर उभा राहिला होता. त्या प्रश्नाचे सडेतोड उत्तर राजवाड्यांनी त्यांना वाटले तसे १९०४ साली या निबंधात दिले आहे.

## डेक्कन एज्युकेशन सोसायटीवरील आक्षेप

म्हणूनच त्यांचा डेक्कन एज्युकेशन सोसायटीवरील हल्ला अगदीं निर्विकारपणे आता तपासला पाहिजे. ग्रंथमालेच्या जून १९०४ च्या अंकात तो प्रसिद्ध झाल्यानंतर या निबंधाचे आतापर्यंतचे पुनर्मुद्रण फक्त दोन वेळा झाले आहे. एक आचार्य वि. प्र. लिमये यानी १९३१ साली छोटीशी प्रस्तावना लिहिली व साताऱ्याच्या बाबूराव वैद्य यानी तो त्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध केला ते पुनर्मुद्रण. आणि दुसरे भास्कर वामन भट यानी जे राजवाडे चरित्र लिहिले आहे त्यात हा सर्वच निबंध जशाच्या तसा दिला आहे ते. या दोन्हीही पुनर्मुद्रणात त्या त्या संपादकांनी या महत्त्वाच्या मुद्याला स्पर्शच केलेला नाही. वास्तविक राजवाड्यांच्या अितर लेखांचा समावेश त्यांच्या निरनिराळ्या लेखसंग्रहात होत असताना या निबंधाचा समावेश ग्रंथमालेने प्रसिद्ध केलेल्या संकीर्ण लेखसंग्रहा खेरीज इतर कोठे होत नाही याचे खरे कारण यांत डेक्कन एज्युकेशन सोसायटीवर त्यांनी कडाडून टीका केली आहे हेच असावे, असे मला वाटते. या टीकेला तेव्हा काही उत्तर दिले गेले काय हे पहाणे अगत्याचे आहे. परंतु तसा शोध सहजपणे करता आला नाही तरी राजवाड्यांच्या टीकेची मीमांसा ही शिक्षणविषयक विचारांच्या

दृष्टीने अतिशय आवश्यक गोष्ट आहे, हे कोणीहि कबूल करील.

राजवाड्यांच्या टीकेचा रोख असा की, सोसायटी बनविण्याचा मोह या मंडळींना झाला त्याचे कारण राज्यमान्यता मिळविणे व लोकांचा विश्वास संपादन करणे हे त्यामुळे सोपे होईल असे त्यांना वाटले. या सोसायटीने सतत इंग्रज अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करण्याचे धोरण ठेवले. सोसायटीतील मंडळींनी स्वतःला प्रोफेसर म्हणवून घेता यावे यासाठी कॉलेजचा खटाटोप केला. आणि सरकारी नोकर बनविणे हे जे इंग्रजी शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट, तेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून अल्प वेतनावर कामे केली. म्हणून यांच्या स्वार्थ-त्यागाला कवडीचीहि किंमत नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी जेव्हा न्यू इंग्लिश स्कूल काढले त्या वेळी त्यांचा खरा विचार इंग्रज अधिकाऱ्यांचे नियंत्रण पूर्ण झुगारून देण्याचा होता. प्रथम जरी विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी नेहमीचीच शिक्षणपद्धति व परीक्षेतील आपल्या विद्यार्थ्यांचे यश यावर दृष्टि केन्द्रित केली होती, तरीहि त्यांच्या मनासमोर खरे ध्येय निराळे होते. स्वतः विष्णुशास्त्री हे मुरब्बी विचारवंत होते व नेते म्हणून या सर्व मंडळींना मान्य होते. परंतु त्यांच्या दुःखद निधनानंतर नव्या मंडळीपैकी कोणीच सर्वमान्य नेता होण्यासारखा नव्हता व कोणलाहि विचार ठरविण्याइतकी परिपक्वता आलेली नव्हती. सहाजिकच या भांबावलेल्या स्थितीत या मंडळींनी सोसायटी बनविली, राजमान्यता मिळविली, सरकारी सहाय्य संपादिले आणि स्वत्व मात्र गमावले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या १९०४ किंवा १९०५ साला-पर्यंतच्या विचारसरणीकडे आणि कामगिरीकडे पाहिले तर यापैकी कोणत्या गोष्टी कोणत्या दृष्टिकोणातून पाहिल्या जाव्यात यावर बरेचसे अवलंबून राहाते. वास्तविक स्थिति होती ती अशी की, टिळक आणि

आगरकर व भागवत आणि करंदीकर असे चौघेजण डेक्कन कॉलेज-मध्ये विद्यार्थी असतानाच त्यांच्या मनात देशसेवेचे बीज रुजले होते व ते शिक्षण संस्थास्वरूपात अवतीर्ण होणार असे दिसत होते. टिळक आपल्या राजीनाम्यात म्हणतात की, अशा चर्चेचा अंतिम परिणाम म्हणून पुण्यातील एका प्रतिष्ठित गृहस्थाला ही तरुण मंडळी त्या वेळी भेटली होती. परंतु त्या गृहस्थाने याना लोकमत कितपत अनुकूल होईल याविषयी शंका वाटते असे सांगितले. एवढ्यात चिपळूणकर यानी सरकारी नोकरीचा राजिनामा दिला असून ते लौकरच स्वतंत्र शाळा काढणार आहेत असे टिळक आगरकरांच्या कानावर आले व म्हणून त्यांची भेट या दोघांनी घेतली. म्हणजे चिपळूणकर यांनी शाळा काढली नसती तरीहि टिळक आगरकरांनी एक स्वतंत्र शिक्षण संस्था काढण्याचा विचार मनाशी आखलेला होता, ही या संदर्भातील अतिशय महत्त्वाची बाब महाराष्ट्राने ध्यानी घेणे आवश्यक आहे.

चिपळूणकरांच्या देशप्रेमाबद्दल संशय नाही. परंतु त्यांच्या शिक्षक म्हणून असलेल्या ख्यातीविषयी विशेष काही गौरवास्पद आढळत नाही. शाळेचे प्रमुख म्हणूनही त्यांच्या हातून विषेश काही काम होत नव्हते, असे केळकरानी चिपळूणकरांची योग्य ती प्रशंसा करून देखील टिळक चरित्रात म्हटले आहे. तेव्हा चिपळूणकर प्रमुख असतानाच वामन शिवराम आपटे यांची सुपरिंटेंडंट म्हणून नेमणूक झाली होती व त्यांनी शाळेला चांगली शिस्त आणली होती. चिपळूणकर आणि ही इतर तरुण मंडळी यांच्यात तात्त्विक मतभेद होत असत असेही कोठे मांडले गेल्याचे आढळत नाही. तेव्हा चिपळूणकरांची दृष्टि वेगळी होती व या मंडळींची दृष्टि वेगळी होती. म्हणजे कोणता भेद नेमका होता ते सांगणे कठीण वाटते. या शाळेत शिक्षक असतानाच टिळक आणि आगरकर यांना कोल्हापूर

प्रकरणांत १०१ दिवस तुरुंगवास घडला. त्या वेळी चिपळूणकर नुकतेच वारले होते.

सोसायटी निर्माण केली ती स्थिरता निर्माण व्हावी आणि अधिक जबाबदारीने व निर्भयपणाने काम करता यावे, म्हणून निर्माण केली असे म्हणता येण्यासारखे आहे. टिळकांचा राजीनामा डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सुरवातीच्या अवस्थेवर बराचसा प्रकाश टाकणारा आहे. डेक्कन कॉलेजमधून यातील बरेच पदवीधर आलेले असल्याने व केळकर हे एल्फिन्स्टन कॉलेजमधून आलेले असल्याने त्यांनी डेक्कन कॉलेजच्या प्राचार्यांना किंवा आपल्या प्राध्यापकांना सल्लामसलतीसाठी भेटणे किंवा आपल्या सोसायटीच्या गव्हर्निंग कौन्सिलवर घेणे हे स्वाभाविक होते. शिवाय जी मंडळी या रीतीने सोसायटीशी निगडित होती, त्यांत प्रिन्सिपल वर्डस्वर्थ, वेडरबर्न आणि सेल्बी हे युरोपिअन गृहस्थ मुख्य होत. राजवाड्यांची दृष्टि अशी की, कोणीहि मनुष्य स्वतःच्या हितावर निखारे ठेवले जातील अशी स्थिति दुसऱ्याला उत्तेजन देत असताना निर्माण होऊ देत नाही. त्या न्यायाला अनुसरून हे युरोपिअन सल्लागार डेक्कन एज्युकेशन सोसायटीला अधिक तेजस्वी रीतीने वाढू देणे अशक्यच होते.

या ठिकाणी अधिक तपशीलवार असे विवेचन केले पाहिजे. १८८५ साली जेव्हा फर्ग्युसन कालेजचा फक्त एक वर्ग उघडला गेला, तेव्हा न्यू अिंग्लिश स्कूलची कीर्ती अखिल भारतांत झालेली होती. सरकारी धोरणही विद्याप्रसार अशा खाजगी प्रयत्नाने सुकर होतो म्हणून खाजगी प्रयत्नांस उत्तेजन देण्याचेच होते. सरकारची नियंत्रणे जाचक होण्याएवढी नव्हती. रिपन व रे यांची कारकीर्द मनाला उल्हसित करणारी होती. म्हणून १८८५ सालापासून तो १८९७ पर्यंत सोसायटीत अंतर्गत मतभेद पुष्कळ होत होते, तरीही

प्राध्यापकांना स्वतंत्र पुस्तके लिहिता येत होती व ती अभ्यासक्रमात समाविष्ट करता येत होती. थोडासा तरी बदल निरनिराळ्या ईयत्तांच्या परीक्षाविषयांत घडवून आणता येत होता. व सरकारने आक्षेप घेतल्यानंतर तो थांबविला जात होता. वृत्तपत्रातून आपल्या मताप्रमाणे लेखन करिता येत होते. कॉलेजच्या वर्गांची वाढ करिता येत होती आणि सरकारच्या किंवा खाजगी रीतीने चाललेल्या इतर शिक्षणसंस्थांचा कारभार आपल्या हाती घ्यावा किंवा ती जबाबदारी एवढ्यांतच स्वीकारूं नये याविषयी त्या त्या संस्थांच्या विनंति-पत्रानुसार विचारविनिमय करतां येत होता. वसतिगृहांच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देऊन वसतिगृहात आलेल्या निवडक विद्यार्थ्यांची तयारी निराळ्या लोकनेतृत्वाच्या धर्तीवर करता येत होती. म. शि. गोळे यांनी असे वेचक विद्यार्थी या लोकनेतृत्त्वासाठी निवडले होते. हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा जो इतिहास लिहिला आहे तो वाचल्यास आपणास समजून येते. ही बरीचशी स्वातंत्र्यमय वातावणांत काम करू देणारी स्थिति १८९७ च्या प्लेगमुळे जे विषारी वातावरण फोफावले, त्यामुळे एकदम पालटली असें ध्वन्यर्थानें म्हणता येण्यासारखे आहे.

राजवाडे जेव्हां न्यूस्कूलमधून शिक्षकाच्या नोकरीचा राजीनामा देऊन बाहेर पडले, तो काळ देशाच्या नवचैतन्याच्या आविष्काराच्या दृष्टीने अतिशय आणीबाणीचा होता. आधुनिक भारत या ग्रंथात आचार्य जावडेकर यांनी १८९२ पासून सरकार गुप्त सरक्युलरे काढून सरकारी नोकरांना कॉंग्रेसला हजर राहाण्यापासून कसे परावृत्त करूं लागले होते त्याची माहिती दिली आहे. त्याच बरोबर या वेळीं देशात चहूकडे संन्यासी निर्माण होऊन ते गुप्तपणाने उठाव करण्याचे विचारात होते, अशीहि माहिती दिली आहे. डेक्कन एज्युकेशन

सोसायटीचे स्वार्थत्यागपूर्वक काम करणारे शिक्षक काही शैक्षणिक प्रयोग शाळातून करू लागले तर त्यांची गळचेपी होऊं लागली, हे सोसायटीच्या इतिहासावरून दिसते. तरीहि १८९७ साली जो उद्रेक झाला त्यामुळे सोसायटीवर जे गडांतर आले तेच प्रामुख्यानें राजवाड्यांचे मनात असले पाहिजे.

पुण्यांत प्लेगने थैमान घातले तेव्हा सुधारकाचे संपादक देवधर व सुधारकात लेख लिहून लोकांच्या भावनांना वाट करून देणारे वा. ब. पटवर्धन यांनी अतिशय कडक शब्दात इंग्रज अधिकाऱ्यावर टीका केली. स्वाभाविकच या सोसायटीच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सभासद प्रिन्सिपल सेल्बी यांनी सरकारी नोकराला योग्य ती भूमिका घेऊन डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमन पदाचा राजीनामा दिला. सेल्बी यांचा राजीनामा हे सोसायटीच्या दृष्टीने भयंकर संकटच होते. त्याखेरीज प्रो. भानु यानी शिवाजी उत्सवात जहाल भाषण करून ब्रिटिश सरकारवर भयंकर टीकास्त्र सोडले होते. व मराठ्यांच्या इतिहासातील गोष्टी हे पुस्तक लिहिले होते. त्यात तर उघड उघड सरकारी सत्तेविरूद्ध उठाव करण्याची फूसच होती. आणि या सर्वांवर कळस म्हणून की काय, इंग्लडात गोखल्यानीही ब्रिटिश राजवटीला काळिमा लावणारी कृत्ये प्लेगने संत्रस्त झालेल्या पुणे शहरात घडत आहेत असे म्हटले होते. गोखल्यांना आपले आक्षेप सिद्ध करता आले नाहीत म्हणून त्यांनी जाहीर रीतीने माफी मागितली. ही माफी सबंध महाराष्ट्राच्या जिव्हारी लागली. गोखल्यांनी माफी मागितली हे गोखल्यांच्या ऋजु स्वभावाला आणि राजकारणातील शुचितेला जितके भूषणावह होते, तितकेच ते मानी महाराष्ट्राला मानखंडनात्मक वाटले आणि त्यामुळे पुणे व पुण्याबाहेरचा सुशिक्षित समाज खवळून उठला. राजवाडे जे इतक्या संतापाने लिहीत आहेत

त्यांचे कारण ही पार्श्वभूमी होय. पटवर्धन यांना एक वर्ष संस्थेपासून दूर व्हावे लागले. भानू यांनाहि असेच अज्ञातवासात जावे लागले. नामदार गोखले यांना एक वर्ष राजकारणांत लक्ष न घालण्याची सोसायटीने जी अट कबूल केली होती ती स्वत:वरही लादून घ्यावी लागली. आणि अशा रीतीने १८९७ सालापासून डेक्कन एज्यूकेशन सोसायटीच्या आजीव सदस्यांच्या स्वातंत्र्यावर पुष्कळसे निर्बंध तात्त्विक दृष्ट्या आले व प्रत्यक्षातहि आले. याविषयीचीहि अधिक माहिती सोसायटीच्या इतिहासांत जिज्ञासूंना मिळेल.

सोसायटी अशा रीतीने एका दिव्यातून पार पडली खरी, परंतु ती हतबल होऊन; असे यावरून दिसते हे मान्य केले पाहिजे. परंतु यापेक्षा निराळा मार्ग अनुसरता आला असता काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. राजवाड्यांची वृत्ती निराळी आणि सरकारशी विरोध न होऊ देता परंतु काही प्रमाणात का होईना स्वतंत्र मार्गाचा अवलंब करून, संस्था चालावणाऱ्यांची वृत्ती निराळी. सोसायटीने सरकारशी जो पत्रव्यवहार या प्रकरणी केला त्याचा सारांश प्राध्यापक लिमये यांनी दिला आहे. त्यावरून तर असे दिसते की, प्राध्यापकांनी राजकीय क्षेत्राशी आपला संबंध पूर्णपणे तोडून टाकावा अशी अट मान्य करण्यात आली नाही. फक्त चार गोष्टी मान्य करण्यात आल्या, त्या अशा.

१. कोणीही आजीव सेवक राजकीय मतप्रणाली प्रसृत करणाऱ्या वृत्तपत्राचा मालक किंवा भागीदार असणार नाही. अशा वृत्तपत्राच्या व्यवस्थापनांत, प्रकाशनात अथवा दैनंदिन कामकाजात तो संबध ठेवणार नाही.

२. कोणीही आजीव सेवक राजकीय संघटनेचा पदाधिकारी असणार नाही.

३. गव्हर्निंग बॉडीने ज्या ज्या चळवळीतून भाग घेण्यास परवानगी नाकारली असेल अशा चळवळीपासून तो दूर राहील.

४. सामान्यतः सार्वजनिक वर्तणुकीच्या बाबतीत आजीव सेवक हे गव्हर्निंग बॉडीला जबाबदार राहातील.

या अटी मान्य करण्यावाचून दुसरा पर्यायच संस्थेपुढे नव्हता, असे लिमये यांच्या इतिहास कथनावरून दिसते. या वृत्तीत प्रखरता नाही हे खरे, परंतु त्याजबरोबर सबंध डेक्कन एज्युकेशन सोसायटीची निर्मिति, तिच्या हेतूचे प्रि. वर्डस्वर्थ याजकडून झालेले आधीचे विशदीकरण, तिच्याबद्दलच्या फर्ग्यूसन व वर्डस्वर्थ यांनी प्रगट केलेल्या अपेक्षा, तिच्याशी संबंधित असलेले वेडरबर्न व सेल्बी–विशेषतः वेडरबर्न यांची राजकीय ध्येये व हिंदी राजकारणाचा गाडा पुढे रेटला जावा अशी त्यांच्या मनात असलेली तळमळ आणि या सोसायटीच्या प्रमुख मंडळींची तोपर्यंतची राजकीय कामगिरी, याहि गोष्टी मनासमोर आणल्या पाहिजेत. संस्था जेव्हा स्थापन झाली तेव्हा वर्डस्वर्थ यांनी सांगितले होते की, अशा संस्थामधून राष्ट्रीय आकांक्षा वृद्धिंगत झाल्या पाहिजेत आणि हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवल्याचे श्रेय या स्वार्थत्यागी चमूला पुढेमागे प्राप्त झाले पाहिजे. शिक्षणाचा प्रसार अधिकाधिक व्हावा म्हणून ध्येयवादी शिक्षक सबंध महाराष्ट्राला पुरविण्याची मनीषा आधीच्या चालकांनी बाळगली होती. बाहेर क्रांतिकारकांचे प्रयत्न चालले होते व राजकारणातील काही प्रवाह दहशतवादी होत होते. तरीहि सर्वसाधारण जनतेस सुशिक्षित करणे हेहि महत्त्वाचे असे देशकार्य आहे व भावी भारत आपण घडवीत आहोत याची अहर्निश जाणीव या मंडळींच्या अंगी होती. हे काम धिमेपणाचे असले तरी त्यात सरकारची पूर्णपणे लाचारी पतकरली होती असे म्हणणे अन्यायाचे होईल. ते राजवाड्यांनी ठरविले

याचे कारण वासुदेव बळवंत अपयशी झाले, चाफेकर बंधू फाशी गेले, सुधारकांचा वरचष्मा होऊ लागून जहाल राजकारणाला या संस्थातून वाव मिळेनासा झाला; हेच बहुधा असले पाहिजे. सावधपणे काम करणाऱ्या शिक्षण संस्थांच्या नशीबी येणारी अशी दोहो बाजूने होणारी अवहेलना व हेटाळणी आपल्या सामाजिक जीवनांत अपरिचित नाही.

तत्कालीन अडचणीच्या स्थितीत सेल्बी यांच्या नेतृत्त्वानेच डे. ए. सोसायटीने काही प्रमाणात तरी सरकारच्या निर्बंधातून वाट काढून आपल्या सदस्यांना स्वत्व टिकविण्यात मदत केली हे ध्यानी घेतले पाहिजे. आजीव सेवकांनी ज्या बाबीसंबंधी वचनबद्धता कबूल केली होती, त्याच्याविषयीच शिक्षण खात्याकडून पुन्हा असे लिहून आले होते की, या आजीव सेवकांची गव्हर्निंग बॉडीला असलेली वचन-बद्धता पुरेशी नाही. त्यांनी सरकारने सुचविलेल्या आणखी काही अटीही मान्य असल्याचे कळवावे. यात विद्यार्थ्यांना राजकारणा-पासून पूर्णतः दूर ठेवावे आणि अर्थातच यासाठी शिक्षकांनी व प्राध्यापकांनीही राजकीय चळवळीत भाग घेऊ नये, ही अट होती. सोसायटीने जे उत्तर पाठविले त्याचे स्वरूप सांगताना प्राध्यापक लिमये लिहितात की, “ १६ जून १८९८ रोजी गव्हर्निंग बॉडीच्या चेअरमन साहेबांनी विद्याखात्याच्या डायरेक्टर साहेबांस पत्र लिहिले असून त्यात असे दर्शवून दिले आहे की, आजीव सेवकांची वचन-बद्धता व सरकारने काढलेल्या परिपत्रकातील हुकूम हे एकमेकास पूरक नसून विसंगतच आहेत. कारण सोसायटीने काही ठराविक मर्यादे-पर्यंत सार्वजनिक जीवनांत भाग घेण्यास आजीव सेवकांना संमती देण्याचे ठरविले आहे. तर सरकारचा ठराव असे सांगतो की, संस्थेतील सेवकानी राजकारणापासून पूर्णतया दूर रहावे. गव्हर्निंग ॅडी ही आजीव सेवकांना राजकीय चळवळीपासून दूर राहाण्यास

अवश्य सांगते व सांगेल, परंतु त्यांनी राजकारणांत कुठल्याही तऱ्हेने भाग घेता कामा नये असे सांगणे गव्हर्निंग बॉडीस आवडणार नाही. राजकीय चळवळ याचा अर्थ अशा चळवळी की, ज्या सरकाराविरुद्ध योजिलेल्या असतात किंवा ज्यांच्यापासून उपद्रव निर्माण होण्याची व राज्यकारभारात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते. चेअरमन साहेबांच्या या धोरणास डायरेक्टर साहेबांनी रुकार देऊन राजकीय चळवळीचा अर्थ आपणही असाच करितो असे म्हटले. व नंतर डायरेक्टरनी असे सुचविले की, वचनबद्धता जर योग्य रीतीने सांभाळली गेली तर सरकारी ठरावात ज्या अटी सुचविल्या गेल्या आहेत त्याचे पालन केल्यासारखे होणार आहे. राजकीय संघटनेचे सदस्यत्व संस्थेतील सेवकांनी पत्करू नये असे सरकार म्हणत नाही. परंतु अशा संघटनेत पदाधिकारी होणे हे सरकारास इष्ट वाटत नाही. त्यांनी आपले असेही मत व्यक्त केले की, राजकीय पक्षातील पुढारीपण शिक्षकांनी स्वीकारणे ही गोष्ट अनिष्ट आहे. कारण त्यांच्या मतांचे जाहीर आविष्करण हे विद्यार्थ्यांवर खासच परिणाम करणार.

डे. ए. सोसायटीच्या आजीव सेवकांनी अशा रीतीने स्वतःचा एक हक्क शाबूत ठेवण्यात यश मिळविले. व शिक्षकांच्या धंद्यास योग्य राजकीय कार्य आणि राजकीय चळवळ यांतील फरक जाणून देऊन सरकारी रीत्याच महत्त्वाची सवलत मिळवून दिली.'' ( डे. ए. सोसायटीचा इतिहास, पान १७१ वरील मजकुराचे मराठी भाषांतर. ) हे चेअरमन स्वतः सेल्बी होत. सेल्बी जर यावेळी नसते तर डे. ए. सोसायटीला सरकारी हुकुम निमूटपणे मान्य करणे भागच पडले असते आणि तसे झाले नसते तर जे गंडांतर समर्थ विद्यालय व तत्सम इतर संस्थावर पुढे आले, तसे गंडांतर डे. ए. सोसायटीच्या संस्थावर येण्याची फार शक्यता होती.

प्रत्येक क्षेत्रात एक मध्यम मार्ग असतो. आणि एक हाराकिरीचा परंतु दैदीप्यमान व तेजस्वी मार्ग असतो. मध्यम मार्ग आपण चोखाळलेला होता असा दावा सोसायटीचे चालक करू शकतात. रँग्लर परांजपे तर स्पष्टच लिहितात की, फर्ग्युसन कॉलेजमध्ये रानडे-गोखले मतप्रणाली अनुसरली जात असे. व नवीन आजीव सदस्यांना याची जाणीव करून देण्यात येई. पुढे रिसले सरक्युलरच्या वेळी ते जुलमी सरक्युलर नाइलाजाने अंमलात आणीत असतानाच असेही रँग्लर परांजपे यानी म्हटले की, ‘आजीव सदस्य म्हणून काम करण्यात जो स्वार्थत्याग आपण व आपले इतर सहकारी यानी केला आहे तो केवळ मिशनऱ्याप्रमाणे शिक्षण कार्यातच स्वतःला गाडून घेण्याकरिता नव्हे. राजकीय जागृती किंवा राजकीय स्वरूपाचे काम आम्हाला करता यावे असाही हेतू या स्वार्थत्यागमय जीवन पद्धतीच्या बुडाशी आहे.’ ‘रा. गांधी यांनी १९२० साली फर्ग्युसन कॉलेज हे राष्ट्रीय महाविद्यालय बनवावे अशी विनंती आपणास केली होती परंतु आपले महाविद्यालय सर्व अर्थाने राष्ट्रीयच आहे असे आपण रा. गांधी याना सांगितले. येथील अध्यापक वर्ग भारतीय आहे. ध्येय राष्ट्रस्थापनेचे आहे आणि जरी सरकारी ग्रँट आम्ही घेत असलो तरी सरकारचा पैसा हा जनतेचाच पैसा असल्याने तशी सरकारी मदत घेण्यात गैर काहीच नाही. सरकारने जर पाणउतारा होईल अशा अटी लादल्या तर गोष्ट वेगळी’ असे परांजपे पुढे म्हणतात. कोणत्या अटींचे पालन करणे म्हणजे पाणउतारा होतो याविषयी अर्थातच एका बाजूने लोकमान्य टिळक किंवा राजवाडे व दुसऱ्या बाजूने कठीण परिस्थितीत संस्था चालविणारे संस्थाचालक यांच्यात मतभेद होत होता हीच महत्त्वाची गोष्ट आहे.

फर्ग्युसन कॉलेजला राजकीय क्षेत्रात काम करण्याची मोकळीक मिळवावयाची होती, ते राजकीय क्षेत्र गोखले पक्षाचे होते. त्यांत या मंडळींनी विशेष काम केले असे इतिहास म्हणत नसला तरी प्रतिकूल परिस्थितीत एका बाजूने टिळकांच्या जहाल राजकारणाचा मारा सहन करीत व दुसऱ्या बाजूने सरकारच्या दडपशाहीचा मारा सहन करीत वाट काढण्याचे श्रेय फर्ग्युसन कॉलेजने मागितले तर ते गैर ठरू नये. हा मिळमिळीत मार्ग आम्हांस पसंत नाही असे म्हणणे ठीक असले तरी बंगालप्रमाणे किंवा पंजाब व संयुक्त प्रांताप्रमाणे धनाढ्यांचे पाठबळ महाराष्ट्रातील स्वतंत्र शिक्षण संस्थाना मिळाले नाही. सरकारी मान्यता असलेल्या शिक्षण संस्थामधून आपल्या मुलांची नांवे काढून ती राष्ट्रीय शिक्षण संस्थात दाखल करणाऱ्यांची संख्या कधीच फुगली नाही. आपल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रयत्नाची ही शोकांतिका आहे. म्हणूनच डे. ए. सोसायटी फारशी दोषी ठरू शकत नाही असे म्हणणे भाग आहे.

गोखल्याना संस्था लवकर सोडावी लागली याचे कारण हे वाढते निर्बंध हेहि असू शकेल. त्यांची इतर कामे वाढत होती तरीहि जर तेव्हाच्या काळात सरकारचे निर्बंध जाचक झाले नसते तर कदाचित् परांजप्यांच्या प्रमाणे त्यानी संस्थेत काम करण्याचे चालू ठेवले असते. परंतु अशा कामामध्ये समाधान न मानता त्यानी याहूनहि स्वार्थत्यागी व देशसेवाव्रतधारी अशा संस्थेची गरज हेरली आणि भारत सेवक समाजाची स्थापना केली. टिळकांनी संस्था सोडल्यानंतर हळू हळू जहाल राकारण आखले, तर गोखल्यानी सर्व्हंटस् ऑफ इंडिया स्थापून फर्ग्युसन कॉलेजच्या क्षेत्रापेक्षा फार मोठे कार्यक्षेत्र निर्माण केले. मात्र गोखल्यांनी आपल्या विचारसरणीची छाप फर्ग्युसन कॉलेजवर कायम ठेवल्यामुळे परांजपे म्हणतात त्याप्रमाणे फर्ग्युसन

कॉलेजची एक गोखलेमतप्रणाली त्या कॉलेजात बळकट झाली. १९०४ च्या संदर्भात या गोष्टींचा विचार करू लागताना राजवाड्यांनी जी हेटाळणी या निबंधात अप्रत्यक्षपणे केली आहे तिचे स्वरूप असे भासू लागते. खुद्द गोखल्याना ते फर्ग्युसन कॉलेजातील इतर सर्व प्राध्यापक वर्गापेक्षा अनेक पटीने कर्तबगार, स्वार्थत्यागी, व देशसेवाव्रतधारी असून जर महाराष्ट्रात तेव्हा टीकेचा मारा सहन करावा लागला तर फर्ग्युसन कॉलेजातील त्यांच्या मवाळ अनुययाना असा आहेर मिळणे हे अस्वाभाविक वाटत नाही. त्या कॉलेजातील काही जबाबदार प्राध्यापकांनी राजकारणात पुढे विनाकारण लुडबूड केली असे माटे यांनीहि म्हटलेले आहे.

पंडित नेहरू आपल्या डिस्कव्हरी ऑफ इंडिया या महान ग्रंथांत इंग्रजी शिक्षणाचा जेव्हा विचार करतात, तेव्हा त्यांचेही मत बव्हंशी राजवाड्यांप्रमाणेच असल्याचे आढळते. पंडितजी म्हणतात की, 'ब्रिटिश राज्ययंत्र सुरळीत चालू राहावे म्हणून येथील सुशिक्षित मंडळींना नोकरीचे आमिष दाखविण्यात आले. या सुशिक्षितांनी सरकारी नोकरी करून हे राज्ययंत्र सांभाळल्याने एक प्रकारचा देशद्रोह खासच होत होता. परंतु अशा देशद्रोही पोटभरूपणाखेरीज दुसरे काही या सुशिक्षितांच्या हातून होण्याची स्थितीच नव्हती.' हे म्हणणे नाकबूल करताना डे. ए. सोसायटीचे चालक असे म्हणू शकतील की, सोसायटीच्या वचनबद्धतेतून मुक्त होऊन परांजप्यांनी वाटल्यास त्याना मिळू शकणाऱ्या अत्यंत मोठ्या सन्मानाच्या जागेची नोकरी स्वीकारावी असे सोसायटीने म्हटले असतानासुद्धा; त्याचा काहीही मनावर परिणाम न होऊं देता अगदी अल्प वेतनावर रँगलर परांजपे सरकारी नोकरीचे फार मोठे प्रलोभन दूर सारून कित्येक वर्षें राहिले हे विसरून कसे चालेल? परंतु मुख्य मुद्दा असा की,

फर्ग्युसन कॉलेजमधून व अशाच इतर संस्थामधून जे शेकडो पदवीधर प्रतिवर्षी बाहेर पडू लागले त्यानी काही दुसरा मार्ग अवलंबावा अशी जाणीव या शिक्षण संस्थांनी निर्माण केली किंवा नाही ? गोखल्यांच्या सर्व्हंटस् ऑफ इंडिया या संस्थेचे अनुयायित्व तरी स्पष्टपणाने व त्यागबुद्धीने पुढे किती जणांनी पत्करले ? गावोगावी शिक्षण संस्था स्थापून शिक्षणाचा प्रसार करणे हे महत्त्वाचे कार्य मानावयाचे झाल्यास गोष्ट वेगळी.

राजवाड्यांनी या स्वार्थत्यागाला बिलकूल किंमत दिलेली नाही. त्यांची स्वतःची मनीषा नेमकी काय होती ते सांगणे कठीण आहे. ज्या वेळी हा आत्मचरित्रपर निबंध त्यानी लिहिला, त्या वेळची स्थिति लक्षात घेतली पाहिजे हे वर म्हटलेच आहे. अनेक वेळा त्यानी आपल्या तीव्रपणे प्रगट झालेल्या पहिल्या मतांची दुरूस्ती केलेली आहे. १९०४ साली त्यांची मनोभूमिका क्रांतिकारी उठाव साधू शकत नाही, या वैफल्यकारी जाणिवेमुळे व सरकारच्या संताप-जनक उन्मत्तपणामुळे अत्यंत तीव्र बनलेली असणे अगदी शक्य आहे. त्यांच्या अंगात विलक्षण देशाभिमान होता; महाराष्ट्राभिमान होता; जेत्यांच्या बद्दल सदोदित धुमसणारा त्वेष होता, हे खास. त्यांचे स्नेही विजापूरकर यांची कोल्हापूर संस्थानातील प्रोफेसरची नोकरी जरी १९०५ सालच्या सप्टेंबर महिन्यांत संपविण्यांत आली, तरी देखील १९०३–१९०४ सालापासून विजापूरकर आपल्या नोकरीबद्दल साशंक असलेले आढळून येतात. त्यांनी जे स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांची सेवा करण्याचे व्रत घेतले होते त्यामुळे त्यांच्यावर खात्रीने केव्हातरी सरकारी प्रहार होणार याची त्यांना जाणीव होती असे त्यांनी गोखल्याना जी पत्रे लिहिलेली आहेत त्यावरून स्वच्छ दिसते. समर्थ विद्यालयासारखे एकादे आदर्श व

सरकारी मान्यता मिळविण्याच्या भानगडीत न पडणारे, तेजस्वी शिक्षणदान करणारे विद्यालय सुरू केले पाहिजे; विशेषतः कर्झन साहेबांच्या उन्मत्तपणाला चोख उत्तर देण्यासाठी लोकांची मने तयार केली पाहिजेत; अशी जाणीव विजापूरकर आणि राजवाडे या दोघांनाही एकमेकांच्या विचार विनिमयात होत असली पाहिजे असा प्रस्तुत संपादकाचा कयास आहे.

१९०४ साली शिक्षण सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचले पाहिजे, नवीन विद्येचा प्रसार समाजातील खालच्या थरापर्यंत सर्व दूर झाला पाहिजे, ही जाणीव त्यांच्या अंगी होती असे वाटत नाही. पुढेपुढे मात्र त्यांना त्याचीही आवश्यकता अतिशय भासू लागली, हे त्यांनी केलेल्या मराठ्यांच्या इतिहास मीमांसेवरून व स्वतःच्या काही तुरळक प्रत्यक्ष प्रयत्नावरून सिद्ध होते. 'मराठा, क्षत्रिय, मराठा कुणबी, शूद्र कुणबी व नागवंशी महार याना साक्षर करण्याचा जारीने प्रयत्न न केल्यासुळे बुद्धिमान व कर्तबगार अशा उच्च ब्राह्मणास व उच्च क्षत्रियाना त्यांच्या बरोबर अधोगतीत रखडवत बसण्याची यथायोग्य शिक्षा मिळाली आहे' असे ते या मीमांसेत म्हणतात. तुरूंगातून सुटून आल्यावर विजापूरकरांनी ज्याप्रमाणे तळेगांवच्या परिसरातील धनगर व इतर जातीजमातीसाठी शिक्षण सुलभ करण्याचा वैयक्तिक प्रयत्न काही दिवस केला, त्याचप्रमाणे राजवाड्यांनी नासिक येथे चांभार लेण्याच्या बाजूस असलेल्या वडार जमातीतील लोकासाठी शाळा स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता, हे फडके यांनी मनोहर मासिकाच्या जानेवारी १९४५ च्या अंकात निवेदिलेले आहे. परंतु ही बहुजन समाजातील शिक्षणप्रसाराची महती १९०४ साली त्यांच्या मनावर विशेष रीतीने ठसली होती असे वाटत नाही. या निबंधात डेक्कन एज्युकेशन सोसायटीवर जी टीका आहे

तिचा रोख निराळा आहे. पुढे काही मंडळींनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला बहुजन समाजातील शिक्षण प्रसाराच्या दृष्टीने विशेष महत्त्व दिलेले नाही. ते काम शाहू छत्रपति व महर्षि शिंदे, भाऊराव पाटील आणि डॉक्टर आंबेडकर यांनी केले असून या सर्वांची आद्य प्रेरणा महात्मा ज्योतिबा फुले यांची आहे असेच आजचे या संबंधातील सर्वसाधारण मत आहे. राजवाड्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला दोष दिला, त्याचे कारण पुण्यात तेव्हा जहाल मवाळांच्या राजकारणांचा बुजबुजाट झालेला होता. डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून जहाल भासतील असे सर्वजण निघून गेलेले होते किंवा सरकारी धोरणामुळे निष्प्रभ केले गेले होते. सोसायटीची आपल्याला काही माहिती आहे व तिच्यातील मंडळींचा परिचय आहे असे राजवाडे म्हणतात ते उघडच आहे. जरी ते त्यांच्या वडील बंधूकडे जात येत नसत तरी गोखल्यांच्या आग्रहामुळे १८९६ साली त्यांचे वडील बंधू स्वार्थत्याग करून फर्ग्युसन कॉलेजांत आले होते व आजीव सेवक झाले होते. भानू आणि लिमये ही तर इतिहासप्रेमी मंडळीच होती. रँग्लर परांजप्याबद्दल व्यक्तिशः राजवाड्यांना अत्यंत आदर होता. श्री. नंदर्गीकर शास्त्री हे १९०२ साली निवृत्त झाले. त्यांच्याकडे राजवाडे नेहमी उतरत असत असे भा. इ. सं. मंडळाचे संस्थापक मेहेंदळे यांनी म्हटलेले आहे. म्हणून तो काल लक्षात घेतल्यास राजवाड्यांच्या या टीकेची कल्पना त्यांचा स्वभावधर्म लक्षांत घेतला तर आपणास करता येईल.

## डेक्कन कॉलेजचे कार्य

डेक्कन एज्युकेशन सोसायटीवर हल्ला चढवितांना आपले वडील बंधू न्यू इंग्लिश स्कूलचे माजी विद्यार्थी व तेव्हां तर प्रत्यक्ष फर्ग्युसन कॉलेजांतील एक सन्मान्य आजीव सेवक या गोष्टींचा जर राजवाड्यांना

अटकाव होऊ शकला नाही तर डेक्कन कॉलेजबद्दल लिहिताना त्यांना कोणता विचार सावरणारा ठरला असता? त्यांनी डेक्कन कॉलेज-बद्दल प्रतिकूल लिहिले ते शिकवणाऱ्यांच्या हेतूविषयी, ज्या परिसरात ते कॉलेज अखेर उभे राहिले त्या जागेविषयी, तेथील काही निःसत्व अध्यापकांविषयी आणि शिक्षणक्रमामध्ये असलेल्या निरर्थकतेविषयी, धर्मभावनेच्या अभावाविषयी व सांस्कृतिक प्रवर्तनाच्या उदासीनते-विषयी. डेक्कन कॉलेजविषयी इतरांनी पुष्कळच चांगले लिहिलेले आहे. विष्णु कृष्ण चिपळूणकर यांचे चरित्र त्यांच्या बंधूंनी लिहिले. त्यात डेक्कन कॉलेजविषयी बरेचसे विस्ताराने लिहिले आहे. कीलहार्न-संबंधी व इतर प्राध्यापकांविषयी आदरबुद्धि ठेवून परंतु सत्य निवेदन करण्याच्या दृष्टीने बरेचसे तेथे लिहिलेले आढळते. विष्णु मोरेश्वर महाजनी, श्री. चौकर, गणेश जनार्दन आगाशे इत्यादींनी डेक्कन कॉलेजबद्दल लिहिलेले असून त्यापैकी आगाश्यांच्या व महाजनींच्या लेखनांत गौरवभावना बरीच दिसते. विविध ज्ञान विस्तारात १९०३ साली काही शिक्षणविषयक अनुभव सांगणारे लेख प्रसिद्ध झाले, असे या निबंधाच्या सुरुवातीला राजवाड्यांनी म्हटलेले आहे. प्रत्यक्षांत जे आढळते ते असे कीं, १९०३ सालच्या विविधज्ञान विस्ताराच्या फक्त एका अंकात डेक्कन कॉलेज १८५१ ते १९०१ या फ्रेझर यानी लिहिलेल्या ग्रंथाचे सविस्तर परीक्षण आलेले आहे. परीक्षण लिहिणाऱ्याची भावना आदराची असून हा लेखक डेक्कन कॉलेजचा माजी विद्यार्थीच आहे. गोखले प्राध्यापकाचे नांव फ्रेझर यांनी दिलेले नाही इत्यादी कांहीं किरकोळ दुरुस्त्या या परीक्षणांत असल्या तरी डेक्कन कॉलेजबद्दल सर्वत्र आदरभाव आहे. हेच वि. मो. महाजनींचे लेखन असावे असा तर्क करावासा वाटतो. विविध-ज्ञान विस्ताराचे संपादक रावसाहेब मोरमकर हे सरकारी नोकर.

म्हणून विविध ज्ञान विस्तार हे मासिक कितीही उत्कृष्ट वाङ्मयीन दर्जाचे असले तरी जहाल विचारसरणी त्या मासिकाला वर्ज्यच होती. राजवाड्यांनी हा निबंध लिहावयास घेतला तो थोड्याशा उपहासगर्भ आणि संतप्त मनःस्थितीत, हे आधी सूचित केलेच आहे. निबंधाच्या प्रस्तावातच मुळी ही मिश्र भावना व्यक्त होते. तेव्हा इतरांनी डेक्कन कॉलेज संबंधी कितीही बरे म्हटले असले तरी १९०४ सालच्या त्या स्फोटक कालामध्ये राजवाड्यांना ते कसे दिसले याचे प्रतिबिंब या निबंधात पडलेले आहे.

गतकालाचे समालोचन करीत असतांना त्या त्या काळच्या आपल्या खऱ्या भावना काय होत्या त्याचे भान न राहाता ज्या काळी आपण लिहीत असतो त्या वेळच्या आपल्या भावनांच्या चष्म्यातून व आपल्या कर्तृत्वाच्या मनोऱ्यावरून मनुष्य गत कालाकडे पाहाण्यास प्रवृत्त होतो. राजवाड्यांनी या निबंधात आपण नोकर होण्यासाठी शिक्षण घेणार नाही असे आधीच ठरविले होते असे म्हटलेले आहे. स्वतंत्र धंदा करण्याची आपली मनीषा होती असे ते म्हणतात. १९०४ साली त्यांचे हे म्हणणे योग्य असले व फारसे खटकणारे नसले तरीहि इतिहास संशोधन कार्याला वाहून घेण्याचा समय येईपर्यंत त्यांची कार्याची दिशा निश्चित झाली नव्हती हे खास किंबहुना जरी त्यांनी डेक्कन कॉलेजला भरपूर शिव्या दिल्या असल्या तरी त्यांची तेजस्वी मानसिक घडण बनविण्याच्या कामी डेक्कन कॉलेजचे संस्कारच असले पाहिजेत असे प्रस्तुत संपादकास निखालस वाटते. म्हणून सर्व साधारणपणे डेक्कन कॉलेज या संस्थेने नव्या महाराष्ट्राची घडण आपल्या परीने कशी केली हे थोडक्यात सूचित करणे इष्ट ठरेल. डेक्कन कॉलेजची संपूर्ण कामगिरी येथे चर्चेस घेता येणार नाही.

संस्कृतीचे पुनरुत्थान होत असताना महत्त्वाच्या शिक्षण केंद्राचा प्रभाव अतिशय पडतो. आपल्याकडील अशा नव्या शिक्षण संस्था प्रामुख्याने दोन. एक मुंबईचे एल्फिन्स्टन कॉलेज व दुसरे पुण्याचे डेक्कन कॉलेज. एल्फिन्सटन कॉलेजने दादाभाई, तेलंग, रानडे, चंदावरकर, गोखले, फेरोजशा मेथा हे राष्ट्रवीर निर्माण केलेले आहेत; अलीकडच्या थोर मंडळींची यादी देत बसण्याचे कारण नाही. परंतु ही यादी जी परंपरा दाखविते ती सर्व साधारणपणाने सनदशीर राजकारणाची, नेमस्तांची, महत्त्वाची सरकारी नोकरीतील पदे जनहितार्थ भूषविणारांची, अशी आहे. डेक्कन कॉलेजने झुंजारपणाची शिकवण दिली. विचार जागृतीसाठी त्यागी जीवन पत्करण्याची वृत्ति निदान काही जणात तरी स्फुरविली; निर्भयता शिकविली आणि संस्कृतच्या संशोधनाला व इतिहासाच्या संशोधनाला चालना दिली. डेक्कन कॉलेज हे श्रीमंतांचे, चैनी लोकांचे, अशी जी समजूत झाली ती पुढे इतर खाजगी कॉलेजे निर्माण झाल्यानंतर. वास्तविक एखादी शिक्षण संस्था असुक प्रकारची शिकवण देते असे म्हटले जाते, तेव्हा ती शिकवण देण्याचे तिचे सामर्थ्य सदोदित तेवढेच प्रज्वलित असते असे नाही; किंवा तिच्या संस्काराखाली येणाऱ्या प्रत्येकाच्या अंगीच ती शिकवण भिनत असते असेही नाही. साकल्याने या परिणामाकडे पहावयाचे असते. असे पाहिले तर डेक्कन कॉलेजने हा परिणाम १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत घडविलेला आहे असे खास म्हणता येईल. अशा संस्थेची थोडी अधिक माहिती होणे जरूरीचे आहे.

खडकीच्या लढाईनंतर १० फेब्रुवारी १८१८ रोजी सातारा काबीज करण्यात आला व १२ फेब्रुवारी रोजी एक मराठी फर्मान काढून माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी लोकांना आश्वासन दिले की, पेशवाईत चालू असलेल्या सर्व धार्मिक व धर्मादाय स्वरूपाच्या ग्रंथांचे

इंग्रज सरकार रक्षण करील. १७३१ पासून दक्षिणा वाटण्याची प्रथा पेशव्यांनी दाभाड्यापासून आपणाकडे घेतली होती. ती प्रथा साहाजिकच इंग्रजांच्या विचारार्थ पुढे आली. या दक्षिणेच्या रकमे-तून नाशिक व वाई या दोन ठिकाणी हिंदू कॉलेजेस सुरू करावीत असे एल्फिन्स्टनला वाटले. परंतु तो विचार पुढे बाजूस पडून पुण्यातच संस्कृत कॉलेज १८२१ मध्ये सुरू झाले. १८२२ च्या अखेरीस येथे १४३ ब्राह्मण विद्यार्थी होते. आधुनिक विद्येचा अन्तर्भाव अजून झाला नव्हता. हे संस्कृत कॉलेज काटकसरीच्या नावाखाली बंद करण्यांत येणार, असे निवृत्त एल्फिन्स्टनला समजल्याबरोबर त्याने या विद्यालयाची आवश्यकता कंपनी सरकारच्या गळी उतरविली. नवे पाश्चात्य ज्ञान तेथे शिकवले जात नाही म्हणून ते विद्यालय बंद करणे ही मोठी चूक होईल, असे सांगून संस्कृतिसंवर्धनाच्या दृष्टीने मूळ ठिकाणच्या लोकांच्या विद्येला आश्रय दिलाच पाहिजे; त्यांचा जो सांस्कृतिक वारसा आहे, तो समूळ नष्ट करून तेथे आधुनिक विद्या उपरी आणून लावणे कमालीचे मूर्खपणाचे होईल असेहि त्याने आवर्जून सांगितले. आज ना उद्या या संस्कृत विद्यालयात आधुनिक विषयांचा शिरकाव होईल. परंतु जी नवी विद्या शिकविली जाईल ती मूळच्या संस्कृतीला धरूनच शिकविली पाहिजे, हे त्याने कंपनी सरकारच्या निदर्शनास आणिले.

१८३७ मध्ये संस्कृतच्या कांही शाखा कमी करून मराठी विषय शिकविण्यास तेथे सुरवात झाली. मेजर क्यांडी यांची नेमणूक या सुमारचीच. नव्या संस्कारांना लोक किती बुजत असत याचे उदाहरण पुणे नगर संस्थेच्या इतिहासात नमूद केलेले आहे. ते असे की, १८३७ मध्ये डेक्कन कॉलेजांत (संस्कृत कॉलेजांत; कारण अजून ते डेक्कन कॉलेज व्हावयाचे होते) एक-दोन टेबले ठेवण्यात आली. त्या

बरोबर कांही शास्त्री प्राध्यापकांनी मेजर क्यांडीचा निषेध करून त्या चमत्कारिक वस्तु परत घेऊन जाण्यास सांगितले. संस्कृतच्या वर्गात ही पाश्चात्य वस्तु ठेवल्याने तेथील पावित्र्याचा भंग होतो असे त्यांनी सांगितले. यावरून १८५१ पर्यंत या संस्कृत कॉलेजात ब्राह्मणाखेरीज इतर जातींना प्रवेश नव्हता याबद्दल विशेष आश्चर्य वाटत नाही. शिवाय आता संस्कृत शिक्षणांत पुष्कळ बदल झाला आहे. परंतु १८२१ पासून संस्कृत पाठशाळा व संस्कृत कॉलेज यामध्ये वाङ्मयीन संस्कृत विद्याभ्यासाबरोबरच वैदिक ब्राह्मणांना दिले जाणारे पौरोहित्याचे व ब्राह्मण धर्माचे शिक्षणही दिले जात असे. वेद हे अपौरुषेय आहेत; ईश्वरप्रणीत आहेत; अत्यंत पवित्र आहेत; अशी भावना असल्यामुळे व १८५१ पर्यंत येथे अशा तऱ्हेचे शिक्षण दिले जात असल्यामुळे फक्त ब्राह्मण ज्ञातीलाच येथे प्रवेश होता. १८४२ पासून या कॉलेजात इंग्लिश शिकविण्यात येऊ लागले. परंतु या कॉलेजात खरा मोठा फरक १८५१-५२ या दोन वर्षांतच पडला. ७ जून १८५१, शनिवार, या दिवशी संस्कृत कॉलेज व संस्कृत पाठशाळा यांचे एकीकरण होऊन मराठी, इंग्लिश, संस्कृत व नॉर्मल क्लास असे चार विभाग सुरू झाले. मराठी आवश्यक या विभागांत भाषांतर करण्यासाठी चार विद्वान् महिना ४० रुपयावर नेमलेले असत. त्यांची नेमणूक ५ वर्षांपर्यंत होती. इंग्रजीतून निवडक ग्रंथांचे भाषांतर करणे किंवा उपयुक्त मजकुराची पुस्तके मराठीत तयार करणे हे त्यांचे काम. इंग्लिश विभागांत उच्च श्रेणीच्या विद्यार्थ्यांना जॉन्सन, गोल्डस्मिथ, शेक्स्पीअर, ह्यूम, मिल व ह्यामिलटन रीड यांचे तर्कशास्त्र व गणीत हे विषय अभ्यासावे लागत. इंग्लिश किंवा संस्कृत ऐच्छिक होते. परंतु इंग्लिश, संस्कृत व मराठी तीनही विषयांचा अभ्यास करणारांना ५० शिष्यवृत्त्या होत्या. संस्कृतसाठी १० शिष्यवृत्त्या आणखी वेगळ्या

होत्या. नॉर्मल क्लासचा उद्देश शिक्षक तयार करणे हा होता. व यासाठी २० शिष्यवृत्या होत्या. यावेळीच कॉलेजचे नांव पुणे संस्कृत कॉलेज याच्या ऐवजी "पूना कॉलेज" असे झाले.

दक्षिणेचे स्वरूप आता थांबले, कारण वेद शिकण्याचे स्वरूपही आता थांबले. आणि ही संस्था सर्व जातींना खुली झाली. काही अब्राह्मण विद्यार्थ्यांना शिकविण्याची कामगिरी शास्त्री मंडळीवर आली तेव्हा बऱ्याचशा शास्त्र्यांनी या गोष्टीस स्पष्टपणे नकार दिला आणि मराठी विभागात भाषांतर करण्याचे कमी पगाराचे काम पत्करले, परंतु स्वतःच्या श्रद्धेपासून ते विचलित झाले नाहीत. ज्योतिबा फुले पुण्यात महार मांगासाठी ज्यावेळी शाळा काढत होते किंवा मुलींची शाळा स्थापन करीत होते अशा वेळी सनातनी दृष्टिकोन कसा होता ते यावरून दिसते. आपले नुकसान पत्करूनसुद्धा ते जुन्या श्रद्धेला चिकटून राहिले. त्यातील ज्या दोघांनी अब्राह्मण विद्यार्थ्यांना शिकविण्यात मुळीच शंका बाळगिली नाही त्यांची नावे धनंजय कीर यांनी आपल्या इंग्रजी 'फुले चरित्रात' दिलेलीच आहेत.

१८५७ मध्ये दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाऐवजी चार वर्षांचा अभ्यासक्रम होऊन १९ वर्षांच्या खाली असलेले विद्यार्थी घेतले जाऊ नयेत असे ठरले. १८६० मध्ये संस्था मुंबई विद्यापीठाला संलग्न करण्यात आली. तरीहि काही वर्षे मॅट्रिक्युलेशनचे वर्ग कॉलेजात होतेच. १८६१ मध्ये ६ विद्यार्थी व १८६२ मध्ये १८ विद्यार्थी पूना कॉलेजमधून मॅट्रिक पास झाले. १८६५ मध्ये मात्र कॉलेजचे हे मॅट्रिकच्या वर्गाची तयारी करून घेण्याचे काम संपले आणि त्या दृष्टीने विचार केल्यास १९६५ हे वर्ष डेक्कन कॉलेजच्या शताब्दीचे वर्ष असेहि म्हणता येईल.

पूना कॉलेज विश्रामबाग वाड्यात होते. रस्त्यातील आवाज, रहदारी, इमारतीचा कोंदटपणा या गोष्टींचा विचार करून हे कॉलेज दुसरीकडे हलवावे असे ठरविण्यात आले. हे ठरविण्यात आणखी एक खरे बलवत्तर कारण होते; ते म्हणजे 'पेशव्यांची ही जुनी राजधानी असल्याने राजकीय स्मृति सदोदित जाग्या होत असतात. त्यामुळे तरुणांची माथी स्थिर रहात नाहीत.' म्हणून हे कॉलेज विश्रामबाग वाड्यातून हालवून अहमदनगरला न्यावे असा एक विचार होता. तो अमलात आला नाही. परंतु जमशेटजी जिजीभाई यांनी एक लाख रुपये सरकारला देणगीदाखल दिले व अट घातली की, सरकारने तेवढीच रक्कम घालावी आणि योग्य अशी जागा द्यावी. विश्रामबाग वाड्यातून काही दिवस वानवडीला व तेथून डेक्कन कॉलेजच्या सध्याचे जागेवर या कॉलेजचे स्थलांतर झाले. या जागेची पायाभरणी सर बार्टल फ्रीयर यांनी १५ आक्टोबर १८६४ रोजी केली; व समारंभाचे अखेर असे जाहीर केले की, येथून पुढे 'पूना कॉलेज' या नावाऐवजी 'डेक्कन कॉलेज' असे या संस्थेचे नाव राहील. नुसत्या पुण्यालाच नव्हे तर सर्व दख्खनला या संस्थेतून विद्यादान होणार आहे. डेक्कन कॉलेजच्या जागेबद्दल राजवाड्यांनी जे खेदाचे व उद्विग्नतेचे विचार व्यक्त केलेले आहेत त्याची पार्श्वभूमी खरी कशी होती हे पुण्याहून कॉलेज का हलविण्यात आले याची जी मीमांसा वर दिली आहे त्यावरून जाणत्यांच्या लक्षात येईल.

बी. के. ठाकोर यांच्या मताप्रमाणे २३ मार्च १८६८ हाच डेक्कन कॉलेजचा खरा स्थापना दिन आहे. परंतु त्याविषयी आपणाला सध्या विचार करावयाचा नाही. वर जे डेक्कन कॉलेज संबंधी संक्षिप्त वर्णन दिले आहे ते बी. के. ठाकोर यांच्या 'डेक्कन कॉलेजचा जन्म' या लेखाच्या आधाराने प्रामुख्याने दिलेले आहे. हा त्यांचा लेख डेक्कन

कॉलेज कार्टली या त्रैमासिकाच्या पहिल्या वर्षाच्या चवथ्या म्हणजे वर्षअखेरच्या अंकांत प्रसिद्ध झालेला आहे. डेक्कन कॉलेज कार्टर्ली हे त्रैमासिक १८९२ पासून डेक्कन कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी प्राचार्यांच्या व प्राध्यापकांच्या संमतीने व सहकार्याने चालू केले. हे त्रैमासिक इंग्रजीत व मराठीत मजकूर प्रसिद्ध करीत असे. यातल्या काही मजकुराची कल्पना दिल्यास डेक्कन कॉलेज हे विचार मंथनाचे महत्त्वाचे क्षेत्र कसे होते त्याची कल्पना येईल. मात्र फक्त संक्षेपानेच तसे येथे करण्यांत येत आहे. पहिल्या अंकातच शिवराम महादेव परांजपे यांची '**अहिल्याजार**' ही खंडकाव्यात्मक कविता प्रसिद्ध झाली. त्या कवितेवर अश्लील म्हणून मराठ्यात टीका आली. आणि त्या टीकेला रीतसर उत्तर म्हणून नसले तरीहि एक प्रकारे त्या कवितेचे समर्थन करण्यासाठी पुढील त्रैमासिकाच्या अंकात काही मजकूर आढळतो. इतर अनेक वर्षांचे अंक पाहिल्यास पुष्कळशा गोष्टींवर प्रकाश पडतो. उदाहरणार्थ, टिळक नामदार झाल्याबद्दल त्यांचा सत्कार डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केला होता, हे त्यावरून दिसते. इतिहास विषयाला जी चालना मिळाली असे मागे म्हटले आहे, त्याचे भरपूर प्रत्यंतर यातील अनेक लेखावरून मिळते. सामाजिक सुधारणा झाल्याच पाहिजेत हे प्रतिपादन आढळते, त्याचप्रमाणे सामाजिक सुधारणांना विरोध करणारे जोरदार प्रतिपादनही आढळते. युनिव्हर्सिटीची सुधारणा तेव्हा घाटत होती तिच्याविषयी, तरुणांमधील नैतिकतेविषयी, मातृभाषांना योग्य स्थान प्राप्त होण्याविषयी, भगवद्गीतेतील शिकवणुकीच्या स्वरूपाविषयी, त्या वेळच्या कॉलेजमधील प्राध्यापकांच्या बौद्धिक व इतर गुणवत्तेविषयी व विशेषतः पूर्वीच्या प्राध्यापकाच्या तुलनेने ते कसे दिसतात याविषयी आणि कॉलेज जीवनातील स्मृतींच्या विषयी असे विविध स्वरूपाचे लेख या

त्रैमासिकातून आलेले आहेत. वादविवादाच्या हकीगती आहेत. वामन शिवराम आपटे यांच्यावर 'इन मेमोरियम' ही छोटीशी कविता त्यांच्या मृत्यूनंतर ' के. जे. एस ' या सहीने प्रसिद्ध झालेली आहे. आगरकरांवरील मृत्युलेखही उत्कृष्ट आहे. याखेरीज या क्वार्टर्लीच्या अंकावरून इन्डियन हिस्टरी सोसायटी, एसे सोसायटी, नेटिव्ह क्लॉथ सोसायटी, अशाही काही संस्था तेथे निर्माण झाल्या होत्या असे दिसते. त्या निर्माण झाल्या आणि विलयाला गेल्या याबद्दल डेक्कन कॉलेज या फ्रेजरने लिहिलेल्या ग्रंथाचे परीक्षण करणाऱ्याने खेद व्यक्त केला आहे. परंतु डेक्कन कॉलेजचे वातावरण कसे होते ते दर्शविणाऱ्या या खुणा आहेत. अफझूलखानाच्या वधाविषयी ऐतिहासिक लेख या त्रैमासिकात आले आहेत. गँट डफच्या इतिहासावर टीका करणारे कीर्तने, निबंधमालाकार चिपळूणकर व साने यांच्या इतिहाससंशोधन प्रेमाचा परिणाम राजवाड्यांवर झाला हे त्यांनी स्वतःच म्हटले आहे. परंतु डेक्कन कॉलेजमुळे आपल्याला इतिहासाची महती समजली असे त्यांनी म्हटले नसले तरी डेक्कन कॉलेजच्या वातावरणाचाही काही परिणाम होऊन राजवाड्यांच्या मनात इतिहासप्रेम रुजले; याचे कारण त्यांचे डेक्कन कॉलेजातील शिक्षण हेही एक आहे; असे त्या कॉलेजात तेव्हा इतिहास विषयाला कोणी प्राध्यापक नव्हता तरीही म्हणावेसे वाटते. डेक्कन कॉलेज क्वार्टर्लीच्या एका अंकात आंबेजोगाई या तीर्थक्षेत्रावर एक लेख आहे. या लेखातील एक वाक्य चिंतनीय आहे. डेक्कन कॉलेज त्रैमासिक हे कॉलेज प्रकाशन. प्राचार्य आणि इतर प्राध्यापक या सरकारी नोकरीत असणाऱ्या विद्वानांचे व विद्याखात्याचे त्यातील मजकुराकडे लक्ष असणारच. लेखक या लेखात म्हणतो की, आंबेजोगाई येथील देवालयाची स्थिति समाधानकारक आहे; याचे कारण

" मुसलमानी राज्य आहेः— अथवा इंग्रजी राज्य नाही म्हणून. " हा लेख पहिल्या वर्षाच्या दुसऱ्या अंकात आहे.

डेक्कन कॉलेजची संस्कृति अशी होती. विचारांचे निर्भय प्रतिपादन, स्वतःला वाटणाऱ्या मतांचे खुले आविष्करण, अध्यापकाविषयी आदरबुद्धी प्रगट करून देखील त्यांच्याशी झालेले मतभेद उघडपणे मांडण्याची परवानगी, ईश्वराचे अस्तित्व अथवा नास्तिकता या मतांची चर्चा, इंग्रजी राज्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामासारख्या अनेक बाबींची उलटसुलट निःशंक चर्चा, हे डेक्कन कॉलेजचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. परमताबद्दल सहिष्णुता आणि आपल्या विचारांचे सडेतोड आविष्करण हे गुण या जीवनातून अनेक विद्यार्थ्यांनी उचलले आहेत. ऐतिहासिक विवेचन करणाऱ्या राजवाड्यांनीहि ते उचलले आहेत हे त्यांच्या कित्येक महत्त्वाच्या लेखावरून दिसून येते. गीतारहस्याचा जन्म या शिक्षणातून झाला आहे. त्याचप्रमाणे गीतेतील भाषा व व्याकरण या संबंधी दोष दिग्दर्शन करण्याची तयारीही या शिक्षणांतूनच निर्माण झाली आहे. मराठी भाषेच्या व्याकरणाची खोल मीमांसा स्फुरण्याला देखील डेक्कन कॉलेजचे शिक्षणच कारणीभूत झाले असले पाहिजे. या सर्व दृष्टीने पाहू जाता असे खात्रीने म्हणता येईल की, नवा महाराष्ट्र घडविणाऱ्या उपकारक गोष्टींपैकी डेक्कन कॉलेज हीही एक संस्था होय.

हे डेक्कन कॉलेज सरकारी संस्था : ती फर्ग्यूसन कॉलेजच्या मंडळींना चालवावयास देण्याचा सरकारचा मध्यंतरी विचार होता. तो अंमलात आला असता तरी सरकारमान्य फर्ग्यूसन कॉलेजबद्दल १९०४ साली राजवाड्यांना जेवढा तिटकारा वाटत होता तेवढाच त्या कॉलेजबद्दलहि वाटला. त्यातून डेक्कन कॉलेज खासगी शिक्षणसंस्थेच्या ऐवजी सरकारी तंत्रानेच पुढे चालले. आणि त्या कॉलेजात मधूनमधून

उर्मट सत्ताधिकारी इंग्रजी राज्याची शेखी मिरवू लागले. असे काही प्रसंग राजवाड्यांच्या कानी आल्यानंतर त्यांचे माथे भडकावे यात अस्वाभाविक असे काहीं नव्हते. याविषयी थोडीशी सविस्तर माहिती प्रो. सेल्बी आणि प्रो. वेन व प्रिन्सिपल वर्ड्स्वर्थ यांच्या विषयी जे अभिप्राय प्रगट झालेले आहेत ते सांगत असताना देता येण्या-सारखी आहे. प्रिन्सिपॉल वर्ड्स्वर्थ हे प्रसिद्ध कवी वर्ड्स्वर्थ यांचे नातू. पुढे जरी ते मुंबईला गेले तरी ते डेक्कन कॉलेजमध्ये असताना त्यांची वागणूक कशी होती याबद्दलच्या आठवणी अनेकांनी अभिमानाने लिहिलेल्या आहेत. ते अनियमित होते व पोषाकही फारसा व्यवस्थित करीत नसत. परंतु सरकारी अधिकारी आणि प्रिन्सिपॉल वर्ड्स्वर्थ यांचे कधीही पटत नसे. वर्तमान राजकीय गोष्टीसंबंधी ते मुंबईच्या दैनिकातून जोराचे लेख लिहीत आणि अधिकाऱ्यांच्या उद्दामपणा-विरुद्ध असत. एकदा ते गव्हर्नरच्या रोषालाही पात्र झाले होते आणि आपल्या जागेचा राजिनामा देण्याची त्यांनी तयारी दाखविली होती. अखेर सर रिचर्ड टेंपल यानी माघार घेतली व प्रिन्सिपल वर्ड्स्वर्थ यांचे म्हणणे अबाधित राहिले. प्रि. वर्ड्स्वर्थ किती तडफदार होते त्याची कल्पना येण्यासाठी एवढे म्हटले म्हणजे पुरे की, सर रिचर्ड टेंपल निवृत्त झाले तेव्हां त्यांच्या सन्मानार्थ जो समारंभ मुंबईस झाला त्याला ते हजर राहिले नाहीत. या निबंधात राजवाड्यांनी त्यांचा उल्लेख केला असून त्यानी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कार्याची व प्रेरणेची तुलना जेसुइट लोकांच्या कार्य-पद्धतीशी केली, हेही नमूद केलेले आहे. प्रिन्सिपाल वर्ड्स्वर्थ यांचे ते भाषण डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या इतिहास–ग्रंथांत दिलेले असून ते जर नीट वाचले तर वर्ड्स्वर्थ हे हिंदुस्थानांतील शिक्षणप्रसार आणि राजकीय जागृती यासाठी किती उत्सुक होते त्याची कल्पना

येईल. त्यांनी या सोसायटीला धन्यवाद देतांना असेही म्हटले आहे की, ‘ बंगाल्यात ज्याप्रमाणे इंग्रजी शिक्षणाचे दुष्परिणाम दिसूं लागले व पाश्चात्य जीवनसरणीचा अवलंब करिताना मूळ बंगाली किंवा भारतीय संस्कृतीचा सुशिक्षितास संपूर्ण तिटकारा वाटू लागला तसे पश्चिम भारतात व डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या क्षेत्रात दिसत नाही; ही फार आनंदाची गोष्ट आहे.’ फर्ग्युसन कॉलेजच्या उद्‌घाटनाच्या वेळचे प्रि. वर्डस्वर्थ यांचे हे उद्‌गार भारतीय संस्कृती आणि इंग्रजी शिक्षण यांची ताटातूट न होता त्यांच्यात उत्कृष्ट समन्वयच निर्माण झाला पाहिजे हे दर्शवीत नाहीत काय ? वंगभंगाच्या चळवळीनंतर बंगालचे डोळे उघडले आणि सुशिक्षित बंगाली स्त्रीपुरुष आता पाश्चात्य जीवनसरणी ऐवजी बंगाली जीवनसरणीचा आग्रहाने पुरस्कार करीत आहेत. आपण मात्र वर्डस्वर्थ यांचे धन्यवाद फारसे ध्यानात न ठेवितां महाराष्ट्रीय किंवा भारतीय जीवनसरणी दूर लोटू लागलो आहेत.

प्रो. सेल्बी आणि प्रो. बेन यांच्या विषयीही डेक्कन कॉलेजच्या संदर्भात थोडेसे सांगण्या सारखे आहे. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाच्या एका अंकात प्रो. सेल्बी यांच्या बटलरची व्याख्याने या पुस्तकाचा परामर्ष घेण्यात आला आहे. १८८२ सालच्या या परीक्षणात असे म्हटले आहे की, सेल्बी यांचा नवमतवाद, नास्तिकता, आत्म्याच्या अमरत्वाविषयी त्याना असणारी शंका, या गोष्टी पहाता डेक्कन कॉलेजातील विद्यार्थी आपल्या संस्कारक्षम वयात अशा गुरूच्या हातून शिक्षण घेत आहेत ही चिंतेची बाब आहे. मिल्लच्या मताचे पूर्ण प्रतिबिंब सेल्बी याजवर पडलेले दिसते. परंतु ‘ दि न्याशनल माईन्ड कॅनॉट रेस्ट इन अग्नास्टिसिझम ’ हे परीक्षण बहुधा रानड्यांनी लिहिलेले असले पाहिजे. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादक तेव्हा सीतारामपंत चिपळूणकर हेच होते. पुढे मात्र १९०४

साली सेल्बी यांचा दृष्टीकोन विशेष निराळा झाला नसला तरी रँगलर परांजप्याच्या मताहून अधिक मान्य होईल असे मत धार्मिक शिक्षणाच्या आवश्यकते संबंधी प्रिन्सिपल सेल्बी यांनी व्यक्त केले असल्याचे लोकमान्य टिळकांच्या एका लेखावरून दिसते.

प्रो. बेन यांच्या बद्दल डेक्कन कॉलेज क्वार्टर्लीच्या १८९२ च्या अंकांत असा मजकूर आहे की ते जॉन स्टुअर्ट मिलला सामान्य बुद्धीचा समजत असत. बेन आणि सेल्बी यांत महदंतर होते. बेन यांचा संबंध डेक्कन एज्युकेशन सोसायटीशी आलेला दिसत नाही. उलट १८८४ सालापासून प्रिन्सिपल सेल्बी यांचा संबंध डे. ए. सोसायटीशी जो निर्माण झाला तो १९०६ पर्यंत घनिष्ट स्वरुपाचाच होता. बेन यांच्या विषयीची तेव्हांच्या महाराष्ट्रातील टिळक पक्षाची दृष्टी कोणती असेल त्याचा अंदाज यावा म्हणून केळकरांनी टिळक चरित्रांत नाना फडणीसांचा उत्सव या सदराखाली जी हकिकत दिली आहे ती येथे देतो. राजवाड्यांच्या टीकेची पार्श्वभूमी सुद्धा त्यामुळे थोडीशी समजते. "२० मार्च १९०० च्या केसरीच्या अंकात नाना फडणीस यांच्यावर त्यांच्या शंभराव्या श्राद्ध तिथीच्या संबंधाने विस्तृत लेख प्रसिद्ध झाला. डेक्कन कॉलेजमध्ये पुढच्याच आठवड्यात डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन जाइल्स यांचे व्याख्यान झाले. त्यांनी शंभर वर्षापूर्वीचे पुणे हाच विषय मुद्दाम निवडला; व इंग्रजी सुराज्य आणि मराठी स्वराज्य यांची तुलना व्हावी म्हणून पेशव्यांच्या राज्यांतील जुलूम व मागासलेपणा यांच्यावर भर दिला. आगगाडी तारायंत्र यांचीही महती त्यानी गाइली. प्रो. बेन व डॉक्टर भांडारकर या भाषणाला हजर होते. प्रो. बेन विनोदाने म्हणाले 'जाइल्स साहेबांनी इंग्रजी राज्यांतील सुखसोयींची यादी वाचून दाखविली त्यात बायसिकल, क्रिकेट वगैरे गोष्टींचा उल्लेख चुकून

राहिला असावा : शिवाजी हजर असता तर तो बायसिकलच्या शर्यतीत पहिला आला असता, व तानाजी हा उत्तम क्रिकेट खेळला असता.' डॉक्टर भांडारकर तर जाइल्सच्या भाषणाला अध्यक्षच होते. त्यांनी जाइल्सच्या 'पोक्त' विचारांची वाखाणणीच केली. ते म्हणाले 'यशवंतराव होळकरांच्या मृत्यूचा मुद्दा फारच छान होता. पूर्वीच्या रानटी स्थितीचा मला अनुभव आहे. मी मालवणाहून मुंबईस प्रथम परीक्षेस आलो तेव्हा मला १५ दिवस लागले. आता ती स्थिति नाही. मला एवढेच वाईट वाटते की, मी जरा लवकर जन्माला आलो. थोड्याशा उशीराने जन्माला आलो असतो तर ह्या सुखसोयींचा उपभोग लहानपणीच मला घेता आला असता. मी आज तुमच्यापुढे बोलायला उभा आहे ही इंग्रजी राज्याची कृपा. नाहीतर मी माझ्या खेडेगावात ३ तास संध्या आणि ४ तास ब्रह्मयज्ञ करीत बसलो असतो.' भांडारकर अशा गोष्टी कोठेहि त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने अगदी मनापासून सरळ सांगत. बिचाऱ्याला विनोद माहीतच नव्हता. त्यांनी जुन्या दख्खनचा इतिहास लिहिला त्यावरून प्राचीन इतिहास त्याना अवगत होता आणि जुन्या संस्कृतीबद्दल त्यांना अभिमान नव्हता असे नाही. पण पेशव्यांच्या निंदेबरोबर साहेबावरील टीकेचाही एकादा तरी शब्द बोलून राष्ट्रीय अभिमान प्रगट करावा आणि जाइल्स साहेबाची थोडीतरी हजेरी घ्यावी याविषयीचे अज्ञान त्याना होते. म्हणून विद्यार्थ्यांपुढे वरीलप्रमाणे प्रदर्शन त्यांनी केले. केसरीतील नाना फडणीसावरील लेख, महाराष्ट्रात झालेले ठिकठिकाणचे उत्सव आणि डेक्कन कॉलेजात झालेली मराठेशाहीची ही निंदाप्रचुर भाषणे यांचा बरोबर विरोध पाहिला म्हणजे सरकारी कॉलेजाविषयी लोकांच्या मनात अप्रीति उत्पन्न व्हावी हे स्वाभाविकच नाही काय? पुढच्या आठवड्यात

प्रो. बेन यांना रजेवर जाताना विद्यार्थ्यांनी मानपत्र दिले त्या वेळी विद्यार्थ्यांना उपदेश करताना बेन यांनी जाइल्स साहेबांच्या वेळी केलेली चूक सुधारून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात ते म्हणतात की, मी बिचारा भोळा म्हणून काहीतरी बोलून जातो. याचा बाहेरील लोकांना उपयोग करण्याचा काय अधिकार ? १८९६ साली प्रो. भानूंनी शिवाजीवर व्याख्यान दिले. त्यावेळी मीही थोडे बोललो. त्याचा भानूंनी दुरूपयोग केला. मी आपला भोळा बोलून जातो ते लोकांनी खरे कां समजावे ? याही बोलण्यात खोच होती. शिवाजीची स्तुती करणारे त्यांचे भाषण टिळकांनी खटल्यात पुराव्यात दिले होते आणि साहेब लोक देखील शिवाजी विषयी काय बोलतात हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. अर्थात् त्याचा गवगवा झाला आणि बेन साहेबांनी जाइल्स साहेबांची थट्टा केली असे बाहेर लोक बोलू लागले. ते त्यांना अडचणीचे वाटू लागले एवढ्याकरिताच त्यांनी हा भाषणाचा प्रसंग साधला असावा.'' ( केळकरकृत टिळकचरित्र )

राजवाड्यांना सेल्बीपेक्षा बेनचे महत्त्व तेव्हा अधिक वाटत असलं पाहिजे हे उघड आहे. बेनच्याच प्रदीर्घ अभिप्रायाचे अवतरण त्यांनी आपल्या भाषांतराचा उपोद्घात या लेखात प्लेटो व ॲरिस्टॉटल यांची थोरवी गाताना दिले आहे.

यावरून ज दिसत ते असं की, डेक्कन कॉलेज, प्रिन्सिपल वर्डस्वर्थ, सर विल्यम वेडरबर्न, प्रो. बेन आणि प्रो. सेल्बी इत्यादींचा थोडासा तपशीलवार अभ्यास करणे त्यावेळच्या महाराष्ट्राच्या मनाची घडण समजून घेण्यासाठी आवश्यक आहे.

## या निबंधा विषयीची प्रतिक्रिया :

या निबंधाची तावडतोबीची प्रतिक्रिया अत्यंत तीव्र झाली. मुंबईच्या सुबोध पत्रिकेने राजवाड्यांना उत्तर दिले. विविधज्ञान

विस्ताराच्या पुस्तक ३५ अंक ७-८ या जोड अंकात म्हणजे जुलै आगष्ट १९०४ च्या अंकात मंगेश जिवाजी तेलंग यांनी राजवाड्यांच्या निबंधाइतकेच दीर्घ असे उत्तर दिले. इतरही काही नियतकालिकातून प्रतिक्रिया प्रसिद्ध झाल्या असाव्यात. परंतु त्यांचा तपशील अद्याप आढळत नाही. राजवाड्यांच्या बेमुर्वतखोरपणावर तेलंगानी शस्त्र धरलें असून राजवाड्यांच्या अभ्यासकास ते निःसंशय उपकारक आहे. तेलंगाचे उत्तर समर्पक नसेल, परंतु ते अनेक ठिकाणी राजवाड्यांच्या स्वभाव वृत्तीवर अप्रत्यक्षपणे प्रकाश टाकणारे असल्याने महत्त्वाचे आहे. ते अनुदारपणाचे भासते. मूळ मुद्याविषयी कोठे कोठे त्यात भरपूर विपर्यास आहे; तरीही राजवाड्यांच्या विचारसरणीतील उणीवा व अखिल भारतीय दृष्टिकोनाऐवजी निव्वळ महाराष्ट्रीय दृष्टिकोन स्वीकारून राजवाड्यांनी केलेले प्रतिपादन यावर त्यात टीका आढळते. तेलंगाची टीकाही पक्षीय भूमिकेवरून आणि कदाचित् जातीय भूमिकेवरून केलेली असली तरी या निबंधाला ती पूरक आहे. राजवाड्यांविषयी तेव्हांचे जहाल लेखन राजवाड्यांच्या कोणत्या व्यंगावर किंवा मनोवृत्तीवर खरमरीत टीका करणारे होते त्याचे ते निदर्शक आहे. तेलंग हेही डेक्कन कॉलेजचे राजवाड्यांच्या वेळचेच जुने विद्यार्थी. डेक्कन कॉलेजच्या कळसत्या शिखराच्या आंत ( टॉवर ) घुबडे धूत्कार करून कसे औदासिन्य निर्माण करीत, खोल्यातून गर्दी झाल्यानंतर या टॉवरमध्ये झोपण्यासाठी विद्यार्थी कसे येत, घुबडांना हाकून लावून त्यांची अंडी हस्तगत करून राजवाड्यासारखे काही अतिक्रमी ती अंडी खाऊनही कशी टाकत; खोल्यातील दोन टेबलें एकमेकाला जोडून सर्व विद्यार्थी ती टेबलेच कॉट ऐवजी कशी वापरीत असत या गोष्टीचे बहारदार वर्णन व या गोष्टीच्या पल्लवित करणाऱ्या स्मृति वास्तविक डेक्कन

कॉलेज संबंधी आपल्या आठवणी सांगणाऱ्यानें किंवा त्या आठवणी विषयी परीक्षण लिहिणाराने जागृत केल्या असल्या. परंतु राजवाड्यांचा हा निबंध अशा ललितरम्य आठवणी सांगणारा नसल्यामुळें ज्या कडवटपणाने राजवाड्यांनी लिहिले त्याचा समाचार परीक्षण लेखकाने आपल्या जहाल व खवळून लिहिलेल्या उत्तरात घेतलेला आहे.

प्रथम हा लेख तेलंगानी निनावी छापण्याचे ठरविले होते असे दिसते. लेखाच्या सुरवातीला फक्त एक दक्षिण महाविद्यालयीन पदवीधर एवढेच लिहिलेले होते. परंतु संपूर्ण लेख झाल्यानंतर लेखाच्या खाली तेलंगानी आपले संपूर्ण नांव छापले आहे. विविधज्ञान विस्ताराच्या या अंकात काही प्रतीमध्ये एक दक्षिण महाविद्यालयीन पदवीधर या सुरवातीच्या मजकुरावर पांढरी पट्टी चिकटविलेली आहे.

तेलंगांनी राजवाड्यांच्या विषयी काही विधाने केलेली आहेत, ती विचार करावयास लावणारी आहेत. त्यातील काही अशी : ‘ त्यांची कागदी मते व त्यांचे प्रत्यक्ष वर्तन यांचा केव्हांही मेळ नसतो. मायदेश, मायभाषा, सनातन धर्म वगैरे घोटीव व गोंडस नावांची यांचे लेखात व भाषणात रेलचल आढळून येते. हे स्वतःस राष्ट्राभिमानी, देशाभिमानी म्हणवितात. पण राष्ट्रत्वास विरजण पाडणारे जातिमत्सर, परोत्कर्षाची असहिष्णुता वगैरे आत्मघातकी गुण यांचे अंतःकरणात स्वैर नांदत असतात. बिनदेशी देशाभिमानी, धर्मविहीन धर्माभिमानी व अराजक राजनिष्ठ मंडळीत राजश्री विश्वनाथ काशिनाथ राजवाडे या सद्गृहस्थांचे नांव आताशा प्रमुखत्वाने पुढे येत आहे.’ तेलंगांचा सबंध निबंध राजवाड्यांच्या निबंधाबरोबरच दिलेला असल्याने त्यातील अधिक काही भाग येथे देण्याची जरूर नाही. परंतु आणखी एक तेलंगांची विचार करावयास लावणारी टीका तेवढी त्यांच्याच शब्दांत येथे देतो.

'राजवाड्यांच्या मनःसंतापाचा आवेग अशा रीतीने एका तासाच्या हसण्याने गेला म्हणून बरे' असे छद्‌मी विधान करून डेक्कन कॉलेजच्या इमारती विषयी राजवाड्यांनी दाखविलेल्या नापसंतीचा उपहास करताना तेलंग म्हणतात की, 'नाहीतर आजला डेक्कन कॉलेज नामशेष झाले असते. व आमच्या मराठ्या राजवाड्यांचे नाव फडके, चाफेकर इत्यादि प्रसिद्ध मराठी देशभक्तांचे पटात कधीच नोंदले गेले असते.'

× × × ×

राजवाड्यांनी हा निबंध लिहिला तेव्हा ते स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म या त्रयीमुळे भारून गेले होते यात मुळीच शंका नाही. ग्रंथमालेतील त्यांचा या निबंधाच्या आधी प्रसिद्ध झालेला त्याच वर्षीचा 'कालगणन' हा निबंध पाहिला तर असे दिसते की, आपल्या शिक्षणांत जी पाश्चात्य विचार सरणी व पाश्चात्य संस्कृती घुसली तिच्यामुळे आपण स्वतःच्या परंपरांना पूर्ण पारखे झालेले आहोत याची स्पष्ट जाणीव त्याना कालगणने संबंधात देखील झाल्यामुळे पूर्वी मराठ्यांच्या इतिहासाची साधने छापताना इंग्रजी सन व तारखा आपण वापरल्या त्या इथून पुढे आता शालिवाहन शक व हिंदु पंचांगातील तिथी प्रमाणे आपण वापरणार असल्याचे त्यांनी जाहीर केलेले आहे. राजवाड्यांचा प्रस्तुत पुनर्मुद्रित होत असलेला निबंध अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. दुर्दैवाने त्यात काही प्रसिद्ध व्यक्तीवर व डेक्कन एज्युकेशन सोसायटी व डेक्कन कॉलेज यावर टीका झाल्यामुळे तो फारसा लोकांपुढे आलेला नाही. ग्रंथमालेत जून १९०४ मध्ये तो प्रथम प्रसिद्ध झाला. त्यानंतर ग्रंथमालेनेच राजवाडे संकीर्ण लेखसंग्रह हे २८ लेखांचे पुस्तक प्रसिद्ध केले; त्यात तो पुनर्मुद्रित झाला. त्यानंतर २५ वर्षे तो लुप्त झाला. साताऱ्याचे कै. विनायक शंकर ऊर्फ बाबूराव वैद्य यांनी १९३१ साली

तो स्वतंत्र पुस्तिका म्हणून 'रामदास' इत्यादि राजवाड्यांच्या इतर स्वतंत्र पुस्तिकांच्या प्रकाशनाबरोबरच प्रसिद्ध केला. १९३१ सालच्या या पुनर्मुद्रणाला एक लहानशी प्रस्तावना राष्ट्रीय शिक्षणाचे व्रत घेणाऱ्या आचार्य वि. प्र. लिमये यांनी लिहिली आहे. धुळ्याचे कै. भास्कर वामन भट यानी जे राजवाडे चरित्र लिहिले त्यात हा निबंध जसाच्या तसा समाविष्ट केला. आणि आतां तो त्यावरील तितक्याच दीर्घ अशा तेलंगांच्या टीकालेखासह महाराष्ट्रीय वाचकांपुढे येत आहे. निबंधाची प्रत तयार करताना भटांच्या चरित्रातील मजकूर राजवाडे संकीर्ण लेख संग्रह या ग्रंथमालेच्या प्रतीबरोबर ताडून पाहिलेला आहे.

सितारामपंत चिपळूणकर, काशिनाथपंत नातू इत्यादि त्या वेळच्या मोठ्या मंडळींना राजवाड्यांनी आपल्या फटकळ स्वभावाप्रमाणे अपशब्दांची लाखोली वाहिलेली आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनी लिहिलेले चरित्र वाचले म्हणजे राजवाडे कोणत्या व्यक्तीला का शिव्या देत आहेत ते थोडेफार कळते. या निबंधाला ज्या टीपा दिलेल्या आहेत त्यामधून काही ठिकाणी असा उलगडा करता आल्यास करण्याचा यत्न केलेला आहे. वैयक्तिक टीकेमुळे आणि जहाल भाषेमुळे या निबंधाला थोडेसें वैगुण्य प्राप्त झाले आहे. आणि म्हणून जेंव्हा जेंव्हा राजवाड्यांच्या स्वतःच्या शैक्षणिक अनुभवाविषयी लिहिण्याचा चरित्रकारांना किंवा लेख लिहिणारांना प्रसंग येतो तेंव्हा तेंव्हा या निबंधांतील फक्त काही निरुपद्रवी भागच उद्धृत करण्यात येतो. असे असले तरीहि हा सबंध निबंध महाराष्ट्रांतील शिक्षण विषयक विचारांच्या इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. शिवाय लेखनात जहाल टीका आहे म्हणून ते लेखन बाजूस टाकले जावे; विशेषतः राजवाड्यासारख्या मनस्वी, तपोधन अशा लेखकाचे आत्मचरित्रपर आणि चिंतनपर लेखन असूनही ते बाजूस टाकले जावे हे योग्य नाही.

राजवाड्यांच्या चरित्राच्या दृष्टीने या निबंधाचा नीट विचार झाला पाहिजे. सामाजिक महत्त्व असलेला असा हा एक मूल्यवान् दस्तऐवज आहे. महाराष्ट्राच्या मनाची १९०४-१९०५ या अत्यंत स्फोटक कालखंडातील ठेवण कशी होती त्याचे थोडेफार प्रातिनिधिक दर्शन घडविणाराही हा निबंध आहे. आजच्या शिक्षण क्षेत्रातील समस्या काही दृष्टींनी बदलल्या असल्या तरी शिक्षण आणि देशाची संस्कृती यांचा एकजीव होतो या गोष्टीची महती अबाधित राहातेच. शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना ज्या तपोबलाची आवश्यकता आहे, ते तपोबल मिळण्याची साधने अशा लेखनातूनच प्राप्त होत असतात. हे त्याचे महत्त्व पुनःपुनः मनावर ठसल्याने तो योग्य त्या प्रास्ताविक विवेचनासह पुनर्मुद्रित केलेला आहे.

राजवाड्यांसारख्या थोर विचारवंताचे जोरदार लेखन संपादित करू इच्छिणाऱ्या व्यक्तींच्या अंगी जेवढे वैदग्ध्य, कसोशीचा शोध करण्याची तयारी, अभ्यास, एकनिष्ठा आणि विचारांची स्थिरता पाहिजे तेवढी कोणा एका व्यक्तीजवळ सध्या उपलब्ध होईल किंवा नाही अशी शंका वाटते. राजवाड्यांचा अभ्यास अनेक रीतींनी अजूनही केला पाहिजे. इतिहास क्षेत्रातील त्यांच्या कार्याविषयी कोणत्या प्रकारचे विवेचन होणे आवश्यक आहे त्याचा विचार बाजूस ठेवून देखील असे म्हणावेसे वाटते की, राजवाडे आणि टिळक, राजवाडे आणि विजापूरकर, राजवाडे आणि विविध ज्ञान विस्तार मासिक, असा जरी मर्यादित स्वरूपाचा अभ्यास केला तरी त्यातून अनेक गोष्टींवर नव्या तऱ्हेने लिहितां येण्यासारखे आहे. आमच्या वाङ्मय चिकित्सकांनी आपापल्या दृष्टी प्रमाणे ही चिकित्सा करण्याचे ठरविले तर महाराष्ट्राला त्याची फार गरज आहे.

—०—

# माझे विद्यार्थी-जीवन

अथवा

( कनिष्ठ, मध्यम व उच्च शाळांतील स्वानुभव )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



गेल्या वर्षी दोनतीन गृहस्थांनी आपला पाठशालीन अनुभव मुंबईच्या विविधज्ञानविस्तारातून प्रसिद्ध केला. त्यात पाठशालेतील अनुभविलेल्या सुखाची, मिळविलेल्या ज्ञानाची व ज्ञान देणाऱ्या गुरूंची काही माहिती देण्याचा सदर गृहस्थांनी प्रयत्न केला. तसाच प्रयत्न आपणहि करून बघावा व आपला अनुभव कोणत्या प्रकारचा होता हे बाहेरच्या लोकास कळवावे, अशी मलाहि इच्छा उत्पन्न झाली. असली इच्छा मलाच एकट्याला झाली असे नाही. ह्या संबंधाने ज्या ज्या सहाध्यायी मंडळीशी माझे बोलणे झाले त्यांचीही अशीच माझ्यासारखी स्वानुभवप्रदर्शनाची उत्कट इच्छा आहे असे दिसून आले. मग ह्या बाबीचा खल करण्याकरिता आम्ही बरेच जण एके ठिकाणी जमलो व ह्या प्रश्नाची बरीच शहानिशा केली. ज्या पद्धतीने आपल्याला शिक्षण मिळाले तिची किंमत काय, ज्या शिक्षकांनी हे शिक्षण दिले त्यांची किंमत काय व ज्या स्थली हे शिक्षण मिळाले त्या स्थलाचे माहात्म्य कोणते, ते कागदावर नमूद केले असता, आपल्या पाठीमागून जे कोणी तरुण लोक हे शिक्षण अनुभविण्याची इच्छा करितील त्यांना काही माहिती मिळून, निःसंशय थोडा तरी फायदा होईल, असे सर्वांचे जरी नाही तरी बहुतेकांचे म्हणणे पडले. एका दोघांचा ह्या बाबीसंबंधाने किंचित् मतभेद होता. त्यांचे म्हणणे असे पडले की, आपल्याला जे शिक्षण मिळाले त्याची योग्यता वर्णन करण्याइतकी खचित नाही. अर्थात्, वर्णन करून आपली आपणच शोभा करून घ्यावी हे आपल्यासारख्या

कार्याकार्यज्ञांस लाजीम नाही; तेव्हा गप्प बसून विद्वान् म्हणून जो काही थोडाफार मान मिळतो तो घ्यावा आणि व्यर्थ वाचाटपणा न करावा, हे श्रेयस्कर होय. हे म्हणणे अगदीच टाकाऊ होते असे म्हणण्याचें कोणाचेंच धाडस होईना. लोक आपल्याला विद्वान् म्हणतात खरें; परंतु आपली विद्वत्ता कोणत्या दर्जाजी आहे हे आमच्यापैकी प्रत्येकजण जाणून होता. तेव्हा आपला अनुभव प्रसिद्ध न करणेच शहाणपणाचे आहे, असे एकवार सर्वांना वाटू लागले. परंतु मात्स्यान असाहि विचार मंडळीत निघाला कीं, आपली विद्वत्ता काही असो; आपल्यासारखेच जे कोणी नवीन लोक विद्वान होऊ इच्छि-तील, त्यांना आपल्या अनुभवाचा फायदा देणे हेच आपले खरे कर्तव्य आहे; मग ह्या आपल्या करणीने आपण जगाच्या तिरस्कारास पात्र होवो किंवा स्तुतीस पात्र होवो; आपल्या मागून येणाऱ्या लोकांची आपल्यासारखीच दैन्यावस्था जेणेकरून न होईल अशीच कृति आपण केली पाहिजे. परमार्थाचा स्वार्थावर पगडा बसून, हा विचार बहुतेकांना नव्हे तर झाडून सगळ्यांना—गप्प बसावयाला जे सांगत होते त्यांनाहि—पसंत पडला आणि असे ठरले की, प्रत्येकाने आपापला अनुभव सवडीप्रमाणे प्रसिद्ध करावा. हा ठराव इतर मंडळी केव्हाहि अमलात आणोत, माझा अनुभव कोणत्या तऱ्हेचा होता ते नमूद करण्याची सवड सध्या मला मिळाल्यामुळे ही संधि मी व्यर्थ दवडीत नाही.

## [ २ ]

इ. स. १८८२ साली मुंबईतील विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेत मी पसार झालो. त्या वेळी माझे वय अठरा होते. ह्या अठरा-पैकी माझी सात वर्षे इंग्रजी व तीन वर्षे मराठी शिकण्यात गेली. आठव्या वर्षीं मी धुळाक्षर शिकण्यास आरंभ केला: व दोन

तीन वर्षे अळंटळं करीत कधी शाळेत व कधी घरी मिळून सामान्य मराठी वाटेल ते वाचणे व केरोपंतांच्या अंकगणितातील वाटेल तो प्रश्न चुकतमाकत सोडविणे मला येऊ लागले. भूगोल, इतिहास, व्याकरण, व्युत्पत्ति, भूमिति, काव्य वगैरे विषयांची मला वस्तुतः बिलकूल माहिती नव्हती. ह्या तीन वर्षांतील फक्त दीड वर्षच काय तो मी शाळेत गेलो. बाकीची वर्षे माझी धांगडधिंग्यांत, विटी-दांडूत, पोहण्यात, उड्या मारण्यात व मारामाऱ्या करण्यात गेली. दीड वर्ष मी दोनचार खेडेगावातील व शहरातील शाळात होतो, तेवढ्या अवधीत मला एकहि पंतोजी शास्त्रीयरीत्या शिक्षण देणारा भेटला नाहीं. येथून तेथून सर्व पंतोजी आडमुठे, पोटभरू इकडची पाटी तिकडे उचलून टाकणाऱ्यापैकी होते. ह्या दीड वर्षाच्या कालांत आठवड्यातून दोनतीन दिवस घटका अर्धी घटका मी अभ्यास करीत असे व तेवढ्या अभ्यासावर वर्गात माझा नंबर पंतोजीची अवकृपा व देहदंड न संपादण्या इतका वर रहात असे. ह्या अवधीत अत्यंत उच्च प्रतीचे शिक्षण मिळालेला व द्रव्यावर दृष्टि न ठेवता केवळ स्वदेशांतील मुले उदात्त विचारांची, उदात्त कृति करणारी व स्वदेशावर प्रेम करणारी निपजावी एवढ्याच हेतूने अध्यापकाचा धंदा आयुष्यभर नम्रपणे करणारा असा एकादा गुरु जर मला मिळाला असता तर ह्या तीन वर्षांच्या अभ्यासात माझी प्रगती मुंबईतील विश्वविद्यालयाच्या बी. ए. च्या इतकी झाली असती असे मला आता वाटते. शिवाय धर्मनिष्ठा, देशप्रीति, वगैरे नैतिक गुणांचा उद्गम माझ्या ठायी किती झाला असता त्याचा अंदाज आता मला यथास्थित करता येतो. माझ्या आयुष्यातील आठ वर्षांपासून पंचवीस वर्षांपर्यंतची सतरा अठरा वर्षे देश, धर्म, स्वभाषा, व स्वजन यांच्याविषयीच्या अनास्थेने गुदरली ती, असा उत्तम गुरू मिळता तर, खचित गुदरली

नसती. एकंदरीत अदमास करता, मला असे वाटते की ह्या तीन वर्षांत जे काही मी नवीन शिकलो ते सर्व, एखाद्या उत्तम गुरूच्या देखरेखीखाली, मी सहा महिन्यांत शिकलो असतो. म्हणजे, या तीन वर्षांपैकी माझ्या आयुष्यातील अडीच वर्षे नूतन ज्ञान संपादन दृष्टीने अगदी फुकट गेली. खेरीज नैतिक व धार्मिक दृष्ट्या माझा किती तोटा झाला तो तर सांगवतच नाही. त्यात खैर एवढीच झाली की, मराठी चवथी इयत्ता संपविल्यावर सहाव्या इयत्ते-पर्यंत अभ्यास करण्यात आणखी काळ न दवडता, मला माझ्या घरच्या मंडळींनी इंग्रजी शाळेत घातले. इंग्रजी शिकण्यात नोकरी मिळण्याचा जास्त संभव आहे असे पाहून त्यांनी ही व्यवस्था केली असावी असा माझा तर्क आहे.

[ ३ ]

१८७६ साली पहिल्यांदा मी पुण्यातील बाबा गोखले[१] यांच्या शाळेत गेलो. त्या वेळी ह्या शाळेची स्थिति अगदीच खाला-वलेली होती. पूर्वी ही शाळा बऱ्या स्थितीत होती; परंतु अलीकडे बाबांचे लक्ष शाळेवरून उठून वकिलीकडे लागले होते. त्यामुळे त्यांच्या नावाने चालणारी ही शाळा कशीतरी चालणाऱ्यांपैकीच होती. मास्तराना दुपारी इतर धंदे करता यावेत म्हणून शाळा सकाळी सहा वाजल्यापासून दहा वाजेपर्यंत भरत असे. सरकारी हायस्कूलशिवाय व मिशन स्कूलशिवाय तिसरी इंग्रजी शाळा काय

---

१. १८५९ साली पुणे कॉलेजातून प्रवेश परीक्षा पास झालेल्यात बाबा गोखले यांचे नाव आढळते. महादेव शास्त्री कोल्हटकर यांनी अथेल्लोचे मराठी भाषांतर केले. त्याचा पुन्हा एकवार प्रयोग व्हावा असे पुण्यातील काही पुढाऱ्यांनी जे पत्रक काढले होते, त्या पत्रकावर बाबा गोखले यांची सही होती.

ती हीच असल्यामुळे, हीत तीनचारशे मुले असत. त्या सर्वांची व्यवस्था बाबांच्या शुक्रवारातील घरात वगैरे केलेली असे. बाबांच्या घरात एक रस्त्यावरील दिवाणखाना व त्याच्या खालील दोनचार लांबट खोल्या एवढ्यात काय ते उजेड वगैरे सृष्ट फायदे मुबलक मिळत. घराच्या पाठीमागील व लगतच्या एका घरातील वर्गांच्या ज्या खोल्या असत त्या ओलसर, दमट, अंधुक, पडक्या, गटार पायखाना वगैरेच्या घाणीने भरलेल्या अशा असत. माझे नाव ज्या वर्गात प्रथम नोंदले गेले त्याची स्थापना ह्या घाणेरड्या खोल्यापैकी एकीत केलेली होती. वर्गात पन्नाससाठ मुले असत. हा वर्ग मिश्र असे. म्हणजे काही मुले इंग्रजी मातृका शिकणारी, काही हावर्डच्या पहिल्या पुस्तकाचा प्रथमार्ध शिकणारी, काही द्वितीयार्ध शिकणारी, व काही हावर्डचे दुसरे पुस्तक शिकणारी, ह्या एकाच वर्गात असत व ह्याना शिकविणारा एकच मास्तर असे. त्यामुळे प्रत्येक तासातील पाचचार मिनिटे माझ्या तुकडीच्या वाट्यास व त्यापैकी अर्धे मिनिट माझ्या वाट्यास येई. सहापासून दहापर्यंतच्या चार तासातील पाच विषय मिळून माझ्या वाट्यास मास्तरच्या वाणीचा साक्षात् स्पर्श दोन अडीच मिनिटे येई. तेवढ्यात जे ज्ञान काही संपादन करता येईल तेवढे करण्यात मी पाचसात महिने लोटले. इतक्यात बाबांच्या शाळेत एक क्रांती झाली. पुण्यातील प्रसिद्ध वकील, वक्ते व विनोदी गृहस्थ जे काशिनाथपंत नातू[२] ते ह्या सुमारास बाबांच्या शाळेत पातीने

---

२. त्या वेळच्या पुण्यातील एक सार्वजनिक कार्यकर्ते; कॉंग्रेसच्या वार्षिक परिषदांना ते पुण्यातर्फे प्रतिनिधि म्हणून गेल्याचे आढळते. पुण्यातील हिंदु मुसुलमानांच्या दंग्यात सरकारने हिंदूवर जे आक्षेप घेतले होते ते फोल झाले म्हणून 'रे' मार्केटात एक सभा झाली तिचे हे अध्यक्ष होते.

मास्तरकीचा धंदा करीत असत, त्यांच्या डोक्यात स्वतःच एक नवीन शाळा काढावी अशी शक्कल आली. नवीन शाळा भरण्यास जुन्या शाळेतील मुले फितविण्याचा मार्ग काशिनाथपंतांच्या हाता-खालील काही मास्तरांनीं काढून, बाबांच्या शाळेतील बरीच मुले नातूंच्या शाळेत नेली. माझ्या वर्गातील काही पुढारी मुले ह्या नवीन शाळेत गेली म्हणून मीहि त्यांच्याबरोबर गेलो. ह्या शाळेत मला हावर्डचे दुसरे पुस्तक शिकण्याच्या वर्गात बसविले. येथे जो दोनतीन महिने काढतो तो इतक्यात प्रसिद्ध देशभक्त पण बंडखोर वासुदेव बळवंत फडके,[3] रा. रा. वामनराव भावे व लक्ष्मणराव इंदापूरकर, ह्या तिघांनी एक नवीन शाळा काढिली व नातूंच्या शाळेतील बरीच मुले आपल्या शाळेत फितवून नेली. ह्या मुलांबरोबर मीहि भाव्यांच्या शाळेत दाखल झालो व दाखल होण्याप्रीत्यर्थ मला हावर्डचे तिसरे पुस्तक शिकण्याच्या वर्गात सामील केले. येणेप्रमाणे सुमारे एका वर्षाच्या अवधीत मी इंग्रजी तिसरी इयत्ता शिकूं लागलो; आणि हा सर्व प्रकार सप्टेंबर-आक्टोबरात झाल्यामुळे, १८७७च्या जानेवारीत माझा इंग्रजी चौथ्या इयत्तेत वर्ग झाला. ह्या सर्व घालमेलीत सुमारे हजार दीड हजार इंग्रजी शब्द व काही धरसोडीचे इंग्रजी व्याकरण शिकण्यापलीकडे मी कांहीएक जास्त ज्ञान संपादिले नाहीं. भाव्यांच्या शाळेत १८७७, १८७८ व १८७९ ही तीन साले मी काढिली व पुढे १८८० त सातव्या इयत्तेत जातो तो रा. रा. लक्ष्मणराव इंदापूरकर रा. रा. गोखले हे दोन मास्तर शाळा सोडून पुणे व मुंबई येथील मिशन

---

३. यांच्या विषयी येथे टीपेत काही सांगण्याची गरज नाही. परंतु भारतीय विद्याभवनने हिस्टरी अँड कल्चर ऑफ दि इंडियन पीपल या महाग्रंथाच्या नवव्या खंडात जी माहिती दिलेली आहे ती जिज्ञासूनी अवश्य पहावी. पृष्ठे ९०८ ते ९१४.

स्कुलात नोकर झाले, सबब शिकविणारा कोणी नसल्यामुळें मी भाव्यांची शाळा सोडली व रेवरंड मि. बोमंट ह्यांच्या मिशनस्कुलात गेलो. पुढे दोनतीन महिन्यांनी तीहि शाळा सोडून स्वस्थ घरी बसलो आणि वर्षाभराने विष्णुशास्त्री चिपळोणकरांच्या शाळेत दहापंधरा दिवस जाऊन, नंतर प्रवेशपरीक्षेचा घरीच महिना दोन महिने अभ्यास करून १८८२ च्या जानेवारीत ती परीक्षा खासगी रीतीने पास झालो.

[ ४ ]

सहा वर्षांत पांच खासगी शाळांचा परिचय झाल्यामुळे, पुण्यातील खासगी इंग्रजी शाळांच्या अंतःस्थितीची मला बरीच माहिती झाली. ह्या माहितीपासून काय तात्पर्य काढावयाचे हे जरी त्या काली मला समजण्याची ऐपत नव्हती, तरी तिच्यापासून ह्या शाळासंबंधाने बरीच कीव माझ्या ठायी प्रादुर्भूत झाली. आता, वीस-बावीस वर्षांच्या अंतरावरून ह्या शाळांच्या अंतःस्थितीसंबंधाने व हेतूसंबंधाने विचार करण्याचा प्रसंग आला म्हणजे शाळा काढणाऱ्या बहुतेक गृहस्थांच्याविषयी फारसा पूज्यभाव मनांत उद्भवत नाही, हे मला मोठ्या निरुपायाने म्हणावे लागत आहे. ह्या पाच शाळांच्या चालकांपैकी काशिनाथपंत नातूंची शाळा वर्षसहामहिने चालून पुढे बंद झाली. शाळा काढण्यात क्षुद्र मत्सर व उदरपूर्तीचा तात्पुरता उपाय ह्या खेरीज ह्या नीच मनोवृत्तीच्या व त्याहून नीच नीतिमत्तेच्या इसमाचा काही जास्त उदात्त हेतु नव्हता. नाना महागावकर व भाजेकर ह्यांची शाळा बाबा गोखल्यांनी घेतली व पुढे चालविली. त्यात उदरपूर्तीचा धंदा पत्करण्यापलीकडे बाबांचा काही इतर हेतु होता असे दिसत नाही. गुरुजीच्या पेशाला अवश्य लागणारी जी कडकडीत नीतिमत्ता तिचा बाबांच्या ठायी पूर्ण अभाव होता, हे

पुण्यातील आबालवृद्धास महशूर होते. सीतारामपंत चिपळोणकरादि बाबांचे साहाय्यकारी लोक सुरादेवीचे कट्टे उपासक म्हणून प्रसिद्ध होते. अशा लोकांच्या हाती दहापाच वर्षांत शाळेचे बारा न वाजते तर मोठेच आश्चर्य घडले असते. वासुदेव बळवंत फडके, वामन प्रभाकर भावे व लक्ष्मण नरहर इंदापूरकर हे तिघेही गृहस्थ नीति-मत्तेने बरे होते. पैकी वासुदेव बळवंत फडके यांचा शाळा काढण्यात एवढाच हेतु होता की, शाळेतील मुले उत्तम देशभक्त निपजावीत. परंतु हा उदात्त विचार ज्या पद्धतीने अमलात आणावा अशी फडक्यांची इच्छा होती, ती भावे व इंदापूरकर यांस पसंत न पडल्यामुळे व फडक्यांची पद्धत स्वीकारली असता आपल्यासारख्या गरीब पोटभरू माणसाना शाळा सोडून देशांतर करण्याचा प्रसंग हट्कून यावयाचा तो न यावा, अशी ह्या दोघांची इच्छा असल्यामुळे,

---

४. सीतारामपंत चिपळूणकर : सिताराम हरी चिपळूणकर हे विष्णु शास्त्री यांचे चुलते. सार्वजनिक सभेचे ते कित्येक वर्षे चिटणीस होते. चिपळूणकरांचे येणे जाणे क्राफर्ड साहेबाकडे फार असे, पण चिपळूणकर अत्यंत निःस्वार्थी, लाचलुचपतीत कधीहि न पडणारे. एका पैशानेही कोणाचे मिंधे राहणारे नव्हते. असे असता राज-कारणाचा अभ्यास व सरकारी कामकाजाचा व्यासंग यामुळे क्राफर्ड साहेबास चिपळूणकरांची फार मदत होत असे. साहेब लोकाना भेटून सरकारी माहिती काढणे व त्याजकडून सार्वजनिक कार्यांत होईल तितकी मदत मिळविणे यात सितारामपंत चिपळूणकरांचा हातखंडा असे. आणि शेवटी क्राफर्ड साहेबांच्या अंगावर आभाळ कोसळले, तेव्हा सर्व लोकांस न जुमानता, क्राफर्ड साहेबाविषयी अगदी उघडपणे सहानुभूति दाखविण्याचा क्रम त्यांनी सुरू ठेविला व त्याचे प्रायश्चित्तहि त्यांना भोगावे लागले. चिपळूणकरांना सार्व-जनिक सभेच्या सेक्रेटरी पदाच्या आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. अशी माहिती केळकरांनी टिळकचरित्रांत दिलेली आहे.

फडक्यांचा ह्या शाळेशी जो काही थोडासा संबंध होता तो लवकरच तुटून गेला. इंदापूरकर व विशेषतः वामनराव भावे ह्यानी जन्मभर मास्तरकीचा धंदा केला व तो प्रामाणिकपणाने केला यात संशय नाही. महागावकर, माजेकर, नातू, बावा गोखले, सीतारामपंत चिपळोणकर वगैरे मंडळीप्रमाणे किफायतीचा इतर धंदा मिळेतोपर्यंत शाळेला चिकटून रहावयाचे व तो धंदा मिळाल्यावर शाळेला लाथ मारावयाची असा क्षुद्र विचार या दोघाहि गृहस्थांचा नव्हता. त्यातल्या त्यात वामनराव भाव्यांचा तर नव्हताच नव्हता. इंदापूरकरासंबंधाने मात्र असे निकराने बोलता यावयाचे नाही. मध्यंतरी भाव्यांच्या शाळेला ओहोटी लागली असता, ह्या गृहस्थानी काही वर्षे तिला अन्तर दिले होते. सारांश मास्तरकीचा धंदा व शाळा ह्यांच्याशी एकनिष्ठेने वागण्याचा धडा पुण्यात घालण्याचा पहिला मान भावे यास देणे जरूर आहे. शाळेला फंड जमविण्याकरिता व कायमची इमारत मिळविण्याकरिता भाव्यासारख्या गृहस्थाने केलेली पायपीट व मेहनत खरोखर इंग्रजी स्पेले व शब्द शिकविण्याच्या गिरण्यांहून श्रेष्ठतर अशा एकाद्या राष्ट्रहितसाधक संस्थेलाहि भूषण झाली असती. एकाच धंद्याला जन्मभर वाहिलेल्या या गृहस्थाच्या मनात प्रवेशपरीक्षेपर्यंत इंग्रजी शिकविण्याची कायमची शाळा स्थापणे ह्याहून दुसरा कोणताहि हेतु नव्हता; व दुसरा कोणताहि उदात्त हेतु उद्भवण्यासारखी भाव्यांची विद्वत्ताहि नव्हती व मनोरचनाहि नव्हती. भाव्यांची शाळा पांचसात वर्षे चालल्यावर, विद्वत्तेने व मनोरचनेने राष्ट्रहित साधण्यास बराच लायक असा एक गृहस्थ सरकारी नोकरीला लाथ मारून पुण्यात आला. हा गृहस्थ म्हणजे विष्णुशास्त्री चिपळोणकर हा होय. चिपळोणकरांच्या पूर्वी ज्यानी ज्यांनी म्हणून खाजगी शाळा काढली

ते सर्व पदवीहीन होते व पुण्यातल्या हायस्कुलांतील हेडमास्तरादि पाचचार पदवीधरांशी तुलना करता ह्या पदवीहीन शालाचालकांचे पारडे लोकदृष्टीने बरेच हलके पडे. आता ह्या पदवीहीन गृहस्थात सगळेच अविद्वान होते असा प्रकार नव्हता. बाबा गोखले एका काळी पूना कॉलेजात गेले होते; आणि कृष्णशास्त्री चिपळोणकर, केरोपंत छत्रे वगैरे विद्वान मंडळीत त्यांची गणना होत असे. काशीनाथपंत नातू, भाजेकर, इंदापूरकर हे तिघेही इंग्रजी चांगले जाणत असत. सीतारामपंतासारखा कुशल इंग्रजी लिहिणारा तर त्याच्यावेळी पुण्याच्या हायस्कुलातील मास्तरात कुंटे, गाडगीळ अशा एकदोन व्यक्तींखेरीज तिसरा कोणी होता की काय ह्याची शंकाच आहे. अशी जरी वास्तविक स्थिति होती, तथापि हे सर्व गृहस्थ पदवीहीन पडल्यामुळे, हायस्कुलातील पदवीधर मास्तरापेक्षा ह्याना लोक थोडेसे कमीच मानीत. बाकी हायस्कुलातील पदवीधर मंडळी खाजगी शाळातील पदवीहीन मंडळीहून मुलांना काही निराळे शिकवीत अशातला प्रकार काही एक नव्हता. इंग्रजी शब्द व स्पेले पाचसात वर्षे शिकवून प्रवेशपरीक्षेला मुलांना तयार करावयाचे हा दोघांचाहि एकच धंदा होता. खासगी शाळांतून जसे कित्येक अनीतिमान् मास्तर असत; तसेच हायस्कुलातहि अपेयपान, अभक्ष्य-भक्षण चार्गटपणा, बाहेरख्यालीपणा, वगैरे दुर्गुणांनी मंडित असे गुरुजी थोडेफार होते. अशा स्थितीत नीतिमत्तेचा धडा मुलांच्या मनावर ठसविण्याचे काम सरकारी व खासगी शाळातील मास्तरांच्या हातून फारच गचाळपणाने यत्किंचितहि साधले न जावे हे साहजिक आहे.

---

५. पुण्यातील सरकारी हायस्कूल : १८४२ साली पुणे संस्कृत पाठशाळेला इंग्रजी वर्ग जोडण्यात आले. विश्रामबाग वाड्यात हे सरकारी हायस्कूल सुरू झाले. १९२२ साली ते बंद झाले.

ही स्थिति स्वानुभवाने लक्षात आणून विष्णुशास्त्री चिपळोणकरांनी लोकशिक्षणार्थ एक नवी शाळा काढिली. देशभक्त, विद्वान्, कार्यकर्ते, विचारवंत, आचारवंत, धर्मशील, उद्योगी, साहसी, असे लोक निर्माण करण्याचा उदात्त हेतु ह्या विद्वान् चालकांच्या नव्या शाळेचा प्रथमारंभी होता. प्रचलित लोकशिक्षण सरकारच्या धोरणाने चालल्यामुळे, त्या शिक्षणात भासमान होणारे दोष, नव्या शाळेच्या धोरणाने चालणाऱ्या लोकशिक्षणात न यावे ह्या हेतूने सरकारी इन्स्पेक्टर, डिरेक्टर, परीक्षक वगैरे कोणाचाहि स्पर्श आपल्या शाळेला होऊ द्यावयाचा नाही असा बाणा शास्त्रीबोवांनी, उन्हाळ्याच्या सुटीच्या वेळी मुलांना निरोप देताना व इतरत्र, प्रदर्शित केला होता. ह्या बाण्याला बरीच साजतील अशी पदवीधर व पदवीहीन अशी पाचचार मंडळीहि चिपळोणकरांनी जुळविली होती. व दहापाच वर्षांत नव्या शाळेचे संपूर्ण स्वरूप लोकांना दाखविण्याचा त्यांचा हेतु होता, असे म्हणतात. चिपळोणकरांचे जे निकट स्नेही होते त्यांचे सांगण्यात असे येते की, सरकारी धोरणाने चालणाऱ्या लोकशिक्षणाहून किंचित निराळी अशी शिक्षणपद्धति प्रारंभी सुरू करून, उत्तरोत्तर सरकारी लोकशिक्षणाहून पूर्णपणे भिन्न अशी शिक्षणपद्धति, वर्तमानपत्रद्वारा, व्याख्यानद्वारा आणि ग्रंथ व निबंध ह्यांच्या साहाय्याने लोकमत तयार करून प्रचलित करावयाची, असा शास्त्रीबोवांचा विचार होता. म्हणजे, इंग्रजी शिकण्याचे व्यसन लोकांना जे अतोनात लागले होते त्याच्या छंदाने प्रथम इंग्रजीतून ज्ञान द्यावयाचे; व नंतर जसजसे लोकमत बदलेल तसतसे जास्त जास्त मराठीतून शिकविण्याला सुरवात करावयाची; आणि शेवटी सरकारी नोकरीकरिता मॅट्रिकचा अभ्यास करण्यापासून जसजसे लोक परावृत्त होत जातील तसतसे इतर व्यवसायाना उपयोगी पडेल असे शिक्षण मराठीतून प्रचलित

करावयाचें; असा काहीसा चिपळोणकरांचा बेत होता. परंतु शाळा काढून दोनसवादोन वर्षे लोटतात न लोटतात तोंच शास्त्रीबोवाला मृत्यूने अकस्मात गाठले व त्यांचा हेतु बहुतेक जागच्या जागीच जिरला. नवी शाळा शास्त्रीबोवांच्या हयातीत सुमारे दोन सवादोन वर्षे चालली; परंतु, सर्वच प्रकार नवीन पडल्यामुळे तींत राष्ट्रोत्तेजक अशा शिक्षणाची सुरवात बिलकूल झाली नाही. आपल्या शाळेतून प्रवेश-परीक्षेत बरीच मुले पास झालेली व दरवर्षी एकाने तरी जगन्नाथ शंकर-शेटची शिष्यवृत्ति हटकून पटकावलेली दाखवून लोकांचे आपल्याविषयी अनुकूल मत व सादर बहुमान मिळविण्यातच शास्त्रीबोवांची दोन वर्षे गेली. ह्या लहानशा अवधीत इतर खाजगी व सरकारी शाळा जे काम करीत होत्या तेच शास्त्रीबोवांच्या नवीन शाळेने केले. चिपळोण-करांच्या नवीन शाळेत दोन गोष्टी मात्र नव्या झाल्या. इंग्रजी वाचनाची क्रमिक पुस्तके सरकारी व खासगी शाळांतून प्रायः हॉवर्डची असत, त्यांच्या बदला नवीन शाळेत रॉयल क्रमिक पुस्तके सुरू झाली व ही नवीन चूष लोकांना व मुलांना त्या वेळी बरीच आश्चर्यजनक वाटली. दुसरी नवी गोष्ट म्हटली म्हणजे सरकारी शाळेत इन्स्पेक्टराची तपासणी व डिरेक्टरांची धूळभेट दरवर्षी जी होत असे, तिचा उपसर्ग ह्या दोन वर्षांत चिपळोणकराच्या शाळेला बिलकूल झाला नाही. इतर खासगी शाळांच्या चालकांना सरकारी अधिकारी व बडेबडे गोरे लोक ह्यांच्या पायांची धूळ आपल्या शाळेस लागण्याकरितां जिवापाड मेहनत करावी लागे व ही मेहनत एकदाची फलद्रूप झाली म्हणजे मोठी कृत्यकृत्यता वाटे. ह्याच्या अगदी उलट प्रकार चिपळोणकरांच्या शाळेचा होता; व तो मोठ्या धोरणाचा होता. परंतु हे धोरण शास्त्रीबोवांच्या बरोबरच अस्तास गेले. ह्याचे कारण असे होते की, शास्त्रीबोवांचे संपूर्ण धोरण समजणारा इसम

शास्त्रीबोवांच्या सहकारी मंडळीत एखाददुसराच होता व त्या एखाद-दुसऱ्यालाहि ते धोरण अमलात आणण्याचा सुरक्षित मार्ग जसा कळावा तसा क्वचितच कळला होता.

इंग्रज सरकारने शाळा खाते सुरू केले त्याचा मतलब उच्च, मध्यम व कनिष्ठ दर्जाचे नोकर तयार करण्याचा होता व आहे. साहित्य, वैद्यक, कायदा व स्थापत्य, ह्या विषयांत काही लोक कामापुरते तरबेज करण्याकरिता सरकारने ते ते विषय शिकविणाऱ्या पाठशाळा स्थापिल्या. ह्या पाठशाळांतून जे लोक पास होऊन बाहेर पडले त्यांना सरकारने मुन्सफ, मामलतदार, डेप्युटी कलेक्टर, हेडमास्तर, असिस्टंट सर्जन, असिस्टंट इंजिनियर, हायकोर्ट वकील वगैरे सिव्हिल सर्वेटांच्या खालच्या जागा दिल्या. जे लोक ह्या पाठशालांतून परीक्षा पास न होता मध्येच गळाठले व जे हायस्कुलांतील म्याट्रिक, पब्लिक सर्विस वगैरे परीक्षा पसार झाले त्यांना इंग्रजी कारकून, सबओव्हर-सिअर, असिस्टंट मास्तर, हास्पिटल असिस्टंट, डिस्ट्रिक्ट वकील वगैरेंच्या नोकऱ्या मिळाल्या, आणि जे इसम ट्रेनिंगच्या परीक्षा, मराठी सहावी इयत्ता वगैरे कनिष्ठ दर्जाच्या परीक्षा पास व नापास झाले त्यांना मराठी शाळांवर मास्तर, देवी डाक्तर, मराठी कारकून, मोकदम व बगले वकील सरकारने नेमिले. येणेप्रमाणे उच्च, मध्यम व कनिष्ठ शिक्षणाच्या पाठशाळा व शाळा काढण्यात नोकर तयार करण्याचा तेवढा एक हेतु सरकारचा होता, असे १८३३ पासून १९०४ पर्यंतचा हिंदुस्थानातील इंग्रज सरकारच्या शिक्षणखात्याचा वृत्तांत पाहिला असता दिसून येते.

नोकर तयार करण्याचे हे खाते यूरोपातील किंवा इंग्लंडातील विश्वविद्यालयाच्या धर्तीवर अर्थातच नाही व विचार केला असता, ते तसे असणे अशक्य होय. परकीय सरकारची नोकरी करण्यास लायक

असे इसम तयार करण्याचे काम यूरोपातील विश्वविद्यालये बिलकूल करीत नाहीत. विद्याव्यासंग, विद्यावृद्धि व विद्यासंग्रह करण्याचा यूरोपातील विश्वविद्यालयांचा मुख्य हेतु असतो. ह्या विश्वविद्यालयाकडे सरकारी नोकऱ्या मिळविणाऱ्या इसमांची परीक्षा घेण्याचे काम यूरोपात प्रायः कोठेहि सोपवलेले नाही. इकडील विश्वविद्यालयाचे म्हणजे शाळाखात्याचे मुख्य काम म्हटले म्हणजे अव्वल कारकून, सर्जन, इंजिनियर, ओव्हरसियर, मामलतदार, मुन्सफ, हायकोर्ट व डिस्ट्रिक्ट वकील वगैरे नोकऱ्या पटकाविण्याची इच्छा करणाऱ्या उमेदवारांना शिकवून त्यांची परीक्षा घेण्याचे आहे. अर्थात् इकडील विश्वविद्यालयांच्या द्वारा यूरोपातील विश्वविद्यालयांची कामगिरी कदापिहि होणे नाही. नोकरचाकर निपजविणाऱ्या यंत्राच्या द्वारा प्रतिष्ठित, शीलवंत व देशभक्त असे पुरुष कसे निर्माण व्हावे? सररहा परीक्षा घेऊन लहान मध्यम नोकऱ्या देण्याची पद्धत भर रंगांत असलेली पहावयाची असल्यास प्रस्तुत कालीहि चीन देशांत उत्तम पहावयास मिळते. त्या देशाची संस्कृति अलीकडील हजार पांचशे वर्षांत अत्यंत स्थिर झालेली आहे. तिला वाढ म्हणून बिलकूल नाहीं. संस्कृतीची प्रगति ह्या हजार पंधराशे वर्षांत चीन देशात यवमात्रदेखील झालेली नाही. जी स्थिति हुएत्संगाच्या वेळी होती तीच नुकत्याच वारलेल्या मार्क्वेस लीच्या वेळी होती व सध्याही आहे. ह्या चिनीपद्धतीचेंच अनुकरण हिंदुस्थानातील इंग्लिश राजकर्त्यांनी केलेले

---

६. चिनी पद्धती: 'माय कंट्री अँड माय पीपल' या लिन युटांग यांच्या ग्रंथात चिनी परीक्षा पद्धती विषयी वेगवेगळ्या ठिकाणी जी माहिती विखुरलेली आहे, तिच्या आधाराने ही टीप दिलेली आहे. आताच्या कम्युनिस्ट राजवटीत यापैकी काहीच कदाचित शिल्लक राहिलेले नसेल. परंतु ही राजवट येण्यापूर्वी लिन युटांगने आपल्या देशासंबंधी जे लिहिले ते असे. (पान ७३ वर चालू)

आहे. हिंदुस्थानसारख्या अनेक भाषा बोलणाऱ्या, अनेक धर्म पाळणाऱ्या, अनेक आचार चालविणाऱ्या व अत्यंत नीच, सामाजिक स्थितीपासून अत्यंत उच्च समाजव्यवस्थेपर्यंत शेकडो जाती असणाऱ्या देशात व्यवस्थित राज्य चालण्यास व शांततेचे स्थैर्य होण्यास, ही

---

(तळटीप पान ७२ वरून पुढे चालू)

वर्ग रचना सुप्रतिष्ठित झाली आहे असा समाज चीनमध्ये नसल्याने सामाजिक दृष्ट्या खालच्या थरातील कोणत्याहि व्यक्तीला सार्वभौम सत्तेकडून घेतल्या जाणाऱ्या परिक्षेत यश मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध करता येत असे. पुढे मात्र ही समान संधी नष्ट होऊन प्रतिष्ठित घराण्यांची मिरासदारी नोकरीच्या क्षेत्रात सुरू झाली. चीनमधील ही परीक्षा पद्धती १९०५ सालापर्यंत विशेष बदल न होता तशीच चालू होती. वृद्धाबद्दल चिनी समाजात ज्याप्रमाणे अत्यंत नम्र भावना व आदर दर्शविण्याची रीत होती त्याचप्रमाणे सुशिक्षित पदवीधराबद्दल आदर दर्शविला जाई. पहिला आलेला विद्यार्थी पांढऱ्या शुभ्र घोड्यावरून मिरवत जाई. आता तो अंमलदार होणार व त्याचा अधिकार जाहीर होणार म्हणून ललकाऱ्या देत तुताऱ्या वाजवून त्याची मिरवणूक निघे. स्वतंत्र बुद्धिमत्तेचा अशा पदवीधराजवळ अभावच असे. घटपटादि पढीकपणा खेरीज व त्याच त्या कल्पनांच्या उजळणीखेरीज त्यांच्या जवळ प्रत्यक्ष अशी प्रतिभा किंवा प्रयोगशीलता नव्हती. अर्थशास्त्र माहीत नसणारे विद्वान कर पद्धतीवर लिहीत. ज्यानी कधी जमिनीत चुकूनहि पाऊल टाकले नाही असे केवळ लेखणी बहाद्दर शेतीवर ग्रंथ लिहीत. सार्वभौम सत्तेकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना बसणाऱ्या अशा उमेदवारांना लिन युटांग पोलिटिकल कॅंडिडेट्स म्हणतो. त्यांचा हेतु पूर्णपणे पोटभरूपणाचा असतो. ते निव्वळ विद्येचा व्यापार करतात. यांत्रिक परीक्षा पद्धतीने मनुष्याच्या चारित्र्याची व खऱ्या गुणवत्तेची कसोटी घेतली जाईल हा भ्रम जुन्या परीक्षापद्धतीत व प्रचलित शिक्षण पद्धतीतहि आहे. असे लेखकाचे म्हणणे १९३५ साली देखील होते.

च्चिनी पद्धत उत्तमोत्तम आहे, असे चीन देशातील परीक्षा पद्धति पाहून इंग्लिश मुत्सद्यांचे मत झाले; आणि त्या मताप्रमाणे त्यांनी ती पद्धत आस्ते आस्ते अमलात आणिली. ही पद्धत अमलात आणण्याचे मुख्य साधन विश्वविद्यालये, तदंगभूत पाठशाला, आणि इंग्रजी व मराठी शाळा होत. ह्या सर्व साधनांचा मुख्य उपयोग लहानमोठ्या परीक्षा घेऊन उमेदवारांना शिक्का देण्याचा आहे: आणि ह्यांचा मुख्य हेतु इंग्रज लोकांविषयी, इंग्लिश संस्कृतीविषयी व इंग्लिश आचारविचाराविषयी उमेदवारांच्या मनात पूज्य बुद्धि उत्पन्न करण्याचा आहे. उमेदवार गाढे विद्वान् व्हावे व स्वदेशीय संस्कृतीविषयी त्यांच्या ठायी परम आदर उत्पन्न होऊन तिचा जयजयकार करण्याकडे त्यांनी आपले तन, मन आणि धन लावावे असा या पद्धतीचा दूरचाहि हेतु नाही. असली ही हिंदुस्थानातील इंग्रजी शिक्षणपद्धति आहे; आणि मनुष्यस्वभाव पहाता, अन्य प्रकार असणे सर्वथा अशक्य आहे. ही शिक्षणपद्धति आस्ते आस्ते अमलात येऊन आज सुमारे सत्तर वर्षे झाली आणि आता तर हिची व्याप्ति भरतखंडाच्या ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत होऊन गेली आहे. १८३२ मध्ये हिचा जेव्हा प्रथम प्रारंभ झाला, तेव्हाच तिच्याविरुद्ध दिशेने जाणारी व तिला तोलून धरणारी अशी एखादी शिक्षणपद्धति स्वदेशातील मंडळीने स्वदेशाच्या हितार्थ काढावयाला पाहिजे होती. म्हणजे देशातील येथून तेथून सर्व उमेदवार मंडळीला सरकारी नोकरीस लायक करणाऱ्या ह्या शिक्षणपद्धतीचे दुष्ट परिणाम ज्या मानाने सध्या भासमान होत आहेत त्या मानाचे प्रमाण बरेच संकुचित झाले असते. परंतु दुर्दैवाने, मुत्सद्दीपणाचा ह्या देशात त्यावेळी बहुतेक अभाव असल्यामुळे, तसा प्रकार झाला नाही. अलीकडील तीसपसतीस वर्षांत सरकारी शिक्षणपद्धतीचे खरे स्वरू

व अंत्य हेतू एखाद्या दुसऱ्या गृहस्थाच्या ध्यानांत हळूहळू थोड्याफार प्रमाणाने येऊ लागला; त्या हिडिस स्वरूपाचा व अनुदार हेतूचा प्रतिकार करण्याकडे विष्णुशास्त्र्यासारख्या विचारी पुरुषाचे लक्ष्य गेले; आणि नव्या इंग्रजी शाळेचा उदय झाला. सरकारी शिक्षण-पद्धतीतील अवगुण काढून टाकून जेणेकरून स्वदेशातील तरुण मंडळी स्वतंत्र विचाराची, स्वतंत्र आचाराची व स्वदेशाच्या उपयोगाची निपजेल, अशी नवीन शिक्षणपद्धति आपल्या नव्या शाळेत सुरू करावयाचा चिपळोणकरांचा मनोदय होता, म्हणून मागे सांगितलेच आहे. परंतु, आपणा हतभाग्यांच्या दुर्दैवाने उचल खाऊन, ज्या महानुभावाच्या डोक्यात वरील उदार कल्पना निर्माण झाली, तो नवी शाळा स्थापून दोन वर्षे लोटताहेत तोच एकाएकी इहलोक सोडून गेला ! पाठीमागे जी चालक मंडळी राहिली त्यांचे विचार शास्त्रीबोवांच्या विचाराहून फार भिन्न पडल्यामुळे, नव्या शाळेचे नवे वळण तरुण पिढीला देण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी फारच थोडे होते. राष्ट्रातील तरुणांना नवे वळण लावण्याचे सामर्थ्य, बुद्धीने, नीतीने, विद्येने, विचाराने व कर्तृत्वशक्तीने मागे राहिलेल्या मंडळीच्या आंगी फारच थोडे होते, किंबहुना मुळीच नव्हते, हे त्या संस्थेच्या पंचवीस वर्षांच्या इतिहासावरून कोणाही विचारी मनुष्याला सहज कळून येण्यासारखे आहे. तत्रापि ह्या संस्थेचा अंतःस्थ व बहिस्थ इतिहास माहीत असणारे असे लोक फारच थोडे असल्यामुळे, ह्या संस्थेची, हिने केलेल्या कार्याची व हीत असणाऱ्या व्यक्तींची माहिती कारणा-पुरती खाली देतो. अशाकरिता की, तीवरून ह्या संस्थेच्याद्वारा देशहिताचे कार्य कितपतसे झाले आहे त्याचा अंदाज वाटेल त्याला करता यावा.

४१९६४ चरित्र

[ ५ ]

नवी इंग्रजी शाळा विष्णुशास्त्र्याने काढिली त्या वेळी पहिल्या दोन वर्षांत तीत रा. टिळक, आगरकर, आपटे व नामजोशी असे चिपळोणकराखेरीज चार इसम होते. शास्त्री वारल्यानंतर किंवा त्या सुमारास रा. गोळे[७], केळकर[८], गोखले, पाटणकर[९], धारप[१०], भानू[११], वगैरे मंडळींचा संस्थेत प्रवेश झाला. नंतर दहापाच वर्षांच्या अंतराने

---

७ गोळे : महादेव शिवराम (१८५९ ते १९०६) : १८७७ मध्ये मॅट्रिक पास झाल्यावर गोळे डेक्कन कॉलेज मध्ये गेले. १८८० मध्ये ते संस्कृत व तत्त्वज्ञान घेऊन बी. ए. झाले व त्यांना दक्षिणा फेलो मिळाली. तेथेच आगरकरांशी स्नेह झाला; व १८८३ पासून ते न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक म्हणून आले. कॉलेजच्या गरजेच्या दृष्टीने शास्त्र विषयाच्या अध्यापकाची उणीव भासे म्हणून ते १८८४ मध्ये नॅचरल सायन्स हा विषय घेऊन एम. ए. झाले. आगरकरानंतर ते प्रिन्सिपॉल झाले. १९०१ साली ते निवृत्त झाले. सेवेची मुदत संपूर्ण करून पेन्शन घेऊन निवृत्त होणारे ते पहिले आजीव सेवक. **हिंदुधर्म आणि सुधारणा**, व **ब्राह्मण आणि त्यांची विद्या**, ही त्यांची दोन पुस्तके प्रसिद्ध आहेत.

८. केळकर वासुदेव बाळकृष्ण. (१८६० ते १८९५) : पहिल्या सात सेवकापैकी हे एक. ते एल्फिन्स्टन कॉलेजातून बी. ए. झाले. इंग्लिशाचे व अर्थशास्त्राचे अशी बक्षिसे त्यांनी मिळाविलेली होती. इंग्रजी व मराठी ते फार सफाई, लिहीत. केसरी व मराठा यांतील त्यांचे लेखन नमुनेदार उतरलेले आहे. **त्राटिका, वीरमणी आणि सुंदरी** व **लटपट्या** पद्या अशी यांची तीन नाटके.

९ पाटणकर : परशुराम नारायण (१८६० ते १९२९) : १८८५ साली डेक्कन कॉलेजातून ते ग्रॅज्युएट झाले व १८८६ साली आजीव सेवक झाले. सामाजिक प्रश्नासंबंधी यांची व टिळकांची मते जुळत

(तळटीप पान ७७ वर पहा)

रा. कर्वे[१२], लेले[१३], चांदोरकर[१४], बापू लिमये, वगैरे आणीक काही गृहस्थ सामील झाले. पैकी ज्यांच्या मताला संस्थेत विशेष मान असे व ज्यांच्यावरती संस्थेचे बहुतेक सर्व धोरण अवलंबून असे, असे गृहस्थ म्हटले म्हणजे रा. टिळक, आगरकर, आपटे, नामजोशी, गोखले, गोळे व केळकर हे सात होत. शास्त्री वारल्यानंतर, ह्या सात गृहस्थांवर

---

(पान ७६ वरून पुढे चालू)

असत. टिळकांनी सोसायटी सोडली, तेव्हा यांनीहि सोडली. त्यांच्या विषयीची अधिक हकिकत डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या इतिहासात पहावी.

१० धारप : नारायण कृष्ण (१८५१ ते १८९४) : केरुनाना छत्रे यांचा व धारपांचा आप्त संबंध होता. प्रथम सरकारी नोकरी करून नंतर धारप न्यू इंग्लिश स्कूलात आले. नकली दागिन्यांचा व्यापार करून किफायतशीर धंदा करण्याचे त्यांच्या मनांत होते. परंतु त्यांत दैव उघडले नाही. १८८४ मध्ये ते आजीव सेवक झाले.

११. भानु चिंतामण गंगाधर (१८५६ ते १९२९) : प्रथम यांनी वडिलांच्या मर्जीखातर सब ओव्हरशिअरच्या क्लासमध्ये नाव घातले. परंतु पुढे ती नोकरी सोडली व डेक्कन कॉलेज मध्ये शिक्षण पूर्ण करून वडिलांच्या इच्छेविरूद्ध १८८७ मध्ये आजीव सदस्यत्व पत्करले. डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडून जाण्याची पाळी मध्यंतरी १८९७ साली त्यांच्यावर आली होती. भानूंचे इतिहास प्रेम व इतर वाङमयीन लेख या विषयाची माहिती मराठी वाचक वर्गास आहेच.

१२. कर्वे धोंडो केशव (१८५८ ते १९६२) : यांना भारतरत्न हे सर्वोच्च मानाचे पद पंडित नेहरु यांच्या हस्ते त्यांच्या शताब्दि पूर्तीच्या वेळी देण्यात आले. गोखल्यांचेमुळे कर्वे हे टिळकांच्या राजीनाम्यानंतर गणित विषय शिकविण्यासाठी फर्ग्युसन कॉलेजमध्ये आले. १८९२ साली ते आजीव सेवक झाले १९०२ साली रँग्लर परांजपे रुजू झाल्यावर मग कर्व्यांचेकडील कॉलेजातील गणितापैकी

(तळटीप पान ७८ वर पुढे चालू)

संस्थेची सर्व जबाबदारी पडली. शास्त्री जोपर्यंत होते, तोपर्यंत शाळेचे मुख्य धोरण त्यांच्याच मनाप्रमाणे चाले. कारण ह्या सर्व मंडळीत, वयाने, अनुभवाने, विद्येने, ग्रंथकर्तृत्वाने व विचाराने श्रेष्ठत्व शास्त्रीबोवाकडेच येण्यासारखे होते आणि शिवाय, शाळेचे मूळ उत्पादकत्व त्यांच्याकडे असल्यामुळे, पुढारपणाचा मान त्यासच मिळणे अपरिहार्य होते. परंतु शाळा स्थापन होऊन दोन वर्षे लोटत आहेत नाहीत तोच शास्त्री निवर्तल्यामुळे, त्यांच्या धोरणाचा व पुढारपणाचा सामान्य विकास होण्यासहि अवकाश सापडला नाही. अर्थात् त्या धोरणाचे संपूर्ण स्वरूप कोणत्या प्रकारचे असणार होते तेहि कळण्यास योग्य मार्ग राहिला नाही. यूरोपियनाचा पाय आपल्या संस्थेत शिरकू द्यावयाचा नाही, हे स्थूल परंतु महत्त्वाचे धोरण मात्र चिपळोणकराने जगजाहीर केलेले महशूर आहे. ह्यापलीकडे शाळेचे वळण, स्वरूप, बुद्धि वगैरे कोणत्या प्रकारची असावी, ह्यासंबंधाने त्यांच्या हातचे लेखी टिपण वगैरे काही होते की काय ते त्यांच्या साथीदारांना कदाचित् माहिती असले तर असेल. इतरांना त्याची काहीएक बातमी नाही..बहुशः अशा प्रकारचा लेख बिलकूल नसावा असे वाटते. येणेप्रमाणे पुढाऱ्यांच्या धोरणाशिवाय शाळेची सर्व जबाबदारी मागे राहिलेल्या मंडळीवर पडली. तीतून ते कोणत्या

---

(पान ७८ वरून पुढे चालू)

काही भाग कमी करून न्यू इंग्लिश स्कूलचे कामहि त्यांना देण्यात आले. १९१४ साली ते सोसायटीतून निवृत्त झाले.

१३ लेले ग वा. उर्फ भाऊसाहेब (१८६० ते १९२७) : १८९१ साली डे. ए. सो.चे आजीव सेवक झाले

१४. चांदोरकर दिनकर त्र्यंबक (१८६८ ते १९००) : यांची सामाजिक मते आगरकरासारखी होती व त्याना सुधारकाचे कामात ते मदतही करीत.

शिताफीने व कशा सफाईने पार पडले, ह्या गोष्टींचा विचार करणे बरेच मनोरंजक व बोधप्रद आहे, परंतु कोणत्याहि प्रकारे कठीण, खोल किंवा भानगडीचे नाही. कारण, शास्त्रीबोवांचे जे मुख्य स्थूल धोरण—की युरोपियनांचा स्पर्श संस्थेला होऊ द्यावयाचा नाही—त्याचा त्याग, पुढाऱ्याला मरून वर्ष सहा महिने होत आहेत नाहीत तोच ह्या मंडळीने पहिल्या प्रथम केला; आणि भावी इमारतीच्या पायाच्या आधारस्तंभाला प्रहार करून उखडून पाडिले. हा प्रकार ज्या वेळी झाला तेव्हाच शास्त्रीबोवाने काढलेल्या नव्या धोरणाचा अंत झाला आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी जन्मास आली. हा प्रकार कसा झाला त्याचे थोडक्यात वर्णन देतो.

[ ६ ]

शास्त्रीबोवांच्या पाठीमागे जी तरुणमंडळी राहिली त्यांच्या डोक्यात प्रथम असा विचार आला की, आपण जे पाचसात लोक काही एका कार्याकरिता एका ठिकाणी जमलो आहोत, त्यांची काहीतरी एक व्यवस्थित कायदेशीर मंडळी करावी, आणि त्या मंडळीच्या हातात संस्थेची सर्व सूत्रे देऊन महाराष्ट्रात सरकारी शिक्षणपद्धतीसारख्या शिक्षणपद्धतीचे जाळे पसरावे. एवढे दोनच विचार मंडळीच्या डोक्यात येऊन थांबते तरीहि शास्त्रीबोवांचे मूळचे धोरण बरेच बिघडले *असते. परंतु ह्या दोन विचाराबरोबर असेहि दुसरे दोन विचार आले की, संस्थेच्या चरितार्थाकरिता सरकारातून

* 'राजवाडे संकीर्ण लेखसंग्रह' या ग्रंथमालेने प्रसिद्ध केलेल्या लेखसंग्रहात 'असते' असा मूळ शब्द आहे. भटकृत 'राजवाडे चरित्रांत' नसतें असा शब्द आहे. तो बरोबर वाटत नाही. (सं)

पैशाची काही मदत मिळवावी आणि संस्थेच्या दिम्मतीने एक कॉलेजहि काढावे. अशा एकंदर चार क्लृप्त्या ह्या मंडळींच्या मनात आल्या असे दिसते. या चारी क्लृप्त्यापैकी प्रायः प्रत्येक क्लृप्तीत काहीना काही दोष होता. कोणतीहि संस्था कायदेशीर रीतीने सरकारात नोंदविली व शाहीर केली असता तिला राजमान्यत्व व स्थैर्य येते, अशी एक कल्पना आपल्या लोकात बरीच पसरली आहे; आणि कायदेपंडितांना तर ती जास्तच पराकाष्ठेची प्रिय होते. पैसे, देणग्या व वर्गण्या मिळविण्याला, जमीन जुमल्याचे स्वामित्व पत्करण्याला, आणि फिर्यादी लावण्याला व लावून देण्याला हे राजमान्यत्व व स्थैर्य अत्यंत आवश्यक आहे, हे एखादा नवशिक्याहि कायदेपंडित सांगू शकेल. तेव्हा ही पहिली क्लृप्ति ह्या मंडळीला मान्य झाली ह्यात काही मोठेसे नवल नाही. दक्षिण महाराष्ट्रातून व इतर स्थलाहून पैशाची थोडीबहुत म्हणजे लाखपन्नास हजारापर्यंत मदत होईल असा रंग दिसत होता आणि ही मदत संस्थेला राजमान्यत्व व कायदेशीर स्थैर्य आले असता विशेष प्रयास न पडता मिळण्यासारखी होती. संस्थेला स्थैर्य व राजमान्यत्व आणण्याचा विचार मंडळीच्या मनात सहजगत्या उद्भवण्यास जी अंतःकारणे झाली, त्यापैकी वर दिलेले कारण एक होय. ह्याखेरीज बहिरुपाधींचाहि उपसर्ग मंडळीच्या मनाला सडकून झाला. सरकारी नोकरीवर लाथ मारून विष्णुशास्त्र्याने जेव्हा नवी स्वतंत्र शाळा काढली, तेव्हापासूनच ह्या संस्थेसंबंधाने आंग्लो इंडियन कामगारांमध्ये साशंक विचार सुरू झाला. दोनदोनशे, चारचारशे, किंबहुना हजारहजार रुपये दरमह मिळविण्याची ज्यांची लायकी दहापाच वर्षांत व्हावयाची अशी पदवीधर विद्वान् मंडळी ह्या संस्थेत तीसपसतीस रुपड्यांवर संतुष्ट राहून काम करण्यास ज्या अर्थी सिद्ध झाली, त्या अर्थी ह्या संस्थेचा

अंतस्थ हेतु काहीतरी गूढ असावा व कालान्तराने सार्वजनिक स्वस्थतेवर परिणाम व्हावा, अशा विचाराची छटा आंग्लो इंडियन कामगारांच्या मनःपटावर झळकू लागली. कित्येक विद्वान् व विचारी युरोपियनांनी तर ह्या मंडळींची तुलना युरोपातील जेसूट मंडळींशी केली. विष्णुशास्त्री वारल्यावर, केळकर वगैरे एल्फिन्स्टन कॉलेजात शिकलेल्या मंडळींनी आपला गुरु जो वर्डस्वर्थ त्याला शाळेच्या बक्षिस-समारंभाकरिता एकदा गद्र्यांच्या वाड्यात आणिले. त्यावेळी ह्या गृहस्थाने नूतन शाळाचालक मंडळीला जेसूटांच्या पंक्तीस नेऊन बसविले. अशी तुलना करण्यात वडस्वर्थचा हेतु काही असो, परंतु जेसूट लोकांच्या गुप्त मंडळीने शिक्षणसंस्थांच्या द्वारा युरोपातल्या सर्व देशातील दरबारात, उमरावात, मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या लोकात काय कामगिरी बजाविली, हे ज्या ज्या इसमाला अवगत असेल, त्या त्या इसमाच्या मनावर ह्या तुलनेचा काय परिणाम झाला असेल, ते स्पष्ट करून सांगण्याची जरूर नाही. तशात मंडळीतील दोन इसमांनी कोल्हापूरच्या दुर्दैवी शिवाजीची कड घेऊन नुकतीच तरवार गाजविली होती. नव्या शाळेचे चालकत्व स्वीकारून वर्ष दीडवर्ष जाते आहे नाही तोच ज्या मंडळींनी एवढा पराक्रम केला, ती मंडळी पुढे काय करील आणि काय न करील, असाहि संशय अँग्लो इंडियन लोकात साहजिकपणे पसरला होता. शिवाय मंडळींच्या हातात नुसती शाळाच होती असे नाही. केसरी व मराठा अशी दोन वर्तमानपत्रेहि महाराष्ट्रात स्वतंत्र विचाराचा फैलाव करण्याकरिता मंडळीने काढिली होती. केसरीतील लेख इतके स्पष्ट, निर्भीड व झणझणीत असत की, त्यावरूनच जर सर्व महाराष्ट्राच्या मनाची परीक्षा करण्याचे कोणी त्या काली मनात आणिले असेल, तर महाराष्ट्रातील लोकांची मने फारच क्रांतिप्रवण झालेली असावी,

अशा त्याचा सहजासहजी ग्रह झाला असण्याचा संभव होता. सारांश, पाचचार प्रकारांनी नवी शाळा व नवी वर्तमानपत्रे स्थापन करणाऱ्या ह्या मंडळीसंबंधाने परकी लोकांची मने बरीच साशंक झालेली होती. अशा मंडळीला आपल्या डोळ्यादेखत वाटेल ते करू देणे कोणत्याहि राज्यकर्त्यांना इष्ट नसते. अशी मंडळी आपल्या मुठीत कोणत्या प्रकारे येईल व आपले जे थोर धोरण आहे त्याला अंकित कशी होईल, हे पहाणे राज्यकर्त्यांचे कामच असते. देशात चळवळ्या, उद्योगी, साहसी, जाणत्या व स्वातंत्र्येच्छू लोकांनी एखादी जोरदार संस्था काढली, तर त्या संस्थेला निर्जीव करून टाकण्याकरिता, सरकारी पक्ष नाना प्रकारचे उपाय योजीत असतो. स्वतंत्र संस्था कधी कधी केवळ दडपशाहीने दबून जातात ; कधीकधी बक्षिसाच्या लालुचीने नरम पडतात ; कधी कधी निव्वळ गोड बोलण्याने फसतात; आणि क्वचित् अधिकाराच्या जोराने सपशेल बुडवून टाकाव्या लागतात. पैकी कोणत्या मात्रेचा उपयोग प्रस्तुत प्रसंगी करावयाचा हा प्रश्न उद्भवतो न उद्भवतो तोच खुद्द रोगी, वैद्यबोवा घरी येण्याची वाट न बघता, मात्रेच्या शोधार्थ मात्रेच्या मालकाकडे जाण्याच्या तयारीत आहे, असे दृष्टोत्पत्तीस आले. रोग्याला जालीम मात्रेची जरूर नसून, सामान्य सौम्य मात्रेनेच त्याचे तोंड गोड होण्यासारखे आहे, असे वैद्यांच्या ध्यानात आले आणि त्याप्रमाणे त्यांनी रोग्याला, जी मात्रा त्याला हवी होती ती थोडथोडी मिळत जावी, अशी योजना केली. सौम्य मात्रेने रोग्याच्या रोगाचा उपशम कसा झाला ते रोग्याच्या मनोरचनेची चिकित्सा केली असता कळण्यासारखे आहे.

[ ७ ]

महात्मा विष्णु कृष्ण चिपळोणकर वारले त्यावेळी व त्यानंतर दोन वर्षांत शाळेचे चालकत्व ज्या मंडळीकडे आले, त्यांचे धोरण

शास्त्रीबोवांच्या धोरणाहून फारच निराळे होते. १८६८ पासून १८८० पर्यंत बारा वर्षांच्या सतत मननाने देशस्थिति कोणत्या प्रकारची आहे व ती सुधारण्यास काय उपाय योजिले पाहिजेत, ह्याचा विचार बारकाईने व सखोल अंतःकरणाने करण्यास शास्त्रीबोवाला बारा वर्षांचा अवधी मिळून, त्यांचे मन प्रगल्भ, हेतु स्पष्ट, विचार खोल व कृति उत्साहशाली, झाली होती. शास्त्रीबोवांच्या पश्चात त्यांचे पागोटे ज्या मंडळीने आपल्या डोईवर घालून घेतले त्या मंडळीला आपले विचार कायमचे ठरविण्याला इतका अवधि मिळाला नाही. मंडळीतील बहुतेक सर्व सभासद कॉलेजातून नुकतेच सुटून नव्या शाळेत विष्णुशास्त्र्यांच्या पुढारपणाखाली काम करावयाला लागले होते; आणि एकदोन वर्षे जो कोठे पुढाऱ्यांच्या धोरणाचा संस्कार थोडाफार मिळतो तोच त्यांना स्वतःला पुढारपण स्वीकारण्याचा प्रसंग आला. ह्या तरुण नवशिक्या मंडळीपैकी विचाराने मुरलेला असा एकहि इसम नव्हता. प्रत्येकाचे शिक्षण ह्या नाही त्या तऱ्हेने एकदेशी झाले होते. एकाचे तत्त्व दुसऱ्यास हटकून पटेलच अशी खात्री नव्हती. पुढारपणा घेऊन अमुक एक गृहस्थ संस्थेचे धोरण चालविण्यास योग्य आहे, अशी कोणाचीच खात्री कोणाला देता येण्याची सोय नव्हती सर्व मंडळीने एके ठिकाणी जमावे व जे काय ठरेल ते अमलात आणावे, असा प्रकार सुरू झाला होता. मुरलेल्या पुढाऱ्याने संस्थेच्या हिताची किंवा देशाच्या हिताची एखादी नामी कल्पना फार दिवस विचार करून संपादिलेली मंडळीपुढे मांडावी, मंडळीला तिच्यासंबंधी विचार करण्यास अवधि द्यावा व नंतर बहुमताने ती कल्पना अमलात आणावी, अशा पद्धतीला थारा मिळण्यास ह्या मंडळात त्या वेळी अवकाशच नव्हता. का कीं, मुरलेला पुढारी ह्या मंडळीत त्यावेळी कोणीच नव्हता. तेव्हा बहुमताने किंवा दोन तृतीयांश

किंवा तीन चतुर्थांश मतांनी काय ठरेल ते करावें, असा नियम करणे जरूर पडले. मुरलेल्या पुढाऱ्याने खोल विचार करून काढलेल्या कल्पना ज्या मंडळींच्या मनास वळण देण्यास निर्माण झालेल्या नसतात, त्या मंडळीत बहुमताने किंवा सर्व मतांनी जे काही काम होते ते सामान्यतः सामान्य प्रकारचेच असते असा नियम आहे, आणि त्या नियमान्वये प्रस्तुत तरुण मंडळीच्या हस्ते जी कामे झाली तीहि एकोनएक अगदी सामान्य व तात्पुरती अशी झाली. ही मंडळी वरवर विचार करणारी होती, हे त्यांच्या कृत्या-वरून तर आता स्पष्टच आहे; परंतु त्यावेळी शिक्षणपद्धतीसंबंधी जे विचार वेळोवेळी त्यांनी प्रकट केले, त्यांवरून देखील त्यांच्या कृत्यांचे भावी स्वरूप तात्त्विक विचार करणाऱ्याला समजण्यासारखे होते. इंग्रज सरकारने लहान, मध्यम नोकर तयार करण्याकरिता जी शिक्षणपद्धति सुरू केली, तिने आपल्या देशाचे कल्याण होणार आहे असे ही मंडळी त्यावेळी प्रतिपादीत असत. इतकेच नव्हे तर आताहि परम प्रेमाने प्रतिपादीत असतात ! ह्या मंडळींपैकी बहुतेकांची मोठी महत्त्वाकांक्षा म्हटली म्हणजे एखादे कॉलेज काढून तीत प्रोफेसर होणे, व परीक्षांकरिता पोरे तयार करणे, ही होती. देशभक्त, स्वातंत्र्येच्छु, उद्योगी, साहसी व करारी जवान तयार करण्याचा ह्या मंडळींचा बिलकूल हेतु नव्हता. तसा हेतू असता तरी तो हेतु तडीस नेण्यास जी गुलामगिरीची शिक्षणपद्धति त्यांनी अवलंबिली होती, तिने तो साध्य होणे केवळ अशक्यप्राय होते. समुच्चयाने ह्या मंडळींची अंतर्रचना अशा प्रकारची होती. व्यक्तिशः पहाता, मंडळीतील प्रायः प्रत्येक इसम कोणातरी एखाद्या मुरलेल्या पुढाऱ्यांच्या धोरणाने चालण्यास योग्य असा असून, स्वतंत्रपणे ह्या संस्थेचे धोरण देशहिताच्या बाजूने ठामपणे व निश्चयाने नेणारा

नव्हता. विष्णुशास्त्री वारल्यावर वर्डस्वर्थ, सेल्बी,[१५] भांडारकर व रानडे ह्यांपैकी कोणातरी एकाच्या किंवा सर्वांच्या उपदेशाने चालण्याची या लोकांना जरूर पडली, ह्यावरून वर जे विधान केले आहे, त्याची सत्यता येईल. शिवाय हंटर,[१६] रे,[१७] रिपन वगैरे युरोपियनांची सर्टिफिकिटे मिळविण्यास ही मंडळी किती हपापलेली होती हे पाहिले असताहि ह्या मंडळीच्या उद्योगाचे स्वरूप ध्यानात येण्यासारखे आहे.

[८]

असली मनोरचना ज्या मंडळीची होती, ती ही मंडळी, आपली संस्था राजमान्यत्व व स्थैर्य याप्रत कायदेशीर रीतीने कशी नेता येईल आणि तिच्या द्वारा पैशाची मदत मिळण्याची सोय होऊन एकादे कॉलेज कसे काढता येईल, ह्या विवंचनेत गुंग होऊन गेली होती; आणि हे हेतु साध्य करण्याकरिता युनिव्हर्सिटी व सरकार

१५. सेल्बी : डेक्कन कॉलेजात लॉजिक व मॉरल फिलॉसॉफी या विषयाचे प्राध्यापक म्हणून १८७७ मध्ये यांची नेमणूक झाली. राजकोटच्या राजकुमार कॉलेजचेहि काही वर्षे ते प्रमुख नेमले गेले होते. १८९० साली ते डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले. राजवाड्यांच्या निबंधात त्यांजविषयी अधिक माहिती आलेलीच आहे.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीशी सेल्बी यांचा संबंध प्रथमपासून जिव्हाळ्याचा होता. व १८९१ पासून म्हणजे टिळकांनी सोसायटी सोडल्यानंतर तो अधिकच जिव्हाळ्याचा झाला. प्रस्तावनेमध्ये सेल्बींनी सोसायटीला कशा प्रकारची मदत केली याबद्दल थोडेसे विवेचन केलेलेच आहे.

केळकरांनी टिळक चरित्रांत जी माहिती गोखले-टिळक विरोधा विषयी दिलेली आहे तिचाहि या निबंधाचा काळ ध्यानी घेता, येथे उपयोग होईल. १८९५ पासून गोखले आणि टिळक यांच्यातील (तळटीपा पान ८६ वर चालू. तळटीपा १६ व १७ पान ८६-८७ वर)

ह्यांच्याकडे कोणत्या मार्गाने जाता येईल ह्याची तोड काढीत होती. राजमान्यत्व मिळविण्याकरिता सरकारी रजिस्ट्रेशन ऑफीस, पैशाची मदत मिळविण्याची विद्याधिकाऱ्यांची कचेरी व गव्हर्नरादि बड्या मंडळीची पायरधणी आणि कॉलेज काढण्याकरिता युनिव्हर्सिटीच्या सीनेट सिंडिकेटादि संभाची विनवणी, ह्याकडे ही मंडळी धाव घेऊ लागली. तेव्हा अधिकारी मंडळीला एका प्रकारे संशय येऊ लागला व एका प्रकारे समाधानहि वाटू लागले. संशय अशाकरिता की, यूरोपियानांचा स्पर्श आपल्या संस्थेला बिल्कूल होऊ द्यावयाचा नाही,

---

( तळटीप पान ८५ वरून पुढे चालू )
विरोध अधिकच तीव्र झाला. ब्रूटफोर्सचा आधार घेऊन आपले म्हणणे खरे करून पाहाण्याची टिळकांची पद्धत असते असे गोखल्यांनी म्हटले; तेव्हा टिळकांनी लोकमताला ब्रूट फोर्स म्हणणाऱ्या गोखल्यांची बरीच रेवडी उडविली. ब्रूटफोर्स या शब्दाचा अर्थ काय होतो हे प्रिन्सिपल सेल्बी यांनीच विशद करून सांगावे अशी गोखल्यानी विनंती केली. आणि सेल्बीना त्या शब्दांचा अर्थ गोखल्यांनी केला तसाच करावयास पाहिजे असे सांगावे लागले. टिळकांना या शब्द-योजनेचा अर्थ माहीत नव्हता असे थोडेच आहे ?

राजवाड्यांनी आपल्या रामदास या प्रसिद्ध निबंधात एके ठिकाणी तळटीप दिलेली आहे; तेथेहि सेल्बी यांचे ' तेच राज्य उत्तमोत्तम होय की, ज्यात राज्याच्या हिताची दिशा तद्‌घटक सर्व मनुष्यांच्या हिताच्या दिशेशी सर्वतोपरी जमते.' हे प्रतिपादन जेथे राज्यकर्ते व राज्यातील इतर नागरिक एकाच धर्माचे असतील तेथेच सार्थ ठरू शकेल असे म्हटलेले आहे.

१६. हंटर : १८८२ साली हिंदुस्थान सरकारने जे शिक्षणविषयक मंडळ नेमले त्याचे अध्यक्ष. प्रत्येक इलाख्यातील शिक्षणासंबंधी मुलाखती व निवेदने यांच्या आधाराने त्यांनी आपल्या शिफारशी

( तळटीप पान ८७ वर पहा )

असा ज्या मंडळीच्या मूळ उत्पादकाचा बाणा, ती मंडळी यूरोपियनांची सर्टिफिकिटे व कन्येऱ्या ह्यांच्या कडकडून भेटी घेण्यास एकाएकी इतकी उत्सुक कशी झाली ? ह्यात कांही काळेबेरे असण्याचा तर संभव नाही ? सरकारच्या पैशाने शाळा व पाठशाळा चालवून, सरकारच्या हेतूविरुद्ध खटपट करण्याचा ह्या मंडळीचा तर विचार नसेल? असल्या शंका अधिकाऱ्यांच्या मनात येणे साहजिक होते. परंतु या संशयांबरोबर अधिकारी वर्गाला समाधान वाटण्याला जागा अशी

---

( तळटीप पान ८६ वरून पुढे चालू )
सरकारला सादर केल्या. मुसलमानांच्याकडे पक्षपातीपणाने पहाणे हा हंटरचा दृष्टीकोन होता. सर सय्यद अहंमद यांच्या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर त्यानी करवून घेतले. मात्र विद्वत्तेची त्यांना कदर होती. टिळकांच्या १८९७ च्या तुरुंगवासात ज्या अनेक युरोपिअन गृहस्थांनी टिळकांची शिक्षा कमी करावी अशी सरकारला विनंती केली, त्यात हंटर हेहि एक होते. जोग यांच्या इंग्रजी टिळक चरित्रात डॉ. डब्ल्यू , डब्ल्यु, हंटर व सर विल्यम हंटर अशी दोन निरनिराळी नावे ग्रंथात व सूचीतहि आहेत. वास्तविक हे दोन्हीहि एकच आहेत असे डे. ए. सोसायटीचा इतिहास पाहिल्यास कळून येते.

१७. रे : मुंबई इलाख्याचे गव्हर्नर. यांच्या नावे १८८५ मध्ये पुण्याचे मार्केट नवीन बांधले गेले. आता ते फुले मार्केट म्हणून ओळखले जाते. सध्या ज्या ठिकाणी फर्ग्युसन कॉलेज आहे त्या ठिकाणची पायाभरणी लॉर्ड रे यांच्या हस्ते १८९२ मध्ये झाली.

श्री. धनंजय कीर याच्या इंग्रजी टिळक चरित्रात पुढील प्रमाणे मजकूर आहे. लॉर्ड रे यांनी एकदा न्यू स्कूलला भेट दिली व एका वर्गात विद्यार्थ्यांना विचारले की, सरकारी नोकरीत येण्याची किती विद्यार्थ्यांची इच्छा आहे? त्याबरोबर वर्गातील बहुतेक विद्यार्थ्यांनी आम्ही सरकारी नोकरी करू म्हणून हात वर केले.' शाळा चालकांना या प्रकाराने आश्चर्याचा धक्का बसला असे कीर लिहितात.

झाली कीं, दोनचार वर्षे स्थापित होऊन जी मंडळी स्वतंत्रपणे एक जंगी संस्था चालवते, जीतील सभासद पोटाला चिमटा घेऊन स्वदेशातील लोकांना उच्च ( ? ) व मध्यम शिक्षण स्वल्प किमतीत देण्याचे व्रत पत्करितात, आणि जिचा मूळ उत्पादक आपल्या संस्थेला यूरोपियनांचा, अर्थात् यूरोपियन पैशाचा स्पर्श होऊं द्यावयाचा नाही अशी घनघोर प्रतिज्ञा करतो, ती मंडळी केवळ आपला स्पर्शच नव्हे, तर आपली कडकडून भेट घेण्यास येते, तेव्हा ही मंडळी आपल्या कह्यात आणण्यास ही संधि उत्तमोत्तम आहे. अशा ह्या नाना प्रकारच्या मनोविकारांनीं विलसणारी ही दोन्ही मंडळे ( अधिकारी मंडळ व संस्थोत्पादक मंडळ ) एकदांची पंधरावीस महिन्यांच्या खटपटीने एका ठिकाणीं आली आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा जन्म झाला. रोगी व वैद्य यांची गांठ पडून, दोघांचेहि हेतु ह्या जन्मसमारंभांत सफल झाले ! ह्या गाठीत एका पक्षाच्या हातापायात मण दीडमण वजनाच्या रुपेरी शृंखला पडून, तो पारतंत्र्योदधीत अज्ञानोज्जृंभित मोहाने आनंदित होत्साता मज्जन करू लागला; आणि एका एतद्देशीय स्वातंत्र्यप्रवण शिक्षणसंस्थेला पांचचार हजार रुपड्यांच्या देणगीने आंगाखाली घालता आले, ह्या फुशारकीने दुसरा पक्ष कृतकृत्य झाला. युरोपातील निरनिराळ्या देशातील स्वतंत्र संस्था आपल्या कह्यात आणण्यास तेथील सरकारांस कोण भयंकर उपाय योजावे लागतात, हे लक्ष्यात आणले असता, डेक्कन एज्युकेशन सोसायटी पांचचार हजारांच्या वर्षासनाने नरम करता आली, ही गोष्ट अँग्लोइंडियन अधिकाऱ्यांना मोठी समाधानाची वाटली. परंतु, माझ्या मते ह्या समाधानांत अभिमान व फुशारकी वाटण्यास काहीएक कारण नव्हते. डेक्कन एज्युकेशन सोसायटी गर्भावस्थेपासून अत्यंत नरम होती. ती गरम असावी असा जो सरकारास संशय आला, त्याचे कारण विष्णुशास्त्री व त्यांचे बाण्याचे उद्गार होत. विष्णुशास्त्री

वारल्याबरोबर त्यांचे विचार त्यांच्या अनुयायांनी सोडून दिले; नावापलीकडे विष्णुशास्त्र्यांची नवी शाळा व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे न्यू स्कूल ह्यात साम्य बिलकूल नव्हते; सरकारची मदत न घेण्याच्या ऐवजी ती मिळविण्याकरिता सोसायटीतील मंडळी पराकाष्ठेची भुकेली होती; ह्या गोष्टी जर विद्याधिकाऱ्यांस यथास्थित कळत्या, तर पैशाची मदत बिल्कूल न देताहि सोसायटी हवी तितकी वंगविता येती, हेहि त्यांच्या लक्ष्यात आले असते. शाळा व कॉलेज ह्यातून परीक्षाकरिता मुले तयार करावयाचा ज्यांचा धंदा त्यांच्या मुलांना परीक्षा अजीबात बंद करून, किंवा सरकारी शाळातील विद्यार्थ्यांपेक्षा त्यांच्या मुलापासून जास्त फी घेऊन, किंवा शाळेतील मास्तराखेरीज इतर चार एतद्देशीय किंवा यूरोपियन गृहस्थांची नैतिक सर्टिफिकिटे दाखल केल्याशिवाय परीक्षेला येऊ द्यावयाचे नाही अशी अट घालून, व इतर आणिक शेकडो क्षुद्र युक्त्या करून, खासगी शाळांच्या चालकांना नरम आणता येईल. त्याना वठणीला आणण्यास पैशाची खैरातच केली पाहिजे अशातला भाग नाही.

[ ९ ]

डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन होऊन आज एकवीस वर्षे झाली. इतक्या अवधीत देशहिताचे कोणते काम हिने केले हे पहावयाचे आता उरले आहे. सरकारी हायस्कुले व कॉलेजे ह्यात चालू असणाऱ्या शिक्षणपद्धतीहून सोसायटीच्या शाळेत व कॉलेजात प्रचलित असणाऱ्या पद्धतीत काडीचाहि भेद नाही. पुस्तके, वर्ग, परीक्षा वगैरे सर्व लहानसहान गोष्टी जशा तिकडे चालू आहेत. तशाच त्या इकडेही चालू आहेत. तिकडे हेडमास्तर आणि प्रिन्सिपाल शाळा व कॉलेजे यांची व्यवस्था पहातात, त्याप्रमाणेच इकडेहि सुपरिंटेंडंट व

प्रिन्सिपाल पहातात. तिकडे हेडमास्तर डिरेक्टरच्या आज्ञा शिरसावंद्य मानतो; त्याप्रमाणेच इकडे सुपरिटेंडंट कौन्सिलातील कार्यकर्त्या कमीटीचा हुकूम पाळतो. ह्याप्रमाणे सरकारी शिक्षण पद्धति ह्या सोसायटीने जशीची तशी उचलून घेतली आहे. सरकारी शिक्षणखात्यांत व सोसायटीत फरक इतकाच कीं, तिकडील हेडमास्तरला २५० पासून ८०० पर्यंत पगार व प्रिन्सिपॉलला ८०० पासून २००० पर्यंत पगार असतो; तो इकडे नसतो. इकडील हेडमास्तर व प्रिन्सिपॉल ७५ पासून ९०/१०० रुपयांवर तेच काम समाधानाने करतो. तिकडील हेडमास्तर, मास्तर प्रिन्सिपॉल व प्रोफेसर जी कामे जितक्या योग्यतेने करितात ती कामे तितक्या, कदाचित् त्याहूनहि जास्त योग्यतेने इकडील मास्तर व प्रोफेसर करतात. प्राप्तीच्या बाबीत काय तो मोठा फरक आहे. सोसायटीतील मास्तरांनी व प्रोफेसरांनी घस जी काय सोशिली आहे ती ही ह्या एवढ्याच बाबतीत. देशहिताकरिता आपण स्वार्थत्याग केला आहे, वगैरे भाषा सोसायटीतील सभासद जी योजतात ती ह्या पैशाच्या बाबीसंबंधानेच होय. ह्या भाषेत कितपत अर्थ आहे ते आता पाहू.

[ १० ]

पांच रुपयांच्या पंतोजीपासून तो पाचशे रुपयांच्या प्रोफेसरापर्यंत व तीन रुपयांच्या तलाठ्यापासून तो बाराशे रुपयांच्या जज्जापर्यंत लहान मोठे नोकर तयार करण्याकरिता सरकारने मराठी व इंग्रजी शाळा, ट्रेनिंग व इतर कॉलेजे व युनिव्हर्सिट्या निर्माण केल्या. शाळा-पाठशाळांतून लागणारे नोकर विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणें सरकार ठेवीत असते. नोकर जास्त पाहिजे असले म्हणजे जास्त पंतोजी ठेवून जास्त उमेदवार तयार करण्याची व्यवस्था सरकार करते. नोकरीकरिता उमेदवारांची संख्या फाजील झाली म्हणजे

कमी पंतोजी करून कमी उमेदवार येतील अशी तजवीज सरकार करते. ह्या तजविजीला सरकार उदार शिक्षणाची पद्धति म्हणून मोठे मोहक नाव देते. ह्या नावाला भुलून सोसायटीतील मंडळींच्या मनांत अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, हे उदार शिक्षण आपल्या देशबांधवांना स्वस्त व सुलभ रीतीने देण्याची आपणहि काहीतरी व्यवस्था करावी व सरकारचे उदार हेतु त्वरित सफल होण्यास थोडी फार मदत करावी; मग ह्या कामी पैशाच्या बाबतीत स्वार्थ-त्याग करावा लागला तरी बेहत्तर आहे. सोसायटीतील मंडळींनी पैशाच्या बाबतीत जो स्वार्थत्याग केला म्हणून म्हणतात त्याचा मुख्य हेतु हा आहे. म्हणजे उदार शिक्षणाच्या भपकेदार नावाखाली सरकारी नोकरीला लायक असे उमेदवार तयार करण्याकरिता ह्या मंडळींनी स्वार्थत्याग केला आहे. हा स्वार्थत्याग तर खराच; परंतु हा सत्कारणी लागला किंवा असत्कारणी लागला, हे पाहूनच ह्याचे महत्त्व किंवा लघुत्व ठरवावयाचे आहे. समजा कीं, इंग्लंडावर फ्रेंच लोकांचे राज्य[१८] झाले, आणि इंग्लंडातील सर्व तरुण मंडळीला फ्रेंच

---

१८. इंग्लंडावर फ्रेंच लोकांचे राज्य : राजवाड्यांनी ज्या तऱ्हेचा युक्तिवाद केला आहे. तसाच युक्तिवाद व्हॅलेंटाअिन चिरोल यांनीहि केलेला आहे. हे वाचकास खालील उताऱ्यावरून समजून येईल. व्हॅलेन्टाइन चिरोल यांचे ‘ इंडियन अनरेस्ट ’ हे प्रसिद्ध पुस्तक टाइम्समधील लेखमालेच्या स्वरूपात प्रथम प्रसिद्ध झाले. चिरोल साहेबांचा दृष्टीकोन व त्यांनी सुचविलेले उपाय आणि राजवाड्यांचा दृष्टीकोन व राजवाड्यांना अभिप्रेत असणारे उपाय यात स्वाभाविकच महदंतर आहे. परंतु आपला मुद्दा पटविण्यासाठी चिरोलहि राजवाड्याप्रमाणेच युक्तिवाद करतात. तो असा : “ क्षणभर कल्पना करा, ती कल्पना मूर्खपणाची भासेल हे खरे आहे, पण कल्पना करा

( तळटीप पान ९२ वर पहा )

सरकारचे नोकर बनविण्याचे एखादे शाळाखाते फ्रेंच सरकारने काढले आणि त्या खात्याला इंग्रज लोकांना उदार शिक्षण देणारे खाते म्हणून भपकेबाज नाव ठेविले. समजा कीं, ह्या भपकेदार नावाला भुलून, फ्रेंच नोकर-तयार करण्याच्या कामी फ्रेंच सरकारला दहावीस इंग्रज गृहस्थ पोटाला चिमटा घेऊन मदत करू लागले आणि आपण स्वार्थत्याग केला म्हणून आपली महती मोठ्या विनयाने मिरवू लागले. समजा की, अशी स्थिति इंग्लंडात झाली तर दहावीस भोळ्या इंग्रजांची किंमत स्वतंत्र राष्ट्रातील लोक काय बरे करतील? हे लोक स्वदेशहिताच्या अगदी निरूपयोगी व ह्यांचा स्वार्थत्याग कवडीच्या मोलाचा ठरला जाईल; कीं त्यांना मोठमोठ्या देशभक्तांच्या पंक्तीस बसवून संतमहंताप्रमाणे यांच्या नावांचा पृथ्वीवरील सर्व स्वातंत्र्यप्रिय

---

( तळटीप पान ९१ वरून चालू )

की, आपल्या इंग्लंड देशावर गेली शंभर वर्षे चिनी राज्यसत्ता असती आणि त्या राज्यसत्तेने आपल्या सामाजिक चालीरीती किंवा धार्मिक श्रद्धा यांच्यात ढवळाढवळ न करता फक्त आपल्या तरुणांना चिनी क्रमिक पुस्तकातून चिनी शिक्षणच दिले असते; तर त्याचा आपल्या तरुणावर काय परिणाम झाला असता? हे शिक्षण देण्यात इंग्रज लोक नेमले गेले आहेत परंतु ते आपल्या शिष्यापेक्षा फक्त किंचित अधिक प्रमाणात खरे चिनी ज्ञान व चिनी नीतिशास्त्र किंवा चीनच्या अंतरंगाची खरी जाणीव असणारे आहेत. अशा परिस्थितीत ते काय शिक्षण देऊ शकतील? याचा परिणाम म्हणजे केवळ गोंधळ होणार. हिंदुस्थानच्या तरुणांना सध्या जे शिक्षण मिळत आहे व शाळा कॉलेजांतून जी तरुण मंडळी बाहेर पडत आहेत ती असल्या शिक्षण क्रमाचा परिणाम दर्शवीत आहेत." व्हॅलेन्टाइन चिरोल यांचे हे अवतरण सर फिलिप मॅगनस यांनी आपल्या 'एज्युकेशनल एमस् अँड एफर्टस्' या पुस्तकात दिलेले आहे.

राष्ट्रांत यावच्चंद्रदिवाकरौ जयजयकार होईल? दुसरा प्रकार होण्यापेक्षां पहिल्याकडेच स्वतंत्र राष्ट्रांतील विचारी लोकांची प्रवृत्ति होईल हे उघड आहे. ह्या दृष्टीने पाहता, डेक्कन एडुकेशन सोसायटीतील मंडळीचा स्वार्थत्याग असत्कारणी लागला आहे, हे विधान सर्वत्र मान्य व्हावे असे वाटते. सरकारी नोकर तयार करण्याला सरकारी हायस्कुले व कॉलेजे कामापुरती हवी तितकी होती. तेच काम कमी, अत्यंत कमी पगारावर करण्याच्या नसत्या उठाठेवीत पडण्याचे काहीएक अडले नव्हते. कमी पगारावर नसती उठाठेव करणाऱ्या ह्या मंडळीच्या वर्तनाने सरकारी अधिकारी प्रथमप्रथम बरेच बुचकळ्यात पडले. कमी पगारावर राहून शाळा व कॉलेज चालविण्यात ह्यांचा काहीतरी मतलब असावा असा संशय त्यांना पहिल्या पहिल्यांदा आला पण पुढे पाचचार वर्षांच्या अनुभवाने हा त्यांचा संशय समूळ मावळून गेला; आपल्या नोकर तयार करणाऱ्या शिक्षण पद्धतीला हे लोक खरोखरच उदार व स्वतंत्र शिक्षणपद्धति समजतात हे त्यांच्या ध्यानात आले; आणि खुद्द डेक्कन कॉलेज ह्या मंडळीच्या गळ्यात घालण्यास ते सिद्ध झाले. अगदी थोड्या खर्चात जर कोणी डॉन क्विझोट आपले काम आपल्या मनाप्रमाणे करण्यास तयार आहे, तर ते त्याच्याकडून कोण शहाणा करून घेणार नाही? पण ह्या प्रसंगी एक निराळाच चमत्कार झाला! ही मंडळी डेक्कन कॉलेज आपल्या हाती घेण्याचे पतकरीना. ह्या मंडळीच्या गूढ विचारासंबधाने सरकारचा संशय फिटला; परंतु ह्यांचा स्वतःच्याबद्दलचा संशयमात्र अजूनहि फिटला नव्हता! सरकारी कॉलेज सरकारी अटीसह घेण्यात आपल्या स्वातंत्र्याचा नाश होईल अशी ह्या मंडळीस ह्या वेळी काळजी पडली! जणू काय ह्यांच्या स्वातंत्र्याचा नाश अद्याप व्हायचा राहिलाच होता! ज्या वेळी इंग्लीश शिक्षणपद्धती जशीच्या

तशी ह्यानी सुरू केली; ज्यावेळी ह्यांच्या कॉलेजात फर्ग्युसनचे नाव पाचपन्नास हजार रुपयाकरिता दिले गेले; व ज्या वेळी पाच चार हजाराचे वर्षासन ह्या मंडळीनी पत्करिले; त्याच वेळी ह्यानी आपली स्वतंत्रता पूर्णपणे गमावली होती. नंतरच्या टिवल्याबावल्या केवळ अज्ञानदर्शक व उपहास्य होत !!!

[ ११ ]

देशाच्या हिताकरिता ज्याने आपले नुकसान करून घेतले किंवा सर्वस्वावर पाणी सोडले त्याने स्वार्थत्याग केला हे म्हणणे यथास्थित शोभते. देशाचे कोणतेहि हित न करिता ज्यानी आपले थोडेबहुत नुकसान करून घेतले त्याने स्वार्थत्याग केला असे कोणी म्हणत नाही; त्याने आपले अज्ञपणाने नुकसान करून घेतले असेच लोक म्हणत राहतील. हाच प्रकार सोसायटीतील मंडळींचा आहे. तशात ह्या मंडळीने आपले स्वतःचेच तेवढे नुकसान करून घेतले आहे, असे नाही. लहानमोठ्या नोकऱ्या मिळवू इच्छिणारे उमेदवार ह्यांच्या व ह्यांच्याचसारख्या इतरांच्या वीसएकवीस वर्षांच्या खटपटीने इतके स्वस्त झाले की, बी. ए. ला पंधरा रुपयाला कोणी विचारीनासे झाले आणि मुंबईच्या एका गव्हर्नराच्या भाकिताप्रमाणे ग्रॅज्युएटांना पट्टेवाल्याचीहि नोकरी मोठ्या मिनतवारीने मिळण्याचा प्रसंग जवळ येऊन ठेपला ! यू.एस्. एफ्., मॅट्रिक, पी. ई., आय. ई., बी. ए., एम्. ए., एल्एल्. बी., पास व नापास, अशा नोकऱ्याकरिता हपापलेल्या ज्या ज्या इसमास सरकारी नोकरी मिळत नाही तो तो इसम, काळ वाईट आला, अशी ओरड करतो; न्यू स्कूलच्या धर्तीवर जिल्होजिल्ही व तालुक्यातालुकी शाळा काढून कसेबसे पोट भरतो; आणि सरकारी नोकरीला जास्त उमेदवार तयार करतो. पुणे, सातारा, नगर, मुंबई, धुळे, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी,

चिपळूण, नाशिक, पेण, वाई वगैरे स्थळी ज्या खासगी शाळा न्यू स्कूलच्या धर्तीवर अलीकडील वीस वर्षांत निघाल्या त्या सर्वांनी लहान मध्यम उमेदवार स्वस्त व विपुल तयार करण्याचे काम मोठे बहादुरीने केलेले आहे. राष्ट्रातील तरुणांना इतर कोणत्याहि स्वतंत्र धंद्याने पोट भरण्याचे माहीत नसल्यामुळे, हे एक मोठे राष्ट्रीय संकटच ओढवलेले आहे. ह्या संकटाच्या मुळाशी पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी आहे. पुणेशहर सर्व महाराष्ट्राचे पुढारपण घेणारे; आणि पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील पुढारी शिक्षकांनी जी शिक्षणपद्धति अवलंबिली ती इतर लहानमोठ्या शहरांतील पुढारी लोकांनी उचलावयाची. अर्थात् जी फळे सोसायटीच्या संस्थांना आली तीच किंवा त्यांच्यासारखीच फळे बाहेरगावच्या शाळांनाहि आली. पुण्याचे शाळापुढारी चुकले, त्याने सर्व महाराष्ट्राचीहि फसगत झाली! महाराष्ट्रातील येथूनतेथून सर्व पांढरपेशांची तरुण मुले सरकारी नोकरीला उमेदवार झाली. स्वतंत्र धंदा माहीत नाही. पोट कसे भरावे हे कळत नाही. बिचारी स्वतःच्या कर्माला बोल लावून देशोधडी भटकत आहेत! सरकारी नोकरीला लायक झालेले हे उमेदवार एक मोठे राष्ट्रीय नुकसान करीत आहेत. जे धंदे त्यांना लहानपणापासून शिकविलेले नाहीत, त्या धंद्याच्या कित्येक क्षुद्र कंपन्या हे उमेदवार लोक काढतात, त्यात हटकून फसतात, आणि पांढरपेशालोकांना ही कामे साधत नाहीत म्हणून शिक्का मिळवितात. सारांश, चुकलेल्या पुढाऱ्यांच्या कृत्यांचे असे परंपरित परिणाम होतात.

[ १२ ]

नोकऱ्या मिळवू इच्छिणाऱ्या उमेदवारांची संख्या देशात अतोनात होत चालली आहे, ही गोष्ट सरकारच्या नीट ध्यानात आलेली आहे; व ह्यावर प्रस्तुतचे राजकार्य धुरंधर गव्हर्नर जनरल

लॉर्ड कर्झन ह्यांनी युनिव्हर्सिटीचा नवा कायदा करून एक रामबाण उपाय योजिला आहे. ह्या उपायाने सरकारी नोकरीला उमेदवार तयार करणाऱ्या स्वस्त व भिक्षुकी कॉलेजांचे बारा वाजून प्रायः जेवढ्या नोकरांची सरकारात मागणी असेल तेवढेच उमेदवार सरकारी कॉलेजातून तयार केले जाणार आहेत. ह्यालाच लॉर्ड कर्झनांनीं उदार शिक्षण, उदारतम करण्याची युक्ति, असे गोंडस नांव दिलेले आहे. खाजगी संस्था कॉलेजे काढून नोकऱ्यांपेक्षा उमेदवारच अतोनात जास्त करून ठेवतात. तेव्हा खासगी कॉलेजे न निघतील अशी प्रथम योजना करून, विद्यमान खासगी कॉलेजांनी कायमचा दहापाच लाखांचा फंड, सरकारी कॉलेजांतल्यासारखी मोठी फी, बडी लॅबोरेटोरी, जंगी इमारत, वगैरे व्यवस्था अवश्य केली पाहिजे, असा निर्बंध केलेला आहे. सारांश, सरकारी कॉलेजा-खेरीज उमेदवार तयार करणारी इतर कॉलेजे होता होईल तो नसावी, असा ह्या कायद्याचा रोख आहे, आणि खासगी कॉलेजांचा गेल्या २५ वर्षांतील इतिहास पाहतां हा रोख सरकारच्या हिताला जसा उपकारक असावा तसाच आहे. सरकारी नोकर तयार करण्याच्या उदार शिक्षण पद्धतीचा प्रसार करणाऱ्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा इतिहास जर नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी मनन केला असता, तर सोसायटीसारख्या संस्थांच्या हस्ते चालणाऱ्या उदार शिक्षणाच्या पिछेहाटीबद्दल पर्वाच्या युनिव्हर्सिटी बिलाच्या वादविवादात नामदारांनी बिल्कूल शोक केला नसता. जी गोष्ट मुळातच नव्हती तिच्या निधनाबद्दल कोण शहाणा शोक करील !

[ १३ ]

विष्णुशास्त्र्यांच्या नव्या शाळेची डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या शाळा व कॉलेजे यांचा उत्पत्ति व स्थिति आज पंचवीस वर्षे प्रत्यक्ष

पहात असल्यामुळे, सोसायटीतील बहुतेक सर्व सभासदांची चांगली ओळख असल्यामुळे व तीतील कित्येक प्रमुख मंडळींशी संस्थेसंबंधी अनेक वेळा बोलण्याचे प्रसंग आल्यामुळे, मला जी माहिती मिळाली, तिच्यावरून सोसायटीच्या मनोरचनेची चिकित्सा वर केली आहे. सोसायटीतील कित्येक मंडळींच्या नैतिक व बौद्धिक गुणाबद्दल मला बराच आदर वाटतो. परंतु, सोसायटीच्या द्वारा काही देशहित झालेले आहे, असे म्हणण्यास माझे मन धजत नाही. तसेच चालली आहे ह्याच तऱ्हेने जोपर्यंत सोसायटी चालेल, तोपर्यंत ती सध्या नोकर तयार करण्याचे जे काम करीत आहे, तेच करीत राहील; व तिचे हे काम करण्याचे अवसान सरकारच्या इच्छेवर अवलंबून राहील. युनिव्हर्सिटीच्या नवीन कायद्याचा रोख पहाता, सोसायटी दिवसे दिवस जास्त दुर्बल होत जावी असा अंदाज आहे. सोसायटीने डेक्कन कॉलेज जर आपल्या ताब्यात घेतले, तर सोसायटी बरीच दशके नोकर तयार करण्याचे काम असेच चालवील. परंतु आहे या स्थितीत म्हणजे काही धोरण निराळे ठविले नाही तर, महाराष्ट्रातील विचारी व देशभक्त लोकांच्या आदरास ती पात्र होईल असा फारच थोडा संभव आहे.

[१४]

पुण्यातील अत्यंत प्रख्यात अशी जी डेक्कन एज्युकेशन सोसायटी तिच्याबद्दल येथपर्यंत लिहिले. आता त्या शहरातील इतर शिक्षण-संस्थासंबंधानेहि चार शब्द नमूद करणे अवश्य आहे. भाव्यांची शाळा, नूतन मराठी विद्यालय व न्यू प्रिप्रेटरी क्लासेस ह्या संस्थाहि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचेच काम करीत असतात. लष्करातहि एक शिक्षणसंस्था असल्याच प्रकारची आहे. ह्या सर्वांचा हेतु रेल्वे, पोष्ट, शाळा वगैरे खासगी व सरकारी खात्यातील नोकर तयार करण्याचा आहे.

[ १५ ]

पुण्याप्रमाणे महाराष्ट्रातल्या व हिंदुस्थानातल्या इतर प्रांतातील लहान मोठ्या शहरी ज्या इंग्रजी शाळा व पाठशाळा आहेत त्याहि धंद्याच्या निमित्ताने हिंडताना माझ्या पाहण्यात आल्या आहेत. पैकी काही शाळा व कॉलेजे ब्रिटिश मुलखातलि आहेत व काही एतद्देशीय संस्थानातील आहेत. पैकीं ब्रिटिश मुलखांतील खासगी शाळा व कॉलेजे याविषयी पुण्यातल्या शाळासंबंधाने जे माझे मत झाले आहे तेच आहे. संस्थानातील शाळा व कॉलेजे यासंबंधाने मात्र एक दोन बाबी विचार करण्यासारख्या दिसल्या. संस्थानिकांच्या पदरी जी हायस्कुले व कॉलेजे आहेत त्यांचे कार्य काय? त्यांच्या हायस्कुलात व कॉलेजात जे विद्यार्थी शिकतात ते पुढे कोणाच्या नोकऱ्या करतात? संस्थानिकांच्या शाळाखात्यातून जे विद्यार्थी बाहेर पडतात त्यांच्या विद्येचा खर्च संस्थानिकांनी सोसावा आणि त्यांच्या नोकरीचा फायदा इतर लोकांनी घ्यावा, हा प्रकार कोठला? ह्यासंबधाने काहीतरी निर्बंध पाहिजे. तसेच, संस्थानिकांच्या राज्यांचे धोरण इंग्रज सरकारच्या राज्याच्या धोरणाहून अर्थात निराळे आहे. इंग्रज सरकार सम्राट् आहे व संस्थानिक सामंत आहेत. निरनिराळ्या संस्थानिकांच्या निरनिराळ्या पूर्वपीठिका असून, सम्राटाशी निरनिराळे संबंध आहेत. तेव्हा संस्थानातील शिक्षणपद्धति इंग्रजी शिक्षणपद्धतीहून निराळी असावी, हे अवश्य आहे. संस्थानिकांच्या कॉलेजात संस्थानाला उपयोगी पद्धतीने, म्हणजे संस्थानचा पूर्वेतिहास, सम्राटसंबंध वगैरे राजनैतिक विषय जाणणारे, असे नोकर तयार केले जावे. यात संस्थानाचा पैसा सत्कारणी पडला असे होईल.

[ १६ ]

पुण्यातील ज्या शाळांशी लहानपणी माझा परिचय झाला त्यांची माहिती देता देता बराच विस्तार झाला, परंतु तो अपरिहार्य होता. मागे सांगितलेच आहे की, १८८२ च्या जानेवारीत मुंबई युनिव्हर्सिटीची प्रवेश परीक्षा मी दिली. नंतर पहिली टर्म मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात भरली. कॉलेज त्यावेळी महालक्ष्मीवर असे. मेसर्स वर्डस्वर्थ हॅथार्नथ्वेट, मॅकमिलन, पिटर्सन, ऑलिव्हर, बोडस, हैरात वगैरे प्रोफेसर होते. पैकी पी. ई. च्या वर्गाला ऑलिव्हर नांवाचा शिक्षक इंग्रजी शिकवी. ही स्वारी अत्यंत लाजाळू असून मुलांच्याकडे वर मान करून बघण्याचेहि धैर्य ह्याला नव्हते. मुलांनी जोडे व बूट आपटावे, बाके व मेजे खडखड वाजवावी व प्रसंगी हजारो पाखरासारखे घुमावे, असा प्रकार हमेशा चाले. नॉट ( Not ) हा नकारार्थी शब्द आहे, वगैरे अपूर्व माहिती मधून मधून हे विद्वान् देत असत. पी. ई. च्या परीक्षेला त्या वर्षी नेल्सनचे चरित्र होते. आठदहा वर्षांच्या मुलांना हे इंग्रजी पुस्तक ठीक आहे. विशीच्या आसपास असणाऱ्या इकडील घोडमुलांना मात्र त्याचा मोठासा उपयोग होतो असे नाही. प्रवेश परीक्षेच्या वेळी जे इंग्रजी ग्रंथ मी वाचले होते, त्या मानाने हे पुस्तक वाचणे केवळ पोरखेळ वाटला. मि. हॅथार्नथ्वेट बीजगणित व भूमिति व्यवस्थित रीतीने फळ्यावर जाऊन शिकवी. प्रो. मॅकमिलन अडखळत अडखळत तर्कशास्त्रातील सोपी माहिती नीट फोड करून सांगे. पिटर्सनकडे विक्रमोर्वशीय का असेच कोणते, नाटक असे. स्त्रीच्याप्रमाणे अत्यंत कोमल व गोंडस स्वराने ही स्वारी संस्कृताचे इंग्रजी भाषांतर करी व कधी कधी एखाद्या वाकड्या तिकड्या संस्कृत वाक्याचा किंवा शब्दाचा अर्थ सांगताना बिचके. संस्कृत भाषेत पारंगतता प्राप्त होण्यापेक्षा गोड इंग्लिश भाषांतर पिटर्सनापासून

शिकण्यासारखे होते. ग्रीक किंवा रोमन इतिहासापैकी काही भाग एखाद्या फळ्याकडे दिलेला असे, तो टिपणे करून काहीतरी सांगत असे. शिकविण्याची व्यवस्था ही अशी असे. मेसर्स वर्थानथ्वेट व मॅकमिलन ह्याखेरीज कोणी शिक्षक मन लावून मनोभावाने शिकविण्याची पर्वा करी, असे मला दिसले नाही. एल्फिन्स्टन कॉलेजात मी रहाता विद्यार्थी नव्हतो, गिरगावातून आगगाडीने जात असे. त्यामुळे तेथील रहिवाशी विद्यार्थ्यांच्या रहाणीविषयी फारसे लिहिता येत नाही. विद्यार्थी इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर रहात. त्या मजल्यातील तक्तपोशी व कूड सर्व लाकडी असल्यामुळे थोडे कोठे चालू लागले की, सर्वत्र गोंगाट व गडबड होऊन जाई. अशा गडगडाटात हिंदू विद्यार्थीच अभ्यास करू जाणत. इतर देशातील टिकले असते की काय ह्याची शंकाच आहे. ह्या टर्मात माझ्या ज्ञानात फारशी भर पडली असे वाटत नाही. परीक्षेकरिता नेमलेल्या सर्व पुस्तकांचे आलोडन महिना पंधरा दिवसांच्या एकाग्र अभ्यासाने येण्यासारखे होते. बाकीचा वेळ सर्व फुकट. ह्या अवधीत एकाहि शिक्षकाशी माझी ओळख झाली नाही. शिकविले म्हणजे शिक्षकाचे काम झाले. कॉलेजच्या बाहेर विद्यार्थी करतो काय व वागतो कसा हे पाहण्याचे काम शिक्षकाचे नसावे, असा प्रकार होता. बाकी कॉलेजाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष पूसतपास करणे, शिक्षकाच्या मनात असते तरीहि दुरापास्तच होते. सारांश, परीक्षेकरिता मुलांना शिकवावयाचे, हें मुख्य धोरण असे. पहिली टर्म संपल्यावर मी पुण्यास आलो. पैशाच्या व इतर कारणामुळे दुसऱ्या टर्मला कॉलेजात गेलो नाही. पहिल्या टर्मात मुंबईस असताना विष्णुशास्त्री चिपळोणकर वारल्याची बातमी ऐकिली, त्यावेळी महद्दुःख झाले. मरण ही मनुष्यांची प्रकृति आहे, ही गोष्ट तोपर्यंत

माझ्या अनुभवास आली नव्हती. तमिस्त्र्याच्या मुशीत जगताच्या ह्या तीरावर स्वैर व निभ्रांत हिंडत असतां जेथून कधीं कोणी परत आला नाही त्या तीराची मला कल्पनाच नव्हती. सर्व मनुष्ये व प्राणी अमर आहेत, अशी माझी अस्पष्ट भावना होती. ह्या भावनेला शास्त्रीबुवांच्या मृत्यूने जबर धक्का बसला. शाळेतून जाताना व येताना आणि शहराच्या पश्चिम भागात हिंडताना शास्त्रीबोवांच्या सभ्य, भारदस्त व प्रौढ मूर्तीला मी अनेकवार पाहिले होते. शास्त्रीबोवा परम देशभक्त आहेत, असे ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकत होतो, आणि त्यांनी लिहिलेले निबंध वाचलेले माझ्या कानावरून गेले होते. ह्या पुरुषासंबंधाने अशा अनेक गोष्टींचा माझ्या मनावर संस्कार झाला असल्यामुळे त्यांच्या मरणाने मला थोर दुःख झाले. पुण्यास आल्यावर उदरपूरणार्थ मी एक जुजबी धंदा काढला; तो धंदा कनिष्ठ नोकर तयार करण्याचाच होता. मला जे आतापर्यंत शिक्षण मिळाले होते, त्याच्या जोरावर दुसरा कोणताच स्वतंत्र धंदा करण्याची माझी ऐपत नव्हती. पब्लिक सर्व्हिस, सेकंड ग्रेड, परीक्षेकरिता उमेदवार तयार करण्याचा मी एक वर्ग काढला. त्या वर्गात दहापंधरा मुले असत व तीसपस्तीस रुपये प्राप्ति दीडदोन तासांच्या वटवटीने होई. हा धंदा मी दीडदोन वर्षे केला. पुढे १८८४ साली माझ्या वडील बंधूंना डेक्कन कॉलेजात फेलोशिप मिळाल्या कारणाने, त्या वर्षाच्या जूनमध्ये पी. ई. च्या परीक्षेची दुसरी टर्म मी डेक्कन कॉलेजात भरू लागलो. ह्या वेळी मि. ऑक्सनहॅम कॉलेजचा प्रिन्सिपाल असून, मेसर्स भांडारकर, सेल्बी, करकरे, झळकीकर[१९], दस्तूर आणि बॅरेट हे

---

१९. झळकीकर : डेक्कन कॉलेज व एल्फिन्स्टन कॉलेज येथे हे संस्कृत शिकवीत. ग्रामण्य, प्रायश्चित्त, धर्ममतांची मीमांसा इत्यादि बद्दल तत्कालीन पुढाऱ्यांनी यांच्या विचारांचा व पाठिंब्याचा आधार बरेच वेळा घेतला आहे.

प्रोफेसर होते. ह्या वर्षी वर्गातील दहांपैकी व्याख्यानाला मी हजर होतो. प्रिलिमिनरी परीक्षेतून कसाबसा निघून फेलो व क्लार्क ह्यांच्या कृपेने परीक्षेस मला परवानगी मिळाली. नंतर परीक्षेची सर्व पुस्तके मी विकत घेतली आणि महिन्याभराच्या अभ्यासाने पी. ई. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात पास झालो. १८८५ साली मी गांवातून आलो तर कॉलेजात येत असे. त्या वर्षी दोनहि टर्मा भरून मी परीक्षेला गेलो नाही. १८८६ व १८८७ ही दोनच सबंध साले मी कॉलेजात रहात होतो. ह्या दोन सालात माझ्या मनात असा विचार आला की, पहिल्या व दुसऱ्या बी. ए. च्या परीक्षांना एकदम बसावे. परंतु दोनहि साले असा चमत्कार झाला की, प्रिलिमिनरी परीक्षतच मला आडकाठी होऊ लागली. परीक्षेच्या अगोदर एक महिना अभ्यास करावयाचा, व्यर्थ बारा महिने परक्षिेची ती क्षुल्लक पुस्तके कुटीत बसावयाचे नाही असा माझा संकल्प होता. सहामाही परीक्षा व प्रिलिमिनरी परीक्षा ह्या दोन परीक्षा कॉलेजातल्या कॉलेजात दिल्यावर आणीक मुंबईस त्याच विषयाची शेवटची परीक्षा द्यावयाची, असा परिपाठ आहे, म्हणजे बी ए. सुद्धा तिन्ही परिक्षा मिळून एकंदर नऊ परीक्षा झाल्या. प्रत्येक वेळेस ती ती क्षुल्लक व दरिद्री पुस्तके तोंडपाठ करून नीट ध्यानात ठेविली पाहिजेत. खरे म्हटले असता कॉलेजातच जी प्रिलिमिनरी परीक्षा होती तीत पास झाले म्हणजे काम संपले अशी व्यवस्था हवी होती. पहिल्या सहामाहीत जी पुस्तके वर्गात शिकून होतात, त्यांची परीक्षा त्या सहामाहीच्या शेवटी होतेच. त्यांची परीक्षा पुन्हा मुंबईला द्यावयाला लावणे म्हणजे विद्यार्थ्यांना निव्वळ त्रास देणे आहे. तशात बी. ए. पर्यंत शिकविल्या जाणाऱ्या पुस्तकातील बरीच पुस्तके अशी आहेत की, जी अथपासून इतीपर्यंत सूक्ष्मपणे ध्यानात

ठेवण्यात अर्थ नाही. इंग्रजी कादंबऱ्या, संस्कृत नाटकें, इंग्रजी कविता, निबंध, ह्यातील विषय दर वर्षाच्या तीनहि परीक्षांच्या वेळी बारीक ध्यानात ठेवून फायदा काय? ह्या परीक्षांना कित्येक पुस्तकें अशी आहेत की, ज्यातील प्रमेयें आधुनिक शास्त्राच्या दृष्टीने अगदी कवडीमोल आहेत. उदाहरणार्थ, बेकनचे 'ॲडव्हान्समेन्ट ऑफ लर्निंग' घ्या. ह्या ग्रंथातील पहिला भाग विद्येच्या प्रशंसेसंबंधाचा आहे. दुसऱ्या भागात बेकनाने तीनशे वर्षांपूर्वीच्या माहिती प्रमाणे विद्येचे विभाग वगैरे केलेले आहेत. हे विभाग आधुनिक शास्त्राच्या दृष्टीने अगदी चुकलेले आहेत. परंतु येथील विद्यार्थ्यांना ते मोठ्या सायासाने ध्यानात ठेवावे लागतात व पुढे जास्त माहिती झाल्या-वर विसरावे लागतात. हीच गोष्ट संस्कृतातील तर्कसंग्रहाची आहे. सुवर्णात अग्नि आणि मृत्तिका आहे, गाय गोत्वसामान्यवती आहे, द्रव्य गुणांचे अधिष्ठान आहे, वगैरे विचित्र सोंगे ह्या ग्रंथात आहेत. ही तोंडपाठ करून उपयोग कोणता? व ह्यांची तीनतीनदा परीक्षा देण्यात फायदा काय? 'ॲडव्हान्समेंट ऑफ लर्निंग' सारख्या जुनाट पुस्तकाच्या दुसऱ्या भागातील खुळसट माहिती तीनतीनदा परीक्षा देण्याकरिता सूक्ष्मपणे ध्यानात ठेवायला लावणे म्हणजे विद्यार्थ्यांना व्यर्थ शीण देणे आहे. एकच परीक्षा तीनतीन वेळा देण्याची ही अजब सरकारी पद्धति मला बिलकूल पसंत नव्हती. ह्याचकारिता सहा माही, प्रिलिमिनरी वगैरे परीक्षांस मी बसत नसे. अर्थात् दोनतीन वर्षे मला कोणत्याच परीक्षेला जाता आले नाही. शेवटी १८८७ च्या शेवटी मी कॉलेज सोडून गेलो. मग १८८८ त बाहेरचा विद्यार्थी म्हणून फर्स्ट बी. ए. च्या परीक्षेला सहामाही, प्रिलिमिनरी वगैरे परीक्षांची आडकाठी बिलकूल नसल्यामुळे, मी एकदम गेलो व पास

झालो. ह्या परीक्षेचा अभ्यास करण्यास मला वीस पंचवीस दिवस लागले. पुढे एक वर्षभर १८८९ साली मी भाव्यांच्या शाळेत वनस्पतिशास्त्र शिकवीत होतो. १८९० साली डेक्कन कॉलेजात राहावयाला गेलो. त्या वेळी प्रिंसिपॉल मि. सेल्बी होते. दुसऱ्या बी. ए. च्या परिक्षेकरता इतिहास हा ऐच्छिक विषय घेतला. हा विषय शिकविणारा त्यावेळी डेक्कन कॉलेजात कोणी शिक्षक नसल्यामुळे, वर्गांत जाण्याची मला जरूरच राहिली नाही. मि. सेल्बी मोठे कडक अंमलदार म्हणून प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांनी वर्गांत इतर विषयांनाहि हजर रहाण्याची सक्ति माझ्यावर बिल्कूल केली नाही. कारण इतिहास घेऊन परीक्षेला जाणारा विद्यार्थी कॉलेजात मी एकटाच होतो, व तो विषय शिकविणारा शिक्षक तेथें कोणीच नव्हता. निव्वळ कॉलेजातील खोलीचा, हवेचा व जवळील नदीचा उपयोग करून घेण्याकरिता मी ८० रुपये फी भरली. कॉलेजॉत राहून तंदुरुस्ती करावी, हा माझा तेथे राहण्यात उद्देश होता. १८८९ च्या डिसेंबरपासून १८९० च्या आक्टोबर पर्यंत मी तेथे यथेच्छ राहिलो; नंतर महिनाभर परीक्षेचा अभ्यास करण्या-करिता पुण्यापासून बारा कोसावर वडगांव म्हणून एक खेडे आहे तेथे गेलो; व तेथे परीक्षेची तयारी करून १८९० च्या (१८९१ च्या पाहिजे. मु. गो. दे.) जानेवारीत बी. ए. ची परीक्षा पास झालो. मॅट्रिक पासून बी. ए. पर्यंतच्या कोणत्याहि परीक्षेत मी कधी नापास झालो नाही. १८८४ साली प्रथम मी डेक्कन कॉलेजात गेलो. त्यावेळी दर दोनदोन महिन्यानी एकएक परीक्षा जर घेतली असती तर ह्या तिन्ही परीक्षा पहिल्या सहामाहीतच मी पास झालो असतो. परंतु सहा टर्मा, सहामाही व उपान्त्यपरीक्षा आणि मुंबईच्या फेऱ्या, अशा नाना प्रकारच्या खुळात सापडल्यामुळे, १८८४ पासून

१८९० पर्यंत मला व्यर्थ रखडत रहावे लागले. ह्या रखडण्यात इतके मात्र झाले की, माझ्या मनाला जे योग्य वाटले तेच मी केले आणि कॉलेजातील खुळसट शिस्तीला बळी न पडता आणि मन व मेंदू याना शैथिल्य व क्षीण न येऊ देता जगात जास्त उत्साहाने काम करण्यास मी सिद्ध झालो.

[ १७ ]

युनिव्हर्सिटीच्या परीक्षा मी कशा दिल्या ह्या संबंधी माहिती येथपर्यंत दिली. आता कॉलेजातील शिक्षकवर्गाविषयी माझे काय मत झाले होते व झाले आहे ते सांगतो. १८८४ पासून १८८७ पर्यंतच्या चार वर्षांत मि. आक्सनहॅम प्रिन्सिपॉल होते. ह्या गृहस्थाच्या अमदानीत कॉलेजच्या अंतर्व्यवस्थेत शिस्त फारशी व्यवस्थित नव्हती. वर्गात वाटल्यास हजर रहावे, वाटल्यास हजर राहू नये. डोक्याला टोपी घालावी, न घालावी किंवा नुसते उपरणे गुंडाळूनहि वर्गात जावे. कॉलेजातून दोनचार दिवस गैरहजर असले तरी देखील खपत असे. गावात नाटके बघण्यास व कॉलेजाजवळ तमाशा पहाण्यास सर्व प्रकारची मुभा असे. धर्माचा, समाजाचा, वडील माणसांचा किंवा गुरूंचा धाक म्हणून ज्याला म्हणतात तो काडीमात्र नव्हता. मनसोक्त वर्तन करावे, कॉलेजची फी द्यावी, प्रिलिमिनरीला बसावे व परीक्षेला जावे हा धंदा होता. १८८४ पासून १८८७ पर्यंतच्या चार सालात दरवर्षी दहावीस वेळा निरनिराळ्या शिक्षकांच्या वर्गास मी हजर होतो; तो पुस्तकातील विषय समजून घेण्याकरिताच केवळ नव्हे, तर शिक्षक शिकवतो कसा, हेहि पहाण्याकरिता. मि. बॅरेट्ला पी. ई. च्या वर्गात इंग्रजी कादंबरी शिकविताना मी पाहिले आहे. शब्दांचे अर्थ सांगण्याचे शाळापंतोजीचे काम हा गृहस्थ करीत असे. मि. आक्सनहॅमला नाटके व ॲडव्हान्समेंट

ऑफ लर्निंग ही पुस्तके शिकविताना दहापंधरा वेळा मी ऐकिले आहे. ह्या गृहस्थांनी तास सुरू झाल्यानंतर दहापंधरा मिनिटांनी यावे व दहापंधरा मिनिटे तास संपण्याच्या अगोदर जावे; पुस्तकाची पाने चाळीत चाळीत मध्येच दहापाच ओळी वाचाव्या; व थोडीशी थट्टामस्करी व टिवल्याबावल्या करून, मुलांना खूश करून सोडावे. मि. आक्सनहॅमच्या नाटकी हावभावाला व विनोदी स्वभावाला कित्येक मुले इतकी भाळून जात की, त्याच्यासारखा शिक्षक नाही असे त्यांचे आग्रहाचे म्हणणे असे. कविता नुसती वाचून दाखवून तीतील मर्म विद्यार्थ्यांच्या मनात बिंबवून द्यावे आक्सनहॅमने, असा स्तुतिवाद मी अनेकांच्या तोंडून ऐकिलेला आहे. परंतु या अजब सामर्थ्याचा अनुभव मला एकदासुद्धा आला नाही. नटाच्या अंगविक्षेपाने व उच्चनीच स्वराने जी करमणूक होते ती काहीशी ह्या शिक्षकाच्यापासून होत असे. बारेटप्रमाणे हेहि गृहस्थ शाळापंतोजीपैकीच होते. विद्यार्थ्यांची मनोरचना विवेचक व शास्त्रप्रवण करण्याकडे किंवा विविध माहितीने व बहुश्रुतपणाने संपन्न करण्याच्या कामी ह्या दोघांहि शिक्षकांचा फारसा उपयोग नव्हता. शिवाय, हेहि खरेच की, सरकारी नोकरीला उमेदवार जेथे तयार करावयाचे आहेत तेथे बहुश्रुतपणा, विवेकबुद्धि किंवा शास्त्रप्रवणता विद्यार्थ्यांच्या ठायी उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. गुलामांना स्वतंत्र नागरिकांचे शिक्षण कोठे बोलले आहे! ह्या दोघा शिक्षकांप्रमाणेच रा. करकरे ह्या गृहस्थांची व्यवस्था असे. हे १८७० सालाच्या सुमारास केंब्रिज युनिव्हर्सिटीत गणित विषयात सीनियर ऑप्टीम ( optime ) झाले व हिंदुस्थानात परत आले. मुंबईस आल्यावर ह्यांचा चोहोकडे जयजयकार झाला. हिंदुस्थानचा उदयकाल जवळ आला, म्हणून शेकडो लहानमोठ्या अँग्लोइंडियनांनी ह्यांचे अभिनंदन केले. एक ब्राह्मणाचे

सामान्य पोर केंब्रिजसारख्या विद्यालयात आप्टीम झाले, म्हणून एतद्देशीय वर्तमानपत्रांनी ह्यांच्या बुद्धिमत्तेचे व विशाल ग्राहकशक्तीचे पोवाडे गाइले. योग्य संधि व योग्य साधनें दिली असतां, ब्राह्मण काय करू शकेल, ह्या विषयावर यूरोपियनांना टोचून शेकडो लेख लिहिले गेले; आणि केरोपंत छत्र्यांसारखे मुरलेले गणितज्ञ गोविंद साहेबांना लवून सलाम करू लागले! सर्वांना अशी आशा सुटली कीं, थोड्याच अवधीत साहेबमहसूफ काही नवीन शोध करून किंवा अजब उपपत्ति काढून न्यूटन व लाप्लास ह्यांना खालीं पहावयाला लावणार. ह्या भावी ऐश्वर्यावर भिस्त ठेवून साहेबांना युनिव्हर्सिटींतील लहान मोठ्या परीक्षांचे परीक्षक नेमिले. अशी साहेबांची फारफार बडेजावत्या काली झाली. पण सारी मानमान्यता चटसारी जिरवून टाकून, लोकांच्या आशेला साहेबांनी बिलकूल अंकूर फुटूं दिला नाहीं. मि. करकरे कॉलेजातले आपले काम बरेच बिनबोभाट करीत असत. परंतु त्यांच्या शिकवणीचा फायदा घेऊन डेक्कन कॉलेजातून कोणी गाढा गणितज्ञ विद्यार्थी निपजला, असे कोठे अद्याप ऐकिवात नाही. प्रस्तुत लेखकाने बी. ए. करिता एक वर्ष गणित विषय घेतला होता. व साहेबांची पाचपंचवीस लेक्चरे ऐकली होती, परंतु त्या व्याख्यानापासून त्याचा काही फायदा झाल्याचा त्याला अनुभव नाही. मात्र जेजुरी नगरातल्या यक्षकिन्नराच्या तोंडातील कित्येक रागरागिण्यांचे हार्मोनिकल डिफरेन्शिएशन व इंटिग्रेशन गुंजारव पद्धतीने कसे करतात ह्याचे ज्ञान त्यास थोडेफार झाले!

८११६९ चरित्र

[१८]

वरील मंडळीहून निराळ्या तऱ्हेचे शिक्षक प्रो. भांडारकर व मि. सेल्बी होत. हौ, बूल्हर, कीलॅहॉर्न[२०], भाऊ[२१] दाजी ह्यांच्या बरोबरीने प्राचीन लेखसंशोधनांची ऐपत डॉक्टरांच्या अंगी असून, शिवाय ह्या चारी गृहस्थापेक्षा संस्कृत सारस्वतात व तर्क,

२०. कील हॉर्न : सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या अर्वाचीन चरित्र कोषांत डॉ. कीलहॉर्न यांजविषयी का. ना. दीक्षित यांनी जी सविस्तर माहिती दिलेली आहे ती पहावी. त्याच कोशांत आणखी एके ठिकाणी म्हणजे विनायक बळवंत चौकर यांच्याविषयी माहिती देतांना कीलहॉर्न यांजबद्दलचा उल्लेख आलेला आहे. विष्णुशास्त्री यांच्या चरित्रात त्यांच्या बंधूनी कीलहॉर्न यांच्या संस्कृतच्या बेतशीर ज्ञानाबद्दल लिहिले आहे. परंतु तस वाटण्याचे कारण कीलहॉर्न हे वर्गात शिकवितांना टिपणांच्या आधाराशिवाय शिकवित नसत व क्वचित् ही टिपणे हाताशी नसतील तर शिकविणे थांबवीत असत हे असावे. प्राध्यापकां-विषयीच्या व विद्वत्तेविषयीच्या आपल्या कल्पनांमध्ये मीमांसेसाठी किंवा आधारासाठी टिपणांचा व रेखिव माहितीचा उपयोग करणे या गोष्टीला जेवढे महत्त्व प्राप्त झाले पाहिजे तेवढे झालेले नाही, असाही कीलहॉर्नसंबंधीच्या असल्या अभिप्रायाचा अर्थ शक्य आहे.

डॉ. फ्रॅन्झ कीलहॉर्न (१८४०-१९०८) यांचा जन्म जर्मनीत झाला. १८६६ मध्ये पूना कॉलेजांत संस्कृतचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. इंडियन अँटिक्वेरीचे परिशिष्ट एपिग्राफिका इंडिका या त्रैमासिकाची हिंदुस्थान सरकारने सुरुवात केली ती त्यांच्याच संशोधन प्रयत्नांची महती ओळखून. त्यांच्याविषयीचा अभिप्राय देतांना दीक्षित लिहितात, "याच्या लेखवाचनात बिनचूकपणा, यांनी नमूद केलेल्या तारखांचा काटेकोरपणा व ऐतिहासिक निष्कर्षसाधनांतील पद्धतशीरपणा अद्याप आदर्श मानला जातो."

२१. भाऊ दाजी : शिलालेख व त्यावरील शकांचा उल्लेख यामुळे यांनी ठरविलेले कालनिर्णय अचूक ठरले. हे प्रख्यात संशोधक होते व रॉयल एशियाटिक सोसायटीचे पहिले हिंदी सभासद होते.

न्याय, व्याकरण, वेदान्तादि शास्त्रात ह्यांची गति विशेष आहे. मेरुशास्त्री गोडबोले किंवा राजारामशास्त्री बोडस किंवा बाळशास्त्री रानडे ह्यांच्यासारखी गाढी विद्वत्ता इकडील इंग्लिश विद्याविभूषित विद्याधरांच्या ठायी क्वचित आढळते. परंतु युरोपियन विद्येच्या संस्काराने एका प्रकारची चिकित्सक व विवेचक बुद्धि जी विकसत असते व जिच्या जोरावर थोड्या माहितीनेहि बरीच लिखाई इंग्रजीत करता येते, तिचे वास्तव्य डॉक्टरांच्या ठायी बरेच आहे. संस्कृत नाटक असो, तर्क असो, ऋग्वेदातील ऋचा असोत, किंवा शांकर-भाष्य असो, त्यांतील शब्दांची, स्वरांची, प्रमेयांची, वगैरे चिकित्सा विद्यार्थ्यांना दिग्दर्शनमात्राने करून दाखविण्याची हौस डॉक्टरांना असे; परतु एथून तेथून एकंदर सर्व शिक्षणीय ग्रंथांचे इंग्रजी भाषांतर बरोबर वठविण्यात तासातला अर्धा अधिक वेळ जात असल्यामुळे वरील हौस पुरविण्यास फारसा अवकाश रहात नसे. तशात नोकरीच्या उद्देशाने परीक्षेकरिता संस्कृत ग्रंथ इंग्रजीत शिकून टाकण्यापेक्षा इतर उदात्त हेतू कोणत्याहि विद्यार्थ्यांचा प्रायः नसल्याकारणाने डॉक्टरांच्या विचिकित्सक व्याख्यानांचा फारसा उपयोग होत नसे. डॉक्टर आज तीसपसतीस वर्षे शिक्षकाचा धंदा करीत आहेत, परंतु भाऊ दाजी किंवा राजेंद्रलाल मित्र[२२] त्यांच्या विद्यार्थ्यांमधून अद्याप एकहि निघाला नाही. वेळच्या वेळेस वर्गात हजर राहून, डॉक्टर आपले काम उत्कृष्ट करीत, आणि इंग्लिश शिक्षणपद्धतीच्या

---

२२ राजेंद्रलाल मित्र : १८२४ ते १८९१. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्राच्य विद्यापंडित व संशोधक. ग्रीक लोकांचेकडून भारतीयांनी दगड कोरण्याची कला प्राप्त करून घेतली, या जेम्स फर्ग्युसन यांच्या मताचे अनेकदां पुराव्यानिशी खंडन करून यांनी तेजस्वी संशोधनाची चुणूक दाखविली.

उदारत्वाचे गोडवे गात. आपण शिकविली ती मुले विद्याव्यासंगी व चिकित्सक निघाली नाहीत असा कटु आभिप्राय, डॉक्टर आठवड्यांतून पाचचार वेळातरी दिल्याशिवाय रहात नसत. परंतु ते ही गोष्ट लक्षात घेत नसत की, इंग्रज सरकारने शाळा व कॉलेजे जी काढिली आहेत ती वस्तुतः नोकर तयार करण्याकरिता काढिली आहेत. विद्याव्यासंगी शास्त्रज्ञ निपजविण्याकारिता काढिली नाहीत. नोकरीच्या व्यवसायात दिवसांतले दहा तास खर्चून, बाकी राहिलेल्या वेळांत प्राचीन लेख संशोधनाचे काम व्हावे कसे ? डॉक्टरांच्यासारखी तीन-चार तासांची नोकरी ज्यांना सुदैवाने मिळाली त्यांना ही गोष्ट शक्य आहे; परंतु अशा सर्व लोकांनी संशोधक व लेखक बनलेच पाहिजे हा आग्रह व्यर्थ होय. अशा कामाला पुरेशी विद्वत्ता असूनहि लेखकर्तृत्वाकडे पुष्कळांची प्रवृत्ति नसते. हा केवळ रुचिवैचित्र्याचा व स्वभावघटनेचा प्रकार आहे. त्याबद्दल कुरकुरण्यात हाशील कोणते ? मत्स्याहार केल्याने बुद्धीला जोम येतो, मांसाहाराने श्रमसहिष्णुता येते, वगैरे मते ब्राह्मण विद्यार्थ्यांपुढे कधी कधी डॉक्टर प्रतिपादीत असत. इतकेच नव्हे तर उदाहरणार्थ ते आपल्याचकडे पाहण्यास विद्यार्थ्यांना स्पष्टपणे सुचवीत असत. जातिभेद, बालविवाह वगैरे पद्धतीवरहि ताशेरा झडत असे. येणेप्रमाणे संस्कृत पुस्तकांचे इंग्लिश भाषांतर करण्याचे कंटाळवाणे काम स्वतःची सामाजिक, धार्मिक व व्यावहारिक मते सिद्धान्तवत् सांगून डॉक्टरसाहेब मनोरंजक करीत. जातिभेद वाईट आहे, वगैरे मते जरी ते प्रतिपादीत, तरी सर्व जातींच्या विद्यार्थ्यांवर त्यांची सारखीच कृपा असे. विद्यार्थ्यांना नोकरीकरिता शिफारसपत्रे किंवा सल्लामसलत देण्याला ते सदा तयार असत. सारांश, बहुत प्रकारे स्तुत्य व आदरणीय असे शिक्षक ह्या नात्याने त्यांचे वर्तन असे.

[ १९ ]

डॉक्टर भांडारकरांसारखेच नियमित व करारी असे डेक्कन कॉलेजातील दुसरे शिक्षक मि. सेल्बी होत. जोपर्यंत मि. आक्सनहॅम प्रिन्सिपॉल होते, तोपर्यंत कॉलेजातल्या अंतर्व्यवस्थेत त्यांनी बिल्कूल हात घातला नाही. कॉलेजात वेळच्या वेळी यावे व आपले काम आपल्या मतीप्रमाणे चोख करावे, असा ह्यांचा क्रम असे. बर्क, बेकन, तर्क, नीति आणि तत्त्वज्ञान हे विषय शिकविण्याचे काम ह्यांच्याकडे असे. पैकी बर्ककृत 'फ्रेंच राज्यक्रांती' वर व बेकनकृत 'विद्यावृद्धी' वर ह्यांनी टिपा छापलेल्या आहेत. मॉडर्स ट्रेझरी ऑफ बायॉग्रफी, इंग्लिशकोश वगैरे पुस्तके जो विद्यार्थी मन लावून चाळील त्याला ह्या टीपापेक्षा विपुल टिपा लिहून काढिता येतील. परंतु, ह्या टिपा छापून, विद्यार्थ्यांचे बरेच श्रम मि. सेल्बी ह्यांनी वांचविले आहेत. तर्क, नीति, आणि जुने किंवा नवे तत्त्वज्ञान ह्यांवरहि ह्यांच्या ठरीव टिपा व संक्षेप असतात; व त्यांचीच घोकं-पट्टी प्रायः सर्व परीक्षार्थी करितात. ह्यांनी प्लेटोवर एक लहानसे व्याख्यान व ॲरिस्टॉटलच्या तत्वज्ञानाचा संक्षेप इकडील विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता लिहिला आहे. असल्या ह्या छोटेखानी पुस्तकात जर्मन पंडितांचे विस्तृत वाचन, मार्मिक विवेचन, किंवा दीर्घ व्यासंग दिसून येण्यास बिलकूल वाव नसतो, हे खरे आहे; परंतु लेखावरून जर कोणाहि शिक्षकाच्या बुद्धीची परीक्षा करावयाची असेल, तर आपल्या विषयावरील नामांकित ग्रंथांची टीपात्मक संक्षिप्त टाचणे इकडील परीक्षार्थि विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी करण्याची हातोटी ह्यांना बरीच साधलली आहे, हे कोणीहि निःपक्षपाती मनुष्य कबूल करील. मुंबई इलाख्यातील माजी विद्याधिकारी सर अलेक्झांडर ग्रांट—जे पुढे एडिंबरो यूनिव्हर्सिटीचे अधिकारी झाले—त्यांचा ग्रीक तत्वज्ञांच्या

ग्रंथावर बराच व्यासंग असे, असे त्यांच्या एकदोन ग्रंथावरून दिसते. तितपत व्यासंग मि. सेल्बी यांचा अद्याप दिसून आलेला नाही; तथापि, इतर असल्याच कॉलेजातील शिक्षक आपापल्या विषयावरील ग्रंथासंबंधाने एक ओळहि छापून काढण्याचे धैर्य करीत नाहीत, त्यापेक्षा मि. सेल्बी ह्यांचा टाचणेच छापून काढण्याचा क्रम का होईना, बराच प्रशंसनीय आहे, ह्यात संशय नाही. विद्यार्थ्यांना परीक्षासिद्ध्यर्थ काय पाहिजे हे मि. सेल्बी चांगले जाणत व ह्याच धोरणाने ह्यांचे सर्व शिकवणे असे. हे प्राय: वर्गात उभे राहून व्याख्यान देत व एखाद्या चांगल्या अभ्यासी विद्यार्थ्याकडे दृष्टीचा नेम धरून क्यांटप्रमाणे व्याख्यान सुरू करीत. फार हळू व तोंडातल्या तोंडात जलद बोलल्या-मुळें, ह्यांचे बोलणे कधी कधी नवशिक्या विद्यार्थ्यांना बरोबर ऐकू येत नाही; व ह्याच ऐकू न येण्याला कित्येक इंग्लिश शिक्षक विद्यार्थ्यांना आपल्याबरोबर मजल मारता येत नाही असे म्हणतात. हे शिक्षक खणखणीत आवाजाने जर शिकवितील, तर ही तक्रार बहुतेक फोल होऊन जाईल. मि. सेल्बी रोजचे धडे घरी काळजीने पाहून येऊन, त्यांची संक्षिप्त टाचणे विद्यार्थ्यांना उतरून घेण्यास सांगत. आक्सनॅहमप्रमाणे विनोद करण्याची यांना संवय नसे. सर्व काम शांतपणे व गंभीरपणे उरकण्याचा यांचा परिपाठ असे. १८७७, १८७८ च्या सुमारास प्रथम डेक्कन कॉलेजांत जेव्हां हे आले, तेव्हा इकडील परिस्थिति माहीत नसल्यामुळे व नोकर लोक तयार करणाऱ्या कॉलेजात शिकवावयाला आपणाला आणिले आहे हे त्यांच्या लक्ष्यात न आल्यामुळे, स्वतंत्र मतांचे आविष्करण हे कधी कधी करीत असत. परंतु इकडे काही वर्षे राहिल्यावर, इकडील इंग्लिश शिक्षणपद्धतीचे खरे स्वरूप त्यांच्या नीट ध्यानात आले व वर्गात राजकीय विषयांवर मते प्रगट करण्याच्या कामात हे पूर्ण मौन

धरू लागले. स्वतंत्र विचार प्रकट न करण्याच्या दहावीस वर्षांच्या सवयींनंतर ते आता पक्के इंपिरियालिस्ट बनले असावे, असे वाटते. त्यांच्या अंमलाखाली कॉलेजात जी अलीकडे शिस्त सुरू झाली आहे तीवरून व परवा सिमल्यास एज्युकेशन कॉन्फरन्सला ते गेले होते त्यावरून, वरील अनुमानाला बळकटी येते. एकंदरीत मि. सेल्बी हे बऱ्यापैकी शिक्षक होते. विलायतेतील कोच परीक्षार्थी गृहस्थाला जी मदत करतो, तीच आपण येथे करितो, असे उद्गार हे कधी कधी काढीत. प्रोफेसर ह्या शब्दाचा इकडे अर्थ कोणता, ते वरील उद्गारांवरून सर्वांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे.

[ २० ]

डेक्कन कॉलेजात माझ्या वेळी जे शिक्षक होते त्यांपैकी कित्येकांसबंधी माझे विचार काय होते ते येथपर्यंत थोडक्यात सांगितले. आता कॉलेजात मी जी तीनचार वर्षे घालविली त्यात माझी दिनचर्या कशी असे ते लिहितो. नियमाने पहाटेस पाच वाजता मी उठत असे व तालमीत जाऊन दोन तास उत्तम मेहनत करीत असे. बैठक, जोर, जोडी, मलखांब व कुस्ती सुमारे दीडदोनहजार मेहनत रोजची होई, तो सात वाजत. नंतर शेरदीडशेर दूध पिऊन अर्धातास कॉलेजभोवतीच मैदानात व झाडाखाली सहल व विश्रांती घेई. आठपासून नऊ पर्यंतचा वेळ वर्तमानपत्रे वाचण्यात जाई. पुढे एकतास नदीवर पोहणे होत असे. परत येऊन भोजन आटोपून खोलीकडे जो यावे, तो नेमके साडेअकरा वाजत. नंतर अर्धातास समानशील अशा दोन-चार सद्गृहस्थांच्या समागमात धूम्रपान आटोपून, कॉलेजातील पुस्तकालयांतून आणलेले एखादे पुस्तक हिंडून, फिरून निजून व बसून मी चांगले वाचून मनन करीत

असे. वर्गातील शिक्षकांच्या व्याख्यानांना मी प्रायः कधी जात नसे, हे मागे सांगितलेच आहे. इतर परीक्षार्थी विद्यार्थी जे चार तास वर्गात घालवीत, ते मी स्वतंत्र पुस्तके वाचण्यात घालवी. वाचण्याचे काम चारसाडेचारला बंद होई. मग, शादिलबोवाजवळील होडी-खान्यात एकांड्या होडग्यात सात वाजेतो नदीवर पाचसात मैलांचे वल्हवणे करी. तेथून परत येऊन संध्या भोजन जो आटोपावे तो साडेआठ वाजत. नंतर दहा साडेदहा वाजे तो अनेक स्वभावाच्या विद्यार्थ्यांशी सामाजिक, राजकीय, धार्मिक व पाठशालीन विषयावर पाचपन्नास विड्या खलास होई तोपर्यंत नाना प्रकारच्या गप्पा चालत. साडेदहापासून पहाटेच्या पांचपर्यंत [२३] खोलीतील दोन टेबला-वर घोंगडी पसरून तीवर ताठ उताणे निजले म्हणजे मला गाढ झोप येई. मेहनतीने अंग इतके कठीण होऊन जाई की मऊ बिछान्यावर मला कधी झोपच येत नसे. १८८४ पासून १८९० पर्यंतच्या सात वर्षांत मी एकहि दिवस कधी आजारी पडलो नव्हतो. कळपात दोनही वेळ जी कळपी मंडळी जमे, तीत आहार्य विषयासंबधाने बोलणे यथास्थित होत असे आणि विद्यार्थिसमाजातील व्यक्तिविषयक दुर्गुणांची व व्यंगांची टीका पायखान्यातील भिंतीवरील सचित्र 'इन्फरनल ग्याझेटा'त होत असे.

---

२३. डेक्कन कॉलेजातील खोल्या कशा होत्या, आंत फर्निचर काय होते वगैरे बद्दलची माहिती डेक्कन कॉलेज क्वॉर्टर्लीच्या एका अंकात आहे. त्यात म्हटले आहे कीं तेव्हा कॉटस् नव्हत्या. प्रत्येकाला दोन टेबले होती. त्यावर हे प्रौढ विद्यार्थी झोपत. घुबडाचा घूत्कार शेजारच्या टॉवरमधील पोकळीतून होत असे. कित्येक विद्यार्थी घुबडे पकडत वा त्यांची अंडी खात. त्यापैकींच राजवाडे एक होते, गर्दी झाली म्हणजे या टॉवरच्या खोलीत विद्यार्थी जात असत.

[ २१ ]

जोपर्यंत मी कॉलेजात होतो, तोपर्यंत माझी दिनचर्या ही अशी होती. परीक्षेकडे माझे बिल्कूल लक्ष नसे व वर्गांत मी सालातून पाच-पंचवीस वेळापेक्षा जास्त कधी गेलो नाही. त्यामुळे शिक्षकवर्गाशी माझी बिल्कूल ओळख झाली नाही. बहुतेक विद्यार्थी परीक्षार्थी पडल्यामुळे उठल्यापासून निजेपर्यंत त्यांचा बराच वेळ परीक्षणीय पुस्तकांच्या अभ्यासात जाई. त्यांचा मुख्य उद्देश स्कॉलरशिपा, बक्षिसे, फेलोशिपा, परीक्षा व नोकरी मिळविण्याचा असल्यामुळे त्यांच्याशीहि विशेष स्नेह करण्याला फारसे कधी कारणच उद्भवलें नाही. १८८० पासून १८९० पर्यंतच्या जुन्या व नव्या सर्व विद्यार्थ्यांशी माझी ओळख असे. परंतु, कॉलेजात असतांना दृढ स्नेह[२४] अमुक एका गृहस्थाशी झाला असे मला वाटत नाही. पुढे मात्र ह्याच विद्यार्थीमंडळातून जे कोणी दहापाच लोक समव्यवसायी निघाले त्यांच्याशी दृढतर स्नेहाने मी बद्ध झालो. शिक्षकांशी व परीक्षार्थ्यांशी माझा फारसा स्नेह झाला नाही ह्याचे मुख्य कारण हेतूंची

---

२४ कॉलेजांतील स्नेही : राजवाड्यांनी या निबंधात आपला कोणाशीहि दृढ स्नेह, तेव्हा झाला नाही असे म्हटले आहे, त्याचे थोडेसे आश्चर्य वाटते. कदाचित् आपल्या स्नेह्यांची नावे कळू न देण्याचा हा अति जागृतपणाचा एक नमुना असेल. श्री. भट यांनी या संबंधात जी नावे दिली आहेत ती अशी : श्री. विजापूरकर हे त्यांचे एक सहाध्यायी असून ते व विसूभाऊ एकत्र रहात होते. रावजी बाळकृष्ण भिडे, देवभानकर, कै. भास्कर विष्णु जोशी हे त्या वेळी डेक्कन कॉलेजांत होते. राजश्री भिडे यांचा व राजवाड्यांचा स्नेह जडला होता. इतिहास संशोधनाच्या कार्यास राजवाड्यांनी प्रारंभ केला तेव्हा भिड्यानी राजवाड्यांस कांही आर्थिक मदतही केली होती. हरि नारायण आपटे डेक्कन कॉलेजांत राजवाड्यांचे वेळी केव्हातरी होते. शिवराम महादेव परांजपेहि होते.

भिन्नता हे होय. शिक्षकांचा हेतु मुलें परीक्षेकरिता तयार करण्याचा; मुलांचा हेतु परीक्षा देऊन नोकरी मिळविण्याचा; आणि माझा हेतु[२५] केवळ विद्यार्जन करून पूर्णपणे स्वतंत्र धंदा करण्याचा. केवळ विद्यार्जन करण्याचा हेतु बाळगणारा मी, नोकर तयार करण्याच्या गिरणीत जाऊन पडलो. अर्थात् माझ्या मनातल्या हेतूला पुष्टीकरण देणारा स्नेही शिक्षकवर्गात किंवा परीक्षार्थी वर्गात कोणी मिळाला नाही. तेव्हा वाटेल त्या दिशेने जाण्यास व वागण्यास माझा मी एकटाच राहिलो. नोकर तयार करण्याच्या कॉलेजात जाऊन ज्याच्या जोरावर नोकऱ्या मिळतात त्या परीक्षांकडे दुर्लक्ष्य मी कां केले व त्या परीक्षाकरितां नेमलेल्या पुस्तकाकडे होईल तितका थोडा वेळ कां दिला, ह्याचे मुख्य कारण तत्कालीन मोठमोठ्या यूरोपियन व एतद्देशीय पुढाऱ्यांचे विचार होत. युनिव्हर्सिटीचे चॅन्सेलरादि मंडळी वार्षिक पदवीदानसमारंभाच्या वेळी विद्या करून नोकरी मिळविणे हा मोक्ष नव्हे, पुस्तके घोकून केवळ परीक्षा पास होण्यात मोठासा पुरुषार्थ नाही, विद्या केवळ ज्ञानार्जनाकरिता शिकावयाची, वगैरे सिद्धांत वारंवार बोलून दाखवी. त्याचा परिणाम माझ्या मनावर अतोनात झाला. हे सिद्धान्त त्यावेळी पुण्यांत जी दरवर्षी पांचपन्नास व्याख्याने होत त्यातहि वारंवार प्रतिपादिले जात. शिवाय, सरकारी नोकरी म्हणजे केवळ गुलामगिरी आहे, असे आपल्या निबंधात विष्णुशास्त्र्याने वारंवार म्हटलेले होते व म्हटल्याप्रमाणे तिला लाथहि मारलेली होती. तेव्हा सरकारी नोकरी म्हणून करावयाची नाही असा

---

२५. आपला हेतु स्पष्टपणे येथे राजवाड्यांनी मांडला आहे. परंतु पुढील आयुष्यक्रमांत आपण संशोधन-क्षेत्रास वाहून घेणार असे त्यांनी ठरविले असल्याचे त्यांच्या धरसोडीच्या क्रमावरून व निरनिराळ्या विषयांची त्यांनी निवड केली होती त्यावरून दिसून येत नाही.

दृढतर ग्रह माझ्या मनाचा झाला; आणि नोकऱ्या ज्याच्या जोरावर मिळतात, त्या परीक्षांकडे व तत्साधनार्थ लागणाऱ्या पुस्तकाकडे दुर्लक्षपूर्वक फारच थोडा वेळ मी खर्चिला. खरे म्हटले असता, ज्ञानार्जनामध्ये ज्यांचे सर्व आयुष्य गेले, विद्येची मर्यादा वाढविण्यात ज्यांनी तपेच्या तपे घालविली व सर्व शास्त्रात अपूर्व शोध करून मानवजातीला ज्यांनी अक्षय ऋणी करून ठेविले, अशा गुरुवर्यांनी चालविलेली एखादी पाठशाळा त्या वेळी असावयाला पाहिजे होती. म्हणजे तेथे दहावीस वर्षे राहून वरील सिद्धान्ताच्या अनुरोधाने विद्यार्जनाची माझी हौस, अधिकारी गुरूंच्या देखरेखीखाली मी पुरवून घेतली असती. परंतु दुर्दैव असे की, अशी पाठशाळा व असे गुरु त्या वेळी मला मिळाले नाहीत. ह्याचा परिणाम असा झाला की, नोकर तयार करणाऱ्या डेक्कन कॉलेजाबद्दल, व त्यांतील शिक्षकांबद्दल माझ्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाला. बारा आणि बारा चोवीस वर्षे शिक्षण द्यावयाचे नोकरीचे, आणि युनिव्हर्सिटीच्या पदवीदानसमारंभाच्या वेळी परीक्षा पास झालेल्या सेवार्थी उमेदवारांना उपदेश करावयाचा स्वतंत्र धंदा करण्याचा किंवा सरस्वतीच्या एकान्त उपासनेचा, ह्या मानभावीपणाचा मला बहुत तिटकारा आला. वाजवीच आहे की, ह्या भाडोत्री शिक्षकांच्या गुलामगिरीच्या नोकऱ्यांच्या व कंटाळवाण्या परीक्ष्यांच्यापासून मी पराङ्मुख झालो व पुस्तकालयांतील ग्रंथांकडे एकदिलाने वळलो. १८८४ पासून १८९० पर्यंतच्या सात वर्षांत व पूर्वीच्या दोन वर्षांत यूरोपियन इतिहास, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र व मानसशास्त्र ह्यावरील प्राचीन व अर्वाचीन अस्सल व भाषान्तरित, बरेच ग्रंथ मी मननपूर्वक वाचले. शिवाय वनस्पतिशास्त्र व फारशी भाषा कामापुरती मी शिकलो. कोशाच्या व व्याकरणाच्या साहाय्याने एखादा

फ्रेंच ग्रंथहि मी वाचीत असे. प्लेटोचे सुराज्य (रिपब्लिक) ह्याच वेळी मी सबंद मराठीत उतरले व १८९५ साली ते अंशतः भाषान्तर नामक मासिक पुस्तकातून प्रसिद्ध केले. हिंदुस्थानचा व महाराष्ट्राचा इतिहास मॅट्रिकच्या वेळी जेवढा मी शिकलो होतो तेवढा बी. ए. च्या वेळी मला बस झाला. परीक्षकांना व शिक्षकांना तर तो येतच नव्हता आणि मला यद्यपि येत असता तरी त्याचा काही उपयोग नव्हता. हिंदुस्थानाच्या व विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहासावर इंग्लिश लेखकांनी जी पुस्तके लिहिली आहेत त्यापैकी पुष्कळ या वेळी माझ्या पहाण्यांत आली, आणि ह्या देशाचा इतिहास लिहिण्यास हे लोक किती नालायक आहेत, हे युरोपियन इतिहासकारांशी तुलना करता, माझ्या पूर्णपणे लक्षांत आले. मराठ्यांची बखर लिहिणारा ग्रांट डफ शेकडो नाही हजारो ठिकाणी कसा चुकला आहे, हे 'मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या' माझ्या प्रस्तावनांत मी यथास्थित सिद्ध केले आहे. ही सिद्धि करण्याची कल्पना प्रथम १८८६ च्या सुमारास माझ्या मनात आली.[२६] रा. रा. साने यांचा काव्येतिहाससंग्रह बारीक रीतीने वाचीत असता ग्रँट डफच्या बखरीशी तो ताडून पहाण्याचा प्रसंग आला आणि डफचा कमकुवतपणा नजरेस आला. खरे म्हटले असता, रा. नीळकंठराव कीर्तने किंवा रा. साने, किंवा त्या दोघांपेक्षा रा. गणेश व्यंकटेश जोशी, अशांसारखा एखादा महाराष्ट्रेतिहास पारंगत गृहस्थ डेक्कन कॉलेजात इतिहास व अर्थशास्त्र शिकवावयास त्या वेळी पाहिजे होता. परंतु असल्या महाराष्ट्रेतिहासज्ञांची स्थापना खालच्या प्रतीच्या इंग्रजी शाळांतील पाचव्या सातव्या इयत्तातील पोरांना इंग्रजी शब्द शिकविण्याच्या वर्गावर सरकार करते; आणि नोकर

---

२६. इतिहाससंशोधनाकडे आपले लक्ष्य कसे वळले हे राजवाड्यांनी या ठिकाणी नमूद केले आहे म्हणून या निबंधाला खास महत्त्व आहे.

तयार करणाऱ्या कॉलेजात हिंदुस्थानचा व मराठ्यांचा इतिहास शिकविण्यास इंग्लंडातील एखादा ग्रॅजुएट आणते !!! ह्या ग्रॅजुएटांची योग्यता किती असते म्हणाल तर मराठ्यांचा इतिहास शिकविण्यापेक्षा शिकण्याचीच आवश्यकता ह्यांना विशेष असते. असल्या शिक्षका-संबंधाने तिरस्कार उत्पन्न न व्हावा तर काय व्हावे ?

[२२]

डेक्कन कॉलेजात असतांना सरकारी शिक्षणपद्धतीचा व शिक्षकांचा परिणाम माझ्यावरती इतर विद्यार्थ्यांपेक्षा निराळा झाला. का कीं, ह्या शिक्षणपद्धतीचा मुख्य हेतु जो नोकरी-करिता परीक्षा देणें तो मी बहुतेक अजीबात झुगारून दिला आणि शिक्षकांच्या शिकवण्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळें ह्या शिक्षणपद्धतीने जे एका प्रकारचे मानसिक दौर्बल्य येते व कर्तृत्व-शक्तीचा जो ऱ्हास होतो तो माझ्या ठायी फारसा झाला नाही. परंतु एका दुष्ट खोडीने मात्र मला अतोनात ग्रासिलें. ती खोड म्हणजे दुसरी तिसरी काही नाही— इंग्रजी बोलण्याची व इंग्रजीत विचार करण्याची. बाराव्या वर्षापासून सत्ताविसाव्या वर्षापर्यंतच्या पंधरा-वर्षांत वाचणे, लिहिणे, विचार करणे, वगैरे सर्व मानसिक क्रिया मी इंग्रजीत करू लागलो. शाळेंत व कॉलेजांत प्राचीन व अर्वाचीन मराठी ग्रंथाशीं शिक्षकांनी व परीक्षांनी माझी क्षणभरहि ओळख करू दिली नाही. त्यामुळे स्वभाषेत कांही प्रासादिक व नामांकित ग्रंथच नाहीत, असे इतर परीक्षार्थ्यांप्रमाणे माझेहि मत व्हायला कोणतीच हरकत नव्हती. तशात कुंटे, रानडे वगैरे विद्वान लोकहि मोठमोठी व्याख्याने इंग्रजीत झोडीत. कॉलेजात तर बहुतेक सर्व विद्यार्थी इंग्रजींत बोलत. अशा स्थितीत मीहि बहुतेक सर्व व्यवहार इंग्रजीतच करू लागलो. बंधूंना व मित्रांना पत्रे लिहावयाची ती

इंग्रजीत, आचाऱ्याशी व गड्यामाणसाशी बोलावयाचे तेहि मराठी मिश्रित इंग्रजीत; डिबेटिंग सोसायटीत मोठमोठी अद्वातद्वा व्याख्याने द्यावयाची ती इंग्रजीत: देशी कपडे वापरणारी मंडळी कॉलेजात काढिली तिचे सर्व काम इंग्रजीत; व्यायामाचे सर्व प्रकार करावयाचे ते इंग्रजीत; सारांश. सतत पंधरा वर्षे बारा आणि बारा चोवीस तास सर्व कामे मी इंग्रजीत करू लागलो. ह्या एवढ्या अवधीत मी मराठी बहुतेक विसरूनच जावयाचा, परंतु दोघा तिघा गृहस्थांनी मला ह्या विपत्तीपासून वांचविले. विष्णुशास्त्री चिपळोणकराच्या टीकात्मक निबंधांनी इंग्रजीच्या ह्या खग्रासापासून माझा बचाव केला; काव्येतिहास संग्रहकारांच्या ऐतिहासिक पत्रांनी स्वदेश म्हणून काही आहे हे मला कळले; व परशुरामपंत तात्या गोडबोले ह्यांनी छापिलेल्या काव्यांनी महाराष्ट्र सारस्वतांचा मला अभिमान वाटूं लागला. हे तीन ग्रंथ जर माझ्या दृष्टीस न पडते, तर आज मी कुंट्यांच्यासारखी इंग्रजीत व्याख्याने देण्यास, सुरेंद्रनाथा-प्रमाणे बूटपाटलोण घालून देशाभिमानाची पत्रे काढण्यास, किंवा सुधारकाप्रमाणे बायकांना झगे नेसवण्याच्या ईर्ष्येस खचित लागलो असतो. सुदैवाने ह्या देशाभिमान्यांच्या प्रयत्नाने माझी अशी विपत्ति झाली नाही. नाहीतर, असले काही चमत्कार माझ्या हातून निःसंशय घडते! दारु पिणारे, मांस खाणारे, बूटपाटलोण घालणारे, स्वदेशाला, स्वभाषेला व स्वधर्माला तुच्छ मानणारे गावठी साहेब त्या वेळी कॉलेजांतल्या परीक्षार्थ्यांत अगदीच नव्हते असे नाही. परंतु त्यांचा संसर्ग उपरिनिर्दिष्ट ग्रंथकारांच्या ग्रंथांतील मतलबाने मला घडला नाही. विद्यार्थी धर्मलंड होतो की, दुराचारी होतो, इकडे कॉलेजांतील शिक्षकांचे मुळीच लक्ष नसे. कॉलेजांतील यूरोपीयन शिक्षकांच्या मते माफक दारू पिणे, बूट-पाटलोण घालणे, स्वधर्माप्रमाणे न चालणे,

स्वभाषा विसरणे, ही काही पापे गणिली जात नसत. तेव्हा ते ह्या गोष्टीत लक्ष घालीत नसत हे स्वाभाविकच होते. गुरूंचा धाक नाही, पुढाऱ्यांचा किता नाही, धर्माचा प्रतिबंध नाही, अशा स्थितीत मी पंधरा वर्षे काढिली. तीतून मी बराच सुरक्षित पार पडलो, त्याचे श्रेय वरील तीन ग्रंथकारांकडे आहे.

[ २३ ]

१८८४ पासून १८९० पर्यंत डेक्कन कॉलेजात मी काळ कोणत्या प्रकारे घालविला, त्याचे वर्णन वर केल्याप्रमाणे आहे. १८९० त जेव्हां मी कॉलेज सोडले, तेव्हा त्या कॉलेजाविषयी माझ्या मनांत प्रेमबुद्धि बिल्कूल राहिली नाही. एकाहि शिक्षकाने मला तेथे काहीच शिकविले नसल्यामुळे, त्या शिक्षकाबद्दल किंवा त्या शिक्षणपद्धती-बद्दलहि मला फारसा प्रेमभाव उत्पन्न झाला नाही. तसेच १८९० च्या शेवटी मी बी. ए. ची परीक्षा पास झालो, त्या वेळीहि मोठा काही अभिमान उत्पन्न झाला नाही. एक क्षुद्र परीक्षा सहजासहजी पास झाली असे मला वाटले. नोकरीकरिता मी परीक्षा दिली नव्हती व तिच्या हवाल्यावर मला कोठे भिकार अर्जहि करावयाचे नव्हते. तेव्हा द्रव्य दृष्टीनेहि मला ह्या पदवीचे काडीमात्र कौतुक वाटले नाही. सारांश द्रव्याच्या, विद्येच्या किंवा गुरुशिष्य संबंधाच्या नात्याने, ह्या कॉलेजा-विषयी माझ्या मनांत आदरबुद्धि किंवा प्रेमबुद्धि लवमात्रहि जागृत झाली नाही, उलट एक प्रकारची तिरस्कार बुद्धि मात्र प्रकट झाली. शिवाय ज्या स्थळावर डेक्कन कॉलेज बांधलेले आहे त्या स्थळाचे माहात्म्यच असे आहे की, त्या स्थळी येणाऱ्या प्रत्येक मराठ्याला एक प्रकारचे औदासिन्यच प्राप्त व्हावे! १८१७ त मराठ्यांचे राज्य जाण्याच्या सुमारास खडकीची जी लढाई झाली म्हणून म्हणतात ती ह्याचस्थळी झाली. होळकराचा पूल, खंडोबाचा माळ व पलीकडील टेकाड, ही

ह्या बाप्यांची संख्या बरीच वाढली म्हणजे त्यापैकी काही सरकारी नोकरीची इच्छा सहजासहजी करतील. अशा लोकांच्या उपयोगी मिशनरीच्या ह्या शाळा व पाठशाळा पडतील असा अदमास आहे. परीक्षा देऊन मामलतदार, मुन्सफ, अव्वल कारकून, हेडक्लार्क वगैरे नोकऱ्या मिळविणाऱ्या पांढरपेशा उमेदवारांशी ख्रिस्ती बाप्यांचा सामना होण्याची वेळ जवळ येत चालली आहे. ह्या नोकरीच्या सामन्यात बाप्यांना जय येण्याचा संभव विशेष आहे.

[ २५ ]

मिशनऱ्यांशिवाय इतर परदेशस्थ लोकांची महाराष्ट्रात एकहि शिक्षणसंस्था नाही. महाराष्ट्राबाहेर काशीस मिसेस ॲनी बिझांट ह्या बाईने अलीकडे एक शाळा व पाठशाळा स्थापिली आहे. महाराष्ट्रात ब्राह्मणांची वस्ती काशीस बरीच आहे व त्यांची मुले ह्या बाईच्या शाळेत जाण्याचा संभवहि आहे. तेव्हा ह्या पाठशाळेचा उपयोग काय ह्याचा विचार करणे जरूर आहे. बिझांटबाईच्या पाठशाळेत सरकारी शिक्षणपद्धतिच चालू आहे; तेव्हा नोकर तयार करण्याचेच काम ती पाठशाळा करील हें उघड आहे. ह्या पाठशाळेत हिंदुधर्माचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे असे म्हणतात. परंतु सदर पाठशाळेत चालणारी हिंदुधर्माची पुस्तके बहुत ठिकाणी चुकली असून हिंदुधर्माचे रहस्य त्या पुस्तकात नाही, असे ती पुस्तके वाचून माझे मत झाले आहे. नोकर तयार करण्याची सरकारी शिक्षणपद्धति व हिंदुधर्म शिकविण्याची चुकलेली पुस्तके, खरा हिंदुधर्म ज्यांना माहीत नाही असे सरकारी नोकर तयार करतील; ह्याहून जास्त काही करतील, असे दिसत नाही. सारांश, बिझांटबाईच्या पाठशाळेपासून काही देशकार्य होईल

असे म्हणण्यास मन धजत नाही. बिझांट बाईसारख्या[२९] रोज नवा धर्म स्वीकारणाऱ्या बाईने हिंदुधर्म शिकविण्याचा आव घालावा ह्यासारखे आश्चर्य कोणतेच नाही; आणि तिच्या शिकविण्यापासून काही देशकार्य होईल, असे समजणाऱ्या वर्तमानपत्रकारांच्या शहाणपणासारखे आचरट खूळहि कोठे पहावयास मिळणार नाही.

[ २६ ]

कनिष्ठ मध्यम व उत्तम शिक्षणपद्धति ज्या आपल्या देशात आज साठसत्तर वर्षे चालू आहेत, त्यांचा अनुभव मला कसा कसा आला, त्याची हकीकत वर वर्णिल्याप्रमाणे आहे. ह्या तीनहि प्रकारच्या

---

२९. डॉ. ॲनी बेझंट हिंदुस्थानांत दुसऱ्यांदा आल्या तेव्हां १८९८ च्या जुलैमध्यें बनारस येथें सेंट्ल हिंदु कॉलेजची त्यांनी स्थापना केली. या कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल आर्थर रिचर्डसन. हे कॉलेज अलाहाबाद युनिव्हार्सिटीला जोडलेलें होते. या कॉलेजला जोडूनच एक हायस्कूल चालविले होते. फक्त ब्रह्मचारी विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाईल अशी कडक अट घालण्यात आली होती. भगवानदास, उपेन्द्रनाथ बसू, ज्ञानेंद्रनाथ चक्रवर्ति, पंडित चेदा लाल, बर्ट्रम केटली, आर्थर रिचर्डसन, मिस् लिलियन एडगर व मिस् पामर या मंडळींचे डॉ. बेझंट यांना या कामी साह्य झाले. शाळेचे पहिले मुख्याध्यापक हॅरी बॅनबेरी हे होते. १९०३ सालीं अरुंडेल प्रथम बनारसला आले. प्राध्यापक, हेडमास्तर, व्हाइसप्रिन्सिपॉल म्हणून त्यांनीं तेथे काम केले. टिळकांनी या कॉलेजबद्दल स्तुतिपर उद्गार काढले आहेत.

पुढें बनारस हिंदु युनिव्हार्सिटीची स्थापना झाल्यावर हे कॉलेज त्या विद्यापीठाचें घटक कॉलेज झाले. डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यंगार यांनीं जें बेझंटबाईचें चरित्र लिहिलें आहे. ( पब्लिकेशन्स विभाग, भारत सरकार ) त्यांत विद्यापीठाची स्वतः बेझंट बाईची जी उदात्त कल्पना होती, ती थोडक्यात चांगली विशद केलेली आहे.

शिक्षणाचा मुख्य हेतु सरकारी नोकरीला लायक इसम तयार करण्याचा आहे. ह्या शिक्षण पद्धतीपासून स्वतंत्र विचाराचा मनुष्य निर्माण होणे अत्यंत कठीण आहे; आणि स्वतंत्र आचाराचा निघणे तर मुळीच अशक्य आहे. स्वदेशाचा इतिहास व स्वदेशाची राजनीति, स्वदेशाचे धर्मशास्त्र व स्वदेशाचे नीतिशास्त्र, स्वदेशाचे अर्थशास्त्र[३०] व स्वदेशाचे समाजशास्त्र निर्माण करून स्वदेशातील देशभक्त गुरुवर्य जेव्हा स्वतंत्र विद्यालये एका कवडी करताहि सरकारचा मिंधेपणा न पत्करता काढतील, तेव्हा विचाराने व आचाराने स्वतंत्र असे देशहितकर्ते शिष्य खचित निर्माण होतील. तोपर्यंत सरकारी शिक्षणपद्धतीने पोटाला चिमटा घेऊन शिकवण्याचा धंदा कोणी करो; किंवा त्या पद्धतीला धर्मशिक्षणाची जोड देण्याचीहि शक्कल कोणी काढो; त्यापासून काहीएक फायदा होणे नाही.

♠ ♠ ♠

---

३०. स्वदेशाचे अर्थशास्त्र : डॉ केतकर यांनी ज्ञानकोश मंडळाचा इतिहास लिहिला आहे. त्याच्या परिशिष्टांत धनंजयराव गाडगीळ यांचा टीकात्मक लेख दिला असून स्वदेशाचे म्हणून काही वेगळे अर्थशास्त्र असत नाही अशी त्यांची त्यातील भूमिका आहे. ते म्हणतात, ‘कोणत्याहि बाजूने विचार केला असता स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र उत्पन्न करण्याची जरूरी बिलकूल नाही. इतकेच नव्हे तर अशा प्रकारच्या संज्ञेनेच फार चुकीच्या समजुती पसरण्याचा संभव आहे... हिंदी अर्थशास्त्र स्वतंत्र तयार करून आमच्या आर्थिक रचनेत काहीं विशेष आहे असा समज उत्पन्न करणेहि योग्य नाही. व्यावहारिक दृष्टीने अर्थशास्त्राचा विचार करणे बरोबर आहे. पण यास हिंदी अर्थशास्त्र असे स्वतंत्र शास्त्र निर्माण करण्याची जरूरी नाही.’

मंगेश जिवाजी तेलंग यांची या निबंधावरील टीका.

# वि. का. राजवाडे

यांचे

# स्वानुभवपुराण

अनुक्रम ४१२६८ ... चरित्र
क्रमांक १३९१ ... २६/३/६०

मंगेश शिवाजी तेलंग यांची या निबंधावरील टीका

# वि. का. राजवाडे यांचे स्वानुभवपुराण

विद्येला अमृताची उपमा दिलेली आहे. पण या अमृताचे अंगी एक मोठा दोष आहे. तो हा कीं, या अमृताचे पान भरपूर झाले, तरच ते आपला गुण दाखविते. परंतु त्याच्या तुटपुंज्या पानाने गुण न होता उलट अपाय होतो. हे अमृत पचण्यास फार कठीण आहे. आणि ते पचविण्याची अंगात मुळची किंवा संपादित शक्ति नसेल तर त्याचा अंमल विषाप्रमाणे होतो. आणि मग तो अल्प-विद्य अगर अपक्वविद्य मनुष्य त्या विषाचे संचारामुळे अगदी तुफान होऊन जातो. त्याची स्वभावतः तीव्र बुद्धि चंचल होते, त्याची तीक्ष्ण दृष्टि मंदावते, त्याचा सारासार विचार फिका पडतो, त्याचा सभ्यपणा अस्तावतो, तो एकदा बरळू लागला म्हणजे मग त्यास भान कसले ते राहात नाही, त्याचे डोळे गरगर फिरूं लागतात, त्याच्या नाकपुड्या विस्तृत होतात, तोंडावाटे फेस बाहेर पडू लागतो. सारांश, अप-माराने पछाडलेल्या एखाद्या असहाय्य दुर्दैवी प्राण्याप्रमाणें

त्याची स्थिति फार केविलवाणी होते. आपली लायकी काय, आपण बोलतो काय, ते लोकांस कितपत रुचेल व पचेल, लोक आपणांस काय म्हणतील, वगैरे व्यावहारिक प्रश्न बिचाऱ्याचे मनास शिवतही नाहीत. त्याची चुकी त्याच्या नजरेस आणण्याची खटपट व्यर्थ होते. जो जो त्यास ताळ्यावर आणण्याची खटपट करावी तो तो त्याचा मनःसंताप वृद्धिंगत होऊन पूर्वीपेक्षा त्याची प्रकृति विशेष नाजूक व निर्जीव होते. असे जरी आहे, तथापि या विक्षिप्त व्यक्तीस वेळीच आळा घालणे हे प्रत्येक समाजहितेच्छूचे काम आहे. अशा बिनजबाबदार माथेफिरूचा तिरस्कार करून त्यास आपला क्रम अबाधित चालवू देणे मोठे पातक होय. समाजाचे स्वास्थ्यासाठी व बिचाऱ्या या 'ज्ञानलवदुर्विदग्ध' हतभागी प्राण्याचे स्वतःचे बऱ्यासाठी, विद्यादेवीच्या साम्राज्यातील 'वेड्याचे इस्पितळात' त्याची रवानगी केलीच पाहिजे.

अलीकडे आम्हामध्ये अशा व्यक्ती बऱ्याच चमकू लागल्या आहेत. त्यांची कागदी मते व त्यांचे प्रत्यक्ष वर्तन यांचा केव्हाही मेळ नसतो. मायदेश, मायभाषा, सनातन धर्म वगैरे घोटीव व गोंडस नावांची यांचे लेखात व भाषणांत रेलचेल आढळून येते. हे स्वतःस राष्ट्राभिमानी, देशाभिमानी म्हणवतात. पण राष्ट्रत्वास विरजण पाडणारे जातिमत्सर, परोत्कर्षाची असहिष्णुता वगैरे आत्मघातकी दुर्गुण यांचे अन्तःकरणात स्वैर नांदत असतात, व त्यांच्या उच्चाराचे व आचाराचे द्वारे हमेश बाहेर पडतात. धर्माचा अभिमान हे मिरवतात, पण हिंदुधर्म हा आचारधर्म आहे हे तत्त्व विसरून स्वतः आचारभ्रष्ट असतात. राष्ट्रीय उन्नतीचे ऊहापोहात न्याय, दया आदि सनातन नीतितत्त्वांचे हे आव्हान करितात; पण

सामाजिक व धार्मिक विषयांचे संबंधात हीच तत्त्वे हे बेलाशक पायाखाली तुडवितात. दक्षिण आफ्रिकेतील इंडियनांस तेथील युरोपिअन अधिकारी वर्गानें आंखलेल्या जागेंत राहावयास भाग पाडले, म्हणजे हे ब्रिटिश साम्राज्याचे घटक या नात्याने समत्वाच्या वागणुकीची अपेक्षा करितात; पण हिंदु समाजाचे घटक या नात्याने महार मांगादि कनिष्ठ जातीस नुसत्या स्पर्शापुरताहि समत्त्वाचा हक्क देण्यास हे नाकारितात. वर्तमानपत्रांतून व भाषणांतून त्यांचा सारखा टाहो चाललेला असतो कीं, हिंदुस्थानांतील इंग्रजांचे राज्य अस्वाभाविक आहे; त्याचा पाया अनीतीवर रचलेला आहे; त्यांचे प्रजावात्सल्य लटके आहे; हिंदुस्थानचे लोक कमकुवत आहेत— बेवकूफ आहेत— पशुतुल्य आहेत— म्हणूनच इंग्लिशांचे हे अधर्माचे राज्य चालले आहे; पण ही स्थिति काही फार दिवस टिकावयाची नाहीं. ईश्वराचे घरी अन्यायाचा जय कधीही व्हावयाचा नाही. पण प्रसंग आला की, यांची राजनिष्ठा कडकडीत असावयाची. स्वराज्याची महती गावयाची असली म्हणजे यांना थेट रामराज्यापर्यंत धाव घ्यावी लागते. ज्ञानाची गोष्ट निघाली की, यांना प्राचीन ऋषीशिवाय मध्ये मुक्कामाची जागाच मिळत नाही. आमचे कर्तृत्व स्थापित करण्यास शिवाजी, बाजीराव, नाना फडणवीस वगैरे मराठे मुत्सद्दी मंडळींची साक्ष केव्हाही ठरलेलीच असते; पण अगोदर साताराची मराठेशाही ज्या पेशव्यांनी बुडविली आणि मग आपसांतील मत्सराने ज्यांनी पेशवाई बुडविली, अशा स्वामिद्रोही व आत्मद्रोही मंडळीचे साक्षीने आमची स्वराज्य भोगण्याची अपात्रता निर्विवाद सिद्ध होत असता, त्या गोष्टीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष्य करावयाचे. अशा बिनदेशी देशाभिमानी, धर्मविहीन धर्माभिमानी व अराजक राजनिष्ठ मंडळीत रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे

या सद्गृहस्थांचे नांव आताशा प्रामुख्याने पुढे येत आहे. हे गृहस्थ मुंबई युनिव्हर्सिटीचे पदवीधर आहेत; पण त्यांच्याच कबूली वरून असे स्पष्ट होते की, त्यांचे मनावर या शिक्षणाचा काही एक परिणाम झालेला नाही. हा कबूलीजबाब जर त्यांनी दिला नसता, तर जून महिन्याचे ग्रंथमालेत त्यानी प्रसिद्ध केलेल्या लेखांतील एकंदर विचारसरणीची संगतवार मीमांसा करणे फार कठीण गेले असते.

'कनिष्ट, मध्यम व उच्च शालांतील स्वानुभव' हा या लेखाचा मथळा आहे. आठव्या वर्षी धुळाक्षरास प्रारंभ केल्यापासून तो सव्विसावे वर्षी बी. ए.ची परीक्षा पास होईपर्यंतच्या अठरा वर्षांच्या आपल्या विद्यार्थी नव्हे–चुकलो–परीक्षार्थी–दशेतील स्वानुभव या लेखात रा राजवाडे यांनी ग्रथित केला आहे. हा स्वानुभव ज्या झोकाने लिहिला आहे, मधून मधून शिक्षणसंस्थांवर, त्यांतील शिक्षक वर्गावर व त्यात दिले जाणाऱ्या शिक्षणाचे पद्धतीवर ज्या टीका व जे उद्गार प्रकट झाले आहेत, त्यावरून पाहाता हा लेख लिहिताना रा. राजवाडे यांचा हेतु काय असावा याचे अनुमान सहज करतां येण्या-जोगे आहे. रा. राजवाडे हे कोणी महात्मे असून, या मृत्युलोकींच्या पुण्यभूमीत ताम्रमुखी म्लेंछ राजांनी स्थापित केलेल्या शिक्षणपद्धती-पासून आम्हा आर्यांचे कितपत हित अथवा अहित झाले आहे याचा स्वतः अनुभव घेऊन त्याचा 'रिपोर्ट' करण्यासाठीच आर्यावर्ताचे हितचिंतन करणाऱ्या समानशील महात्म्यांचे सभेतून त्यांची स्पेशल नेमणूक झाली असली पाहिजे, असा ग्रह निदान थिऑसॉफिस्ट मंडळींचा होण्याचा बराच संभव आहे. महात्म्यांच्या आस्तित्वा-विषयी ज्यांची मने अश्रद्धाळू आहेत अशा प्राकृत जनांस असे वाटण्याचा संभव आहे की रा. रा. राजवाडे हे एक अलौकिक

बुद्धीमान व्यक्ती असून, अगदी लहानपणासून त्यांचे लक्ष आम्हात रूढ असलेल्या शिक्षणपद्धतीचे सूक्ष्म निरीक्षण करण्याकडे वेधलेले असले पाहिजे. नाहीपेक्षा मराठी शिकण्यात घालविलेल्या तीन वर्षांपैकी ' फक्त दीड वर्षच काय तो मी शाळेत गेलो. बाकीची वर्षे माझी घरी धांगडधिंग्यात, विटीदांडूत, पोहण्यात, उड्या मारण्यात व मारमारी करण्यात गेली. दीडवर्ष मी दोनचार खेडेगावातील व शहरातील शाळांत होतो ' हे सांगण्यात दुसरा मतलब तो काय संभवतो ? ' या अवधीत अत्यंत उच्च प्रतीचे शिक्षण मिळालेला व द्रव्यावर दृष्टी न ठेविता केवळ स्वदेशांतील मुले उदात्त विचाराची, उदात्त कृति करणारी व स्वदेशावर प्रेम करणारी निपजावी, एवढ्याच हेतूने अध्यापकाचा धंदा आयुष्यभर नम्रपणे करणारा असा एखादा गुरु जर मला मिळाला असता, तर या तीन वर्षांच्या अभ्यासात माझी प्रगती मुंबईतील विश्वविद्यालयाच्या बी. ए. च्या इतकी झाली असती, असे मला आता वाटते. ' आठ वर्षांच्या मुलाची काय ही विशाल बुद्धी ! काय ही ग्रहणशक्ति ! ! काय ही धारणाशक्ती ! ! ! दुर्दैव या आर्यभूचे कीं निव्वळ अंधपरंपरेच्या चरकात दिव्य शक्तीचा जागचे जागीच चुराडा होऊन जावा ! ! ! ' शिवाय धर्मनिष्ठा, देशप्रीती वगैरे नैतिक गुणांचा उदय माझ्या ठायी किती झाला असता, त्याचा अंदाज आता मला व्यवस्थित करता येतो ' ; काय ही राष्ट्रीय हानि ! रा. राजवाडे यांनी आपला हा अंदाज गुप्त ठेवला नसता तर या हानीचे माप करण्यास सोपे जाते. पण ज्याअर्थी त्यांनी हा अंदाज प्रकट केलेला नाही त्याअर्थी असे करण्यात त्यांचा काहीतरी उदात्त हेतु असला पाहिजे, हे उघड आहे. आणि तो हा असावा कीं, अशा प्रकटीकरणाने आर्यावर्ताचे अगोदरच नाना विपत्तीनी निराश झालेले हतभागी हृदय जास्त कष्टी व निराश होऊ नये ! कोण ही प्रेमळ देशभक्ति ! ! काय हे अगाध मातृवात्सल्य ! ! !

पण येथे एक शंका येते; दीड वर्षांत दोन चार शाळा आपल्या अनुग्रहाने पुनीत करण्यात या बालबृहस्पतीचा हेतु केवळ वर वर्णिलेल्या पूर्णप्रज्ञ शिक्षकाचा शोध करण्याचाच होता काय ? अलबत नव्हता, हे त्याच्या आताच्या दुःखोद्गारांवरून उघड होते. मग अशा चंचल, उनाड, व ग्रामकुटाळास प्रत्यक्ष देवगुरूची जरी जोड मिळती तरी काय होते ?

ही मराठी अध्ययनाची अवस्था. पुढे रा. राजवाडे हे इंग्रजी उर्फ म्लेंच्छ विद्यामंदिरात प्रविष्ट झाले. ' न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि ' अशी कडकडीत आज्ञा करणाऱ्या सनातन धर्माची अवज्ञा अशा रीतीने आपल्या हातून घडल्याबद्दल रा. राजवाडे कष्टी झाल्याचे अगर कष्टी असल्याचे त्यांच्या या लेखात कोठेही नमूद नाही. तेव्हा या बाबतीपुरते सनातन धर्मास थोडेसे बाजूस सारण्यांत त्यांनी बराच मुत्सद्दीपणा दाखविला आहे, असें म्हणावे लागते. हे शिक्षणही रा. राजवाडे यांनी एकाच संस्थेत संपादिले नाही. सहा वर्षांत त्यांनी पाच शाळांचा अनुभव घेतला. ही शाळांतरेही त्यांनी काही बुद्ध्या केली नाहीत. प्रकृतीच्या अनुसंधानानें त्यांना ती सहजच घडली.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि

प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति ३३। अ० ३

— ज्ञानवान् पुरुषदेखील आपल्या प्रकृतीस अनुसरून वागतो. प्राणिमात्र आपापल्या प्रकृतीच्या वळणावर जातात. तेथे मनोनिग्रहाचे काय चालणार ?— या गीतावचनाबरहुकूम रा. राजवाडे यांची चंचल व चपळ प्रकृति त्यास जिकडे ओढून नेईल तिकडे जाणे त्यास प्राप्त होते. या चापल्यापासून, त्यास पुण्यातील तत्कालीन खासगी इंग्रजी शाळांच्या अंतःस्थितीची बरीच माहिती

झाली, असे ते सांगतात. 'ह्या माहितीपासून काय तात्पर्य काढावयाचे हे जरी त्याकाळी मला समजण्याची ऐपत नव्हती, तरी तिच्यापासून ह्या शाळासंबंधाने बरीच कीव माझ्या ठायी प्रादुर्भूत झाली.' हे त्यांचे म्हणणे खरे असो वा नसो, पण या भावी 'मराठ्या' देशभक्ताची पळपुटी प्रवृत्ति त्यावेळी कोणी निरीक्षिली असती, तर त्यास मात्र त्याची कींव आल्याविना राहिली नसेल, किंवा नसती, याबद्दल मुळीच शंका घेण्याचे कारण नाही. पण बेट्यांच्या लक्ष्यात यावयास पाहिजे होते कीं, एका शाळेतून दुसऱ्या शाळेत अशा लागोपाठ भराऱ्या मारणारे हे उडाणटप्पू पोर काही सामान्य नसले पाहिजे; तर ते अवतारी असून आपल्या अवतार–कृत्याच्या सिध्यर्थ त्याची ही पूर्व तयारी चाललेली आहे. कारण या पाच शाळांपैकी एकीसही त्यांनी आपण तीतून–प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा मान दिला नाही. तर 'चिपळूणकरांच्या शाळेत दहापंधरा दिवस जाऊन, नंतर प्रवेशपरीक्षेचा घरीच महिना दोन महिने अभ्यास करून १८८२ च्या जानेवारीत ती परीक्षा खासगी रीतीने' ते पास झाले. आणि याप्रमाणे रा. राजवाडे यांचे मध्यम शिक्षण संपले.

मग आमचे विषयनायक उच्च शिक्षणाचे मार्गास वळले. पहिली टर्म त्यांनी मुंबईचे 'एल्फिन्स्टन' कॉलेजात भरली. 'परीक्षेकरिता नेमलेल्या सर्व पुस्तकांचे आलोडन महिनापंधरा दिवसांच्या एकांत अभ्यासाने होण्यासारखे होते.' अर्थात् राहिलेल्या अकरा साडे-अकरा महिन्यांत अभ्यास करून करावयाचे काय? आणि म्हणूनच पहिल्या सहामाही टर्मात 'माझ्या ज्ञानात फारशी भर पडली असे वाटत नाही.' या रा. राजवाडे यांचे म्हणण्यावर आम्ही पूर्ण विश्वास ठेवतो. पुढे १८८४ चे जून महिन्यापर्यंत त्यास पैशाच्या व

इतर कारणांमुळे दुसरी टर्म भरण्याचे साधले नाही. पण प्रचलित शिक्षणपद्धतीचा अखेरपर्यंत स्वतः अनुभव घेऊन तो जगापुढे मांडण्याचे व तद्वारा जगास शहाणे करण्याचे आपले अवतारकृत्य अपुरते राहून मनुष्यकोटीची कधीही न भरून येणारी नुकसानी होईल अशा भीतीनेच जणुं काय रा. राजवाडे यांनी पुण्याचे डेक्कन कॉलेजात आपले प्रयोग पुनः सुरू केले. वर्गातील दहापाच व्याख्याने ऐकल्यावर प्रिलिमिनरी परीक्षेतून कसेबसे पार पडून त्यांना परीक्षेस जाण्याची परवानगी मिळाली. 'नंतर परीक्षेची' सर्व पुस्तके मी विकत घेतली; आणि महिन्याभराच्या अभ्यासाने पी. ई. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात पास झालो.'

अशा कुशाग्र बुद्धीचा मुलगा पुढील दोनही परीक्षा लागोपाठ पास होऊन जाईल असा जर त्यावेळी कोणी कयास केला असता, तर तो काही वावगा झाला नसता. पण रूढ मार्गाने जाण्याची प्राकृत जनाची जी मनःप्रवृत्ति तिचा धिःकार करण्याकरिताच ज्याचा अवतार, भाषा, पदार्थविज्ञान, तर्क, गणित वगैरे सामान्य जनास बारा महिने वाचूनहि अवघड वाटणारे विषय सहज लीलेने महिनापंधरावड्यात आपलेसे करण्याचा ज्याचा निसर्गतः अधिकार अशा विद्यापंचाननास घाई ती कशाला हवी? शत्रूचा मगदूर काय आहे हे एकदां ओळखले म्हणजे मग वीरास घाई करण्याचे काही प्रयोजन उरत नाही. शत्रु त्याचे दृष्टीने मेलेलाच असतो म्हणावयाचे. याच न्यायाने पुढील दोन साले सबंध कालेजात काढूनहि रा. राजवाडे एकहि परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत. या दोन सालांत त्यांच्या मनांत असा विचार आला की, पहिल्या व दुसऱ्या बी. ए. च्या परीक्षांना एकदम बसावे. दोनहि शत्रूंचा एकदम पाडाव करण्याची धमक त्यास अनुरूपच होती. 'परीक्षेच्या अगोदर एक महिना अभ्यास

करावयाचा. व्यर्थ बारा महिने परीक्षेची ती क्षुल्लक पुस्तके कुटीत बसावयाचे नाही–' हा त्यांचा संकल्प. परीक्षा म्हणजे युनिव्हर्सिटीची परीक्षा. पण म्हणतात ना—

'मनसा चिंतितं कार्यं दैवं चिंतयतेऽन्यथा' याप्रमाणे कॉलेजातील प्रिलिमिनरी परीक्षेच्या रूपाने रा. राजवाडे यांचे दैव त्यांचे संकल्पाचे आड आले. ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यासच युनिव्हर्सिटीचे परीक्षेस जाण्याची परवानगी मिळत असते. पण ही परीक्षा होते अगोदर दोन महिने. आणि ही परीक्षा होऊन निदान एक महिना झाल्याशिवाय पुस्तकास शिवावयाचे नाही ही तर राजवाड्यांची प्रतिज्ञा. मग हे प्रिलिमिनरी परीक्षेत पास व्हावेत कसे? बारा महिन्याचे काम महिना पंधरावड्यात करण्याची शक्ति सामान्य नव्हे. अशा अलौकिक शक्तीची उपपत्ति आम्हात तर अशी करण्याचा संप्रदाय आहे कीं, पूर्वजन्मी अशा मनुष्याची ती ती विद्या पूर्ण झालेली असते. अर्थात त्या विद्येकडे निमित्ताकरिता एकदा पाहिले की त्यास पूर्व स्मरण होते. पण निमित्ताकरिता म्हणून तरी या ग्रंथाकडे पहावे लागते. पण या निमित्तमात्र ग्रंथावलोकनाचीसुद्धा मदत घेणे म्हणजे आपल्या दिव्य बुद्धीवैभवाची अवहेलना करणे होय, अशा समजुतीने रा. राजवाडे अगदी कोरे असे प्रिलिमिनरी परीक्षेस बसले, आणि कोरेच्या कोरेच तीतून बाहेर पडले ! हा कार्यकारण भावाचा प्रभाव पाहून रा. राजवाडे तर चकितच होऊन गेले. काय चमत्कार आहे ! राजवाड्यांसारखा बुद्धीचा प्यारा काही एक अभ्यास न करिता परीक्षेस बसतो आणि परीक्षादेवी त्याचा धडधडीत अव्हेर करिते !! काय हे धाष्टर्य !!! या धाष्टर्याचे प्रायश्चित्त बिचाऱ्या प्रिलिमिनरी परीक्षेस अखेरीस मिळालेच. रा. राजवाड्यांनी पुढे केव्हाही तिची आराधना केली नाही. व

असल्या म्होरक्याच्या जाणूनबुजून केलेल्या अपमानाचे क्षालन करण्याची तिची संधि जी गेली ती गेलीच. खऱ्या लायकीचे जेथे चीज होत नाही, उलट बुद्धीपुरःसर अवमान होतो, अशा स्थळी राहणे शरमेचे आहे हे जाणून १८८७ च्या शेवटी रा. राजवाडे हे कॉलेज सोडून गेले. कॉलेजबाहेरच्या विद्यार्थ्यांस सहामाही, प्रिलिमिनरी वगैरे परीक्षांची आडकाठी बिलकुल नसल्यामुळे १८८८ साली ते पहिली बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. ते म्हणतात ' ह्या परीक्षेचा अभ्यास करण्यास मला वीस पंचवीस दिवस लागले.

पुढील वर्ष रा. राजवाड्यांनी भाव्यांच्या शाळेत वनस्पतिशास्त्र शिकविण्यात घालविले. या एका वाक्यात रा. राजवाडे यांच्या अलोट बुद्धिवैचित्र्याचे सर्वस्व साचले आहे. कारण वनस्पतिशास्त्र हा काही साधारण विषय नव्हे. आजवर दिलेल्या परीक्षांच्या संबंधाने त्यास हा विषय वाचण्याचा मुळीच प्रसंग नव्हता. शिवाय हा नुसता पुस्तकी नाही व तो सशास्त्र पद्धतीने शिकविण्याची सोय त्यावेळी व सांप्रतही कोठल्याच कॉलेजात नाही. असा कठिण विषय स्वतः संपादन करून दुसऱ्यास पढविण्याची पात्रता अंगी आणणे, आणि हे सर्व म्हणण्यासारखा किंवा मुळीच अभ्यास किंवा व्यासंग न करिता हा अद्‌भुत चमत्कार एक राजवाडेच करू जाणत. आपल्या लीलेने या दैवी चमत्काराचा प्रयोग भाव्यांच्या शाळेतील अभागी विद्यार्थ्यांवर सतत एक वर्ष केल्यावर १८९० साली रा. राजवाडे पुनः पूर्वस्थळी पातले. नंतर महिनाभर परीक्षेचा अभ्यास करून रा. राजवाडे एकदांचे बी. ए. बनले. ऐच्छिक विषय इतिहास, तो शिकविणारा कोणी नाही, कॉलेजात राहिले ते अभ्यासाकरिता नव्हे तर ' कॉलेजातील खोलीचा, हवेचा व जवळील नदीचा उपयोग करून तनदुरुस्ती करण्याचे उद्देशाने; असे असूनहि

केवळ महिन्याचे अभ्यासाने बिनचूक परीक्षा पास होणारा खंदा वीर राजवाड्यांसारखा राजवाडेच ! खरेंच आहे,–

गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः
रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ।

दुसरी उपमा मिळणार कोठे ?

स्वानुभव पुराणातील या परीक्षापर्वाचा उपसंहार करिताना रा. राजवाडे म्हणतातः ‘ १८८४ साली प्रथम मी डेक्कन कॉलेजात गेलो, त्यावेळी दर दोन दोन महिन्यांनी एकएक परीक्षा जर घेतली असती, तर या तिन्ही परीक्षा पहिल्या सहामाहीतच मी पास झालो असतो. ’ काय ही मर्यादा ! कोण हा विनय ! वास्तविक पाहाता त्यांना तीनही परीक्षांचा अभ्यास करण्यास अवघे दोन महिने व पंचवीस दिवस लागले असे त्यांनी वर सांगितलेच आहे. पण कदाचित् प्राकृत जनांला हे बुद्धितेज सहन होणार नाही, आणि ते खोडसाळपणाने अतिशयोक्तीचा आरोप आपल्यावर करितील असा पोक्त विचार करून रा. राजवाड्यांनी सहा महिन्यांची सवलत घेतली आहे. आणि अशा रीतीने–

विनयः खलु पौरुषालंकारः ।

हे कविकुलगुरूचे वचन खरें केले आहे, हे चाणाक्ष वाचकांच्या ध्यानात आलेच असेल. पुढे ते म्हणतातः ‘ परंतु सहा टर्मा, सहामाही व उपांत्य परीक्षा व मुंबईच्या फेऱ्या, अशा नाना प्रकारच्या खुळात सापडल्यामुळे, १८८४ पासून १८९० पर्यंत मला व्यर्थ रखडत रहावे लागले. ’ पण करणार काय ? उपाय नाही. जनकासारख्या महा ज्ञान्यास सुद्धा प्राक्तनाच्या फेडीकरिता संसारदुःखे सोसावी लागली. प्रारब्धाचे भोग भोगल्याविना क्षय पावत

नाहीत. हे काही स्वेच्छा-प्रारब्धाचे माहात्म्य नव्हे, तर परेच्छा व अनिच्छा प्रारब्धाचे हे सर्व खेळ आहेत. असा मनाशी विवेक करून रा. राजवाडे यांनी आपला गत गोष्टीबद्दलचा दुःखावेग आवरला पाहिजे. आणि तो तसा आवरण्याचा त्यांनी प्रयत्नही केला आहे, असे त्यांच्या पुढील वाक्यांवरून दिसते. ‘ ह्या रखडण्यांत इतके मात्र झाले कीं, माझ्या मनाला जे योग्य वाटले तेच मी केले; आणि कॉलेजा-तील खुळसट शिस्तीला बळी न पडता व मन व मेंदू यांना शैथिल्य व शीण न येऊ देता, जगात जास्त उत्साहाने काम करण्यास मी सिद्ध झालो.’ चोहोकडून संकटाचा मारा चालला असता, रूढि-देवता आपले मोहजाल पसरीत असता, लोकापवादरूपी राक्षस आ पसरून समोर उभा राहिला असता, कोणासही हार न जाता, एका मनोदेवतेस साक्षी ठेऊन, ‘ माझ्या मनाला योग्य वाटले तेच मी केले ’ असे म्हणण्याचा ज्यास सुसमय प्राप्त झाला, तो पुरुष धन्य होय. या आपल्या मनःपूत वर्तनात रा. राजवाडे यांनी आपल्या मेंदूस शीण व शैथिल्य येऊ न देण्याची पूर्ण खबरदारी घेतली, याबद्दल तर आम्हास तिळप्राय संदेह नाही. कारण, मेंदूस शीण येण्याजोगे काम करण्याचा प्रसंगच जर मेंदूवर राजवाड्यांनी आणिला नाही, तर मग तो शिथिल होणार कसा ? आमची तर पक्की खात्री होऊन चुकली आहे की, रा. राजवाड्यांचा मेंदू ते पहिल्याने मराठी शाळेत शिरले त्या वेळी जसा होता, तसाच ते बी. ए. झाल्यावरहि अविकृत व असंस्कृत राहिला तो राहिला. एरव्ही प्रस्तुत लेखाचा लाभ ग्रंथमालेच्या द्वारे महाराष्ट्रीयास आज होता ना. रा. राजवाडे हे तीन महिन्यांचे अभ्यासाने बी. ए. झाले, हे म्हणणे कोणासच खोटे वाटण्याचे कारण नाही. कारण, यद्यपि राजवाड्यांएवढ्या दांडग्या बुद्धीचे

राजवाडेच असे आम्ही वर म्हटले आहे, तथापि ज्ञानेश्वर महाराज अठरावे वर्षी समाधिस्थ झाले, श्रीशंकराचार्य हे बत्तिसावे वर्षी पंचत्व पावले, वगैरे स्वकीय इतिहासातील उदाहरणे, व कार्डिनळ वुलसे, पास्कल वगैरे परदेशीय इतिहासातील उदाहरणे ही त्यांचे जवळ जवळ येतील इतक्या योग्यतेची आहेत, असे म्हणण्यास आम्हांस कोणताही प्रत्यवाय दिसत नाही.

रा. राजवाड्यांचे ठायी एक गुण जो प्राधान्येकरून वसत आहे, तो विनय होय, हे वर आलेच आहे. बी. ए. पर्यंतचा तीन वर्षांच्या मुदतीचा म्हणून मानलेला विषयसमुच्चय आपण तीन महिन्यांचे आतील अभ्यासाने करतलामलवत् केला ही त्रिवार सत्य गोष्ट प्रायः स्थूलबुद्धीचे समाजास दर्पोक्तीची वाटेल असे त्यास वाटणे साहजिक होय. आणि म्हणूनच अशा मठ्ठ मंडळींची समजूत पाडण्यासाठी त्यांनी आपणाकडे एका दृष्टीने गौणत्व घेतले आहे. आपण कुशाग्रबुद्धि म्हणून परीक्षेच्या अभ्यासाकडे इतका थोडा वेळ दिला असे नव्हे, तर ज्या हेतूने लोक परीक्षा देतात तो हेतुच मुळी आपणास पसंत नव्हता, म्हणून त्याजकडे आपण दुर्लक्ष केले, असे रा. राजवाडे सांगतात. मतलब हा की, जर इतरांप्रमाणे परीक्षांची मातबरी रा. राजवाड्यांना वाटती तर त्यांचे प्रीत्यर्थ आपणांप्रमाणे त्यांनीही श्रम केले असते, अशी परीक्षार्थी व सदभिमानी प्राकृत जनांची समजूत पडून त्यांस समाधान वाटावे. याचे नाव खरा विनय. पण सत्य हे काही केल्या झाकले जाणारे नाही. एकीकडून दडपले तर ते दुसरीकडून आपले डोके वर काढतेच. त्याचप्रमाणे रा. राजवाडे यांनी आपणहि तुम्हांपैकीच एक मंदबुद्धि आहे अशी प्राकृत जनांची समजूत पाडण्याचा जो सद्भाविक प्रयत्न केला आहे, त्यातच त्यांचे लोकोत्तरत्व दिसते. त्यांच्या हेतूची भिन्नताच त्यांचेवर लोकोत्तरत्वाचा

ठसा मारिते. परीक्षा देऊन गुलामगिरी करणे हा प्राकृत जनांचा हेतु, केवळ विद्यार्जन करून स्वतंत्र धंदा करावयाचा हा राजवाड्यांचा हेतु. मग त्यांच्या मनातल्या ह्या हेतूला पुष्टीकरण देणारा स्नेही किंवा परीक्षार्थी वर्गात त्यांस मिळावा कसा? आणि तसा तो मिळाला नाही, असेच राजवाडे सांगतात. खरेच आहे. विद्याव्यसनी पुरुष घरोघरी थोडेच मिळणार आहेत! विद्येचे मर्म व हेतु जाणणारा 'ज्ञानी भवति वा न वा'. 'विद्या करून नोकरी मिळविणे हा मोक्ष नव्हे, विद्या केवळ ज्ञानार्जनाकरितां शिकावयाची' वगैरे सरस्वतीच्या एकान्त उपासनेचे उपदेशांचा भडिमार आमच्या तरुणावर थोडा का होत असतो? पण 'पालथ्या घागरीवर पाणी', किंवा 'नळी फुंकिली सोनारे' इ. इ.. या उपदेशाचे पवित्र बीज रुजण्यास रा. राजवाड्यांच्या सारखा खतावलेला मेंदूच पाहिजे होता. आमच्या देशाच्या भाग्याने हा अपूर्व योग घडून आला, आणि या महाप्रतापी विद्याव्रताची जोड आम्हास लाधली!

[ २ ]

राजवाड्यांच्या स्वानुभवपुराणाचा मुख्य कथाभाग येथवर झाला. या पुराणात ओघानेच काही आख्याने व उपाख्याने त्यांनी बेमालूम ग्रथित केली आहेत, इंग्रजी शिक्षणपद्धति, पुण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, एल्फिन्स्टन व डेक्कन कॉलेजातील अध्यापक वर्ग, वगैरे विविध विषयांचा उहापोह त्यांनी मनमुराद केला आहे. आत्मस्तुति, परनिंदा, मिथ्यारोप इत्यादि अनिष्ट गुणांचे समुच्चयेकरून प्रदर्शन येथल्यासारखे इतरत्र क्वचितच आढळेल. अहं पिशाच्चिकेने एकदा का पछाडले, म्हणजे मनुष्य कसा बेताल होतो, प्रमाण कसे चुकते, त्याच्या दृष्टीचे क्षितिज कसे संकुचित होते याचा उत्कृष्ट नमुना रा. राजवाड्यांनी महाराष्ट्रीयांस प्रस्तुत लेखाने सादर

केला आहे. असो, आता त्यांच्या प्रासंगिक उपाख्यांनाकडे वळूं; व प्रथमतः प्रचलित शिक्षणपद्धतीचे संबंधाने राजवाड्यांचे म्हणणे काय आहे, हे पाहू.

'इंग्रज सरकारने शाळाखाते सुरू केले, त्याचा मतलब उच्च, मध्यम व कनिष्ठ दर्जाचे नोकर तयार करण्याचा होता व आहे, असे १८३३ पासून १९०४ पर्यंतच्या शिक्षणखात्याचा वृत्तांत पाहिला असतां दिसून येते.' रा. राजवाडे यांनी हा आपला ऐतिहासिक सिद्धांत इतक्या संक्षेपाने ठोकून न देता, त्याचा जरासा विशेष खुलासा केला असता तर बरे होते. सरकारी शाळा कॉलेजातून निरनिराळ्या विषयांत पारंगत झालेल्या लोकांस सरकारी नोकऱ्या मिळाल्या, व मिळत आहेत, व पुढेहि मिळणार ही गोष्ट खरी. पण एवढ्यावरून सर्व शिक्षणपद्धतीचा मुख्य हेतूच नोकर तयार करण्याचा आहे, हे कसे निघते हे सहजी समजण्यासारखे नाही. त्याला राजवाड्यांच्या सारखी सखोल बुद्धीच पाहिजे. सुशिक्षित वर्गांपैकी काहीजणास सरकार नोकऱ्या देते म्हणून मूळ शिक्षणाचा हेतुच नोकर तयार करण्याचा आहे असे विधान करावयाचे तर मग अशा सुशिक्षित वर्गात राजवाड्यासारखी एकाददुसरी व्यक्ति निपजली. म्हणून अशा व्यक्ति पैदा करण्याकरिताच सरकाराने आपली शिक्षणपद्धति चालू ठेविली आहे, असेही विधान बिनदिक्कत ठेवून देणारा प्रतिराजवाडे भेटला तर त्यास आमचे राजवाडे काय उत्तर देतील बरे? सरकारी नोकरीस अगदी अनावश्यक असे कितीतरी विषय शाळांतून व कॉलेजातून शिकविले जातात, तसेच शिकविल्या जाणाऱ्या विषयांपैकी कितीतरी विषय परीक्षा पास झाल्याबरोबर विसरण्याचे असतात, हे राजवाड्यांस माहीत नाही काय? बेकनचे 'ॲडव्हान्समेंट ऑफ लर्निंग,' संस्कृत 'तर्कसंग्रह' या पुस्तकांस 'खुळसट' 'क्षुल्लक' हे

बहुमानवाचक किताब खुद्द राजवाड्यांनीच दिलेले नाहीत काय? राजवाड्यांचे मते हा हेतुही गौण दिसतो. वस्तुतः सरकारचा खरा हेतु बराच कावेबाजपणाचा आहे, असे दिसते. कारण राजवाडे निक्षून सांगतात कीं, या शिक्षणपद्धतीचा ' मुख्य हेतु इंग्रज लोकांविषयी, इंग्लिश संस्कृति ( Civilization ) विषयी व इंग्लिश आचारविचारांविषयी उमेदवारांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न करण्याचा आहे; उमेदवार जाडे विद्वान् व्हावे, व स्वदेशीय संस्कृतीविषयीं त्यांच्या ठायी परम आदर उत्पन्न होऊन तिचा जयजयकार करण्याकडे त्यांनी आपले तनमन आणि धन लावावे असा या पद्धतीचा दूरचाही हेतु नाही ! ' पण जगामध्ये कपट किती दिवस बरे उजळ माथ्याने वावरील? त्याचा स्फोट केव्हा तरी झालाच पाहिजे. गेली सत्तर वर्षेपर्यंत सरकाराचे हे कपट नाटक बिनबोभाट चालले. पण ' अलीकडील तीस पस्तीस वर्षांत सरकारी शिक्षणपद्धतीचे खरे स्वरूप व अंत्य हेतु एखाददुसऱ्या गृहस्थाच्या ध्यानात हळुहळू थोड्या फार प्रमाणाने येऊं लागला. ' असे राजवाडे सांगतात. या एखाददुसऱ्या दिव्यदृष्टि व्यक्तिपैकी एक व्यक्ति परलोकवासी विष्णुशास्त्री चिपळूणकर होत, असे राजवाड्यांचे स्पष्ट म्हणणे आहे. दुसरी व्यक्ति कोण याचा मात्र ते पत्ता लागू देत नाहीत. पूर्वी दर्शविलेला राजवाड्यांचा प्रधान गुण जो विनय, तो त्यांस पदोपदी नडतो याचे हे आणखी एक उदाहरण होय. पण त्यांच्या परवानगीची अपेक्षा न धरिता आम्ही प्रिय वाचकांस असे ठाम सांगतो कीं, या अद्भुत विभूतिद्वयापैकीं दुसरी व्यक्ति म्हणजे खुद्द राजवाडेच होत. आता मात्र लोकांच्या भ्रमाचा भोपळा फुटलाच म्हटला पाहिजे. सरकारच्या शिक्षण पद्धतीचे हिडिस स्वरूप व अनुदार हेतु याविषयी याउप्पर तिलप्राय तरी शंका घेण्याची कोणाची प्राज्ञा आहे काय?

स्वदेशाविषयी तिरस्कार व राज्यकर्त्यांच्या देशाविषयी आदर लोकांच्या मनात उत्पन्न करण्याच्या अपवित्र हेतूने अमलात आणलेली ही रामबाण युक्ति सरकारास सुचली कशी, हा एक महत्त्वाचा प्रश्न कल्पून त्याचे समाधानही राजवाड्यांनी केले आहे. ते म्हणतात की, सरकाराने ही परीक्षापद्धति चिनी लोकांपासून उचलली. ‘ उचलली असावी ’ असे ते म्हणत नाहीत, तर निश्चयेकरून उचलली, असेच त्यांचे आग्रहपूर्वक सांगणे आहे. हवाल्याचा अगर अनुमानाचा कारभार राजवाड्यांकडे नाही. त्यांचे सर्व काही आपले स्पष्ट व निश्चित. ‘ हिंदुस्थानासारख्या अनेक भाषा बोलणाऱ्या, अनेक धर्म पाळणाऱ्या, अनेक आचार चालविणाऱ्या, व अत्यंत नीच सामाजिक स्थितीपासून अत्यंत उच्च समाज व्यवस्थेपर्यंत शेकडो जाती असणाऱ्या देशात, देश व्यवस्थित चालण्यास व शांततेचे स्थैर्य होण्यास ही चिनी पद्धत उत्तमोत्तम आहे, असे चीन देशातील परीक्षापद्धति पाहून इंग्लिश मुत्सद्यांचे मत झाले.’ राजवाड्यांच्या या विधानास पुरावा काय म्हणून जर कोणी चौकस माणसाने पृच्छा केली, तर आम्ही त्यास पक्का पाखांडी म्हणण्यास बिलकुल कचरणार नाही. वेदवचनास पुरावा काय म्हणून विचारणे जसे बाष्कळपणाचे व अश्रद्धेचे, तसेच स्वयंप्रकाश व स्वतःप्रमाण राजवाड्यांच्या वर दर्शविलेल्या मताबद्दल जरी आम्हास राजवाड्यांचे विधान कबूल करणे प्राप्त झाले, तरी ते मत चुकीचे आहे, एवढे सांगण्यास आम्हास त्या मुत्सद्यांची किंवा त्यांचे हृद्गत केवळ अन्तःचक्षूने ओळखणाऱ्या राजवाड्यांची मुळीच भीति वाटत नाही. चिनी परीक्षापद्धति व आमचे येथील सरकाराची आवडती, पण राजवाड्यांची नावडती परीक्षापद्धती यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. चिनी परीक्षा वाङ्मयात्मक आहेत; वैद्यक, कायदा इंजिनिअरिंग वगैरे विविध विषयांच्या परीक्षा नोकरीच्या नियमानेसुद्धा

तिकडे घेत नाहीत. चिनी परीक्षांचे विषय म्हटले म्हणजे कनफूशियसचे नीतिग्रंथ, चीन देशाचा इतिहास व चिनी लिपीची कला हे होत. चिनी लोकांचे मते सर्व ज्ञान काय ते आपल्या प्राचीन ग्रंथात साठविले आहे. अर्थात या ग्रंथाचे पठण करणारा तो सर्वज्ञ. व कोणतेहि काम सर्वज्ञ करील ते उत्तम रीतीने करील, ही तर्कपद्धति बिनचूक नाही असे कोण म्हणेल? अशा पंडितास चिनी राज्यकारभारातील पाहिजे त्या हुद्यावर नेमितात. सेनापतीचे अथवा आरमारावरील अधिकाराचे जागी, तसेच इंजिनियरिंग इत्यादि खात्यावर सरसहा त्यांची नेमणूक होते. त्या त्या खात्याच्या विशिष्ट शास्त्रांशी व कलांशी त्यांचा बिलकुल परिचय नसतो. कारण या परिचयाची त्यास जरूरीच वाटत नसते. आमच्या शास्त्रांत सर्व काही आहे, अर्वाचीन शास्त्रीय शोध पाश्चात्यास नवे वाटोत, पण आमच्या परमपूज्य त्रिकालज्ञ प्राचीन महर्षींनी आपल्या तपोबलाने ते कधीच शोधून काढिले आहेत व आपल्या, प्रासादिक ग्रंथात जगाचे कल्याणाकरिता ग्रथित करून ठेविले आहेत, अशी मिथ्या भावना झालेली मंडळी आम्हातही काही थोडी नाहीत. अशा पुराणप्रिय मंडळीच्या आग्रहास्तव एखाद्या दशग्रंथी पंडितास जर एकदम इंजिन हाकण्याच्या कामावर नेमिले, तर त्या आगगाडीत त्यापैकी कितीजण बसण्यास तयार होतील, याचा अंदाज करणे काही फार कठिण नाही. आणि हीच स्थिति आजला चिनी लोकांची आहे. त्या देशाची संस्कृति अलीकडील हजार पाचशे वर्षांत अत्यंत स्थिर झाली आहे. तिला वाढ म्हणून बिलकुल नाही. याचे एक कारण ही त्यांची परीक्षापद्धति होय, हे राजवाड्यांचे विधान अक्षरशः सत्य आहे. पण ही पद्धति व आमचे येथील पद्धती या अगदी परस्परभिन्न आहेत, हे आता वाचकांच्या ध्यानात आलेच असेल. तेव्हा

इकडील पद्धति चिनी पद्धतीची नक्कल आहे व लोकांच्या प्रगतीस स्थिरता आणून त्यास नामर्द करण्याच्याच उद्देशाने ही नक्कल इंग्रजी मुत्सद्यांनी येथे उतरविली आहे, असे म्हणणे म्हणजे जाणून बुजून सत्यापलाप करणे होय, असे म्हटल्याशिवाय राहावत नाही. वस्तुस्थिति राजवाड्यांच्या विरुद्ध आहे, व इतिहासाचे त्यास पाठबळ नाही.

यावरून हल्लीची आपली एकंदर शिक्षणपद्धति पूर्ण आहे, तिच्यामध्ये व्यंग काहीच नाही, असे आम्ही प्रतिपादितो असे मात्र कोणी समजू नये. या पद्धतीतील व्यंगे काय आहेत व ती घालविण्याचे उपाय कोणते, इत्यादि प्रश्नांचे विवेचन येथे अप्रासंगिक होणार आहे. पण राजवाड्यांच्या मते उत्तम शिक्षणपद्धति ती कशी असली पाहिजे, याबद्दलचा शोध त्यांचे लेखावरून होण्याजोगा आहे की काय, याचा विचार करणे प्रासंगिकच नव्हे, तर अत्यंत जरूर आहे. राजवाड्यांस सांप्रतच्या पद्धतीत चांगुलपणाचा अंशही दिसत नाही. तेव्हा ही देशहितास विघातक अशी पद्धति जर आज बंद केली, तर तिची जागा भरून काढून खरे देशहित साधणारी एकादी नवी पद्धति राजवाड्यांच्या बगलेत असली पाहिजे, अशी आशा बाळगणे काही वावगे नाही. पण दुःखाची गोष्ट की, राजवाड्यांच्या पन्नास पानी स्वानुभवाचे बाडात या नूतन पद्धतीचा मागमूसही नाही. बाकी या पद्धतीचे शाब्दिक दिग्दर्शन त्यांनी जागजागी केले आहे. राष्ट्रोत्तेजक अशी ती असली पाहिजे, स्वदेशातील मुले उदात्त विचाराची, उदात्त कृति करणारी व स्वदेशावर प्रेम करणारी निपजावी असा तिचा प्रभाव असला पाहिजे, वगैरे मोघम व मोहक वर्णने काही कमी नाहीत. पण ही स्पृहणीय राष्ट्रीय प्रगति कशी घडवून आणावयाची या परम गुह्याचे स्फोटन न होऊ देण्याविषयी

त्यांनी फारच काळजी घेतली आहे. ‘ प्रसिद्ध देशभक्त पण बंडखोर ’ वासुदेव बळवंत फडके यांनी इतर काही गृहस्थांच्या मदतीने पुण्यात एक शाळा काढिली होती. ‘ ही शाळा काढण्यात त्यांचा एवढाच हेतु होता की, शाळेतील मुले उत्तम देशभक्त निपजावीत; ’ असे राजवाडे म्हणतात. परंतु हा उदात्त विचार अमलात आणावयाची फडक्याची पेटंट पद्धति कोणती याविषयी ते काहीच माहिती देत नाहीत. पुढे ‘ विद्वत्तेने व मनोरचनेने राष्ट्रहित साधण्यास लायक ’ अशा विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी ‘ न्यू इंग्लिश स्कूल ’ काढिले. ‘ देशभक्त, विद्वान्, कार्यकर्ते, विचारवंत, आचारवंत, धर्मशील, उद्योगी, साहसी असे लोक निर्माण करण्याचा उदात्त हेतु या विद्वान् चालकाच्या नव्या शाळेचा प्रथमारंभी होता. पण राजवाडेच सांगतात की, अशा या राष्ट्रोत्तेजक शिक्षणाची सुरवात शास्त्रीबुवांच्या हयातीत मुळीच झाली नाही. या लहानशा अवधीत इतर सरकारी व खासगी शाळा जे काम करीत होत्या, तेच शास्त्रीबुवांच्या नवीन शाळेने केले. सारांश, या ‘ महानुभावांच्या ’ विशाल डोक्यातील उदार कल्पना त्यांचे डोक्याबरोबरच लयास गेली. राजवाडे मोठ्या कष्टाने सांगतात–या धोरणाचे संपूर्ण स्वरूप कोणत्या प्रकारचे असणार होते, ते कळण्यास योग्य मार्ग उरला नाही. शाळेचे वळण, स्वरूप, वृद्धि वगैरे कोणत्या प्रकारची असावी, यासंबंधाने त्यांच्या हातचे लेखी टिपण वगैरे होते की काय, ते त्यांच्या साथीदारांना कदाचित् माहीत असले तर असेल, इतरांना त्याची काही एक बातमी नाही. पण राजवाडे पडले इतिहासंशोधक. ते एवढ्यावर थोडेच उगी बसणार! त्यांनी चिपळूणकरांच्या काही निनावी स्नेह्यांस गांठून त्यांच्या धोरणाची थोडीबहुत दिशा निश्चित केल्यासारखे केले आहे. ती दिशा अशी : ‘ सरकारी धोरणाने चालणाऱ्या

लोकशिक्षणाहून किंचित् निराळी अशी शिक्षणपद्धति प्रारंभी सुरू करून, उत्तरोत्तर सरकारी लोकशिक्षणाहून पूर्णपणे भिन्न अशी शिक्षणपद्धति, वर्तमानपत्रद्वारा, व्याख्यानद्वारा, आणि ग्रंथ व निबंध यांच्या साहाय्याने, लोकमत तयार करून प्रचलित करावयाची असा शास्त्रीबुवांचा विचार होता.' या शब्दजालातून पार पडून आपण काय अर्थबोध संपादिला अशी वाचकांस साहजिक शंका येईल, असे जाणून राजवाडे भाष्यरूपाने त्याचा अर्थ करितात– 'म्हणजे इंग्रजी शिकण्याचे व्यसन लोकांना जे अतोनात लागले होते, त्याच्या छंदाने प्रथम इंग्रजीतून ज्ञान द्यावयाचे; व नंतर जसजसे लोकमत बदलेल तसतसे जास्त जास्त मराठीतून शिकविण्याला सुरवात करावयाची; आणि सरकारी नोकरीकरिता मॅट्रिकचा अभ्यास करण्यापासून लोक जसजसे परावृत्त होत जातील, तसतसे इतर व्यवसायांना उपयोगी पडेल असे शिक्षण मराठीतून प्रचलित करावयाचे.' इतके भाष्य करूनही राजवाड्यांना स्वतःलाच शास्त्रीबुवांच्या या अटोकाट धोरणाचे पूर्ण ग्रहण करिता येईना. आणि म्हणून शेवटी ते शेरा मारतात की, 'असा काहीसा बेत होता.' राजवाड्यांसारख्या पठ्या वीरासही ज्याची मर्यादा व व्याप्ति समजण्याची मारामार, तेथे मग इतरांची कथा ती काय! सर्व राष्ट्रीय आधिव्याधींचा नायनाट करून राष्ट्राच्या अंगात नवीन जोम व तेज उत्पन्न करणाऱ्या या अमोघ शिक्षणपद्धतीचे अगदीच त्रोटक स्वरूप जे राजवाड्यांनी दाखविण्याचा यथामति प्रयत्न केला आहे, त्यावरून शिक्षणाचे विषय प्राचीन विद्येचे असावयाचे, किंवा अर्वाचीन–अर्थात् पाश्चात्य उर्फ म्लेंच्छ विद्येचे असावयाचे याचा नीटसा बोध होत नाही. पाश्चात्य विद्येच्या अंगी असा एक अवगुण आहे की, तिच्या साहचर्याने प्राचीन विद्या अंमळ प्राचीन वाटूं लागतात. त्यांचे महत्त्व व उपयोग प्राचीन काळी होते

याविषयी अर्वाचीन विद्या मुळीच तक्रार करीत नाही. पण सांप्रतकाळी सांप्रतच्या विद्यांचे महत्त्व व उपयोग विशेष आहे असा तिचा अभिप्राय आहे. तेव्हा नोकरीशिवाय इतर व्यवसायांना उपयोगी असे जे शिक्षण देण्याचा विष्णुशास्त्र्यांचा संकल्प होता ते धंदेशिक्षण पौर्वात्य किंवा पाश्चात्य पद्धतीचे याचा खुलासा जरूर पाहिजे होता. जर शिक्षण परदेशी तर मग ते देशी भाषांतून दिल्यानेच त्याचा परकीयपणा कसा जातो व त्याचे अंगी 'प्रतिष्ठित, शीलवंत व देशभक्त' असे पुरुष निर्माण करण्याची अजब शक्ति कशी व कोठून येते याचाही खुलासा होणे जरूरीचे होते. पाश्चात्य शास्त्रीय शोधांची माहिती झाली की, तिचेबरोबर ते शोध करणाऱ्या महा पंडितांविषयी व शोध शक्य करून देणाऱ्या नैतिक, धार्मिक व सामाजिक परिस्थितीविषयी थोडाफार पूज्यभाव उत्पन्न होतोच होतो. आणि त्या मानाने आपल्या परिस्थितीविषयी विषाद वाटू लागतो. मग आपल्या संस्कृतीविषयी जयजयकार करण्याची सदिच्छा या शिक्षणापासून व्हावी कशी? व राजवाड्यांच्या 'मराठ्या' मनोराज्याचे पर्यवसान वस्तुस्थितीत व्हावे कसे?

साधारणपणें अशी रीत आहे की, दुसऱ्या गृहस्थाविषयी बोलताना अगर लिहिताना बहुवचनाचा उपयोग करावा. मग तो गृहस्थ आपल्यासमोर हजर असो वा नसो, तो जिवंत असो वा नसो. किंबहुना तो मृत झाल्यावर त्याचा नामनिर्देश करणे झाल्यास तो बहुवचनी करण्याचा शिष्ट संप्रदाय आहे. पण राजवाडे ह्यांस हा शिष्टाचार उघड पसंत नाहीसे दिसते. कारण जेथे जेथे म्हणून त्यांनी विष्णुशास्त्र्यांचा उल्लेख केला आहे, तेथे तेथे त्यांनी प्रायः एकवचनाचा उपयोग केला आहे. आता या प्रकारच्या शिष्टाचारास एका प्रसंगी मात्र अजीबात फांटा मिळतो. मनुष्याचे बाबतीत जो

प्रकार अशिष्ट तोच प्रकार परमेश्वराचे संबंधाने शिष्ट मानिला आहे. विष्णुशास्त्र्यांस देवस्थानी कल्पून जर एकेरीने त्यांचा नामोच्चार राजवाडे करीत असतील तर मग आमचे काही म्हणणे नाही!

शास्त्रीबुवांच्या मरणापासून आपल्या मनावर झालेल्या परिणामाचे वर्णन करिताना राजवाड्यांनी जो अचरटपणा केला आहे, त्याला कांही सीमाच नाही. ‘मरण हे मनुष्याची प्रकृति आहे, ही गोष्ट तोपर्यंत माझ्या अनुभवास आली नव्हती. तारुण्याच्या मुशीत जगताच्या या तीरावर वैर व निभ्रांत हिंडत असतां, जेथून कधी कोणी परत आला नाही त्या तीराची मला कल्पनाच नव्हती. सर्व मनुष्ये व प्राणी अमर आहेत, अशी माझी अस्पष्ट भावना होती. ह्या भावनेला शास्त्रीबुवांच्या मृत्यूने जबर धक्का बसला.’ भगवान् बुद्धाच्या चरित्रात असे सांगितले आहे की, बुद्धाच्या जन्मकाली त्याच्या पित्याने त्याचे जातक वर्तविले. ज्योतिर्विदांनी भविष्य वर्तविले की, राजपुत्र चक्रवर्ती होईल किंवा बुद्ध ज्ञाता होईल. मात्र तो जर बुद्ध होण्याचा असेल तर चार पूर्वचिन्हे दिसतील. ती चार चिन्हे म्हणजे—एक म्हातारा, एक आजारी, एक प्रेत, व एक ब्रह्मचारी. शुद्धोदन राजास आपल्या मुलाने चक्रवर्ती होणे जास्त इष्ट होते. यास्तव वरील चार प्रकार राजपुत्राच्या नजरेस न पडण्याची त्याने पराकाष्ठा केली. पण त्याचा सर्व बंदोबस्त व्यर्थ जाऊन ऐन तारुण्याचे भरात त्या राजपुत्रास ही चारी पूर्वचिन्हे भविष्याच्या अनुक्रमाने दिसली, व त्यास बोध होऊन त्याने सर्वसंगपरित्याग केला; व मनुष्यकोटीस कडकडीत वैराग्य व निष्कलंक पावित्र्याचा धडा घालून दिला. या इतिहासाची

पुनरावृत्ति आज अडीच हजार वर्षांनंतर भगवान् बुद्धाच्या जन्मभूमीत व्हावी हे हिंदुस्थानचे व विशेषतः महाराष्ट्राचे थोर भाग्य म्हटले पाहिजे. अठरा वर्षांचे वयात एकही आजारी, वृद्ध व मृत मनुष्य ज्याच्या नजरेस पडला नाही, अशा पुरुषाच्या पुण्याईची थोरवी कोठवर वर्णावी? जर अशातला एकादा प्रकार आपल्या या बालबृहस्पतीच्या नजरेस येता तर त्याने आपल्या तीक्ष्ण बुद्धीच्या जोरावर या संसाररूपी पुरातन कोड्याचा कायमचा निकाल लाविला असता, यात आम्हास तरी काही संशय वाटत नाही. पण मानवी प्राण्याचे दुर्भाग्य सवाई शिकंदर. आणि म्हणूनच शास्त्रीबुवांच्या निधनवृत्ताने राजवाड्यांच्या भोळ्या भावनेस जबर धक्का बसण्यापलीकडे काही झाले नाही.

राजवाड्यांच्या पुराणातील आणखी एक अद्‌भुत प्रकरण म्हटले म्हणजे पुण्याच्या 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'वरील त्यांची विस्तृत टीका होय. या सोसायटीवर राजवाड्यांचा पहिला आक्षेप असा आहे की, –ती सोसायटी आहे, म्हणजे ती एक कायदेशीर नोंदविलेली संस्था आहे. ते म्हणतात, 'कोणतीहि संस्था कायदेशीर रीतीने सरकारात नोंदविली व जाहीर केली असता तिला राजमान्यत्व व स्थैर्य येते, अशी एक कल्पना आपल्या लोकात बरीच पसरली आहे.' तेव्हा राजवाड्यांच्या मनाने लोकांची ही कल्पना चुकीची आहे असे त्यांच्या लिहिण्याच्या झोकावरून दिसते. दुसरा आक्षेप असा आहे की, या सोसायटीने सरकारच्या मदतीच्या आशेस बळी पडून आपले स्वातंत्र्य गमावले. सरकारास या संस्थेच्या सद्धेतूसंबंधाने जबर संशय आला होता. व प्रो. वर्डस्वर्थ साहेबांनी तर या मंडळीस युरोपातील जेसुइट लोकांची उपमा दिली होती. तेव्हा आंग्लोइंडियन मंडळी ही संस्था नरम कशी करिता येईल या विवंचनेत होतीच. आंग्लो-

इंडियनांचे धूर्त राजकारण व मंडळीची द्रव्याशा व कॉलेज काढण्याची हाव याचा मिलाफ होऊन शास्त्रीबुवांनी काढलेल्या नव्या धोरणाचा अंत झाला. त्यांचा संस्थेवर आणखी एक आक्षेप असा आहे की, सोसायटीच्या मेंबर लोकांनी जो स्वार्थत्याग केला म्हणून म्हणतात, (स्वतः राजवाड्यांस अर्थात् हे म्हणणे मान्य नाही.) त्याचा हेतु उदार शिक्षणाचे भपकेदार नावाखाली सरकारी नोकर तयार करण्याचा असल्याने तो असत्कारणी केला. हा स्वार्थत्याग तर खराच. पण राजवाड्यांचे मते तो कवडीमोलाचा ठरतो. खऱ्या स्वार्थत्यागाची व्याख्या राजवाड्यांनी अगदी बरोबर केली आहे. ते म्हणतात, 'देशाच्या हिताकरिता ज्याने आपले नुकसान करून घेतले किंवा सर्वस्वावर पाणी सोडले, त्याने स्वार्थत्याग केला हे म्हणणे यथास्थित शोभते. देशाचे कोणतेही हित न करिता ज्याने आपले थोडे बहुत नुकसान करून घेतले, त्याने स्वार्थत्याग केला असे कोणीही म्हणत नाही. त्याने अज्ञपणाने आपले नुकसान करून घेतले, असेच लोक म्हणत राहतील! हा सोसायटीच्या सभासदांचा मूर्खपणा त्यांचे पुरताच असता तर राजवाड्यांनी त्याची तिरस्कार-पूर्वक कीव केली असती. पण त्यांचे मते हा मूर्खपणाचा स्वार्थत्याग करून या माथेफिरू मंडळींनी देशावर घोर संकट आणिले आहे. राष्ट्रातील तरुणांना नोकरीशिवाय इतर कोणत्याही स्वतंत्र धंद्याने पोट भरण्याचे माहीत नाहीसे झाले आहे. आणि त्याचे योगाने एक राष्ट्रीय संकट ओढवले आहे. तेव्हा सोसायटीच्या स्वार्थत्यागाबद्दल तिचा गौरव तर राहोच; पण तिच्या मूर्खपणाबद्दल कीव करण्याची सुद्धा पात्रता तिची नाही. इतकेच नाही तर एका भयंकर राष्ट्रीय संकटाची साहाय्यकारी या नात्याने ती राष्ट्राची महापराधी आहे. हे राष्ट्रीय संकट दूर करण्याच्या पोक्त विचारानेच हल्ली

लॉर्ड कर्झन साहेबानी युनिव्हर्सिट्यांचा नवीन कायदा केला, असे राजवाड्यांचे मत दिसते. अर्थात् लॉर्ड कर्झनसाहेबांनी या कायद्याने राजवाड्यांच्या राष्ट्रभक्त कंपूस आपले कायमचे ऋणी करून ठेवले आहे असे म्हटले पाहिजे. ज्या कायद्याच्या संबंधाने हिंदुस्थानातील सुशिक्षित लोकमत अगदी उलट होते तोच कायदा खऱ्या देशहिताचा आहे, असे त्यावेळी राजवाड्यांनी जर निक्षून प्रतिपादिले असते तर लोकनियुक्त सभासदांच्या अन्तःकरणात चक्क उजेड पडला असता. आणि राष्ट्रीय संकटनिवारणाच्या या कायद्याबद्दल त्यांनीं लॉर्ड कर्झनचे धन्यवाद गायिले असते व लॉर्ड कर्झनचे हे दूरदर्शी धोरण चटकन ओळखून त्याची ओळख आपल्या अज्ञ देशबांधवास करून देऊन त्यांच्या फजितीचा प्रसंग वेळीच टाळणाऱ्या महामुत्सद्दी राजवाड्यांस त्यांनी आपला अनभिषिक्त राजा केले असते. पण राजवाड्यांचा प्रकृतिगुण जो विनय तो या प्रसंगीहि त्यास आडवा आला, आणि हिंदुस्थानातील शहाणे म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांस राजवाड्यांच्या 'विचारी व देशभक्त' कंपूच्या तिरस्कारास पात्र होण्याचा प्रसंग आला. उच्च शिक्षण मुळातच नसता त्याच्या पीछेहाटीबद्दल शोक करण्याच्या अगोदर डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या इतिहासाचे अध्ययन ना. गोखल्यानी करायचे होते, असा राजवाड्यांचा अभिप्राय आहे. पण राजवाड्यांच्याच शब्दांनी ना. गोखल्यांचे प्रतिउत्तर जर असे आले की, जो इतिहास मुळातच नव्हता त्याचे अध्ययन न केल्याबद्दल कोणासहि दोष कोण शहाणा देईल? तर राजवाडे काय म्हणतील बरे? आपल्या आयुष्यातील सुमारे वीस वर्षे ना. गोखल्यांनी सोसायटीत घालविली, हे खरे. पण त्यांना सोसायटीचा गूढ इतिहास अवगत व्हावा कसा? सोसायटीचा हा अन्तःस्थ अस्सल इतिहास

सोपपत्तिक रीतीने लोकासमोर मांडण्याची स्फूर्तीच मुळी आमच्या प्रस्तुत इतिहासकारास अम्मळ उशिराने झाली, यात ना. गोखल्यांचा अपराध तो काय? या उपर जर ना. गोखले आपलेच मत खरे म्हणून जगासमोर मिरवितील तर मात्र राजवाड्यांनी त्यांची बिलकुल परवा न करितां, त्यांचे गो मुखी व्याघ्र स्वरूप 'देशभक्तांपुढे' मांडण्यास बिलकुल कसूर करू नये, अशी आमची त्यांस सूचना आहे. आयत्या वेळी आपली विनयशीलता पुढे करून आमचे राजवाडे त्यांचेकडे काना डोळा करतील, आणि लोक पुन्हा भ्रमचक्रांत सांपडतील, म्हणून ही सूचना मुद्दाम केली आहे. तिचा अनादर होणार नाही, अशी उमेद आहे. सोसायटीचा इतिहास लिहिण्याची स्फूर्ति राजवाड्यांस वक्तशीर झाली नाही, असे वर म्हटले आहे. पण विचारान्ती असे वाटते कीं, ही स्फूर्ति त्यांस झालेली असावी. पण त्यांची नैसर्गिक विनयशीलता नेहमीप्रमाणे त्यांच्या हेतूचे आड आली असावी. हिंदुस्थानातील एकंदर सुशिक्षित वर्ग एकीकडे आणि आमचे दिव्यदृष्टि इतिहासकार राजवाडे एकीकडे, असा अपूर्व प्रकार देशबांधवांच्या नजरेस पाडून, आपला गौरव करून घेणे, व प्रत्यक्ष लाटसाहेबांचे व त्यांच्या अनुरोधाने यच्चयावत् ब्रिटिश साम्राज्याचे लक्ष्य आपल्याकडे वेधून घेऊन,

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेन-
माश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति
श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥

या भगवदुक्तीत वर्णिल्याप्रमाणे जगाची अवस्था संमूढ करून सोडणे हे राजवाड्यांसारख्या विनयसंपन्न महापुरुषाच्या हातून घडावे कसे?

[ ३ ]

येथवर झालेल्या विवेचनावरून रा. राजवाडे म्हणजे काही सामान्य प्रकरण नव्हे हे वाचकांच्या लक्ष्यात आले असेलच. त्यांची गाढी विद्वत्ता, जाडा चौकसपणा, निरंकुश तर्कशास्त्र, अनावर आत्मश्लाघा, अप्रासंगिक परनिन्दा, अगाध स्वयंमन्यता यापैकी एकेका गुणाच्या तडाख्यात सापडल्यासहि मनुष्य जेरीस येण्याचा दृढ संभव आहे. मग या सर्वांचा समुच्चय झाल्यावर काय विचारा-वयाचे? आमच्या वाचकांचीहि स्थिति अशी झाली असेल हे आम्ही पूर्णपणे जाणून आहोत. पण त्यांना येथवर आणल्यावर पुराणाच्या शेवटापर्यन्त नेऊन पोहोचविणे हे आमचे कर्तव्य असल्याने त्यानी आणखी काही वेळ दम धरावा अशी त्यांस नम्र विनंती आहे.

दुर्निवार परीक्षांचे जू झुगारून देऊन, शिक्षक वर्गास धाब्यावर बसवून, राजवाड्यांनी स्वतःच्या हिंमतीवर अगाध ज्ञान संपादिले. त्यामुळे प्रचलित शिक्षणपद्धतीने जे एक प्रकारचे मानसिक दौर्बल्य येते व कर्तृत्वशक्तीचा जो ऱ्हास होतो तो आपल्या ठायी फारसा झाला नाही असे राजवाडे सांगतात. येथवर केलेल्या राजवाड्यांच्या मनोरचनेच्या मीमांसेवरून त्यांच्या मानसिक दौर्बल्याचे मापन कोणासहि सहजी करता येणार आहे.आणि त्यांची आजवर काही कर्तृत्वशक्ति दिसून आली आहे ती जुनी ऐतिहासिक पत्रे व याद्या प्रसिद्ध करण्यात व उपोद्घात लिहिण्यात. परीक्षा पद्धतीने पास झालेल्या पदवीधरात व यदृच्छेने पास झालेल्या राजवाड्यांत मानसिक दौर्बल्य व कर्तृत्व-शक्तीच्या संबंधाने भेद कोठे, कसा व का करावयाचा, याची फोड राजवाड्यांनी चांगली करावयास पाहिजे होती. वर दर्शविलेले राजवाड्यांचे प्रकृतिगुण जर मानसिक प्राबल्य व कर्तृत्वशक्तीचे निदर्शक मानावयाचे तर मग परीक्षापद्धतीने पार पडलेले पदवीधर

स्वतःसिद्ध राजवाड्यांसमोर काहीच नव्हत असेच म्हणणे भाग आहे. त्यांच्या विद्यार्थिदशेत त्यांना खोड काय ती एक लागली होती; ती खोड म्हणजे इंग्रजी बोलण्याची व इंग्रजी लिहिण्याची. बाराव्या वर्षा-पासून सव्वीसाव्या वर्षापर्यंत या भयंकर खोडीने त्यास पूर्ण ग्रासले होते. 'शाळेत व कॉलेजात प्राचीन व अर्वाचीन मराठी ग्रंथांशी शिक्ष-कांनी व परीक्षांनी माझी क्षणभरहि ओळख करूं दिली नाहीं.' हे राजवाड्यांचे विधान जरासे विसंगत दिसते. शाळेतील व कॉलेजातील शिक्षकवर्गाची आपणास धड ओळखहि नसे, व परीक्षां-करिता तर आपण केव्हाहि मेहनत घेतली नाही, या दोन गोष्टी-बद्दल त्यांनी जागोजाग स्वतःची प्रौढी गाइली आहे. मग शिक्षकांनी व परीक्षांनी कट करून राजवाड्यांस मराठी वाङ्मयाची वार्ताहि कळू दिली नाही हा आरोप कसा संभवतो कोण जाणे ! ते कसेहि असो, राजवाड्यांना हे इंग्रजी भाषेचे व्यसन जडले खरें. दुसरा एकादा कच्चा मातीचा विद्यार्थि असता तर त्याचेवर पुढे कोणते दारुण प्रसंग ओढवले असते याचे चित्र राजवाड्यांनी फारच बहारीचे रेखाटले आहे. सहानुभूतीच्या जोरावर ते प्रसंग स्वतःवर कल्पून राजवाडे म्हणतातः— 'हे तीन ग्रंथ ( हे कोणते ते पुढे येईल. ) जर माझ्या दृष्टीस न पडते तर आज मी कुंट्यांच्या-सारखी इंग्रजींत व्याख्याने देण्यास, सुरेन्द्र नाथांप्रमाणे बूट पाटलोण घालून देशाभिमानाची पत्रे काढण्यास, किंवा सुधारकांप्रमाणे बायकांना झगे नेसविण्याच्या ईर्षेस खचित लागलो असतो !' पण महद्भाग्य या देशाचे की, असले काहीच चमत्कार राजवाड्यांच्या हातून घडले नाहीत. कुंट्यांच्यासारखी इंग्रजीत व्याख्याने देण्याची पात्रता अंगी असणे, सुरेन्द्रनाथांच्यासारखी पत्रे काढण्याची धमक असणे या काय सामान्य विपत्ती म्हणावयाच्या ? पण जगाचा

कारभार काय उफराटा आहे पहा! हेच कुंटे व सुरेंद्रनाथ यांचे सप्रेम कौतुक करण्यास आमचे लोक आपले सदा तत्पर! विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या टीकात्मक निबंधांनी इंग्रजीच्या या खग्रासापासून माझा बचाव केला. काव्येतिहास संग्रहाच्या ऐतिहासिक पत्रांनी स्वदेश म्हणून काही आहे, हे मला कळले व परशुरामपन्त गोडबोले यांनी छापिलेल्या काव्यांनी महाराष्ट्रसारस्वताचा मला अभिमान वाटू लागला!' पण हे साक्षात्कार राजवाड्यांना केव्हा व कसे झाले याचा नीटसा पत्ता लागत नाही. सतत पंधरा वर्षे बारा आणि बारा चोवीस तास राजवाड्यांची सर्व कामे इंग्रजीत चालत, तेव्हा स्वत्वाचा हा प्रकाश राजवाड्यांच्या म्लेंच्छमय अंतःकरणात त्यांनी कॉलेज सोडल्यावर बऱ्याच अवकाशाने पडला असावा असे दिसते? कारण, प्रस्तुत लेखकास, डेक्कन कॉलेजातील डिबेटिंग सोसायटीत झालेले, देशी कपड्यांच्या चळवळीच्या संबंधाने राजवाड्यांचे जिनसीवाल्या थाटाचे वाक्पांडित्य, समग्र इंग्रजीत झालेले ऐकिल्याचे स्मरते. आणि ही गोष्ट १८९१ सालात घडली. तेव्हा निदान हे भाषण होईपर्यंत तरी राजवाड्यास वरील उपरति झाली नव्हती असे म्हणावे लागते.

एलफिन्स्टन व डेक्कन कॉलेजांतील अध्यापक वर्गाच्या गुणावगुणांची जी विचिकित्सा राजवाड्यांनी केली आहे ती बहुतेक न्याय्य आहे, असे म्हणावे लागते. पण काही स्थळी त्यांच्या स्वभावगुणाने त्यांना आणखी घेरल्याचे दिसून येते. प्रो. करकरे यांच्या अध्यापनापासून आपणास काही फायदा झाला नाही, असे सांगून राजवाडे म्हणतात, 'मात्र जेजुरी नगरातल्या यक्षकिन्नरांच्या तोंडातील कित्येक रागरागिण्यांचे ज्ञान आपणास झाले.' प्रोफेसर करकरे यांस तमाशे व नाटके पाहण्याचा नाद बराच असे. पण या नादापासून संपादिलेल्या

रागरागिण्यांचे गुंजारवपद्धतीने प्रदर्शन विद्यार्थिवर्गासमोर त्यांनी कधी केलेले प्रस्तुत लेखकास स्मरत नाही. मग राजवाड्यांसारखा सहृदय मराठा श्रोता मिळाल्याने, प्रोफेसर साहेबांची आपले रागनैपुण्य दाखविण्याची स्फूर्ति कधीकधी प्रबळ होऊन तिच्या झटक्यात ते वर्गात आलाप काढीत असल्यास न कळे! राजवाड्यांच्या अनुदार मनाची, इतिहासानभिज्ञतेची व खोडसाळपणाची खूण पटविणारा आणखी एक प्रसंग वाचकांस हवा असल्यास त्यांनी केलेल्या डॉ. भांडारकरांच्या वर्णनात त्यास तो सांपडेल. ‘मत्स्याहार केल्याने बुद्धीला जोम येतो, मांसाहाराने श्रमसहिष्णुता येते, वगैरे मते ब्राह्मण विद्यार्थ्यांच्यापुढे कधी कधी डॉक्टर प्रतिपादित असत.’ डॉक्टर भांडारकर हे जातीने सारस्वत ब्राम्हण आहेत. दाक्षिणी अगर ‘मराठे’ ब्राम्हणात या सारस्वत ब्राम्हणांचा समावेश होत नाही. दक्षिणी ब्राम्हण पंचद्रविडात मोडतात, तर सारस्वत ब्राम्हण पंचगौडांतर्गत होत. दुसरा भेद म्हटला म्हणजे हा की, सारस्वत ब्राम्हण हे मत्स्याहारी म्हणून प्रसिद्ध आहेत; व दक्षिणी ब्राम्हण आपणास निवृत्तमांस म्हणवितात. या व इतर ऐतिहासिक कारणांनी दक्षिणी ब्राम्हण व सारस्वत अगर शेणवी ब्राम्हण या वर्गात कोठे कोठे परस्पर प्रेम फारसे आढळून येत नाही. इतर ब्राम्हण मंडळीस कोणत्याहि बाबतींत हार जाणारी ही जात नव्हे. तेव्हां सारस्वतांचे वर्म काय ते मत्स्याहारात राहिले. पण निवृत्तमांस हे काही ब्राम्हणत्त्वाचे आद्य अगर प्रधान लक्षण नव्हे हे काश्मिरी अगर बंगाली ब्राह्मणांची ज्यास माहिती आहे, त्यास सांगणे नलगे. अशी वस्तुस्थिति असून दक्षिणी ब्राम्हण मंडळी सारस्वत ब्राम्हणास ब्राह्मणेतर वर्गात घालण्याची एकहि संधि चुकूनसुद्धा गमावीत नाही, हे लक्षण कशाचे बरे? ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या पुढे मत्स्याहाराची महती

डॉक्टर गात असत असे सांगण्यात, डॉक्टर साहेबांचे ब्राम्हणत्व राजवाड्यास मान्य नाही हे उघड होते. राजवाड्यांचे हे इतिहासाचे अज्ञान, वस्तुस्थितीची बेपर्वा व व मानसिक वक्रता पाहून कोणासही सखेदाश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. शेणवी हे ब्राम्हणेतर तर ठरलेच. तेव्हा त्यास चातुर्वर्ण्यातील कोणत्या सदरांत घुसडून द्यावयाचे हे ठरविण्याची जबाबदारीहि जणु आपल्यावरच आहे, अशा बुद्धीने राजवाड्यांनी नुकतीच शेणवी शब्दाची व्युत्पत्ती प्रसिद्ध केली आहे. म्हणजे 'शेणवई' हा शब्द 'सेनापती' या शब्दाचा वंशज धरून शेणव्यास त्यांनी क्षत्रिय बनविले आहे! कलियुगात क्षत्रियांचे अस्तित्वच नाही असे प्रतिपादन करणाऱ्या धर्माभिमान्यांनी आता मौनच धरिले पाहिजे; नाहीपेक्षा प्रसंग आहे राजवाड्याशी! इतिहासशास्त्री राजवाडे व्युत्पत्तीशास्त्री बनल्यावर मग असे विपरीत प्रकार होऊ नयेत, तर मग ते व्हावे केव्हा व कोणाकडून? शेणवी हे ब्राह्मण असोत वा क्षत्रिय असोत; शेणवी प्रोफेसरांनी ब्राह्मण विद्यार्थ्यांसमोर मत्स्याहाराची प्रौढी गाणे इष्ट असो वा अनिष्ट असो, प्रस्तुत प्रश्न असा आहे की, डॉक्टर भांडारकर अशा रीतीचे प्रतिपादन वर्गात करीत किंवा नाही? या संबंधी उत्तम पुरावा म्हटला म्हणजे स्वतः डॉक्टर साहेबांचा. पण राजवाड्यासारख्या माथेफिरू वावदुकाच्या आरोपास उत्तर देऊन त्यास नसते महत्त्व देण्यास डॉक्टरसाहेब तयार होतील असे वाटत नाही. शिवाय त्यानी उत्तर दिले तरी ते आरोपीच्या जबानीच्या लायकीचे असे म्हणण्यास राजवाडे कमी करणार नाहीत. प्रस्तुत लेखकाचा पुरावाही जात्यभिमानाने दूषित ठरणार. म्हणून राजवाड्यांचे समकालीन अशा दहा पाच लोकांस गाठून डॉ. भांडारकरावरील या आरोपा संबंधाने त्यांचे म्हणणे काय आहे याची त्याने चौकशी केली. त्यावरून असे स्पष्ट

होते की, राजवाड्यांचा हा आरोप केवळ कल्पनामय आहे. राजवाड्यांचे हे सहाध्यायीही दक्षिणी ब्राह्मण आहेत, एवढे सांगितले म्हणजे त्यांच्या पुराव्याची मातब्बरी सहज कळून येईल. मग राजवाड्यासारखा तरतरीत मेंदूच्या उमेदवार गड्यास पाहून त्याने जर मत्स्यमांसाहार केला तर ' अधिकस्याधिकं फलम् ' या न्यायाने त्याच्या बुद्धीचा जोम दुणावेल या सद्धेतूने प्रेरित होऊन, व 'शिष्यादिच्छेत्पराभवम्' या गुरूच्या महत्वाकांक्षेस अनुसरून डॉक्टर-साहेबानी राजवाड्यास एकांती गाठून त्यास आपल्या बुद्धिमत्तेचे गुह्य सांगितले असल्यास नकळे ! प्रस्तुत लेखकाचा पुरावा बेभर-वंशाचा संभवत असला, तरी तो अगदीच अग्राह्य होणार नाही. डॉक्ट-रांच्या हाताखाली डेक्कन कॉलेजात त्याने दोन वर्षे घालविली आहेत. या अवधीत राजवाडे वर्णितात अशा प्रकारचा टारगटपणा भांडार-करांकडून एकही दिवस झालेला त्यास माहीत नाही. या त्याचे विधानासही त्याच्या सहाध्यायी दक्षिणी ब्राह्मणमित्रांचे पूर्ण अनुमोदन आहे, हे कळविण्यास त्यास फार आनंद होतो.

जाता जाता कॉलेजातील युरोपियन शिक्षकांवर थोडासा चिखल राजवाड्यांनी उडविला आहे. ' चिखल फेकीत असावे; कारण तो थोडासा तरी चिकटेल ' अशा मतलबाची एक इंग्रजीत म्हण आहे. तिचा व्यावहारिक उपयोग राजवाड्यांनी जसा करून घेतला आहे, तसा इतरत्र क्वचितच आढळेल. ' कॉलेजातील शिक्षकांच्या मते माफक दारू पिणे, बूटपाटलोण घालणे, स्वधर्माप्रमाणे न चालणे, स्वभाषा विसरणे, ही काही पापे गणिली जात नसत.' बूटपाटलोणांचे महा पातक राजवाड्यांच्या दृष्टीने केवळ अक्षम्य दिसते. सुरेंद्रनाथांच्या वर्तमानपत्र काढण्याच्या पातकाबरोबर या पातकाची सांगड राज-वाड्यांनी वर घातलेलीच आहे. माफक दारू पिणे, हे युरोपियनांत

निषिद्ध नाही, हे खरे. पण आपल्या हाताखालच्या हिंदु विद्यार्थ्यांनी आपले या बाबतीत अनुकरण करावे, असे कोणाही युरोपियन प्रोफेसराने प्रतिपादिलेले राजवाडे सांगतील काय? किंवा माफक दारू पिणारा एखादा विद्यार्थी युरोपियन प्रोफेसरास आढळून आल्यावरही त्याने त्याचा निषेध न करिता त्याजकडे कानाडोळा केला व अशा रीतीने अप्रत्यक्षतः दारूबाजीस प्रोत्साहन दिले, असे सांगण्याचे राजवाड्यांस धैर्य आहे काय? उलटपक्षी विद्यार्थिवर्गापैकी काही देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्यानी एका प्रसंगी 'पिक् मी अंप्'चे पान केल्याप्रकरणी प्रि. सेल्बी यांनी या मंडळीस कसे कडक शासन केले, हे राजवाड्यांच्या श्रुतिपथावर आले नसेल असे आमच्याने म्हणवत नाही. स्वधर्माप्रमाणे न चालण्याचा उपदेशही कधी कोणी केलेला नाही, व अधर्माने चालण्याचा कित्ताही कोणा युरोपियन प्रोफेसराने विद्यार्थिवर्गासमोर मांडलेला नाही, हे राजवाडे नाकबूल करितील काय? विद्यार्थ्यांच्या खासगी वर्तनावर जेवढा दाब परकीयांनी ठेवणे शक्य आहे तेवढा दाब डेक्कन कॉलेजात राजवाड्यांच्या वेळी नव्हता, असे म्हणणे वस्तुस्थितीस अनुसरून होणार नाही. स्वधर्मावर अश्रद्धा व स्वभाषेचा तिरस्कार या दोषांबद्दल परधर्मी व परभाषी प्रोफेसरांस जबाबदार कोणत्या तत्त्वांवर धरावे, हे समजणे कठिण आहे. या दोषांकडे त्यांचे लक्ष लागत नसे हे काही खोटे नव्हे. पण त्याचे कारण मात्र राजवाड्यांनी दाखविलेले नव्हे. दुसरे असे की, युरोपियन व देशी अध्यापकवर्गाचे गुणावगुणांची चर्चा करण्याचा अधिकारच मुळीं राजवाड्यास पोचत नाही. कारण कोणत्याही व्यक्तीच्या गुणावगुणांचा आढावा काढण्याचे अगोदर त्या व्यक्तीचे विचार, उच्चार व आचार यांचे सातत्याने निरीक्षण करणे अत्यंत जरूरीचे आहे. नाहीपेक्षा त्यांचे

संबंधाने बसविलेला अंदाज एकदेशीय अतएव नादार व बाष्कळ होतो. तसाच प्रकार आमच्या राजवाड्यांच्या चर्चेचा झाला आहे. वर्गातील शिक्षकांच्या व्याख्यानास ते प्रायः कधी जात नसत, व बाकीचा आपला वेळ तालीम, वर्तमानपत्रांचे वाचन, नौकायान, गप्पाष्टक व धूम्रपान अशा महत्त्वाच्या गोष्टीकडे जात असे, असे त्यांनी स्वतःच सांगितले आहे. मग शिक्षकवर्गाची व त्यांची गांठ पडावयाची केव्हां, व त्यांच्या गुणदोषांचे तात्त्विक निरीक्षण करण्याची संधि राजवाड्यांना सांपडावयाची कशी? अर्थात् या बाबतीत त्यांस बहुतेक भिस्त आपल्या सुपीक मेंदूवरच ठेवणे भाग पडले आहे.

डेक्कन कॉलेजातील अध्यापक वर्गाचा यथेच्छ समाचार घेऊन नंतर राजवाडे कॉलेजच्या इमारतीकडे वळले आहेत. या इमारतीच्या संबंधाने त्यांची पहिली तक्रार अशी आहे की, ती अपशकुनी जाग्यावर बांधलेली आहे. कारण 'खडकीची जी लढाई झाली म्हणून म्हणतात–' हे शब्द खुद्द राजवाड्यांचे होत – व जीमुळे मराठी राष्ट्राचा अंत झाला, ती याच स्थळी झाली, आणि आमचे राजवाडे म्हणजे 'मराठेपणा' ची साक्षात् मूर्ति. मग त्यांचे 'मराठी' मन या अभद्र जागेवर उभारलेल्या इमारतीत रमणार कसे? शिवाय इमारतीत तरी 'गोंडसपणा किंवा मराठपणा' आहे म्हणावा तर तसेहि नाही. गोंडसपणा म्हणजे काय हे वर्णिता न आले तरी तो दृष्टिग्राह्य आहे. पण इमारतीचा 'मराठपणा' तो कसा असावयाचा, याची फोड राजवाड्यांनी करावयाची होती. शिवाय गोंडसपणा किंवा मराठपणा असे म्हटल्याने, हे गुण परस्पर भिन्न असावेत, असा राजवाड्यांचा मतलब संभवतो. तेव्हा 'मराठपणा'च्या इमारतीस 'गोंडसपणा'ची जरूरी आहे किंवा नाही, याचे

स्पष्टीकरण अवश्य होते. राजवाड्यासारख्या अन्तर्बाह्य मराठ्याचे दृष्टीस जेव्हा ही इमारत पहिल्याने पडली तेव्हा ते एक तासभर खदखदा हसले यात नवल ते काय? स्थानमहात्म्याने अंतःकरणात उद्भवलेली मराठ्यांच्या नष्ट वैभवाची सखेद स्मृति व इमारतीचे ते हिडिस व अमंगळ स्वरूप, याहीकरून एक तासच काय पण आमरण विकट हास्य करीतच राजवाडे राहिले असते, तरी त्यास कोणीहि दोष देता ना. राजवाड्यांच्या मनःसंतापाचा आवेग अशा रीतीने एका तासाच्या हसण्याने गेला म्हणून बरे, नाहीतर आजला डेक्कन कॉलेज नामशेष झाले असते, व आमच्या मराठ्या राजवाड्यांचे नाव, फडके, चाफेकर इत्यादि प्रसिद्ध मराठी देशभक्तांचे पटात कधीच नोंदले गेले असते.

झाले. राजवाड्यांचे स्वानुभवपुराण एकदाचे संपले. आतां त्यांच्या भरतवाक्याचा निर्देश करून व उपसंहारादाखल दोन शब्द सांगून, आपल्या या अद्वितीय मराठ्या वीराची व प्रिय वाचकांची रजा घेऊ. 'ह्या शिक्षणपद्धतीपासून स्वतंत्र विचाराचा मनुष्य निर्माण होणे अत्यंत कठीण आहे; आणि स्वतंत्र आचाराचा निघणे तर मुळीच अशक्य आहे.' स्वानुभवपुराणाचा हा निष्कर्ष राजवाड्यांनी स्वतःच काढिला आहे. राजवाड्यांची सत्यभक्ति इतकी प्रखर आहे की, इंग्रजीच्या खग्रासापासून ज्यांनी त्यांचा वेळीच उद्धार केला, अशा त्रिमूर्तींनासुद्धा वरील विधानाच्या अपवादात घालण्यास ते तयार नाहीत. पण स्वतंत्र विचाराची व आचाराची त्यांची व्याख्याच तशी करारी आहे. ते म्हणतात, 'स्वदेशाचा इतिहास व स्वदेशाची राजनीति, स्वदेशाचे अर्थशास्त्र व स्वदेशाचे समाजशास्त्र निर्माण करून स्वदेशातील देशभक्त गुरुवर्य जेव्हा स्वतंत्र विद्यालये, एका कवडीकरताहि सरकारच्या मिंधेपणा न पतकरता काढतील, तेव्हा

विचाराने व आचाराने स्वतंत्र असे देशहितकर्ते शिष्य खचित निर्माण होतील.' ही नवीन स्वदेशसृष्टि निर्माण करण्याच्या कामी परदेशी विद्येची मदत घ्यावयाची किंवा नाही; सध्याच्या परकीय अंमलाखाली ही इष्ट गोष्ट घडून येणे शक्य आहे किंवा नाही; नसल्यास प्रथम परकी अंमल झुगारून देण्याचा राजवाड्यांचा विचार आहे की काय; स्वदेश म्हणजे महाराष्ट्र समजावयाचे किंवा आसाम-ब्रह्मदेशासहित समग्र हिंदुस्थान समजावयाचे; या व असल्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांचा उलगडा अगोदर झाला पाहिजे. तोपर्यंत ही राजवाडी प्रतिसृष्टि म्हणजे प्रचलित देशभक्तिरूप विषमज्वराच्या भावनेने संतप्त होऊन, उन्मादवायु प्राप्त झालेल्या कमकुवत व निकस मेंदूचे असंबद्ध बरळणे होय, असे धरून चालण्यास राजवाडे परवानगी देतील अशी आशा आहे.

प्रस्तुतची शिक्षण पद्धती निर्दोष आहे असे कोणीही प्रतिपादणार नाही. तीत कितीतरी दिशांनी सुधारणा झाली पाहिजे. तसेच वाङ्मय, वैद्यक, कायदा वगैरे विषयाप्रमाणे धंदेशिक्षणासही राष्ट्रीय शिक्षणपद्धतीत प्राधान्य मिळाले पाहिजे, तरच ही शिक्षणपद्धती पूर्ण होईल. या दोषाकडे विचारी लोकांचे लक्ष आता लागले आहे. व सरकारचे मत या दिशेने वळविण्याचे प्रयत्नही चालू आहेत. लोकांची प्रगति जसजशी होत जाईल तसतशी त्या प्रगतीची साधनेही बदलत गेलीच पाहिजेत. इंग्लंडमधील ऑक्सफर्ड व केंब्रिज या प्राचीन विद्यासंस्थातून दिले जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणातसुद्धा सुधारणा होणे जरूर आहे, असे तिकडे जोराचे लोकमत होऊ लागले आहे. विद्येच्या कामात अग्रस्थानी मानलेल्या जर्मनीतही रोज नवे नवे प्रयोग शिक्षणपद्धतीत होत आहेत. पण हे काम फार विचाराचे व श्रमाचे आहे. राजवाड्यासारख्या बेफाम देशभक्ताकडून

या देशकार्यास मदत होण्याचे दूरच. उलट सत्प्रयत्नाचे आड येऊन ते करणाऱ्या इमानी लोकांचा वेळी अवेळी आपल्या आचरटपणाने पाणउतारा करण्याचे अश्लाघ्य व अपवित्र काम या देशभक्तांनी करण्याचे तहकूब केले तर मिळविली म्हणायचे. असो, विषयाच्या ओघाने प्रस्तुत लेखकाकडून फाजील कडक भाषेचा उपयोग केला गेला आहे, हे तो जाणून आहे. आणि याबद्दल तो रा. राजवाड्यांची व वाचकांची क्षमा मागत आहे. राजवाड्यांसारख्या कडव्या मराठ्याच्या हातून क्षमेची अपेक्षा करणे साहसाचे आहे, हेही तो जाणून आहे. पण वाचकांची तर क्षमा आहे— व ती असणार, याबद्दल शंकाच नाही—तर मग असल्या आडमुठ्या मराठ्याच्या क्षमेची किंवा क्रोधाची तो लवमात्रही पर्वा करणार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ८११६४ वि.
क्रमांक १३६१ नों. दि. २६/८/६८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७४४७

REFBK-0014481